00058215

891.21
Mor/Mah
58215

TO BE ISSUED OUT
HOUT PERMISSION.

00058215

Digitized with financial assistance from

Ms.Swati Thakar

on 13 March, 2020

2845/1949

KÂVYASANGRAHA. 16.

THE MAHÂBHÂRATA

OF

MOROPANTA

(THE GREAT MARÂTHÎ POET OF THE MAHÂRÂSHTRA.)

"True poem is a gallery of pictures."

SIR JOHN LUBBOCK.

58215

4. VIRÂTAPARVA.

58215

EDITED WITH

CRITICAL AND EXPLANATORY NOTES

BY

VÂMANA DÂJÎ OKA,

HEAD MASTER, HIGH SCHOOL, RAIPORE.

PRINTED AND PUBLISHED

BY

TUKÂRÂM JÂVAJÎ,

PROPRIETOR OF JÂVAJÎ DÂDAJÎ'S "NIRNAYA-SÂGARA" PRESS.

Bombay.

1896.

Price 14 *Annas.*

ORI 891.21
Mor | Mah
56215

(Registered under Act XXV of 1867.)

[All rights reserved by the publisher.]

काव्यसंग्रह. १६.

151

महाराष्ट्रकविवर्यमोरोपंतकृत

महाभारत.

४. विराटपर्व.

म्यां श्रीमयूरकविपरि न परिसिला सकल कवि महीवरता, ।
साजेना कां तैशा त्या कविला सकलकविमहीवरता ? ॥

ROYAL LIBRARY OF THE BOMBAY BRANCH OF THE ROYAL ASIATIC

हें

वामन दाजी ओक,

हेडमास्तर, हायस्कूल, रायपूर;

यांनीं अनेक हस्तलिखित प्रतींवरून शुद्ध करून, अर्थद्योतक, साहित्यशास्त्रविषयक व अवांतर माहितीच्या टीपा देऊन, चार परिशिष्टें जोडून तयार केलें,

आणि

मुंबईत जावजी दादाजी यांच्या 'निर्णयसागर' छापखान्याचे मालक तुकाराम जावजी यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

१८९६.

किंमत १४ आणे.

PX-Q 57

महाराष्ट्र भाषेचें आणि कवितेचें

आस्थापूर्वक अध्ययन

करूं पाहणाऱ्या सज्जनांस

हा ग्रंथ

सप्रेम अर्पण करतों.

'काव्यसंग्रह'कार.

अनुक्रमणिका.

अध्याय.	विषय.	ग्रंथसंख्या.	पृष्ठांक.
१	पांडवांचा अज्ञातवास, धौम्यमुनिकथित परगृहवास-नीति, धौम्याचें द्रुपदपुरास जाणें, शमीवृक्षावर पांडवांचा अस्त्रन्यास, विराटनगरप्रवेश, विराट-गृहीं धर्म, भीम, द्रौपदी, अर्जुन, सहदेव, न-कुल यांचा वास, ब्रह्मोत्सव, जीमूतवध, कृष्णा-व्रत, कीचकसैरंध्रीसंवाद, कीचकगृहीं सैरंध्रीचें आगमन, कीचककृत द्रौपदीविटंबना, भीमानें केलेलें द्रौपदीचें आश्वासन, द्रौपदीपरिदेवन, द्रौपदीभीमसंवाद, कीचकवध, उपकीचकवध.	१९१	१–४२
२	दुर्योधनाला कीचकवधकथन, पांडवांचा शोध, कर्णदुःशासनसंवाद, अज्ञातवासाचा अल्पअ-वधि, द्रोण, भीष्म व कृप यांचें भाषण, दक्षि-णगोग्रहण, सुशर्मप्रयाण, विराटाचा समरोद्योग, विराटसुशर्मयुद्ध, भीमहस्तें सुशर्मपराभव, वि-राटाचा जयघोष.	७९	४३–९८
३	उत्तरगोग्रहण, उत्तराशीं गोपालांचें संभाषण, उत्त-राची समरार्थ जाण्याची तयारी, बृहन्नडासारथ्य, कौरवसैन्यावर हल्ला करण्यासाठीं उत्तर दिशेस जाणें, उत्तराचें भय आणि पलायन, भयग्रस्त उत्तराचें आश्वासन, शमीवृक्षस्थ अस्त्रस्वरूपक-थन, अर्जुनस्वदेशनामनिरूपण, क्लीववेषत्याग; उत्तरार्जुनसंवाद, अस्त्रस्मरण, अस्त्रप्रकटन, गांडीवगुणठणत्कार.	१२४	९९–८२
४	अर्जुनरथस्मरण, देवदत्तशंखनाद, वैराटीची भीति, अर्जुनागमनाविषयीं द्रोणाचा तर्क, दुर्योधन-वाक्य, उत्पातदर्शन, दुर्योधनकृत द्रोणाचार्य-स्तुति, द्रोणाचार्यवाक्य, अर्जुनरथदर्शन, अर्जुन-वर्णन, अर्जुनशंखनाद, अर्जुनाचें कौरवसैन्यावर		

अध्याय.	विषय.	ग्रंथसंख्या.	पृष्ठांक.
	निंदा, कर्णविकत्थन, कृपकृत कर्णनिंदा आणि अर्जुनस्तुति, द्रौणिवाक्य, द्रौणिकृत कर्णनिर्भर्त्सना व पार्थप्रशंसा, भीष्माचें सांत्वनपरभाषण, भीष्मदुर्योधनसंवाद, गोधनासह दुर्योधनाचें स्वपुराप्रत आगमन, व्यूहरचना, पार्थाचा दुर्योधनावर हल्ला, धेनुनिवर्तन, कर्णापयान.	९७	८२–१००
९	अर्जुनकृपयुद्ध, युद्धदर्शनार्थ देवांचें आगमन, कृपापयान, अर्जुनाचा द्रोणचरणीं प्रणाम, द्रोणार्जुनयुद्ध, द्रोणपराभव, द्रौण्यर्जुनसमर, द्रौणिपराभव, कर्णार्जुनसमर, कर्णार्जुनांचा सोपालंभसंवाद, कर्णाचें पुनरपयान, भीष्मपराभव, अर्जुनदुःशासनयुद्ध, संकुलयुद्ध, कर्णकृपद्रोणांचें अर्जुनाशीं पुनः युद्ध, त्यांचा पराभव, भीष्मार्जुनयुद्ध, भीष्माची मूर्च्छा.	९२	१०१–१२०
१०	दुर्योधनार्जुनयुद्ध, विकर्णार्जुनयुद्ध, विकर्णाचें समरांगणापासून पलायन, सुयोधनापयान, अर्जुनकृत सुयोधनाधिक्षेप, कर्णभीष्मादिकांचें दुर्योधनास साहाय्य, संमोहनास्त्रप्रयोग, मूर्च्छित कौरवांच्या वस्त्रांचें हरण, कौरवांचा पराभव, कुरुसैन्याचें प्रत्यागमन, अर्जुनाचें गोधनासहनिवर्तन, देवदत्तशंखजयघोष, अर्जुनाचें योषावेषपरिधान, शमीवृक्षावर आयुधांचें स्थापन, कुरुमर्दनाची व गोधनमोचनाची विराटास बातमी, विराटयुधिष्ठिरादिसंवाद, दूतमुखें उत्तरविजयकथानिवेदन, नगरोत्सव, सोत्सव उत्तराचा पुरप्रवेश, विराटधर्माची अक्षक्रीडा, कृष्णाकृत द्यूतनिंदा, धर्मकृत द्यूतनिर्भर्त्सना, द्यूतप्रसंगीं विराटकृत उत्तराची प्रशंसा, धर्मकृत बृहन्नडास्तव,		

अध्याय.	विषय.	ग्रंथसंख्या.	पृष्ठांक.
	विराटकोपोद्दीपन, धर्ममस्तकीं अक्षप्रहार, नासिकारक्तप्रवाह, उत्तराचें बृहन्नडेसह आगमन, उत्तरमुखें स्वविजयसत्यकथन, विराटोत्तरसंवाद.	१२४	१२१–१४
७	पांडवप्रकाश, स्ववेषपरिधान, विराटभ्रमनिरास, विराटक्षमायाचना, उत्तरेचा सुपार्थ अंगीकार, रामकृष्णद्रुपदादिकांचें आगमन, अभिमन्युविवाहोत्सव. उपसंहार.	३७	१४३–१९१

एकंदर ग्रंथसंख्या ७४०

परिशिष्टें.

अनुक्रमांक.	परिशिष्टनाम.	पृष्ठांक.
१	पाठभेद	१–६
२	अधिक टीपा	७–२१
३	मूळाचें शुद्धिपत्र	२२–२४
४	टीपांचें शुद्धिपत्र	२५–२८

सूचना.

परिशिष्टें तयार करण्याच्या कामीं आम्हास अनेक 'काव्यसंग्रह'हितैषी जनांनीं सप्रेम साहाय्य दिलें. श्री० गणपतराव हरिहर उर्फ बापूसाहेब कुरुंदवाडकर, रा० रा० दत्तात्रय घनश्याम सबनीस, केशव विश्वास फणसे, सदाशिव मोरेश्वर भिडे, मोरो गणेश लोंढे, गोविंद बळवंत आणेराव, बी. ए., रामचंद्र विष्णु सोमण, नागनाथ केशव गोडबोले, गोविंद विष्णु श्रीखंडे, गोपाळ भीमराव कुळकर्णी, विनायक दाजी बेहरे, कृष्णाजी नरहर वाडीकर, नारायण बाळकृष्ण प्रभु देसाई, विनायक शिवराम खरे, रामचंद्र जगन्नाथ बर्वे, प्रो० श्रीधर विष्णु परांजपे बी. ए., नागपुरास असणारे आमचे जुने विद्यालयीन वयस्य व कै० बळवंतराव कृष्ण इनामदार (राजोपाध्ये) यांनीं अर्थनिर्णायक टीपांतील दोष, छापील प्रतींतील अशुद्धें, दुर्बोध आर्यांचा अर्थ, शंकांचें समाधान इत्यादि प्रकरणीं लेख पाठविले व रा० रा० रघुनाथ रामचंद्र मुजुमदार, गोपाळ भीमराव कुळकर्णी व कै० बळवंत कृष्ण इनामदार यांनीं आपणापाशीं असलेल्या हस्तलिखित प्रतींशीं छापील मत ताडून पाहून पाठभेद कळविले; यास्तव या सर्वांचे आभार मानून व 'वारंवार असेंच साहाय्य करावें' अशी अत्यंत नम्रतापूर्वक विनंति करून हा सूचनालेख पुरा करितों.

'काव्यसंग्रह'कार.

मोरोपंतकृत महाभारत.

४ विराटपर्व.

अध्याय पहिला.

(गीतिवृत्त.)

वत्सल तातापेक्षा जो गुरु धौम्य ज्ञानपुण्यराशि कवी ।
जेतिगहन राजसेवाधर्म तया कुरुकुलेश्वरा शिकवी. ॥ १
धौम्य द्रुपदपुराप्रति जातां घेऊनि अग्निहोत्रास, ।
प्रार्थूनि म्हणे, 'न शिवो या यजमानासि, अग्नि हो ! त्रास.' ॥ २
सशतांग [१३]इंद्रसेनाद्यनुचर कृष्णाश्रयासि धाडून, ।
पाठविला द्रुपदपुरा प्रति दासीदासवर्ग झाडून. ॥ ३

१. दयाळु. [या प्रथम चरणांत जे एकमात्रक 'व' आहे ते 'श्रीपांडवसहायो भगवानरविंदाक्षो जयति' या अष्टदशाक्षरी संस्कृत वाक्यांतील चवथे अक्षर आहे. विराटपर्व हे चवथे पर्व म्हणून 'व' हे चतुर्थ अक्षर होय. संपूर्ण महाभारताच्या प्रत्येक पर्वाच्या पहिल्या श्लोकांचे प्रथमाक्षर घेतले असता पूर्वोक्त वाक्य निष्पन्न होते हे सुप्रसिद्ध आहे. अंत आणि वस हा शब्दांपुढे अनुक्रमे बल आणि दया हे अर्थ गम्य असता 'व' मत्वर्थ होतो; तसे–कोसल=पटकट, वत्सल=दयाळू. येथे विराटपर्वातील 'पांडवप्रवेशपर्व' नामक उपपर्वास आरंभ होतो.] २. वापेक्षा ज्यास्त. ३. पुरोहित. [गुरु=अंधकारनिरोधक. 'गुशब्दस्त्वंधकारश्च रुशब्दस्तु निरोधकः । अंधकारनिरोधत्वाद्गुरुशब्दो निगद्यते ॥' सौरपुराण–अध्याय ६८ श्लोक १०.] ४. श्रेष्ठपंडित. ५. अत्यंत दुर्गम, अतिशय कठिण. ६. राजसेवारूप धर्म. भीमाने पांडवांत परगृहवासनवेत्ति सांगितला, कारण त्यांस आता विराटगृही राहावयाचें होते. मनुष्य कोणत्या गुणांनी राजास प्रिय होतो, कोणत्या कारणांनी राजाची इतराजी होते, काय केलें असतां राजाची कृपा होते–इत्यादि नीति धौम्यने सांगितली आहे. [अध्याय ४ श्लोक ७–२३.] ७. धर्मराजाला. ८. प्रस्थानसमयी. ९. अग्निहोत्र–अरणीसहित अग्निहोत्राचा, होमसाधनभूत वेदु इत्यादि. १०. अग्नि पेटवून यथाविधि समंत्रक होम देऊन. [अग्निसिद्धाग्नि, राष्ट्रयज्ञ आणि पूर्वोदिष्ट, हे तीन हेतु साधण्यासाठी अग्नींची यथाविधि पूजा करून–असा भावार्थ.] ११. धर्मोदिकास. १२. रथांनिहित. [शतांग=शत अंगें (अवयव) ज्याला तो=रथ; 'शतांगः स्यंदनो रथः' इत्यमरः.] १३. इंद्रसेनप्रमुख सेवक. १४. द्वारकेत कृष्णाच्या आश्रयाने राहण्यासाठी. १५. द्रौपदीच्या दासी (परिचारिका), दास=नोकर (सैपाकी, आचारी), पौरोगव (सुदपाकावरील अधिकारी, बाकनीस) इत्यादि सेवक. दासी व दास यांचा वर्ग (समूह).

गेले विराटनगरा पांडव अज्ञातवासकामुक ते. ।
चुकतें भावि, तरि सुखा मुज श्रीकांतदास का मुकते? ॥ ४
जी तच्छस्त्रप्राणा आश्रय त्या संकटांत होय शमी ।

१. वैराट. (विराट)-इंद्रप्रस्था(दिल्ली)पासून आग्नेयीस मत्स्यदेश म्हणून जो मत्स्यपुराणांत व इतरांत सांगितला आहे, त्या देशाची वैराट ही राजधानी होती. मत्स्यदेशाचे निरनिराळ्या दिशांनें निरनिराळे भाग मानिले होते. त्यांपैकीं विराट ही पूर्वमत्स्याची राजधानी होती. पुराणांतील वर्णनाशिवाय चिनी व ग्रीकियन् ग्रंथांवरूनही विराटनगराविषयीं भरपूर व खात्रीलायक माहिती मिळते. सहाव्या शतकांत ह्यूएन संग हा चिनी प्रवाशी, विराटनगरीची प्राचीन जागा स्वतः पाहिल्याविषयीं आपल्या ग्रंथांत लिहितो. मथुरेपासून ८३॥ मैलांवर मला विराट लागलें, असें त्यानें लिहिलें आहे. आतां हें अंतर सर्वांशी खरें नाहीं; तथापि खऱ्या अंतरांत व ह्यूएन संग यानें लिहिलेल्या अंतरांत फेर पडण्याचीं कारणें, वाटेतील नद्यांचीं लवणें, डोंगरांचा चढ, व रानांतील वेड्यावांकड्या वाटा हीं होत, असें पाश्चात्य भूगोलकारांचें मत आहे. वैराट म्हणून जें हल्लीं शहर आहे, त्यापासून जवळच पूर्वेकडे एक उंच व पसरट टेंकडी आहे. त्यावर पुराणप्रसिद्ध विराटनगर वसलेलें होतें. त्या शहराचा घेर आसपास बराच पसरलेला असावा. कारण कीं हिंगाऱ्यापासून फार दूरपर्यंत जुन्या भव्य इमारतींचे मोडके खांब, घरांचे पाये, व मौल्यवान भांड्यांचे तुकडे अजून सांपडतात! तसेंच कित्येक बौद्ध लोकांचे मठही जागजागीं आढळतात. पांडव अज्ञातवासांत असतां या नगरींत राहिले होते, ही गोष्ट प्रसिद्ध आहेच. त्यांनीं त्यांनें सरल्याचें ठिकाण कोणतें होतें, याविषयीं विचारले म्हणजे, तेथील लोक उत्तरेच्या बाजूला एक मैलावर असलेली भीमगुंफा नांवाची टेंकडी दाखवितात. ह्या टेंकडीवर भव्य सुळकेवजा कडे तुटलेले आहेत. कित्येक ठिकाणीं भयंकर खिंडारें आहेत. पाण्याच्या जबरदस्त लोंढ्यानें झिजून गेलेले कित्येक मोठमोठे दगड चमत्कारिक आकाराचे बनलेले आहेत. टेंकडीच्या निरनिराळ्या कडांना मजबूद भिंती घालून, कांहीं ठिकाणीं प्रशस्त खोल्या केलेल्या आहेत. तशाच कित्येक गुहा आहेत. त्यांपैकीं एक मोठी गुहा, भीमाची राहण्याची जागा, म्हणून ती भीमगुफा या नांवानें दाखवितात, व तशाच प्रकारच्या कित्येक गुहांना अनुक्रमें धर्म, अर्जुन, नकुल, सहदेव अशीं नांवें दिलेली पाहण्यांत येतात. हल्लीं वसलेल्या विराटनगराची वस्ती वर्तुलाकृति आहे. सभोंवार तांबुस रंगाच्या टेकड्या आहेत. शहरांत जाण्याचा मुख्य रस्ता वायव्येकडील ओढ्याजवळ आहे. नजीक बाणगंगेचा मुख्य उगम आहे. विराट हें शहर तांब्याच्या खाणीविषयीं फार प्राचीन काळापासून प्रसिद्ध आहे. (सरस्थलादर्श-पृष्ठें ३२-३३.)

२. आपलें खरें रूप प्रकट न करतां गुप्तपणें वास करूं इच्छिणारे. ३. होणारे. ४. पांडव. लक्ष्मीपतीचे भक्त. ५. न मुकते—असा प्रश्नालंकारानें अर्थ समजावा. ६. त्यांच्या शस्त्राच्या रक्षणार्थी. 'तच्छस्त्रप्राणां' असाही पाठ दोन जुनाट हस्तलिखित पोथींत आढळतो. त्याचा स्वीकार केला असतां, 'त्यांच्या शस्त्ररूप प्राणांस' असा अर्थ करावा. ७. विराटनगरांत प्रवेश करण्यापूर्वी आपलीं आयुधें कोठें ठेवावीं असा विचार पांडवांस पडला. तेव्हां त्यांनीं तीं आयुधें स्मशानसमीप एका भयंकर व चढण्यास कठीण अशा शमी नामक वृक्षाच्या ढोलींत ठेवण्याचा निश्चय केला. नंतर नकुल त्या वृक्षावर चढला, आणि आयुधें ठेवून खालीं आला—अशी कथा आहे. [अध्याय ५ पहा.]

शिवमूर्तिसी श्मशानीं तीचें वर्णूं न काय हो यश मी? ॥ ५
भेटोनि विराटासि प्रथम युधिष्ठिर वदे मनोज्ञ असें ।
'नामें कंक द्विज मी, धर्माश्रित अक्षकेलिदक्ष असें.' ॥
ठेवी विराटनृप बहुमानें सभ्यांत याहि सभ्यास, ।
वर्ते नृपाश्रितांत नृपाश्रितसाचि, नसतांहि अभ्यास. ॥
मग भीम म्हणे, 'राया! मी धर्माश्रित लहानसा, माजी ।
ओरल्या बल्लव, सेवा होती प्रभुच्या महानसामाजी.' ॥
स्वमहानसीं विराट स्थापी पूजूनि बल्लवाला, हो! ।
हळहळुनि म्हणे धर्म, 'स्वपदा हरिपादपल्लवा! लाहो.' ॥
होऊनि मलिनवेषा जातां राजप्रियेकडे कृष्णा ।

---

१. स्मशानांत शिव वास करतो ही गोष्ट सुप्रसिद्ध आहे. २. सुंदर. ३. कंक=या शब्दाचे तीन अर्थ आहेत. (१) छद्मद्विज, (२) लोहपृष्ठ, (३) कृतांत. येथें 'कृतांत' हा अर्थ ग्रहण करतां आहे. 'आत्मा वै पुत्रनामासि' या श्रुतिवचनानें पुत्र हा पित्याचें प्रतिबिंब, तेव्हां धर्म हा कृतांतपुत्र असल्यामुळें मी 'कंक' आहे असें म्हणून आपल्यावर येणाऱ्या मिथ्यावादिखदोषाचा परिहार करतो. [अध्याय ७ श्लोक १२.] ('कंकश्छद्मद्विजे ख्यातो लोहपृष्ठकृतांतयोः' इति विश्वः.) ४. युधिष्ठिराचा आश्रित. ५. द्यूतक्रीडेंत चतुर. [बृहदश्वापासून अक्षतत्व शिकून घेतल्यामुळें अक्षक्रीडाकुशल.] ६. आहें. ७. सभ्य=सभासद, सभास्तार. ८. 'वर्ते नृपाश्रितांतहि नृपआश्रितपा नसोनि अभ्यास' असाहि एक पाठ आहे. ९. नृपाश्रितापमाणें वागण्याचा अभ्यास नसूनही तसा वागे. १०. कांहीं लहान. 'सा' हा प्रत्यय न्यूनता किंवा आधिक्य यांचा दर्शक आहे. ११. माझी. १२. नांव. १३. बल्लव=बल्लव नांवाचा. बल्लव=सूपकार, सूद. (अध्याय ८ श्लोक ७.) १४. स्वयंपाकघर. गृहांत. ['रसवत्यां तु पाकस्थानमहानसे' इत्यमरः.] १५. धर्म हळहळुनि म्हणे, (हे) हरिपादपल्लवा! (हा) स्वपदा लाहो. भीमाची पाकशाळेंत योजना झालेली पाहून व अतिशय वाईट वाटून धर्म म्हणतोः—हे विष्णुपदकमळा! हा (धर्म) स्वपदः (वैकुंठाला, तुमच्या पदाला) पावो=ही भीमाची दुःस्थिति पाहण्यापेक्षां मला म्हणजे ह्या धर्माला मरण बरें वाटतें. किंवा धर्म हळहळून म्हणालाः—हे भगवंता! हा (भीम) स्वपदा (आपल्या पूर्वीच्या योग्यतेला) पावो (प्राप्त होवो); भीम तिलाच योग्य आहे, ह्या स्थितीला पात्र नाहीं. अथवा, 'स्वपद' हें 'हरिपादपल्लव' लाला (भीम) लाहो (तें भीमाला मिळो)=ह्या (अंतीं प्राप्त होणाऱ्या) आपल्या स्थानाचें म्हणजे हरिचरणकमळाचें चिंतन करून रूप घालवो. अखेरीस हरिभक्त हे हरिचरणकमळीं जावयाचे म्हणून ह्या चरणकमळास 'स्वपद' असें म्हटलें आहे. ही धर्मोक्ति आशीर्वादरूप [illegible] १६. मळिण (घाणेरडा) आहे वेष जिचा अशी. [वेषांतर करण्याचा हेतु स्वरूपगोपन होय.] [illegible] राटाच्या पत्नीकडे, विराटाच्या सुदेष्णा नामक भार्येकडे. (अध्याय ९ श्लोक ६-१० पहा.) १८. द्रौपदी.

चित्तीं म्हणे, 'अहा! बहु अवघड हे उंबरे कैडे कृष्णा!' ॥ १०
पाहुनि पुसे सुदेष्णा, 'बाइ! कवण तूं? असी दशा कां गे?' ।
'कृष्णाश्रिता भुजिष्या सैरंध्री मी' असें तिला सांगे. ॥ ११
राज्ञी म्हणे, 'पहाया रूप तुझें, ईश्वरीस नेववावें. ।
कोण सचक्षु म्हणेल स्वगृही तुज सुंदरीस 'न वसावें?' ॥ १२
परि निश्चयें त्यजिल मज, पाहुनि तुज भूप सुकमनीयेतें; ।
वाटे विलोकिता जरि हें अद्भुत रूप शुक, मनीं येतें. ॥ १३
काय करावें म्यां तरि, जरि सुंदरि! अनुसरेल 'मी' तूतें? ।
वद, केंवि अंतरावी अमृतफलहृता रसज्ञमति तूतें?' ॥ १४
'देवें सैरंध्रीपण हें कांहीं काल पातलें पुरा, ।
पांचां गंधर्वांची पत्नी मी पावलेंय कधीं न दरा. ॥ १५

---

१. उंबरा=उंबरठा. [हा देशी शब्द आहे.] २. डोंगर, घाट. ३. कृष्णा=यादवेंद्रा. हे कृष्णा! हे उंबरठे कल्पांप्रमाणें अवघड आहेत. ('ज्यांस परस्त्रीनेत्रची कधीं सवय नव्हती प्रसुखच ज्यांसे जन्मापासून भोगले त्यावर परदारा करण्याचा प्रसंग आला असतां मोठा कठीणच होय!') [कृष्णः सत्यवतीपुत्रे वायसे केशवेऽर्जुने । कृष्णा स्याद्रौपदी नारी पिप्पलीद्राक्षयोरपि ।। मेदिनी वाच्यलिंगः स्यात्कीर्ति मरिचलेहयोः' इति विश्वः.] ४. पांडवांची भार्या कृष्णा. (द्रौपदी) तिची आज्ञा, द्रौपदीपरिचारिका. [अध्याय ९ श्लोक १७-२० पहा.] ५. दासी. ६. ही शिल्पिकाम करणारी स्वतंत्र स्त्री, अंतःपुरपरिचारिका. ७. लावण्य, सौंदर्य. ८. पुरुष. ९. नवस करावा. १०. ढळस. ११. राहू नको असें कोण म्हणेल? कोणी म्हणणार नाही—हे उत्तर. हा स्वभावोक्ति अलंकार आहे. बोलणाऱ्या जेव्हां एखाद्या गोष्टीबद्दल बाष्पाकारी प्रश्न करतो, परंतु ती गोष्ट कशी आहे याविषयी त्याला शंका नसून उलट पक्की खातरी असते तेव्हां हा प्रश्नालंकार होतो. याला इंग्रजीत Erotesis असें म्हणतात. १२. अध्याय ९ श्लोक २२-२९ पहा. १३. अत्यंत सुंदर अशीतें. १४. मनीं येतें=मनाला आवडले असतें, मनांत भरलें असतें (मोरोपंतांचीच). १५. विराटराज. १६. अमृतफलांनें हरण केलेली. अमृतफळाला लुब्ध [illegible] 'अमृतफळ' हे काल्पनिक 'अमृतकुंभ' किंवा 'अमृतनदी' किंवा 'अमृतप्रवाह' या [illegible] काल्पनिक उत्तमोत्तम फल होय. 'अमृतफळ' हा शब्द अभ्यास लागण्याचा प्रचार दिसतो. अमृतफळावर लुब्ध झालेली रसज्ञमति तृतीयेच्या फळास वश होण्याचा संभव नाही हें उघड आहे. १७. रसिकाची बुद्धि. १८. तृताच्या फळानें. १९. हे [illegible] द्रौपदीच्या भाषणावर उत्तर आहे. [अध्याय ९ श्लोक ३०-३४ पहा.] २०. पांडव हे [illegible] खरोखर गंधर्वसमान होत—असा भाव. २१. भीतीस.

स्पर्शो न देचि बाई! स्वप्नींही मन्मना विवेक मला, ।
गगनमणिकरींच्या तम केव्हां तरि काय हो! शिवे कमला? ॥ १६
हें वपु परभोग्य नव्हे, जो पुरुष बळेंचि हात लाविल या, ।
पावेल लय, ज्योतिस्पृक् जेंवि पतंग मातला विलया. ॥ १७
उच्छिष्ट चारितां मज, मजकरवीं धुवबितांचि चरणातें, ।
नर कीं नारी पावे मत्पतिपासूनि सद्य मरणातें.' ॥ १८
तीतें म्हणे सुदेष्णा, 'मन्निकट स्वस्थ तूं सये! राहें; ।
त्वत्सख्यभाग्य दुर्लभ यावें स्वप्नांतही न येरां हें.' ॥ १९
मग तंतिपालनामें राहे सहदेव होउनि खिलारी, ।
हे लीला, कौरव किति? न बहु हरिजनिं स्मरादिनिखिलारी. ॥ २०

---

१. पातकास. बाई! (सुदेष्णे!) । मन्मना (माझ्या मनाला) विवेक (विचारबुद्धि) मला (पातकाला) स्वप्नींही शिवों न देचि (स्वप्नां देखील स्पर्श होऊं देत नाहीं)—असा सान्वय अर्थ. २. सूर्याच्या हातांतल्या. ३. अंधकार. ४. या पद्यांत 'प्रतिवस्तूपमा' नामक अलंकार आहे. जेथें उपमान आणि उपमेय यांचा एकच समानधर्म शब्दभेदानें (भिन्न शब्दांनीं) दाखविला जातो तेथें प्रतिवस्तूपमा अलंकार होतो. येथें 'विवेक मन्मना मला' इत्यादि उपमेय आहे आणि 'गगनमणिकरींच्या तम' इत्यादि हें उपमान आहे. यांचा एकच अभिन्न (समान) धर्म 'स्पर्शणें' व 'शिवणें' या भिन्न शब्दांनीं दाखविला आहे म्हणून हा प्रतिवस्तूपमा अलंकार होय. 'वाक्ययोरेकसामान्ये प्रतिवस्तूपमा मता' [कुवलयानंद] असें याचें लक्षण आहे. प्रतिवस्तूपमा वैधर्म्यानेंही होते, जसें– 'विद्वानाचे परिश्रम विद्वान् मात्र समजतो, दुःसहप्रसववेदना वंध्या कधींही जाणत नाहीं.' या उदाहरणांत 'समजतो' आणि 'जाणत नाहीं' या दोन भिन्न शब्दांनीं वैपरीत्य (वैधर्म्य) दर्शविलें आहे तरी येथें प्रतिवस्तूपमा आहे. 'प्रतिवस्तूपमा तु सा । सामान्यस्य द्विरेकस्य यत्र वाक्यद्वये स्थितिः ॥' (काव्यप्रदीप–१०वा उल्लास १५-१६ कारिका), 'प्रतिवस्तूपमा सा स्याद्वाक्ययोर्गम्यसाम्ययोः । एकोऽपि धर्मः सामान्यो यत्र निर्दिश्यते पृथक् ॥' (साहित्यदर्पण–दशम परिच्छेद). एकाच सामान्य (साधारण) धर्माची उपमानवाक्य आणि उपमेयवाक्य यांत शब्दभेदानें जेथें दोनदां अवस्थिति असते, तेथें प्रतिवस्तूपमा होते. ५. शरीर. ६. 'परयोग्य' असाही पाठ आहे. ७. दिव्यावर झडप घालणारा, ज्योतीला स्पर्श करणारा. ८. शलभ. 'पतंगः शलभे शालिप्रभेदे पक्षिसूर्ययोः' इति सुधा.] ९. मालेला. १०. [illegible] T. ११. तत्काल. १२. अध्याय ९ श्लोक ३५-३६ पहा. १३. माझ्या जवळ. १४. तुझें प्रेम १५. अन्यास. १६. तंतिपाल=तंति=बैलांना बांधण्याची दोरी अथवा वाणी; दोरी वाळगणारा अथवा वचन पाळणारा, गुरासी अथवा धर्मादिकांची आज्ञा पाळणारा–असा भावार्थ. १७. गोरक्षक. खिल्लार ठेवणारा, वनगर, गौळी. १८. मदनादि सर्व वैरी. सहदेव खिलारी होऊन राहिला (पण तत्क्षणीं स्वशत्रूंचा नाश केला नाहीं) ही केवळ 'लीला' होय. (ज्या) हरिजनिं (भगवद्भक्तांला) स्मरादि निखिलारी (कामप्रमुख सर्व शत्रु) बहु न (तुच्छ भासतात–जेणेंकरून बाधत नाहींत) त्यांला कौरव किति? अर्थात त्यांना कौरव म्हणजे अतितुच्छ होत–असा भाव.

स्त्रीवेष क्लीबत्व स्वीकारी शक्रभू, पतन ये तें ।
इतरां, परि तो नचळे, शिकवी नृत्यादि भूपतनयतें. ॥ २
रक्षिति हरिहररूपें पक्षीं ज्या अतिशयप्रिया बुबुळा, ।
नामें बृहन्नडा तो होय धरुनियां करांत कंबु वुळा. ॥ २
नकुल म्हणे, 'मी ग्रंथिकनामा हयशास्त्र जाणता, राया ! ।
तो शालिहोत्र कीं हा तुल्यचि अश्वांसि, जाण, तारया. ॥ २३
ज्याच्याठायीं नांदे सन्नीति, जसी दयाधिका रामीं, ।
राया ! करीत होतों त्या धर्माच्या हयाधिकारा मी.' ॥ २४
मत्स्य म्हणे, 'आश्रय मी तुज, पल्वल जेंवि ...समराला, ।
नेरयान त्यापुढें किति ? कोमा ये जें विमान समराला. ॥ २५

---

१. अर्जुन इंद्रलोकीं असतां त्यानें उर्वशीची विनवणी मान्य केली नाहीं; उलट तिचा 'तूं क्लीव होशील' हा शाप पत्करला—या कथेवर येथें कविकटाक्ष आहे. अर्जुनाच्या स्थितींत दुसरे कोणी असते तर त्यानें उर्वशीशीं संग करून ते योगभ्रष्ट व पदभ्रष्ट झाले असते, परंतु अर्जुन मात्र एक रतिभर आपल्या सत्त्वापासून ढळला नाहीं. २. नपुंसकत्व. ३. इंद्रपुत्र. (अर्जुन.) ४. [ज्यापासून] पतन (सत्यभ्रंश-सत्त्वच्यवन-पातित्य) ये इतरां तें (इतर सामान्य जनास पतित दशा प्राप्त होते तें) स्त्रीवेषक्लीबत्व शक्रभू (अर्जुन) स्वीकारी, परि (परंतु—स्त्रीवेषक्लीबत्वाचा अंगीकार केला तरी) तो (अर्जुन) न चळे (सत्त्वापासून ढळला नाहीं, पतन पावला नाहीं). लोकामध्ये स्त्रीवेषधारी पुरुष पाततासारखा समजतात व क्लीबत्व हेंही एक प्रकारचें पातित्य (पतितत्व) आ[illegible] आहे असा समज आहे. ५. इन्नरेस. ६. हरि (मारुति) आणि हर (कृष्ण) या रूपानें. ७. पापण्या. ८. अर्जुनरूप बुबुळास. ज्याप्रमाणें पक्षीमध्ये अत्यंत प्रिय बुबुळा रक्षिति त्याप्रमाणें हरिहररूपें ज्या (ज्या अर्जुनाला) रक्षिति तो करांत कंबु धरुनियां बृहन्नडा नामें वुळा होय—असा अन्वय. ९. बृहन्नडा=बृहत्=मोठा; नड=(नर—ऋषयोऽलयोश्चाभेदात्) नर, नारायणसख, आद्यनर. १०. शंख. (शंखवलयें. 'पिनद्धकंबु' असें विशेषण पद मूळांत आहे. त्यानें हातांत शंखवलयें घातली आहेत तो—असा या पदाचा अर्थ आहे.) ११. नपुंसक. १२. ग्रंथिक आहे नाम ज्याचें असा. [आयुर्वेद, अश्वचर्य इत्यादि ग्रंथ जाणतो तो ग्रंथिक. नकुल हा अश्विनीदेवांचा पुत्र, आणि अश्विनौ हे देवांचे वैद्य आणि अश्वचर्यु म्हणून नकुल आपणास ग्रंथिक म्हणजे आयुर्वेद आणि आश्वचर्य जाणणारा असें म्हणतो.] १३. शालिहोत्र=अश्वपरीक्षाशास्त्रप्रणेता प्रख्यात. पुरुष हा कपिलमुनीचा पुत्र. यानें रचलेल्या ग्रंथास 'शाल्यहोत्र' असें नांव आहे. १४. ज्या धर्माच्या ठायीं. १५. उत्तम नीति. १६. दया-परिपूर्ण. १७. दाशरथि रामीं. १८. अश्वाधिपत्या. १९. अल्प सरोवर. २०. मानस सरोवरांतील हंसास. २१. पालखी. २२. उपयोगाला येतें, कामगिरी करतें. २३ म्हणाला.

धर्माश्रितांसि[1] आश्रय मी, लोकां हांसवितिल[2] कविराट, ।
परि शोभेलचि,[3] भासत होता लोकांस . . तिलक[4] विराट.' ॥ २६
ग्रंथिक[5] म्हणे, 'नरेंद्रा! एथेंही स्पष्ट तोचि धर्म[6] असे, ।
ऐसें नसतें, तरि हे येते न प्रार्थितां[7] कशास असे?' ॥ २७
अज्ञातवासकाळीं त्यांची कष्टा दशा वदावि किती? ।
द्रव्यार्थ भीम अर्जुन अन्नें[8] लब्धांबरें[9] तदा [10]विकिती. ॥ २८
वरचेवर दे धर्म द्यूतेविजितपणधन[11] स्वभावांस[12] ।
सर्वमयज्ञ[13] कवि न म्हणतिल 'कृपण' असें त्या घनस्वभावांस.[14] ॥ २९
एकांतीं गुप्तपणें भेटे, चोरांसि जेंवि चोरसखा,[15] ।
सहदेव म्हणे, 'बहु कृश दिसतां, व्हा तुष्ट पुष्ट, गोरस[16] खा'. ॥ ३०
स्वामीपासुनि नकुळहि[17] जोडी भ्रात्रर्थ[18] धन हयां सजुनी, ।
अंतःपुरीं मिळालीं वस्त्रें अर्जुनहि दे तयांस[19] जुनीं. ॥ ३१

---

१. धर्माश्रितांना विराट राजानें आश्रय द्यावा, ही गोष्ट कविवर्यांच्या दृष्टीनें मोठी हास्यास्पद होईल. कारण कोठें धर्माची योग्यता व कोठें विराटराजा! असें जरि आहे तरि मी (ही गीति विराटोक्ति आहे) आजपर्यंत जो **तिलकरहित**=(मस्तकाला टीळा ज्याप्रमाणें शोभा देतो त्याप्रमाणें धर्माश्रितसाहचर्यानें मी शोभेन) **शोभारहित** होतों तो ह्यांच्या साहचर्यानें (ते माझे आश्रित म्हणून नव्हे) तेजस्वी दिसेन. धर्माच्या आश्रितमंडळास विराटराजा आश्रय देणारा– अशी माझी मस्करी करून कविराट (भाट लोक–कविवर्य) लोकांना हंसवितील, पण आजपर्यंत जो विराट लोकांना वितिलक (तिलकरहित–असा) भासत होतो तो आतां (या धर्माश्रितांच्या योगें सतिलक असा) शोभेलचि=टिळा मिळाल्यामुळें शोभा पावेल. २. कविश्रेष्ठ. ३. तिलक-रहित. 'तिलक' हें शोभाप्रद चिन्ह आहे या गोष्टीचें विस्मरण होतां कामां नये. ४. नकुल. ५. तो धर्म (युधिष्ठिर राजा) येथें आहे=या नगरांत धर्मासारखा तूं आहेस म्हणून हे (त्या धर्माचे सेवक) येथें आले, त्या धर्मासारखा तूं नसतास तर ते सेवक येथें आले नसते. ६. आहे. ७. प्रार्थनापूर्वक न बोलावितां ८. येथें 'पांडवप्रवेशपर्व' संपून 'समयपालनपर्वा'स आरंभ होतो. ९. भक्षणास योग्य अशीं नानाविध अन्नें महानसांत अवशिष्ट राहिल्यावर भीम युधिष्ठिरास विकीत असे. १०. मिळालेलीं वस्त्रें. अंतःपुरामध्यें अर्जुनाला जीर्ण झालेलीं वस्त्रें मिळत असत. (गीति ३१ पहा.) ११. अध्याय १३ श्लोक ६-१० पहा. १२. द्यूतांत जिंकिलेल्या पणाचें द्रव्य. १३. स्वबंधूंस. १४. प्रसंग जाणणारे चतुर पुरुष. १५. मेघांसारिखा उदार स्वभा[illegible]वांचा त्यांस. १६. चोराचा मित्र [चोरसख येथें 'सखि'शब्दाला 'राजाहःसखिभ्यष्टच्' या सूत्रानें 'सख' असा आदेश झाला आहे.] १७. दधि क्षीर घृत इत्यादि गोरस. १८. मिळवी, संपादी. १९. भातृ+अर्थ=भावांसाठीं. २०. भावांला.

दयितांसि द्रुपदसुता भेटे भलत्या मिषें, न दे विरहा; ।
तन्मति तिला म्हणे, 'पति अतिमृदुल, न भेटतां न देवि! रहा'.॥ ३२
तें अमृतवर्ष दर्शन त्यांसि, अदर्शन चिराटन गरांत, ।
एवं मासचतुष्टय ते क्रमिती त्या विराटनगरांत. ॥ ३३
ब्रह्मोत्सवांत तेथें ये साक्षान्मल्लकाळ जीमूत, ।
ज्यांची आणी बहुतां भुंजरणनिपुणांसि काळजी मूत. ॥ ३४
'आहे कोणी मजशीं भांडेसा?' हें सगर्व मल्ल वदे, ।
रंगीं तया क्रियोत्तर राजाज्ञेनें सशंक बल्लव दे. ॥ ३५
काळासींहि कराया सिद्धचि तो धीरवीर भीम रणा, ।
कळतां सुयोधन पुन्हा व्यसनीं पाडील याचि भी मरणा. ॥ ३६
भीमभुजाशनिपातें बाहुरणीं दुष्ट मल्ल तो चिरडे; ।
रंगीं बहुगर्वें जो हांसे फुगऊनि गाल तोचि रडे. ॥ ३७
धरिती घडींत शतदां तें ग्लानिविकास सर्व मल्लास्यें; ।

---

१. नवऱ्यांस. २. अत्यंत कोमल मनाचे आहेत यास्तव भेटल्याशिवाय राहूं नको. ३. येथें दोन 'न' आहेत ते प्रकृतार्थ दर्शवितात. 'द्वौ नञौ प्रकृतार्थं बोधयतः' [महावीरचरित–वीरराघवकृत टीका–पृष्ठ ८५.] ४. तें द्रौपदीचें दर्शन. ५. अमृताची वृष्टि करणारें. ६. चिरकाल परिभ्रमण. ७. विपांत. ८. याप्रमाणें. [अध्याय १३ श्लोक १४.] ९. मासांचे चतुष्टय. [चतुष्टय=चोहोंचा समुदाय. 'तय' प्रत्यय लागून समुदायवाचक नामें होतात–पंचतय, द्वितय, त्रितय इत्यादि.] १०. ब्रह्मोत्सव=शरत्काळीं नवधान्योत्पत्ति झाली असतां जो सर्व लोक उत्सव करतात तो. [अध्याय १३ श्लोक १४ टीका पहा.] ११. मल्लांचा काळ. [मल्लांचा गर्व नाहींसा करणारा असा प्रख्यात मल्ल जीमूत.] १२. मल्लविशेष. १३. ज्या जीमूताची काळजी मल्लयुद्धकुशलांस मुतायाला लावी. १४. मल्लयुद्धकुशलांस. १५. लघ्वी=मूत्र. १६. तालमींत. १७. क्रियारूप उत्तर. १८. पांडव विराटनगरींत आहेत असें कळतां, दुर्योधन पुनः व्यसनीं (बारा वर्षें अरण्यवास करण्याच्या संकटीं) पाडील, या मरणा (भीम) भी. १९. संकटांत. २०. भीमबाहुरूप जो अशनि (वज्र) त्याच्या पातें (प्रहारानें). २१. मल्लयुद्धीं. २२. तो जीमूत. 'तो चिरडे' 'तोचि रडे' हें पदांचें आवडतें ठरींव यमक होय. २३. तालमींत. २४. गाल. २५. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. २६. घटिकेंत. २७. शंभरदां. २८. तैं (भीमाचें व जीमूत मल्लाचें मल्लयुद्ध चाललें असतां) सर्व मल्लास्यें (इतर सर्व मल्लांचीं आस्यें=तोंडें) घडींत (घटकेंत) शतदां (शंभरदां) ग्लानिविकास (भीमाची सरशी होत आहे असें दिसलें कीं ग्लानि, जीमूताची सरशी होत आहे असें दिसलें कीं विकास) धरिती. (आतां भीम पडेल असें वाटलें कीं त्या मल्लांची तोंडें प्रफुल्लित दिसत, फिरून भीमाची सरशी होत आहे असें दिसूं लागलें कीं तीं म्लान (निस्तेज) होत; असें घटकेंत पुष्कळदां त्यांच्या चेहऱ्यावर बदल दिसत. हें

जिष्णु म्हणे, 'न धरावा जनरंजनरंगगर्व मल्लास्यें'. ॥ ३८
फिरवुनि शतदा केला पिष्ट क्षितिवरि सैलील आपटुनी. ।
तें प्राशिलें नियुद्धामृत नयनमुखें करूनि आ पटुनीं. ॥ ३९
रायें प्रसन्न होउनि देतां निजवस्त्ररत्नधनदानें, ।
'हाय !' म्हणे भीम, जया पूजावें यत्न करुनि धनदानें. ॥ ४०
मग भीम करी हर्षें पुरवाया राजदारकाम रणें, ।
कृष्णा म्हणे, 'सख्या! हरि! देशि न मज तूं उदार कां मरणें?' ४१
देशमास क्रमिति असे, प्रभुसम मेतें जे सदार विश्वास, ।

पाहून अर्जुन म्हणाला, 'मल्लास्यें (माझ्या नर्तनानें, नाचण्यानें) जनरंजनरंगगर्व (जनरंजन करण्याची जो रंगभूमि तिच्या ठिकाणीं अभिमान) नृत्यगानशालेविषयीं जो मी अभिमान बाळगीत असें कीं माझ्या नाचण्यानेंच (येथें फक्त नृत्यच घ्यावें) लोकांचें मनोरंजन होतें, तो अभिमान आतां फिरून मी धरितां कामा नये. कारण भीमाच्या मल्लयुद्धानें सुद्धां माझ्या नृत्याप्रमाणेंच जनमनोरंजन होतें. भीमाच्या मल्लयुद्धानें जर आतां लोकांचें मनोरंजन होऊं लागलें आहे, तर माझ्या नृत्यानेंच जनमनोरंजन होतें असा गर्व बाहणें आतां ठीक होणार नाहीं. मल्लयुद्धांत मल्लांचे जे पवित्रे होतात त्यांत नृत्याप्रमाणेंच पाय मोठ्या कुशलतेनें टाकावे लागतात, यावरून त्याचें नृत्याशीं येथें साम्य कल्पिलें आहे. २९. मल्लमुखें.

१. अर्जुन. २. मत्+लास्यें=माझ्या नृत्यानें. ३. चूर्ण (जीमूत.) ४. पृथ्वीवर. ५. क्रीडेनें. ६. बाहुयुद्धामृत. ७. नेत्ररूप मुखानें. ८. ज्ञात्यांनीं. ९. विराटें. १०. भीमाला देतां. ११. ज्याला धनदानें पूजावें त्याला विराटानें केलेलें वसनरत्नधनार्पण कितीसें संतोषदायक होणार आहे? तेव्हां त्यानें 'हाय !' म्हटलें हें ठीकच होय. १२. ज्या भीमाला. १३. कुबेरानें. १४. 'हरिसीं' असा अन्यपाठ दोन जुनाट हस्तलिखित पोथ्यांत आढळतो. हरि=सिंह. १५. राजपत्नीचा (सुदेष्णेचा) मनोरथ. १६. भीमानें व्याघ्र, सिंह, गज यांशीं युद्ध करून अंतःपुरांतील स्त्रियांस संतुष्ट केलें असें वर्णन आहे. [अध्याय १३ श्लोक ४०-४१.] १७. द्रौपदी. विराटाचें आणि राजदारांचें मनोरंजन करण्यासाठीं आपले महारथी पति पांडव कष्ट करतात अशी त्यांची दशा पाहून, श्वासोच्छ्वास सोडून, दुःखित होत्साती द्रौपदी म्हणते. [अध्याय१३ श्लोक ४५.] १८. येथें 'उदार'शब्द मोठ्या मार्मिकपणें प्रयुक्त केला आहे. जो उदार आहे त्यानें मरण देण्यास सिद्ध कां नसावें? असें म्हणण्याचें तात्पर्य आहे. १९. येथें 'समयपालनपर्व' संपून 'कीचकवधपर्वा'स आरंभ होतो. २०. अध्याय १४ श्लोक १ पहा. २१. पांडव, प्रभु जो कृष्ण त्याप्रमाणें सदार (द्रौपदीसहित) विश्वास (त्रिभुवनास) मत (मान्य) होते; तेव्हां विश्वनयन आणि लोकबंधु जो सूर्य त्याला त्यांची दुःस्थिति पाहून वाईट वाटावें हें साहजिकच. शिवाय थोर, पराक्रमी व सज्जन पुरुषांस दुर्दशा प्राप्त झाली असतां त्यामुळें उत्पात घडतात असें वर्णन करण्याचा कविसांप्रदायच आहे. Compare, Hamlet, Act I, Sc. I., when the death of Julius Cæsar is referred to:—

"A little ere the mightiest Julius fell

अत्युष्ण दीर्घ सोडी ज्यांसि विलोकुनि सदा रवि श्वास. ॥　४२
कीचकनामा सेनापाल ईयाल प्रसिद्ध राजाचा ।
भंगूं पाहे कृष्णाव्रत, वांछी अभ्युदय धरा ज्याचा. ॥　४३
भगिनीस म्हणे, 'पूर्वी आढळली या न हे मला भवनीं, ।
वांटे जन्मदरिद्रा झाला बहुकोटिहेमलाभ वनीं. ॥　४४

The graves stood tenantless and the sheeted dead
Did squeak and gibber in the Roman street;
As stars with trains of fire and dews of blood;
Disasters in the Sun; and the moist star
Upon whose influence Neptune's empire stands
Was sick as doomsday with eclipse."

२२. मान्य. २३. स्त्रीसहवर्तमान.

१. ज्यांसि (ज्या पांडवांला) विलोकुनि (पाहून) रवि सदा (सर्वकाळ) अत्युष्ण दीर्घ श्वास सोडी (पांडवासारखा पराक्रम अथवा तेजोनिधि आपणास नाहीं असें समजून खिन्न होई) [आणि] जे (पांडव) सदार (द्रौपदीसहित) प्रभुसम (कृष्णाप्रमाणें) विश्वास मत (जगताला मान्य) [ते] दशमास असे (विराटाच्या घरीं राहून, त्याला आणि त्याच्या स्त्रियांना संतुष्ट करण्यासाठीं सिंहगजादिकांशीं युद्ध करून, गीतनृत्यादि करून, वृषभांस आणि अश्वांस उत्तमप्रकारें शिकवून) क्रमिति (घालविति)–असा या पद्याचा सान्वय अर्थ कोणी कोणी करतात असें आढळतें. २. कीचक=विराटाचा सेनापति. ३. पत्नीचा बंधु. ४. कृष्णेच्या व्रता (पातिव्रत्या) भंगूं पाहे=भंग करण्याची इच्छा करी. ज्याचा धरा अभ्युदय वांछी=ज्या कृष्णाव्रताचा उत्कर्ष पृथ्वी इच्छी. पतिव्रता स्त्रियांच्या सदाचरणामुळें हें विश्व चाललें आहे असा लोकांत समज आहे त्याला अनुलक्षून हें लिहिलें आहे. द्रौपदीच्या पातिव्रत्यामुळें ह्या पृथ्वीचे व्यापार सुरळीत चालले होते, तेव्हां त्याचा अभ्युदय (उत्कर्ष) चिंतिणें हें पृथ्वीचें कामच होय. पृथ्वीवर पाप फार झालें म्हणजे ती बुडते व पुण्यामुळेंच ती तरते असा सर्वसाधारण समज आहे. ५. वृद्धि. ६. पृथ्वी. ७. अध्याय १४ श्लोक ७-१० पहा. ८. हे=ही द्रौपदी. ९. गृहांत. १०. हा उत्प्रेक्षालंकार जाणावा. जेव्हां उपमेयावर जाणों हें उपमानच आहे अशी संभावना केली असते तेव्हां उत्प्रेक्षानामक अलंकार होतो. याला इंग्रजींत Simile म्हणतात. जसें–'हा विश्वासराव जणूं काय अभिमन्युच आहे असें स्वपक्षीयांनीं म्हटलें.' येथें विश्वासराव अभिमन्युसम नव्हे तर प्रत्यक्ष अभिमन्युच असें म्हटलें म्हणून उत्प्रेक्षा झाली. दुर्योधनास चित्रसेन गंधर्वानें धरून नेलें त्या प्रसंगाची गीति उत्प्रेक्षेचें उदाहरण आहे:—'सानुज, सदार, दुर्जन दुर्योधन खेचरेश्वरें धरिला, । जाणों क्षितिहृदयींचा साक्षात्कांटाचि तो समुद्धरिला. ॥' [वनपर्व–अध्याय ७ गीति ३०]. यांत दुर्योधनाच्या ठायीं कांट्याची संभावना केली आहे म्हणजे उपमेयावर जाणों हें उपमानच आहे अशी संभावना (आरोप) केली आहे. ११. बहुकोटि सुवर्णाचा लाभ, अमितसुवर्णप्राप्ति.

[1]मोहेल इला पाहुनि शक्रहि, मग अन्य कां न नर मोहे? ।
[2]मजसीं [3]अधःकराया [4]अहिसुरनरकन्यकानन रमो हे.' ॥ ४५
[5]लब्धतदनुमोदन तो [6]जंबुक सिंहीस, [7]कीं [8]सकाम ससा ।
व्याघ्रीस, सतीस बळें, शांतीस वरावयासि [9]तामससा, ॥ ४६
रावणसा बहु विनवी, प्रेमं प्रत्यक्षरींहि नव दावी. ।
[10]कीचक नीच [11]कलुषनिधि त्याची [12]आर्यांत [13]गोष्टि न वदावी. ॥ ४७
मळवूं [14]पाहे स्वबळें या श्रुतिला काय [15]नीच कलि हा? [16]वा ।
[17]दशमुखमुखमलजलनिधिखलपतिपंक्तींत कीचक लिहावा. ॥ ४८

---

१. भुलेळ, भुलून जाईल. २. अहिसुरनरकन्यकानन अधः कराया हे मजसीं रमो—असा अन्वय. ३.खालीं करायास, नम्र करायास, खालीं पाहायाला लावण्यास. ४. नाग, देव आणि मानव यांच्या कन्यांचें मुख. ५. मिळालें (लब्ध) तिचें—मुदेणेचें अनुमोदन (तदनुमोदन) ज्यास तो (कीचक). ६. कोल्ही. ७. किंवा. ['कीं' हें अव्यय विकल्प, प्रश्न, आधार आणि कारण असे अर्थ दाखवितें]. ८. कामातुर. ९. तमोगुणसंपन्न नरासारखा. [तमोगुण आणि शम (शांति) हे परस्परविरोधात्मक आहेत. तमोगुणसंपन्न मनुष्यांत विवेकाचा लोप, उद्योगाचा कंटाळा, आणि मोह हे असतात. तसेंच तम हें ज्ञानास आच्छादतें, मनुष्याला मोहांत पाडतें. [भगवद्गीता—अध्याय १४ श्लोक ७-१३.] १०. येथें गीति ४६-४७ यांचें युग्मक समजलें पाहिजे, लब्धतदनुमोदन तो सतीस बळें वरावयासि विनवी, [जसा] जंबुक सिंहीस, कीं सकाम ससा व्याघ्रीस, [कीं] तामससा शांतीस [आणि] प्रत्यक्षरींहि नव प्रेम दावी—असा अन्वय. ११. पातकसमुद्र. १२.श्रेष्ठांत. १३.'गोष्टि' असा अन्यपाठ. १४.इच्छी. ['पहाणें' याचा अर्थ 'इच्छिणें' असाही होतो—भंगूं पाहे (गीति ४४)=भंगूं इच्छी.] १५. हा नीच कलि (कलिपुरुष कीचक) स्वबळें (आपल्या सामर्थ्यानें) या श्रुतिला (वेदतुल्य पवित्र स्त्री सैरंध्री इला) मळवूं पाहे (पातिव्रत्यधर्मापासून भ्रष्ट करूं पाहे) काय? रूपकालंकार. कलि (कलियुग) श्रुतिला (वेदाला) मलिन करतो, म्हणून श्रुति ओळखणें कठिण पडतें, उच्चार नीट स्पष्ट होत नाहीं आणि अर्थ समजत नाहीं. हेंच श्रुतीचें मालिन्य होय. 'वर्णें वळखे, कलिनें मळविलि याही सुधी जसा श्रुतिला' [वनपर्व—अध्याय ४ गीति १८६] या गीतींतही कलिकृत श्रुतिमालिन्याचा उल्लेख आहे. कलियुगांत वेदाचें माहात्म्य नाहींसें होईल, देवांतील देवपण नाहींसें होईल, वगैरे वर्णन अध्यात्मरामायणांत व इतर ग्रंथांत केलें आहे. यांतील पहिल्या मुद्यास अनुलक्षून कवीनें लिहिलें आहे. कीचकाला कलीची उपमा देऊन तसेंच सैरंध्रीला श्रुतीची उपमा देऊन पंतांनीं पुढील परिणामही ध्वनित केला आहे. ज्याप्रमाणें भगवंतांनीं अवतार घेऊन कलीचा नाश करून वेदोद्धार केला त्याप्रमाणेंच भीमाच्या हातून कीचकाचा वध होणार हें येथें सुचविलें आहे. प्रथमार्धांतील 'वा' शब्द दुसऱ्या अर्धांशीं घ्यावयाचा. १६. अथवा. १७. रावणप्रमुख मलसमुद्र (पापसागर) जे खलपति त्यांच्या पंक्तींत. [मुख=प्रमुख, मुख्य. 'मुखं तु वदने मुख्ये ताम्रे छद्मनि ना पुमान्' इति भागुरिः.]

कृष्णा म्हणे, 'अहाहा! बुडती तरि भजति [1]नीच [2]कामातें, ।
[3]सावध हो, गा! वध हो न, व्याली जाण [4]कीचका! मातें. ॥ ४९
[5]परदारा मी, मत्पति गंधर्व, प्रबल उग्र [6]शिवशील, ।
मार्गे सरशिल, तरशिल; मरशिल जरि मज बळेंचि शिवशील.' ॥ ५०
प्रियें [7]पांचजन्य जीसें, प्रिय [8]तदितर त्या [9]भुंजेसि [10]कंबु कसा? ।
झिडकारिला सतीनें, [11]सिंहीनें दुष्टबुद्धि [12]जंबुकसा. ॥ ५१

---

१. नीच पुरुष. २. मदनास. ३. तुझा वध न व्हावा असें असेल तर सावध हो. ४. नागीण, सर्पीण. ५. अध्याय १४ श्लोक ३४-३७ पहा. ६. शिवासारिखा स्वभाव ज्यांचा. ७. 'प्रिय पांचजन्य जीस प्रिय न इतर त्या भुजेसि कंबु कसा, । झिडकारिला सतीनें सिंहीनें दुष्टबुद्धि जंबुकसा ॥' असाही एक पाठ आहे, आणि अर्थगौरवानें ग्रंथांतील आर्येपेक्षां यांत रस विशेष आहेसा दिसतो. 'सतीनें झिडकारिला' या साध्या भाषणापेक्षां 'सतीनें कसा झिडकारिला' यांत गौरव विशेष; परंतु हें ज्याचे त्याचे अभिरुचीप्रमाणें आहे. ८. पांचजन्य=लक्ष्मीपतीचा शंख, विष्णुशंख. [प्रत्येक देवाच्या अथवा वीराच्या शंखास निरनिराळें नांव आहे. अर्जुनाचा देवदत्त, भीमाचा पौंड्र, धर्माचा अनंतविजय, नकुलाचा सुघोष आणि सहदेवाचा मणिपुष्पक असें भगवद्गीतेच्या पहिल्या अध्यायांत (श्लोक १५-१६) वर्णन आहे. पांचजन्य शंखाविषयीं पुढील उतारा वाचण्यालायक आहे. "पांचजन्य—पंचजन नामक दैत्यापासून कृष्णास हा शंख मिळाला यावरून या शंखाचें हें नांव पडलें आहे. हा शंख पंचजनाच्या उदरांत सांपडला—अशी कथा आहे. कित्येक ग्रंथकार हा शंख सदर्हू दैत्याच्या अस्थींपासून निर्माण केला होता असें म्हणतात. कसेंही असो. या दैत्याची कथा अशी आहे कीं, हा समुद्राच्या तळाशीं राहत असे, व एकदां भगवान् श्रीकृष्ण हे आपल्या संदीपनि नामक गुरुजवळ शास्त्रादिकांचा अभ्यास करित असतां त्या गुरुचा मुलगा प्रभासतीर्थांत स्नान करितां करितां बुडाला, तो या दैत्यानें पाण्याच्या तळाशीं नेला. हें कृष्णास कळल्याबरोबर तो पाण्यांत उडी टाकून बुडी मारून तळाशीं गेला, आणि त्या ठिकाणीं पंचजन दैत्याचा वध करून त्याच्या उदरांतून हा शंख काढिला, आणि गुरुचा पुत्र गुरुस जिवंत आणून दिला." (सरलार्थबोधिनी गीता—अंक २ पृष्ठ ३१.)] ९. ज्या भुजेला. १०. त्या पांचजन्य नामक शंखाहून अन्य शंख (कंबु). ११. त्या विष्णुभुजेला. १२. शंखाच्या बांगड्या करण्याचा प्रचार बराच दिसतो. "शंख कापून त्याच्या बांगड्या करून सोंजवर लाखेची व सोनेरी बर्खाची नक्षी करून बंगाल्यांतील सर्व जातींच्या बायका पूर्वी घालीत असत. अलीकडे सुधारणेचे प्रकाशामुळें कलकत्त्याकडे ही चाल बंद पडली आहे; परंतु खेड्यांपाड्यांतून पुष्कळ बायकांच्या हातांत ह्या बांगड्या दृष्टीस पडतात. असल्या बांगड्या हातांत घालाव्या असें शास्त्र आहे, अशी बंगालच्या लोकांची समजूत होती. अजूनही लग्नाच्या वेळीं मुलीचा बाप तिला शंखाच्या बांगड्यांचा आहेर करतो. ढाका शहरीं मडमांच्या उपयोगी पडण्यासारख्या शंखाच्या बांगड्या अलीकडे तयार होऊं लागल्या आहेत. सिलहेट या गांवींही ह्या बांगड्या आयत्या विकत मिळतात. बंगाल्यांतील पूर्वेकडील प्रांतांत अजूनही सर्व जातीच्या हिंदू सवाशिणी शंखाच्या बांगड्या घालितात." (देशी हुन्नर—पृष्ठ ६३.) १३. हा उपमालंकार जाणावा. १४. कोल्ह्यासारिखा.

[1]बंधु भजो, पति [2]न भुलो, म्हणउनि, नसतां [3]परस्व सामान्य, ।
ती [4]त्या कार्यासि करी जरि न करावें, [5]पर [6]स्वसा मान्य. ॥ ९२
[7]ती तीसं म्हणे, 'कीचकसदना जाऊन आण गे! हाँला.' ।
धाडी बळें वृकाच्या घालुनि हेरिंगीस [8]आंण गे[9]हाँला. ॥ ९३

---

१. बंधु (कीचक) हा सैरंध्रीला भजो (तिची प्राप्ती करून घेवो.) पति न भुलो (विराट राजा हा तिला भुलूं नये; तिच्या ठिकाणीं आसक्त होऊं नये. तसें झाल्यास आपल्यावरून त्याचें मन उडेल) म्हणउनि (असा विचार करून) सामान्य (साधारण) परस्व (परद्रव्य. स्त्री हा एक मनुष्याच्या द्रव्याचा भाग आहे या समजुतीस अनुसरून येथें स्त्रीच्या ऐवजीं 'द्रव्य' लिहिलें आहे) नसतां, ती (सुदेष्णा) स्वसा (कीचकभगिनी) त्या कार्यासि (कीचकगृहीं जाऊन मद्य घेऊन ये अशी आज्ञा सुदेष्णेनें सैरंध्रीला केली व तसें करून कीचकाला सैरंध्रीचा समागम घडवून आणण्याची संधि दिली हें कार्य) जरि न करावें (वाईट म्हणून) पर मान्य करी. सैरंध्रीनें जेव्हां कीचकास अगदीं झिडकारून टाकिलें, तेव्हां त्यानें 'कसेंही करून ही मला प्राप्त होईल असें कर' अशी आपल्या बहिणीची विनवणी केली. तेव्हां सरतेशेवटीं त्या स्वरूपसंपन्न सैरंध्रीला आपला नवरा विराटराजा भुलूं नये व कीचकास ती मिळाली असतां तसें होण्याची बिलकुल भीति उरणार नाहीं असा विचार करून, तसेंच पांचा गंधर्वांची ती स्त्री आहे हें जाणून (अध्याय १ गीति १५-१८) सुदेष्णेनें कीचकाकडे सैरंध्रीला मद्यमिषानें पाठविण्याचें काम पत्करलें. परस्व सामान्य नसतां (परस्त्री सामान्य स्त्री नव्हे असें असतां) [जें कार्य] जरि (मान्य) न करावें [तरि] पर (पण) स्वसा (बहीण) त्या कार्यासि (बंधु भजो, पति न भुलो, म्हणउनि) मान्य करी–असा अन्वय लावावा. जरी अकार्य होतें तरी बंधूची मर्जी रहावी आणि सैरंध्रीच्या लावण्याला भुलून पति मोहांत पडण्याचा प्रसंग येऊं नये, म्हणून सुदेष्णेनें तें केलें– असा भावार्थ. २. दुसऱ्याचें धन (स्व). ३. परंतु. ४. बहिण. (सुदेष्णा.) ५. ती=सुदेष्णा. ६. द्रौपदीला. [कीचकानें आपल्या घरीं उत्तम सुरा आणि अन्न तयार करावें आणि तें आणण्यासाठीं सुदेष्णेनें द्रौपदीस कीचकगृहीं पाठवावें आणि ती आली असतां कीचकानें एकांतीं तिची मनधरणी करून तिला वश करावें, असा बहीणभावांचा संकेत झाला होता, त्यास अनुसरून हें सुदेष्णेचें भाषण आहे. अध्याय १५ श्लोक ५-१० पहा.] ७. मद्य. ८. लांडग्याच्या. ९. हा रूपकालंकार जाणावा. येथें वृकगेह हें कीचकगृह आणि द्रौपदी ही हरिणी असें समजावें. अथवा दोन्ही वाक्यांमध्यें उपमानोपमेयभावाची कल्पना करून, व कीचकाच्या घरीं धाडणें हें लांडग्याच्या घरीं धाडण्यासारखें समजून **'निदर्शना'** अलंकार समजावा. परस्परसदृश असे जे दोन उपमानोपमेय वाक्यार्थ त्यांचें ऐक्य (अभेद) वर्णिलें असतां **निदर्शना** अलंकार होतो. 'मूर्खास उपदेश करणें हें पालथ्या घागरीवर पाणी घालणें होय' या उदाहरणांत 'मूर्खास उपदेश करणें' या उपमेय वाक्याचें व 'पालथ्या घागरीवर पाणी घालणें' या उपमान वाक्याचें ऐक्य वर्णिलें आहे, या वाक्यार्थावर ऐक्याचा (अभेदाचा) आरोप केला आहे. याचें दुसरें उदाहरण:—'त्वद्व्रततस्कराला केला मी बोध फार, आरडलों, । अंधभसितवधिरीं तें दीपहवनगीत, कीं वनीं रडलों.॥' [मंत्ररामायण–युद्धकांड–गीति ९०] या पद्यांत 'अंधास दीप दाखविणें,' 'भस्मांत होम करणें,' 'बहिऱ्यास गाणें

कृष्णा म्हणे, 'न जाइन, जेंवि[1] मृगी वृकविळा[2], विटागारा[3], ।
साधुगृहा धाड, परमतप्ता तत्पथशिळा[4] विटा गारा[5]. ॥ ९४
उचित शुचि[6] तरिच नृवपु[7] व्रतविघ्न म्हणोनि देवि! टाळावें, ।
म्हणति विट विटाळावें, परि वेद म्हणों न दे विटाळावें.' ॥ ९५
विनवी ऐसें बहु, परि तीस सुदेष्णा म्हणे तरी 'जांच[9].' ।
फारचि बरी निरयगति[10] परवशता[11] शतगुणें करी जांच[12]. ॥ ९६
[13]ती आपणा म्हणे, 'हे द्रौपदि! तुजवरि हरीच विटला, गे! ।
चुकलीस तूंचि, नसतां पदरीं अघ[14], पाठिला न विट लागे.' ॥ ९७
ज्या श्रीकृष्णसखीतें योग्य नमाया सुरासुर सतीतें, ।
प्रेषी[16] आणाया ती[17] राज्ञी मानुनि सुरा सुरस तीतें. ॥ ९८
जातां परार्थही बहु तापातें पावली सुरामा[19] ती, ।

ऐकविणें,' आणि 'अरण्यांत रडणें' या वाक्यार्थीचें परस्पर ऐक्य वर्णिलें आहे. याचें लक्षण:—'वाक्यार्थयो: सदृशयोरैक्यारोपो निदर्शना' [कुवलयानंद], 'संभवन्वस्तुसंबंधोऽसंभवन्वापि कुत्रचित्। यत्र बिंबानुबिंबत्वं बोधयेत्सा निदर्शना ॥.' [साहित्यदर्पण–दशम परिच्छेद ६९९ कारिका]. १०. शपथ. [आज्ञा=आण.] ११. गृहास.

१. पूर्वार्धांतील अलंकार 'उपमा.' यांत 'जेंवि' शब्द आहे तो उपमादर्शक होय. २. जारगृहास. ३. अतिशयित तापलेल्या. ४. त्या सुजन गृहास जाणाऱ्या पथांतील (मार्गांतील) शिळा (पथ्थर). ५. शीतल, थंड. ६. पवित्र. ७. मनुष्याचें शरीर. नृवपु (स्त्रीपुरुषदेह) शुचि (पवित्र) तरिच उचित (जगण्यास योग्य, किंवा मनुष्य देह म्हणविण्यास योग्य) म्हणोनि (म्हणून) देवि! (हे महिषी, सुदेष्णे! 'देवी कृताभिषेकायां' इत्यमर:. अभिषिक्तराजस्त्रीला देवी म्हणतात) व्रतविघ्न (पवित्रतेपासून होणारें स्खलन, येथें पातिव्रत्यविघ्न) टाळावें. जर देह हा पवित्र असला तरच तो मनुष्यदेह म्हणविण्याच्या योग्यतेचा समजावा, नाहीं तर तो पशुदेह; किंवा तरच जगण्यापासून फायदा नाहीं तर मरण यावें. विट (जार) विटाळावें (नृवपु) म्हणति. परि वेद विटाळावें म्हणों न दे (परंतु त्याला वेदाची संमती नाहीं. नरदेहाला दोष लागो असें वेद म्हणूं देत नाहीं.) सारांश मानवी वपु जर शुचि तरच जपून ठेवण्यास योग्य, म्हणून पातिव्रत्यास आलेलें विघ्न, हे देवि! सुदेष्णे! टाळलें पाहिजे. विट म्हणतात–मानवी वपु (खुशाल) विटाळावें; पण विटाळावें असें म्हणूं देत नाहीं.) ८. पातिव्रत्यविघ्न. ९. दूर करावें. १०. 'जाच' यांत 'च' हें अव्यय आग्रहार्थी जाणावें. ११. नरकवास, नरकगति. १२. परस्वाधीनपणा. १३. शंभर पटीनें व्यास्त. हें गीत्यर्ध उत्तम सुभाषित होय. १४. ब्राह्मणूक. १५. द्रौपदी. [अध्याय १६ श्लोक १८ पहा.] १६. पातक. तुझ्या पदरीं पाप नसतें, तर हा विट (जार–कीचक) तुझ्या पाठीस न लागता, पण तुझ्या पदरीं पाप आहे म्हणून हा तुझ्या पाठीस लागतो–असा भावार्थ. १७. देव आणि दैत्य. १८. घाडी. १९. ती सुप्रसिद्ध राणी सुदेष्णा. २०. दुसऱ्याकरतां जात असतां देखील. २१. उत्तम स्त्री (रामा)=द्रौपदी.

न करील कां पिण्याची[1] दुर्गतिची[2] माउली सुरा[3] मीती[4]? ॥ ५९
त्या संकटीं सतीनें दीनांचा बंधु कृष्ण आठविला, ।
त्या सवितृमंडलस्थें[5] राक्षस रक्षार्थ[6] गुप्त[7] पाठविला. ॥ ६०
कीचक विलोकुनि म्हणे त्रिजगद्गुरुविष्णुच्याहि[8] आलीस, ।
'रंभाचि[9] सुंदति! तूं या नलकूबरमंदिरासि[10] आलीस. ॥ ६१
सर्वस्व[11] अर्पितों तुज देवि! करीं पूर्ण काम, हो दारा[12], ।
विकत मिळतां स्मितसुधालेशें[13] घेशी न कां महोदारा[14]?' ॥ ६२
इत्यादि नीच कीचक दुष्कर्माची धरूनि आस वदे. ।
कृष्णा वदे, 'सुदेष्णेकरितां[15] पात्रीं भरूनि आसव[16] दे.' ॥ ६३
तो कर धरुनि खल म्हणे, 'दासी आहेत फार अन्या यां[17], ।
वैसा शयनीं, राज्ञी करिते, करवूनि दास्य, अन्याया.' ॥ ६४.
कर आमुडितांचि पडे धडडड वाल्याजवें[18] जैसा विटेपी[19], ।
वैरचें तेज बल तशा दुर्वृत्तीं[20]? जो सुरारसा विटे[21] पी[22]. ॥ ६५

---

१. पिणाराची. २. अधोगतीची, नरकगतीची जननी (सुरा). हें गीत्यर्ध उत्तम सुभाषित होय. ३. मद्य. ४. हा प्रश्नालंकार जाणावा. परार्थ मद्य आणणारी जर दुःख पावते, तर मद्य पिणाराची माती होणार नाहीं काय? खचित माती होईल–हें उत्तर. ५. सूर्यमंडळीं राहणाऱ्या भगवान् कृष्णानें. [द्रौपदीनें मद्य आणण्यासाठीं निघण्याच्या समयीं सूर्याची आराधना केली, तेव्हां तो प्रसन्न झाला आणि त्यानें द्रौपदीचा अभिप्राय जाणून तिच्या संरक्षणासाठीं एक राक्षस सदां तिच्या संनिध असणारा गुप्तपणें पाठविला–अशी कथा आहे. अध्याय १५ श्लोक १९-२०.] 'नाहं वसामि वैकुंठे योगिनां हृदये रवौ । मद्भक्ता यत्र गायंति तत्र तिष्ठामि नारद ॥' याचा अर्थः—मी वैकुंठांत राहत नाहीं, योग्यांच्या हृदयांत राहत नाहीं, सूर्यांत राहत नाहीं, परंतु माझे भक्त जेथें मला गातात तेथें मी उभा असतों. या वचनावरून भगवान् श्रीकृष्ण सूर्यमंडळाच्या मध्यभागीं असतो असा कांहीं अर्थ नाहीं, तर जेथें त्याचे भक्त त्याला सप्रेमांतःकरणानें गातात तेथें असतो असें होतें. येथें सूर्यानें रक्षक धाडिला म्हणून 'सवितृमंडलस्थ' असें पद योजिलें आहे. ६. रक्षणार्थ. ७. तीन लोकांचा गुरु (पिता) स्वामी जो विष्णु (कृष्ण) त्याच्या. ८. सखीस. ९. रंभा=ही कुबेरपुत्र नलकूबर याची आवडती स्त्री. [मंत्ररामायण–उत्तरकांड–गीति–१५६-१६२.] १०. सुंदर दंत जीचे ती. ११. कुबेरपुत्र. १२. सकळ संपत्ति. १३. स्त्री. १४. मंदहास्यरूपी अमृताच्या लहान अंशें. १५. महा उदार अशा या कीचक महाराजांस स्मितसुधालेश देऊन विकत मिळत असतांही कां न घेशी? १६. अध्याय १६ श्लोक ४ पहा. १७. मद्यविशेष. १८. अध्याय १६ श्लोक ५ पहा. १९. या कीचकापाशीं. २०. सुदेष्णाराणी तुझ्याकडून दास्य (सेवा) करवून अन्याय करते, दास्य करण्यास योग्य अशा इतर दासी पुष्कळ आहेत. २१. वावटळीच्या वेगानें. 'वाल्यासवें' असाही पाठ आहे. २२. हा वृक्षाचाच दाखला मूळांत आहे. (श्लोक ८.) २३. वृक्ष. २४. वाईटस्वभावाच्या ठायीं. २५. मद्यरसाला. २६. नीच पुरुष. (जार.) २७. सेवी, प्राशी.

[1]तंव ते उठोनि धांवुनि पळतां कवळूनि नीच कैबरीतें, ।
[3]नृपतिसमक्षहि पाडी लत्ता हाणोनि कीचक वैरोतें. ॥ ६६
तों तो राक्षस पाडी मागें ढकलूनि कीचकालाही, ।
जाणों [5]गरुडें उडवुनि आपटिला मैंत्त नीच कालाही. ॥ ६७
पाहे विराटनिकटस्थित धर्म [8]तदंतिकस्थ भीमहि तें, ।
न सतीस लात वाधे, जेंवि [11]पुनररण्यवासभी [12]महितें. ॥ ६८
[13]आस्तिकशपथ [15]अहीचें कीं [16]हरिचें आवरी वल [18]खलीन, ।
धर्म तसें भीमाचें, तो म्हणतां '[19]भूखलीं खल खलीन.' ॥ ६९

---

१. 'तवकें' असाही पाठ आढळतो. तवकें=लागलीच. २. केशपाशातें. ३. विराटासमक्ष. ४. साध्वीतें. (श्लोक १० पहा.) ५. सूर्यसंनियोजित राक्षस. ६. हा उत्प्रेक्षालंकार जाणावा. ७. माजलेला. ८. काळा सर्प. ९. विराटराजाच्या समीप वसलेला (धर्मराज). १०. त्या धर्माच्या समीप वसलेला. ११. पुनः अरण्यवास होण्याची भीति. पुनररण्यवासभी=पुन्हा पांडवांना वनवास होईल ही भीति. जर द्रौपदीचा छल पांडवास (विशेषतः भीमास) सहन न होऊन, ते प्रकट झाले तर पुन्हा तेरा वर्षे प्रतिज्ञेप्रमाणें त्यांना अरण्यवास भोगावा लागेल व त्यामुळें भारभूत दुष्टांचा संहार होण्याचें काम लांबणीवर पडेल ही पृथ्वीला भीति पडली) महितें (पृथ्वीला) जेंवि बाधे (पीडा करी). पृथ्वीला पांडवांच्या (भावी) पुनरररण्यवासाची भीति बाधूं लागली तशी ती लाथ सतीला बाधली नाहीं, पृथ्वी फार भयभीत झाली, कां तर पांडव ओळखले गेल्यास त्यांस पुनः अरण्यवास व आपणास अनाथत्व प्राप्त होणार. सारांश, द्रौपदीला झालेल्या दुःखापेक्षां पृथ्वीला ह्यास्त पीडा झाली—हा भावार्थ. (पृथ्वीवर पाप फार झालें म्हणजे पृथ्वी गोरूप घेऊन विष्णूकडे भार कमी करविण्याकरितां जात असते अशी प्राचीन ग्रंथांत समजूत आहे.) १२. भूमीस. १३. आस्तिक= हा जरत्कारु ऋषीचा कश्यपकन्या मनसा (जरद्गौरी) हिच्यापासून झालेला पुत्र. हा सकल नागांचा भाचा (भागिनेय) होय. जनमेजयराजाचा पिता परीक्षित् सर्पदंशानें मरण पावला म्हणून रागानें उत्तंकऋषीच्या उत्तेजनास अनुसरून त्यानें सर्पसत्र आरंभिलें. त्यांत अनेक सर्पांचा प्रत्यहीं नाश होऊं लागला. तेव्हां नागांनीं आपला भाचा आस्तिकमुनि याची प्रार्थना करून त्यास सर्पसत्र समाप्त करविण्यासाठीं जनमेजयाकडे पाठविलें. त्यानें जनमेजयाच्या यज्ञमंडपांत येऊन त्याची इतकी स्तुति केली कीं, तो आस्तिकाच्या मनोहर भाषणानें मोहित झाला आणि त्याच्या म्हणण्याप्रमाणें राजानें सर्पसत्र समाप्त केलें. या योगेंकरून सर्व नागांस म्हणजे आस्तिकाच्या मातुलांस मोठा आनंद झाला. नागराज वासुकि प्रसन्न झाला. 'जो कोणी नाग आस्तिकनाम घेणारास दंश करील त्याचें डोकें शतदा फुटेल' असा नागांनीं वर दिला. 'माझें आख्यान जे श्रवण करतील त्या मनुष्यांस नागांपासून अल्प देखील भय नसावें' अशी शपथ आस्तिकानें सर्व नागांस घातली व ती सर्वांस मान्य झाली. या शपथेच्या योगानें नागांचें बळ आकुंचित झालें—या कथेकडे येथें कविकटाक्ष आहे. [मोरोपंत—आदिपर्व—अध्याय ४-७.] १४. सापाचें. १५. अश्वाचें. १६. लगाम. ['लगामः स्यात् खलीनकम्' राजव्यवहारकोश १४४.] १७. भूमिरूप खलांत. १८. दुष्ट. (कीचक.) १९. खलणें=खलांत घालून बारिक करणें, वांटणें.

भीमांगुष्ठासि धरी स्वांगुष्ठें धर्मराज दडपून, ।
नाहीं तरि तेव्हांचि श्येनेंतसा मारिताचि झडपून. ॥ ७०
रोधी युधिष्ठिराज्ञावेला भीमार्णवाचिया वेगा, ।
नाहीं तरि जगदंतक पूर तैया तेभवांचि यावे, गा ! ॥ ७१
कृष्णा रडत म्हणे, 'या रायावरि धर्मनीति विटंताहे, ।
कैसी उपेक्षिता, हो ! सभ्यस्त्रीकीर्तिहानि विटेता हे. ॥ ७२
प्रेमें रक्षितिल सदा म्हेणुनि दिलें मी जयांसि मत्तातें, ।
तो गंधर्व उपेक्षिति मज कां ? कां मारिती न मत्तातें ?' ॥ ७३
शुचि वपु तें योग्य नव्हे सेवाया योग्य कीचकमलातें, ।
जें राजहंससंमत तुंडवितसे काँक नीच कमलातें. ॥ ७४

---

१. अध्याय १६ श्लोक १७ पहा. २. ससाणासा. येथें 'तसा' हा उपमावाचक शब्द असून 'झडपून मारणें' हा उपमानोपमेयांचा साधारण धर्म आहे. ३. धर्मराजाची आज्ञा हीच समुद्रवेला (मर्यादा, तीरभूमि). ['वेला स्यात्तीरनीरयोः' इति विश्वः, 'वेला काले च सीमायामब्धेः कूलविकारयोः । अक्षिप्टमरणे रोगे ईश्वरस्य च भोजने ॥' इति मेदिनी.] ४. भीमरूप सागराच्या. [हा रूपकालंकार जाणावा.] ५. जगद्+अंतक=जगताचा नाश करणारे. ६. या भीमसागराला. ७. आले असते. ८. अध्याय १६ श्लोक २०-३३ पहा. ९. या विराटराजावर. १०. विटणें= कंटाळा येणें, कंटाळणें, रुसणें, रुष्ट होणें. ११. संभावित स्त्रीची अप्रतिष्ठा जींत आहे अशी (विटता). 'सभ्यश्रीकीर्तिहानि विटता' असाही कोठें पाठ आहे. हा पाठ स्वीकारल्यास 'जींत सभ्यजनाची, संपत्तीची आणि कीर्तीची हानि आहे अशी विटता' असा अर्थ करावा. १२. जारकर्म, जारता (बलात्कार). १३. कर्मणि प्रयोगांत कर्मपद प्रथम किंवा द्वितीय पुरुषीं गद्यांत फारसें येत नाहीं, पण पद्यात्मक ग्रंथांत तशीं उदाहरणें कधीं कधीं आढळतात. जसें प्रस्तुत गीतींत **'मी'** हें प्रथम पुरुषीं कर्मपद आहे. या नियमाचीं अन्य उदाहरणें:—(१) **वरिलासि** मत्सखीनें, म्यांही वरिलासि **तूं** मनें मातें. । पापापासुनि रक्षीं या माझ्या चालवूनि नेमातें. ॥, (२) जाउनि तो सूत म्हणे कृष्णे ! द्यूतांत **तूं** स्वयें धर्में । **हारविलीस,** सुयोधनसदनाप्रति ये करावया कर्में. ॥, (३) प्रभु तिस म्हणे धुवावया **सोडविलीस** (तूं) यशास । जा, **त्याजिलीस** परकरगता व्हाविस मला कशास. ॥, (४) परमेशा ! **तूं** मुनिनीं चित्तीं षडरिक्षयार्थ **धरिलास.** ।, (५) प्रद्युम्न म्हणे **केलों** पूर्वी ऐसाचि **मी** हरें काय. ।, (६) त्यातें प्रद्युम्न म्हणे मायेसि **तुम्ही दिला** उपाय नसे. ।. १४. माझ्या पित्यानें. १५. माजलेला त्यातें. १६. स्वच्छ, पवित्र. १७. कीचकरूप मळातें. १८. राजहंसांचें आवडतें. [राजहंस–'राजहंसास्तु ते चंचुचरणैर्लोहितैः सिताः' इत्यमरः. ज्यांचे चंचुचरण सित (शुभ्र) असतात त्यांना राजहंस म्हणतात. यानांच 'कलहंस' असेंही नांव आहे 'राजहंसस्तु कादंबे कलहंसे नृपोत्तमे' इति हैमः.] १९. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. या पद्यांत अप्रस्तुतप्रशंसा नामक अलंकार आहे. जेथें दुसऱ्या गोष्टीचें वर्णन करावयाचें असतें, त्या गोष्टीचें

ज्या नीति सतीची बुधमान्या अशुभ पायरी, तीतें ।
दासीपरि पाहे हा, नुमजेचि विराटराय रीतीतें. ॥ ७९

वर्णन न करतां, ज्या गोष्टीचें उदाहरण द्यावयाचें असतें तिचेंच वर्णन केलें असतें, म्हणजे जेथें प्रस्तुत गोष्टीचें साक्षात् कथन न करतां तिचा प्रलय यावा म्हणून अप्रस्तुत गोष्टीचें वर्णन असतें आणि या प्रकारें प्रस्तुत गोष्ट गर्भितार्थानें दर्शविली असते तेथें **अप्रस्तुतप्रशंसा** नामक अलंकार होतो. यालाच **अन्योक्ति** असें म्हणतात. हा 'पर्यायोक्ता'चा एक प्रकार आहे. यांत अप्रस्तुत (अप्राकरणिक) व्यवहाराचें वर्णन असून त्याचें पर्यवसान प्रस्तुत (प्राकरणिक) विषयावर असतें. यांत अप्रस्तुत वृत्तांच्या वर्णनानें प्रस्तुत वृत्ताचें ज्ञान व्हावयाचें असतें म्हणून त्यांत सामान्यविशेषभावसंबंध किंवा कार्यकारणभावसंबंध असतो. प्रकृत पद्यांत 'राजहंस' अप्रस्तुत, 'पांडव' प्रस्तुत; 'काक' अप्रस्तुत, 'कीचक' प्रस्तुत; 'कमल' अप्रस्तुत, 'द्रौपदी' प्रस्तुत; अशी पदांची योजना समजावी. या अलंकाराला इंग्रजींत Allegory असें म्हणतात. यांचीं उदाहरणें:—(१) शर्मिष्ठा ययातीस म्हणते, 'द्वारीं मृगपतिहस्तांतूनि अहो! वीरराय! जी मुक्ता, । ती सेविजेल इतरें सिंहावांचोनि काय जी मुक्ता? ॥' [आदिपर्व—अध्याय ११ गीति ८], (२) हें शर्मिष्ठेचें देवयानीस अनुलक्षून भाषण आहे:—'राजसुतेचें यश जें तुज येइल काय गे! दरिद्रे! तें, । पाहसि विकोंवया तूं केशरमौल्यें कसें हरिद्रेतें. ॥' [आदिपर्व—अध्याय १० गीति १८], (३) 'उंच वाढला एरंड । तरी कां होइल इक्षुदंड ॥,' (४) 'जरी गर्दभ वेगें धावे । तरी कां अश्वमोल पावे ॥,' (५) 'कुमुदिनी काय जाणे तो परिमल । भ्रमर सकळ भोगीतसे ॥,' (६) 'पाषाण जीवनीं असतां कल्पवरी । पहातां अंतरीं कोरडा तो ॥' [तुकाराम], (७) 'मधुपासि बहु प्रिय जो आत्मप्राणव्रजासम स्तवक, । सकलरसिकप्रिया ला न दुकोनिहि पाहती समस्त बक. ॥' [वनपर्व—अध्याय १२ गीति २८.], (८) 'ती सुमति म्हणे 'ताता, न त्यजुनि पयोधिला नदी परते, । न पतंगचित्तवृत्ति क्षणही रत्नीं त्यजूनि दीप रते. ॥' [वनपर्व—अध्याय १३ गीति २२.], (९) 'शशमंडळींत कोल्हा म्हणतो, 'मी सिंह.' वल्गना करितो. । जोंवरि न पाहिला गजमुक्ताफळकवळभक्षिता हरि तो. ॥' [कर्णपर्व—अध्याय २७ गीति १२]. २०. कीचकरूप काक. २१. द्रौपदीरूप कमळातें.

१. ज्या (द्रौपदीला) सतीची (पतिव्रतेची) बुधमान्या नीति (कविसंमत अशी मूर्तिमती नीति च) [गणति अध्याहृत-समजति] (तसेंच) (सतीची) अत्युच्च पायरी (पतिव्रतासमुदायांत श्रेष्ठ) [गणिति] तीतें हा विराटराय दासीपरी (दासीप्रमाणें) पाहे (समजे), रीतितें नुमजेचि (धर्मन्यायानें काम करण्याचें न जाणे, न समजे.) पतिव्रतावृंदांत श्रेष्ठ व मूर्तिमती नीतिदेवता अशी जी द्रौपदी तिला विराट हा दासीप्रमाणें हलकी समजला व कीचकापासून तिचें रक्षण करण्याचें आपलें काम विसरला—असा तात्पर्यार्थ. [अथवा—ज्या सतीची नीति बुधमान्या (श्रेष्ठजनसंमत), [आणि] (ज्या सतीची) पायरी अत्युच्च (अत्युन्नत पदवी) तीतें हा विराटराय दासीपरि पाहे इ० असा अन्वय केला तर 'गणति' हें क्रियापद व ज्या म्ह० द्रौपदीला असे ज्यास्त शब्द पदरचे व्यावयास नकोत; अर्थ सरळच आहे. पहिल्याप्रमाणें अर्थ लावण्याच्या रीतींत व्याकरणाची थोडीशी ओढाताण होते परंतु अर्थ गौरवयुक्त व सुरेख होतो. न उमजे=न समजे, येथें 'न'च्या अकारास परसवर्ण होऊन नुमजे असें रूप सिद्ध झालें आहे. जसें—नुचाहू, नुघडी].

भूप म्हणे, 'मज तुमचें कलिकारण न समजेचि तैंकशतें, ।
नुमजुनि मधुरहि वेंदतां लागे गालीपरीस कैंकश तें.' ॥ ७६
कंक म्हणे, 'सुज्ञे! जा, त्वां न अनाथासमान वरडावें, ।
गे! गांजितां पर स्वस्त्रीतें, न म्हणेल मानव 'रडावें.' ॥ ७७
गंधर्व त्वत्पति कीं जरि ते सुसमर्थ देशसमयज्ञ, ।
थोरां न अन्य मान्य श्रितरक्षणकीर्तिलेशसम यज्ञ.' ॥ ७८
तेथुनि राज्ञीपाशीं जाऊनि म्हणोनि 'तात! अंब!' रडे, ।
फोडी जैशी व्याघ्रविमुक्त कुलभ्रष्ट धेनु हंबरडे. ॥ ७९
कळतां म्हणे सुदेष्णा, 'नाहींच विचार कीचकीं अधमीं, ।
सखि! उगि, जरि म्हणसिल, तरि करिन तव सुखार्थ बंधुचा वध मी.'
कृष्णा म्हणे, 'वधावा भ्राता त्वां कां? तुझा न अपराधी; ।
पति गंधर्व न दुर्बल, माझी प्रार्थील किमपि न परा धी.' ॥ ८१
निजदुःखाहुनि केवळ कंकनकगासहि गणी लहान सती; ।
तें द्वारकापुर तसें आणी बहुधा मनीं महानस ती. ॥ ८२

---

१. अध्याय १६ श्लोक ३५ पहा. २. कलहकारण. ['कलिः स्त्री कलिकायां ना शूराजिकलहे युगे' इति मेदिनी, 'कलिर्विभीतके शूरे विवादेऽल्पयुगे युधि' इति हैमः.] ३. शतशः कल्पनांहीं. ४. वदलें असतां. ५. कठोर, कडू. हें गीत्यर्थ सुभाषितरूप आहे. ६. सुदेष्णासदनीं जा, येथें उभी राहूं नको. [अध्याय १६ श्लोक ४०-४४ पहा.] ७. देशकाल जाणणारे. ८. इतर यज्ञ मान्य नाहीं. ९. आश्रितांच्या रक्षणेंकरून जी कीर्ति प्राप्त होते तिच्या लेशासारिखा. १०.'जैशी' शब्द उपमावाचक आहे. ११. वाघापासून सुटलेली. १२. कळपांतून दूर झालेली (चुकलेली). १३.अध्याय १६ श्लोक ५० पहा. १४. अध्याय १६ श्लोक ५१ पहा. १५. दुसऱ्यास. १६. बुद्धि. १७. मेरुपर्वतासही. १८. द्वारका—कंसास मारून मथुरेमध्यें कृष्ण राहिला असतां कंसाचा सासरा जरासंध मगधदेशाचा राजा, याणें अठरा वेळां मथुरेस वेढा दिला; परंतु तो व्यर्थ झाला. तरी सुखानें राहण्याकरितां कृष्णानें द्वारकानामक नगरी गुजराथेच्या पश्चिमेस समुद्रामध्यें वसविली. पूर्वीचें द्वारका बेट समुद्रांत गुप्त झालें, व हल्लीं जी द्वारका आहे ती ला द्वोरकेच्या जवळच दुसरें बेट आहे असें म्हणतात. [विविधज्ञानविस्तार—पु० ५ अं० ६.] १९. द्वारकावासी कृष्णाचें व महानसवासी भीमाचें स्मरण तिनें केलें, व भीमाकडे जावयास निघाली, कारण तो कीचकाचा समाचार घेईल अशी तिची पक्की खात्री होती. येथें 'द्वारकापुर' आणि 'महानस' या शब्दांच्या लक्ष्यार्थाचें ग्रहण इष्ट आहे. 'द्रौपदीनें आपल्या वेषांतर घेतलेल्या पतीस अन्योक्तीनें आपलें दुःख निवेदन केलें असतां व कंकानें तीस तसेंच उपरोधोक्तीनें आश्वासन दिलें असतां पुढें सांगितल्याप्रमाणें वृत्तांत झाला.' [निबंधमाला—अंक ३७ पृष्ठ २०.] २०. स्वयंपाकगृह.

जाय निशीथीं साध्वी, दावी निज तो प्रभाचि वाट तमीं, ।
चित्तांत म्हणे, 'भीमा ! दयिता ! दयिता नसेन वाटत मी.' ॥ ८३
पाहूनि म्हणे, 'भीमा ! आश्रय तुज काय हें महानस, हा ! ।
न यशोहानि सहा, गा ! सुज्ञा ! सहकाय हे महान सहा.' ॥ ८४
साश्रु गळां पडुनि म्हणे, 'भेलां किंवा तुम्हीं अहां सासू ? ।
होतें म्हणत व्याली माझीच रिपुक्षयावहां सासू. ॥ ८५
मी काय ? भली निद्रा सुखदात्री ! काय हा महान सखा ! ।
गमलें वपुचि यशोधिक, तरि अन्नचि धरुनि हें महानस खा. ॥ ८६
निजलां काय मृतापरि ? व्हा जागे, सिंहसे उठा, राहो ।

---

१. अर्धरात्रीं. ['अर्धरात्रनिशीथौ द्वौ' इत्यमरः, 'निशीथस्तु पुमानर्धरात्रे स्याद्रात्रिमात्रके.'] २. द्रौपदी. साध्वी='पतिं या नाभिचरति मनोवाग्देहसंयता । सा भर्तृलोकानाप्नोति सद्भिः **साध्वी**ति चोच्यते ॥' [मनुस्मृति—अध्याय ९ श्लोक २९]. याचा भावार्थः—जी (स्त्री) मनानें, वाणीनें व देहानें पतीच्या मर्जीविरुद्ध कांहीं कृत्य करित नाहीं ती मरणोत्तर भर्तृलोकांस जाते व तिला इहलोकीं शिष्ट लोक **'साध्वी'** असें म्हणतात. ३. अंधकारांत. ४. पते प्रियकरा. ५. प्रिय जाया. ६. पाकशाला. ७. हाय हाय. ८. शरीरसहित. ९. सुवर्णहानि. १०. सोसा. देहहानिसहित धनहानि सुद्धां सहन करा, पण यशोहानि सोसूं नका. ११. रडत. १२. मिठी मारून. १३. जीवंत. [स+असु=सहित+प्राण.] १४. माझीच सासू शत्रुक्षय करणाऱ्या अशा वीर पुत्रांस प्रसवली (व्याली) असें म्हणत होतें. १५. शत्रूनाशकर्त्यांस. १६. येथें 'भली,' 'सुखदात्री' आणि 'महान' हे शब्द विपरीतलक्षणेनें योजिले आहेत, कारण 'घातकी', 'दुःखदात्री,' आणि 'तुच्छ, क्षुद्र' असा या शब्दांचा अर्थ प्रकृतस्थळीं यथानुक्रम विवक्षित आहे. येथें विपरीतलक्षणाद्वारा अथवा औपरोधिकरीत्या द्रौपदी आपला गूढ अभिप्राय जो लक्ष्यार्थ तो सूचवीत आहे. या विपरीतलक्षणेचीं दुसरीं उदाहरणें वनपर्वांत दोन आहेतः—(१) वनपर्व—अध्याय ९ गीति ३७ येतोंस=जातोंस. काव्यसंग्रह, पृष्ठ १३२. (२) वनपर्व—अध्याय १३ गीति ४ येतोस=जातोस. काव्यसंग्रह, पृष्ठ २००. याशिवाय कुंकू वाढलें, तांदुळ वाढले, बांगड्या वाढल्या, इत्यादि उदाहरणें विपरीतलक्षणेचींच होत.[अर्थाचे वाच्यार्थ, लक्ष्यार्थ आणि व्यंग्यार्थ (ध्वन्यर्थ) असे तीन प्रकार साहित्यशास्त्रग्रंथांत सांगितले आहेत.] १७. सिंहासारखे. [सिंह=हिनस्ति (हिंसा करितो, मारतो) इति सिंहः । 'हिसि' या धातूपासून वर्णविपर्यय होऊन 'सिंह' हा शब्द झाला आहे. तसेच 'हंस', 'गूढोऽत्मा' व 'वृषोदर' हे शब्द अनुक्रमें 'वर्णागम', वर्णविकृति' व 'वर्णनाश' हीं होऊन सिद्ध झाले आहेत. हे सर्व शब्द संस्कृत व्याकरणग्रंथांत एकाच श्लोकांत गोंविले आहेत. तो श्लोक येणेंप्रमाणेः—भवेद्वर्णागमाद्धंसः सिंहो वर्णविपर्ययात् । गूढोऽत्मा वर्णविकृतेर्वर्णनाशात्वृषोदरम् ॥]

निद्रा, कीर्ति वरा, हो! [1]ह्रीप्रद हा बाहु [2]भृगुकुठारा [3]हो.' ॥ ८७
भीम गडबडोनि उठे [4]अंकींच निवास तीस दे [5]वामीं, ।
चित्तीं म्हणे, 'बहुदिसां [6]आंतळलों या सतीस देवा! मी.' ॥ ८८
'दयिते! कां आलीस? [7]प्रमदे! हा [8]आर्द्र कां पदर जाये!?।
भ्यालीस [9]भीरु! भय कां? भेटें, त्यालाचि, कांप [10]दर ज्या ये. ॥ ८९
तूं काय भार? [11]भामिनी! उतरसि मांडिवरूनि कां, बस ये, ।
झालें काय? वद सुदति! सुमुखि! सति! रडूं नकोचि, थांब [12]सये!' ९०
देवी [13]म्हणे, 'पुसतसां जाणुनिही खेद काय मातें, हो!।
विनवा तुम्हीं तरि [14]सुकृत जें [15]बंधच्छेदका यमा तें हो. ॥ ९१

---

१. लज्जा देणारा. २. परशुरामाच्या परशूस. भृगु हें पद भृगु नामक व्यक्तिवाचक असून त्याचा उपयोग प्रस्तुत पद्यांत तत्कुलोत्पन्न पुरुष (परशुराम) या अर्थानें केला आहे; याप्रमाणेंच 'रघु' म्हणजे रघुकुलोत्पन्न पुरुष असा प्रयोग वारंवार आढळतो. ३. होवो. ४. मांडीवर. ['अङ्कः समीप उत्सङ्गे चिह्ने स्थानापराधयोः' इति केशवः.] ५. स्थान. ६. डाव्या. वामांकच स्त्रीचें बसण्याचें स्थान होय. ७. भेटलों, स्पर्शलों. ८. आवडती स्त्री=दयिता. 'ऊढायां देवि दयिते पुमानाह प्रियां प्रति । आर्यपुत्रं च जीवेश नाथ साप्याह वल्लभम् ॥' अशी सागरोक्ति आहे. [रंगनाथकृत टीकान्वित विक्रमोर्वशीयनाटक-पृष्ठ ५५-५६ पहा.] ९. प्रमदा=जिला प्रमद (हर्ष) असतो ती, उत्तम स्त्री. 'प्रमदः संमदे मत्ते स्त्रियामुत्तमयोषिति' इति मेदिनी. या गीतींत मोरोपंतांनीं वर्णन मोठें बहारीचें केलें आहे. याच्या पुढच्या दोन गीतीही मोठ्या सुंदर आहेत. प्रत्येक विशेषण (दयिता, प्रमदा, भीरु इ०) मोठ्या खुबीनें योजिलें आहे. या गीतीच्या द्वितीयार्धाचा अर्थ:-'भ्यालीस भीरु! भय कां, भेटें त्यालाचि कांप दर ज्या ये.' ज्या (मला भीमाला; ही भीमोक्ति आहे) दर (इषत्, अल्प) कांप (कंप) ये त्यालाचि (त्या मलाच) भेटें (भेट). तुझें दुःख पाहून माझ्या आंगावर रोमांच उभे राहिले आहेत त्या मला तूं भेट. 'त्यालाचि' असें म्हणण्याचें कारण पांडवांत द्रौपदीचा कळवळा विशेषतः भीमाला होता व हें समजूनच द्रौपदी त्याकडे दुःख निवारण करून घेण्याकरितां आली होती व हें भीम जाणून होता. रंगभूमीवर हा देखावा व त्या वेळची भीमाची व द्रौपदीची स्थिति व त्यांचे अनुरूप अभिनय हे पाहून मनाला जितका आनंद व्हावयाचा तितका आनंद कवीनें त्या देखाव्याचें शब्दचित्र काढून वाचकांना दिला आहे, असें म्हटलें असतां अतिशयोक्ति होणार नाहीं. या गीतीच्या चतुर्थ पादांत सुद्धां 'पर्यायोक्त' आहे. १०. भिजलेला. ११. भित्रे! हे भयशीले! ['भीरुरार्ते त्रिलिंगः स्याद्भरयोषिति योषिति' इति मेदिनी.] १२. अल्प, थोडा. १३. भामिनी=कोपना स्त्री. ['कोपना सैव भामिनी' इत्यमरः. 'भामू' (क्रोधे) या धातूपासून 'भामिनी' शब्द उत्पन्न झाला.] १४. ही भीमाची (गीति ८९-९०) प्रकटोक्ति आहे. १५. अध्याय १८-२० पहा. १६. पुण्य. १७. जें बंधछेदका यमा सुकृत [होतें] तें हो, तुम्ही विनवा=दुःखी व गांजलेल्या प्राण्यांस संसारबंधांतून मुक्त करणें हें यमाचें सुकृत. तें तुम्ही (भीमाला उद्देशून द्रौपदी म्हणत्ये) विनवा (प्रार्थना करा)=माझा वध करून

पुसता, नसे स्मृति म्हणुनि, [illegible] सांगत्यें, बरें परिसा, ।
परि साच निजाना, कीं लोहाची भीड काय जी! परिसा? ॥ ९२
कृष्णसखी द्रुपदसुता धर्मस्त्री सून पांडुराजाची, ।
कविगण गणपति गाती कीर्ति सुधासिंधुपांडुरा ज्याची. ॥ ९३
कवि जीस राजसूयामाजि, व्यापुनि मही नभा, गाती, ।
झाली विराटसदनीं सैरंध्री परम हीनभागा ती. ॥ ९४
जी कुरुसभेंत नेली द्यूतजिता किंकरी म्हणुनि अरिनीं, ।
बहु धावरीच केली, जसि देउनि हाक हस्तिनी हरिणीं; ॥ ९५

माझी ह्या त्रासांतून सुटका करा म्हणजे तुम्हाला पुण्य लागेल. पण (कीचकाला मारून) मला बंधमुक्त करण्याचें पुण्य जर तुमच्या नशिबीं नसेल, तर तें (मलाच आपल्याकडे घेऊन गेल्यानें आणि बंधमुक्त केल्यानें) यमाला तरी मिळो—असा कविहृद्गतार्थ समजावा. द्रौपदी ह्या वेळेस अतिशय गांजलेली असल्यामुळें असें तिनें म्हणणें केवळ स्वभावानुरूप होय.

१. ऐका. २. परि (पण—माझें वचन ऐकण्यापेक्षां) साच निजाना (खरोखर निर्जाना बरें!) कीं (कारण) लोहाची भीड परिसा काय जी! (परिसाला कायशी पडणार आहे? तिलमात्र पडावयाची नाहीं). ३. हा पाद सुभाषितरूप आहे. ४. अमृतसागराप्रमाणें शुभ्र. ५. ज्या पांडुराजाची कीर्ति इत्यादि. ६. राजसूययज्ञामध्यें. ७. आकाश व पृथ्वी यांस व्यापून. ८. हतभाग्य. [गीति ९३-९४ यांचें युग्म आहे.] ९. द्यूतांत जिंकलेली. १०. दासी. ११. हत्तीण. ['इन्'अंत शब्दांस 'ई' प्रत्यय लागून स्त्रीलिंगी नामें होतात, जसें—हस्तिन्-हस्तिनी, करिन्-करिणी, दंडिन्-दंडिनी, वेत्रधारिन्-वेत्रधारिणी. हस्तिन्=ज्याला हस्त (सोंड) आहे तो हस्ती=हत्ती. 'या शब्दावरून अपभ्रंश कसे चमत्कारिक होतात व भाषेंतील शब्दसंग्रह कसा वाढत जातो हें चांगलें लक्षांत येण्यासारिखें आहे. मूळ नक्षत्रवाचक शब्द 'हस्त' आहे. 'अश्विनी,' 'मृग' हीं नांवें जशीं आकृतिसादृश्यावरून पडलीं आहेत त्याप्रमाणेंच 'हस्त' हें नांवही हाताच्या आकृतीवरून वरील नक्षत्रास मिळालें आहे. पण अशी मूळ स्थिति असतां मराठींत प्रयोग पहा कसे दृष्टीस पडतात!—'हत्ती गर्जायाला लागला,' 'कोसळेल हत्ती तर पाडील भिंती.' हा चमत्कार होण्यास दोन तीन कारणें झालीं आहेत. एक तर अगोदर 'हस्त' आणि 'हस्ती' (हत्ती) हें वर्णसादृश्य. दुसरी गोष्ट ही कीं, मधें बीज जी बंदींत पडली असते ती वरील नक्षत्र लागतांच पुनः गर्जायाला जाते. तेव्हां गर्जनाची कल्पना साहजिक रीतीनें 'हत्ती'वर बसतेच. तिसरें असें कीं, हत्तीच्या दणक्याप्रमाणेंच वरील नक्षत्राची गर्दी असते. हत्ती मोकळा सुटून जर वोकळला तर गंडस्थलाच्या धडकांनीं जसें कांहीं राहूं देणार नाहीं व सारा विध्वंस करून टाकील, त्याप्रमाणेंच हस्ताच्या अमलांतही धडाधड घरें पडतांहेत, वाऱ्याच्या सपाट्यानें मोठमोठे वृक्ष उपळतांहेत, विजांचा कडकडाट चाललाच आहे, मुसळासारखे धोधारे चालून चोहोंकडे जळबंब होऊन गेलें आहे, हा प्रकार चोहोंकडे दृष्टीस पडतो. याखेरीजही ही एक कल्पना लोकांच्या मनांत बिंबलेली आहेच, कीं मेघांचा स्वामी जो इंद्र त्याचे हत्ती समुद्राचें पाणी सोंडेनें शोषून घेऊन चोहोंकडे

कीचक नीच कर तिचा धरि, परि हरिची सखी न अनुसरली, ।
कर आसुडितां पडतां खल, तेथुनि दूर ती सुतनु सरली. ॥ ९६
खेल दुर्दशार्थ सोडित होताचि, त्यजुनियां दया, लुगड्या, ।
स्मरतांचि भीड पडली जीची, दीनांचिया दयालु गड्या. ॥ ९७
पळतां पाठि सतीच्या लागे, वेणी धरूनि, दे हिसके, ।
स्वकराग्रेंहि शिवाया न रवि जिच्या कांतिसंपदेहि सके. ॥ ९८
लत्ता हाणुनि मूर्छित केली सुकुमार मूर्ति भूपातें, ।
अजि! सोसलें कसें पतिहृदया? सोसो सभ्य भूपा तें. ॥ ९९
पक्का बुद्धि करितसे सुयशाची वृद्धि, मृत्तिका कोची; ।

शाची वृष्टि करतात।' (निबंधमाला–अंक ५३ पृष्ठ २३.) १२. सिंहांनीं. ['हरि' शब्दाचे अनेक अर्थ आहेत:—'हरिश्चंद्रार्कवाताश्वशुकभेकयमाहिषु। कपौ सिंहे हरेऽजेऽशौ शक्रे लोकांतरे पुमान्॥' इति मेदिनी, अथवा 'यमानिलेंद्रचंद्रार्कविष्णुसिंहाखुवाजिषु । शुकाहिकपिभेकेषु हरिर्ना कपिले त्रिषु ॥' इति [हर्षचरित–शंकरकृत टीका पृष्ठ १५० पहा].

१. पडतां=पडला तेव्हां. ['तां' प्रत्यय धातूस लागून झालेल्या वर्तमान कृदंतानें जीं वाक्यें होतात तीं पूर्ण करण्यासाठीं कालवाचक क्रियाविशेषणें आणि क्वचित् संकेतवाचक अव्ययें योजावीं लागतात; जसें, 'स्मरतांचि (स्मरली तेव्हां–स्मरली न स्मरली तोंच) भीड पडली जीची दीनाचिया दयालु गड्या' [गीति ९७], (२) 'पळतां (पळाली तेव्हां) पाठि सतीच्या लागे' [गीति९८], (३) 'तंव ते उठोनि धांवुनि पळतां (पळत होती तेव्हां) कवळूनि नीच कबरीतें' [गीति ६६], (४) 'गे गांजितां (जर गांजीत असेल तर) पर स्वल्पीतें न म्हणेल मानव रडावें' [गीति ७७], (५) 'कळतां (कळलें तेव्हां) म्हणे सुदेष्णा' [गीति ८०], (६) 'उच्छिष्ट चारितां (जर चारिलें तर) मज, मज करवीं धुवावितांचि (जर धुवविलें तर) चरणातें' [गीति १८], (७) 'श्रीरामाच्या हरितां (हरिली तेव्हां) तत्तेजें खल खराखुरा मेला' [गीति १०५]. २. सुगात्री. ['सती' असा अन्य पाठ दोन जुनाट प्रतींत आहे.] ३. नीच कीचक. ४. त्यजुनियां दया=निर्दयपणामें, कठोरपणें. 'दया लुगड्या,' 'दयालु गड्या' हा पंतांचा आवडता यमक आहे. ५. कृष्णाला. येथें 'कृष्णाला' असें सरळ वर्णन न करतां 'दीनाचिया दयालु गड्या' असें पर्यायामें वर्णन केलें आहे म्हणून हें सुरेख पर्यायोक्त झालें. ६. आपल्या किरणाग्रांनीं. (कर=हस्त, किरण.) ७. लावण्यातिशयास. या पद्यांत **'पर्यायोक्त'** अलंकार आहे. यांत द्रौपदीला 'मोठी पतिव्रता' असें सरळपणें न म्हणतां 'जिच्या कांतिसंपदेहि रवि स्वकराग्रेंहि शिवाया न सके' असें पर्यायानें म्हटलें आहे म्हणून हा 'पर्यायोक्त' अलंकार होय. या पद्याच्या उभयार्धांत वर्णलेल्या आसांच्या व पूर्वीच्या स्थितींतील वैषम्याकडे दृष्टि पोंचविल्यास यांत विषमालंकाराची थोडी छटा मारते असें वाटेल. या 'पर्यायोक्त' अलंकाराचें लक्षण पुढें (गीति १७८) दिलें आहे. ८. भूमीवर पाडून, भूमीवर पतनानें. ९. सभासदांसह भूपा (विराटराजाला) तें सोसो (सहन होवो.) १०. ही समग्र गीति सुभाषितरूप आहे. ११. माती, नाश. १२. कच्ची (बुद्धि) सुयशाची मृत्तिका करिते–असा भाव.

हरिनीं श्वावृत्ति वरिली, कीं हा नीच कृति कोकाची. ॥ १००
'तेज तुम्हां असतें तरि, उरता हाणोनि न विटें कीतेला, ।
अहितायुला न पीतां? तेजस्वी दीप न विटला तेला. ॥ १०१
देवा! वांचाया? हे स्त्री, मातीसीच तुडविली, लाजो ।
तोहि पती उद्धरिना अरिनें व्यसनांत बुडविलीला जो. ॥ १०२
हे स्त्री नव्हे, प्रतिष्ठा तुमची, जरि ईस सोडितां पाणी ।

---

१. श्वानाचा स्वभाव, कुत्र्याचा स्वभाव, कुत्र्याचें वर्तन. २. कावळ्याची. ३. तेज=पराक्रम, प्रभाव. ['तेजो दीप्तौ प्रभावे च स्यात्पराक्रमरेतसोः' इति मेदिनी.] ४. जर (कीचक) लातेला हाणोनि (लाथ मारून) उरता न=जीवंत राहता न. ५. हा संभावन अलंकार जाणावा. [संभावन—'संभावनं यदीत्थं स्यादित्यूहोऽन्यस्य सिद्धये'=असें झालें असतें तर असें होईल अशी सतर्क कल्पना करणें यास संभावन असें म्हणतात; जसें—जर शेष वक्ता असता, तर तुझ्या गुणाचें वर्णन झालें असतें; आत्याबाईला मिशा असत्या तर तिला काका म्हटलें असतें; मी जर ब्रह्मदेव असतों, तर कस्तूरिकामृगाच्या अंडांतून गंधगुण काढून खलाच्या जिन्हेमध्यें ठेविला असता.] ६. शत्रूच्या आयुष्यास, शत्रूच्या जीविताला. 'अहितायुला न पीतां? तेजस्वी दीप न विटला तेला.' प्रथम अर्धांत द्रौपदी भीमाला म्हणते, 'जर तुमच्यांत पाणी असतें तर तो नीच कीचक मला लात मारून जिवंत राहता काय? (प्रश्नालंकार; उत्तर—न राहता) तसेंच तुम्ही शत्रूच्या आयुष्याला न पितां? त्याला ठार न मारतां? तेजस्वी दीप हा तेलाला न विटला=तेल पिण्याला जसा तेजस्वी दीप कधीं त्रासत नाहीं त्याप्रमाणें तुमच्यांत जर तेज असतें तर तुम्ही शत्रूचें आयुष्यरूपी तेल न पिते काय? तेजस्वी दीप तेलास कधीं विटत नाहीं; जसें दीपाला मिळेल तितकें तेल हवें तसें तेजस्वी पुरुषाला शत्रु मिळतील तितके मारण्यास हवेत. यांत पांडवांना तेजस्वी दीप व अहितायुला तेल म्हटलें आहे. ७. अन्वय—देवा! हे मातीसीच (मातीप्रमाणें) तुडविली (तुडविलेली) स्त्री वांचाया (जिवंत राहण्यास) लाजो, अरिनें व्यसनांत बुडविलीला (बुडविलेल्या स्त्रीला) जो पति उद्धरिना तोहि वांचाया लाजो:=हे ईश्वरा! कीचकानें लात मारून मातीप्रमाणें मला तुडविलें त्याअर्थी जगण्यांत काय जीव आहे? मरणें बरें. तसेंच आपल्या स्त्रीला शत्रूनें संकटांत पाडलेलें पाहून जो नवरा तिची कींव न करितां त्यापासून सुटका करीत नाहीं तोही मेलेला पुरवला, पण वांचणें त्याला श्रेयस्कर नाहीं. ८. मातीप्रमाणें तुडविलेली स्त्री वांचण्यास लाजो. ९. मातीसारिखीच. १०. हा अपन्हुति नामक अलंकार होय. उपमेयावर उपमानाचा आरोप करण्यासाठीं उपमेयाच्या स्वरूपाचा (गुणाचा) अपलाप (अपन्हव) केला असतो तेथें अपन्हुति अलंकार होतो; उपमेयाच्या खऱ्या स्वरूपाचा अपन्हव करून त्यावर उपमानाचा (नवीन गुणाचा) आरोप करणें, म्हणजे उपमेय असत्य आणि उपमान सत्य असें स्थापणें यास अपन्हुति म्हणतात. प्रस्तुत गीतींत द्रौपदीच्या स्त्रीस्वरूपाचा अपलाप (अपन्हव) करून त्याच्या ठायीं प्रतिष्ठागुणाचा आरोप केला आहे, म्हणजे स्त्री (उपमेय) असत्य आणि प्रतिष्ठा (उपमान) सत्य असें प्रतिपादन केलें आहे. ही अपन्हुति अगदीं संस्कृत कविवर्यांच्या तोडीची असून किती तरी समयानुरूप आणि सुंदर आहे. हींत उत्प्रेक्षेची छटा मारीत असल्यामुळें तर ही फारच सुरेख झाली

धर्मे चार्थे च असें वदलां कां प्रथम जोडितां पाणी ? ॥ १०३
निस्तेज मीही, दीपकवर्तिहरचि तो खराखु, रामेला ।
श्रीरामाच्या हरितां तत्तेजें खल खराखुरा मेला. ॥ १०४
मज मरण सुसह, परि हें दुःसह बहु, धातया ! न रामेला ।
रक्षी वरूनि जो जन म्हणती बहुधा तया नरा मेला.' ॥ १०५
दावी रडोनि झाले जे रांध उगाळितां स्वहात किणी. ।
भीम म्हणे, 'विधिलेखनि ! लेखनि नच वंचकलीस घातकिणी.' १०६

आहे. दुसरीं उदाहरणें:—(१) हा चंद्रमा नव्हे, तर आकाशगंगेंतील कमळच आहे; (२) ही शब्दवृष्टि नव्हे, तर अमृतवृष्टिच होत आहे; (३) हें मुख नव्हे तर चंद्रच आहे. ११. पाणी सोडणें=टाकणें, त्याग करणें, सोडून देणें. [कोणतेंही दान यथासांग व्हावें व त्याजवरील दात्याची सत्वनिवृत्ति व्हावी म्हणून पाणी सोडून त्या दानाची समाप्ति करतात, या आचारावरून पाणी सोडणें म्हणजे सर्वस्वी त्याग करणें असा अर्थ निष्पन्न झाला.]

१. कन्यादानप्रसंगीं कन्येचा पिता (दाता) वरास म्हणतो:—'धर्मे चार्थे च कामे च नातिचरितव्या त्वयेयम्'=हे विप्र ! धर्म, अर्थ, व काम या तिन्ही पुरुषार्थांचें संपादन तूं (या कन्येला) सोडून करूं नको. यावर हात जोडून वर म्हणतो:—'नातिचरामि'=मी इला (या वधूला) सोडून (धर्मार्थकामसंपादन) करणार नाहीं. येथें या विवाहकार्यातील प्रतिज्ञाविधीस उद्देशून द्रौपदीची उक्ति आहे. २. हात. पाणी जोडितां=पाणिग्रहण करतां. ३. मीहि निस्तेज, तो (कीचक) दीपकवर्तिहरचि खराखु. द्रौपदी म्हणते, 'बरें तुमच्यांत तेज नाहीं तर माझ्यांत तरि पाहिजे होतें ? तेंही नाहीं; व तो कीचक हा दिव्याची वात हरण करणारा लठ्ठ उंदीर. द्रौपदीही निस्तेज (ज्योत विझलेली) दीपकवर्ति व तो कीचक तिचें हरण करणारा लठ्ठ उंदीर. ४. दिव्याची वात नेणारा. ५. कीचक. ६. प्रखर (दुष्ट) उंदीर. ७. रामा=स्त्री. ८. त्या रामभार्येच्या तेजानें. ९. रावण. १०. हें पराधीन जिणें दुःसह. ११. हे देवा. १२. आपल्या स्त्रीला. १३. स्वीकारून, अंगीकारून. १४. विराटराजाच्या घरीं द्रौपदीस चंदन उगाळण्याचें काम असे असें वर्णन आहे. (अध्याय २० श्लोक २३-२६.) १५. घट्टे पडलेले. [किण=क्षत, चिन्ह, वण, घट्टा. 'किण'शब्दाला 'इन्' लागून किणिन् (किणी) असें विशेषण झालें. या प्रत्ययानें बहुत विशेषणें होतात. जसें, हल—हली (नांगऱ्या बलराम), धन—धनी, हस्त—हस्ती, पक्ष—पक्षी. इन् प्रत्यय अकारांत नामास लागतो] १६. हे ब्रह्मदेवाचे लेखणी ! हें 'चेतनधर्मारोपोक्ति' (Personification) नामक अलंकाराचें उदाहरण आहे. जेथें अचेतन पदार्थांवर सचेतनत्वाचा आरोप करून सचेतनाचा धर्म दाखविला असतो तेथें हा अलंकार होतो. येथें लेखनी अचेतन असून तिची क्रिया सचेतन ज्ञानसंपन्न मनुष्याप्रमाणें समजून तिची निंदा केली आहे. याच अलंकारास 'अनेकविद्यामूलतत्त्व' ग्रंथांत 'चेतनगुणोक्ति' असें नांव दिलें आहे. हा अलंकार इंग्रजी साहित्यशास्त्रांतून घेतला आहे. या अलंकाराचें अन्य उदाहरण:—'काष्ण म्हणे पळ

नेत्रें पुसोनि [3]कवळुनि **भीम** सतीला म्हणे, 'उगी, न रडें, ।
[3]अज्ञातवास नसता, तरि अरिचें तैंचि मुरडितों नेरडें. ॥ १०७
धर्माज्ञेतें भ्यालों मी साध्वि! न [4]अंधनंदनगदेतें, ।
सुख गुरुवचोनुगचि वपु दे, न [5]सुरसगंध**नंदन**ग दे तें[6]. ॥ १०८
एकांत नृत्यशालाशयनीं [7]भेटे, असेंचि कर, [8]जाये! ।
येईल [9]तसेंच माझ्या **नृ**हरीच्या यश जसेंचि [10]करजा ये. ॥ १०९
[11]काळाहि न [12]भीतिस जी स्त्री तूं भ्यालीस काय अल्पा या? ।
[13]कल्पाया सत्य, स्मित[14] कर, म्हण '[15]नृत्यालयस्थतल्पा या.' ॥ ११०
[16]कल्पाग्निपुढें [17]कूपीं **कृष्णे**! राहील काय ओलावा? ।
[18]गरुड म्हणतां [19]प्रतिभटा! वांचेल कसा म्हणोनि 'ओ' [20]लावा?॥ १११

इकडे पाहुन सज्जन न पत्रिकेतुकडे । चर्मापरि लिहिलें कीं वपुचे मज्जननपत्रिके! तुकडे ॥' [द्रोणपर्व—अध्याय ३ गीति १३१ पहा]. १७. लिहितांना. १८. भ्यालीस.

१. अध्याय २१ श्लोक ४९-५१ पहा. २. द्रौपदीचे सांत्वनार्थ ही भीमोक्ति आहे. (अध्याय २२ पहा.) ३. 'अज्ञातवास नसता'=ज्ञातवास असता. येथें दोन प्रकार असून त्यांचा लोप झाला आहे. ['संभाव्यनिषेधनिवर्तने द्वौ प्रतिषेधौ' इति वामनः (शिशुपालवध—सर्ग ४ श्लोक ५१ टीका), 'स्मृतिनिश्चयसिद्धार्थेषु नञ्द्वयप्रयोगः सिद्धः' इति अधिकारसूत्रम् (मेघदूत—उत्तरभाग श्लोक ४४ टीका)]. ४. हें 'संभावन' नामक अलंकाराचें उदाहरण समजावें. ५. अंध+नंदन+गदेतें= आंधळा धृतराष्ट्र+पुत्र दुर्योधन+गदारूप आयुधातें=दुर्योधनाच्या गदेतें. ६. गुरुवचन पाळणारें. ७. उत्तम रस व गंध यांनीं युक्त अशा नंदन नामक इंद्रोद्यानांतील ग (गीत). ग=गीत. [गं गीतं गा च गाथा स्यात्' इति एकाक्षरकोषः.) ८. हें गीतार्ध सुभाषितरूप आहे. ९. कीचक भेटे—असा भावार्थ. १०. हे भार्ये! ['पतिर्जायां प्रविशति गर्भो भूत्वेह मातरम् । तस्यां पुनर्नवो भूत्वा दशमे मासि जायते । तज्जाया **जाया** भवति यदस्यां जायते पुनः ॥' इति श्रुतिः.] ११. माझ्या करजा यश येईल—असा अन्वय. १२. नखांस. १३. 'काळाहि न भीतिस ती, स्त्रीश्वरि! भ्यालीस' असा अन्य पाठ आहे. १४. भीतिस=भ्याली असतीस. अन्वय—जी तूं स्त्री कालाहि न भीतिस (प्रत्यक्ष काळाला देखील भ्याली नसतीस) ती (तूं) या अल्प (क्षुद्रा) भ्यालीस काय? १५. आपला संकेत-विचार कीचकास सत्य वाटावा यास्तव. १६. मंदहास्य. [स्मित='ईषद्विकसितैर्गंडैः कटाक्षैः सौष्ठवान्वितैः । अलक्षितं द्विजद्वारे सूत्रमानां स्मितं भवेत् ॥' इति चारित्रवर्धनः रघुवंश—सर्ग ९ श्लोक ३७ टीका.] १७. नाटकशाळेंतील पलंगीं (शयनीं). १८. प्रलयकाळच्या अग्नीपुढें. १९. विहिरींत. २०. ओलावा राहणार नाहीं—असा काकुर्थ जाणावा. २१. हें गीतार्ध सुभाषितरूप आहे. प्रतिभटा गरुड म्हणतां लावा ओ म्हणुनि कसा वांचेल? असा या अर्धांचा अन्वय. गरुडानें प्रतिपक्ष्याला आव्हान केलें असतां (हे प्रतिभटा असें म्हणतां) लावापक्षी त्याला उत्तर देऊन (ओ म्हणून) सामना करील तर तो जिवंत राहील काय? अर्थात् राहणार नाहीं. गरुड 'अरे प्रतिभटा!' अशी हांक

उत्साहभरें हृदयीं पर्वी[1] पाथोधिसाचि[2] वाढत मी, ।
पूर्वीच नृत्यशालाशयनीं जाउनि बसेन गाढतमीं[3]. ॥ ११२
मुळमुळ[4] रडों नको सति! सीतेसहि सोडिलें न भोगानें, ।
तेजें असोनिहि वरिले कालकृताभ्युदयलय[5] नभोगानें. ॥ ११३
हरिभक्तच्छल करितां तत्काल उलेल[6] कां न नीचोर[7]? ।
निश्चय सद्धन[8] करितां, निजमार्ग भुलेल[9] कोननीं[10] चोर.' ॥ ११४
करवुनि खलवधनिश्चय तेथुनि गेली सती स्वशयनातें, ।
कंठी क्षेपा[11] स्मरोनि प्राणसख्या[12] पुंडरीकनयनातें[13]. ॥ ११५
गांठी तिला पुन्हा तो खेल[14], जेंवि पतंग[15] दीपकलिकेला[16], ।
प्रार्थुनि म्हणे, 'सुमुखि! मज भज, तुजसीं म्यां चुकोन कलि[17] केला. ११६
सुंदरि! विराट राजा नांवाचा जाण, साच मत्स्यप[18] हा, ।
शृंगाररसतरंगिणि[19]! तळमळतो संगमार्थ मत्स्य पहा. ॥ ११७
जरि हा विराट राजा, तरि कांहीं कोल[20] कां न वदला, गे!? ।
वृद्धकलत्र[21] युंज्या[22] मज हें तेंवि पहावयासि पेर्दे[23] लागे.' ॥ ११८

मारील तर; [किंवा] 'तुझ्या बरोबर युद्ध करण्यास हा गरुड आला आहे' असें कोणी म्हणेल तर. 'ओलावा न राहणें' हें 'न वांचणें' यासारखें पूर्वार्धांत समजावें. पूर्वार्धांत 'अतिशयोक्ति' अलंकार मानावा. उत्तरार्धांत 'दृष्टांत' अलंकार समजावा. 'कल्पाग्नीनें' भीम निगीर्ण केलेला मानून 'ओलाव्यानें' जिवंत राहणें [निगीर्ण केलेलें समजावें. २२. हे शत्रो. २३. लावापक्षी.

१. तिथिविशेषीं. [अमावास्या व पूर्णिमा ह्या पर्वकाळीं समुद्रास मोठी भरती येते, या गोष्टीकडे कविकटाक्ष आहे.] २. सागरासारिखा. ['सा' हें 'असा' याचें संक्षिप्त रूप आहे—ब्राह्मणसा=ब्राह्मण असा=ब्राह्मणासारखा.] ३. निबिड (गाढ) अंधकारांत (तमीं). ४. मुखदुःखाद्यनुभवानें, दुःखानें. ५. पराक्रम. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. ६. कालाच्या प्रभावानें प्राप्त झालेले उदय अस्त. ७. गगनचर सूर्यानें. ८. विदीर्ण होईल, फुटेल. ९. नीचाचें उर. १०. साबूचें द्रव्य. ११. अरण्यांत. १२. रात्र. १३. कमलनयन (श्रीकृष्णातें). १४. दुष्ट कीचक. १५. हा उपमालंकार जाणावा. १६. शलभ, टोळ. ['पतंगः शलभे शालिप्रभेदे पक्षिसूर्ययोः' इति विश्वः.] १७. दिव्याच्या ज्योतीला. १८. कलह. १९. मत्स्यदेशाचा स्वामी. २०. हे शृंगाररसाची नदी. २१. ज्या वेळेस राजसभेंत विराटासमक्ष कीचकानें द्रौपदीस लत्ताप्रहार केला, त्यावेळीं. २२. वृद्धाची स्त्री. ['कलत्र' (विवाहित स्त्री) हा शब्द संस्कृतांत नपुंसकलिंगी आहे.] २३. तरुणास. २४. राज्यपद. २५. ['लाग' हा धातु आवश्यकतावोधक असून याचें कर्तृपद बहुधा चतुर्थ्यंत असतें. जसें:— 'मज पहावयासि पद **लागे**', 'साची करणें **लागे मज** प्रतिज्ञा ती'.]

त्यासि खरें भासेसें प्रियशिक्षित[1] सस्मित[2] स्वयें वदली; ।
परि कांपली सतीची तनु जैसी मंदमारुतें[4] कदली[5]. ॥ ११९
खल पाय धरूं पाहे[6]; सुमति म्हणे, 'कासया[7] नति, सरा हो! ।
परि[10] पात्र निजरहस्या[11] भ्राता वा[12] दास या न तिसरा[13] हो.'॥ १२०
तें[14] वाटे त्या हालापानाद्यतिपातकायना[15] सत्य, ।
मग मनिं म्हणे, 'पित्याचा[16] पाहतसे[17] हात काय नासत्य[18]'. ॥ १२१
केल्या[19] संकेतातें ती निजरमणासि[20] सूचवी रमणी, ।
विटदृष्टि[21] ते कलत्रीं भावी[22] स्वनखांत सूचि[23] वीरमणी[24]. ॥ १२२
त्या शून्यनृत्यशालाशयनीं सांजेचि[25] गुप्त भीम निजे, ।
जागति[26] ते स्वीकारें भुजगांच्या[27] नित्य देति[28] भी मनिं जे.॥ १२३

---

१. प्रियानें (भीमानें) शिकविलेलें. २. हंसून. ३. अध्याय २२ श्लोक १६-१७ पहा. ४. मंद वायूच्या योगानें. ५. केळ. ['**कदली** वैजयंत्यां च रंभायां हरिणांतरे' इति विश्वः.] ६. धरूं पाहे=धरूं इच्छी. 'पाहणें' याचा अर्थ 'इच्छिणें' असा आहे. (गीति ४३ व ४८ यांत 'भंगूं पाहे' आणि 'मळवूं पाहे' अशीं पदें योजिलीं आहेत तेथेंही हाच अर्थ इष्ट आहे.) ७. 'कासया' हें रूप कवितेंत मात्र 'कशाला'बद्दल कधीं कधीं येतें. कासया=कशाला. ८. नमन, पायां पडणें. ९. दूर व्हा. १०. परंतु. ११. आपल्या या गुप्त विचाराला, आपल्या संकेताला. १२. अथवा. १३. होवो. १४. तें द्रौपदीभाषण. १५. हाला+पान+आदि+अतिपातक+अयना=मद्यपानादि अतिपातकाच्या स्थानास. (कीचकास.) १६. दिवस मोठा झाला असें वाटून कीचकाची शंका. [पित्याचा—बापाचा, सूर्याचा.] १७. हात पाहणें=हाताची नाडी पाहणें, प्रकृति कशी आहे हें जाणणें. [सूर्य लवकर कां मावळत नाहीं, यावर कीचकाची कल्पना—कीं तो कदाचित् आजारी असून त्याची प्रकृति नासत्य पाहत आहे म्हणून विलंब झाला असावा.] १८. नासत्य=अश्विनीकुमार, आश्विनेय, वडवा (अश्विनी)-रूपधारिणी सूर्यपत्नी **संज्ञा** (छाटी) हिला अश्वरूपधर सूर्यापासून झालेल्या दोन पुत्रांस अश्विनी-कुमार असें म्हणतात. यांतील ज्येष्ठाचें नांव **नासत्य** आणि कनिष्ठाचें **दस्र**. हे देवांचे वैद्य होत, म्हणून यांस 'स्वर्वैद्य' अशी संज्ञा आहे. हे सप्तविध देवांपैकी होत. हे दोन भाऊ असल्यामुळें यांस नासत्यौ, अश्विनौ, दस्रौ, आश्विनेयौ, वाडवेयौ असें साधारण नांव आहे. हे नकुलसहदेव यांचे जनक होत. १९. केल्या=केलेल्या. ['केला' 'ला'प्रत्ययांत रूपें यांचा जरी भूतकाळाच्या ठिकाणीं उपयोग होतो, तरी तीं मूळचीं विशेषणें होत आणि त्यांचा तसा उपयोग कवितेंत प्रायः आढळतो. जसें—'जरि उकिरड्यांत **पडला, मळला,** न हिरा तथापि सामान्य'; 'निष्फळ होती मेघें **त्यजिलीं, आलीं** हि जीविका शेतें' इत्यादि.] २०. आपल्या प्रियपतीला (भीमाला). २१. जारदृष्टि. २२. मानी. २३ सुई, कांटा. २४. उत्तम वीर. (भीम.) वीर=जो याचकांला, मित्रांला आणि अरिजनांला पराङ्मुख होत नाहीं तो वीर होय. युद्धवीर, धर्मवीर आणि दानवीर असे वीरांचे तीन भेद प्राचीन ग्रंथकारांनीं केले आहेत. [रघुवंश टीका—सर्ग ११ श्लोक २० हेमाद्रि.] हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. २५. संध्याकाळीं. [संध्या=सांज.] २६. 'जागति' याचा कर्ता 'ते' (भीमभुज) जाणावा. २७. आपल्या आकृतीनें. २८. सापांच्या, जारांच्या. (भुजग=सर्प, जार.) हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. २९. भीति.

झाली शाला केवल कृष्णा[1] पोषूनि अंधकारा ती, ।
जाणों[2] सुयशोर्थ तमोगुण[3] धाडी तेथ अंधकाराती[4]. ॥ १२४
चित्तीं भीम[5] म्हणे, 'सुरवर घे म्हणऊनि 'हा! सुरापसदा[6]!' ।
धिक् धिक् छी छी म्हणवुनि घेइल लोकांत हा सुराप[7] सदा.' ॥ १२५
आला त्या साध्वीसीं इच्छुनि जो परम नीच कामरण[8], ।
प्राप्त न होईल कसें त्या मद्यमदांध कीचका मरण? ॥ १२६
पाहे शयनीं निजला होता जो कांत[9] कीर्तिवरटांचा[10] ।
बसल्या ज्याच्या[11] दुर्जननागफणारूपकीर्तिवर टांचा[12]. ॥ १२७

---

१. कृष्णवर्णा; (पक्षीं) साक्षात् द्रौपदीच. २. हा उत्प्रेक्षालंकार जाणावा. येथें अंधकारावर (उपमेयावर) तो तमोगुणचआहे अशी उपमानाची संभावना केली आहे म्हणून हा उत्प्रेक्षालंकार होय. ३. तमोगुण=हा गुण प्रमाद, मोह आणि अज्ञान यांचा जनक आहे. (भगवद्गीता-अध्याय १४ श्लोक १७.) ४. अंधकारराक्षसाचा अराति शत्रु. (शिव.) ५. भीम चित्तीं म्हणे, "सुरवर 'हा! सुरापसदा!' [असें] म्हणऊनि घे"-असा अन्वय. सुरापसदा=सुराधमा. सुरवर=इंद्र. येथें इंद्रकृत अहिल्याधर्षणाचा कथासंदर्भ आहे. भीम मनांत म्हणतो देवश्रेष्ठ इंद्रानें सुद्धां परदारधर्षणानें सुराधम म्हणवून घेतलें, मग मद्यपी कीचक अतिशय फजीत पावेलच पावेल. या पद्याचा अर्थ पुढें लिहिल्याप्रमाणेंही होण्यासारखा असून तोच कदाचित् कवीचा अभिप्रेतार्थ असेल असें वाटतें. 'सुरवर घे म्हणऊनि हासुरापसदा' हासुरापसदा=हा+असुरापसदा असा पदच्छेद येथें करावा लागतो तो 'निरकुंशाः कवयः' या न्यायानें क्षम्य समजावा. असुरापसदाला (दुष्ट राक्षसालाही) 'हा म्हणऊनि' दुष्ट राक्षसालाही स्वकृतीनें हाय हाय म्हणविण्यास लावून (हे कीचका!) 'सुरवर घे' सुर (देव) होण्याचा वर घे. (हे कीचका!) युद्धांत मरण आल्यानें तुजसारख्या राक्षसाधमालाही स्वर्गति मिळेल-असा भाव. ६. देवनीचा. ७. मद्यपी. ८. मदनयुद्ध. [पांचालीसंगमाच्या आशेनें कीचक नृत्यागारांत रात्रीं आला. अध्याय २२ श्लोक ३९-४०.] ९. निजलेला. १०. नवरा, पति. ११. कीर्तिरूप वरटा (हंसिणी)चा. [वरटा=वृणीते सेवते सरः वरटा=जी सरोवराचें सेवन करते ती=हंसी. हंसाची स्त्री वरटा आणि सारसाची लक्ष्मणा असें अमरांत आहे. 'हंसस्य योषिद्वरटा' इत्यमरः, 'वरटा वरटीहंस्योस्तत्पतौ वरटः स्मृतः' इति तारपालः.] १२. (उत्तरार्ध.) ज्याच्या दुर्जननागफणारूप कीर्तीवर (दुर्जनाची नागफणारूप कीर्ति. येथें दुर्जनाला नागाची आणि दुर्जनकीर्तीला नागफणेची उपमा दिली आहे. जशी दुर्जनाची कीर्ति तशी नागाची फणा (फडा) असें समजावें. दुर्जनकीर्ति नागफणा असा समास केला असता तर घोंटाळा न होता, पण 'कीर्तिवरटाचा' हें षडक्षरी यमक साधलें नसतें.) टांचा बसल्या. ज्या (भीमाच्या) दुर्जनरूप नागांच्या कीर्तिरूप फणांवर अनेक प्रसंगीं पूर्वी टांचा पडल्या होत्या. (जशा कृष्णाच्या कालियसर्पाच्या फणेवर.) ज्या भीमानें दुष्टांच्या कीर्तींला (त्यांचा वध करून) धक्का बसविला म्हणजे त्यांचा वध करून आपलें यश वाढविलें त्या भीमाला इ० ('टांचा'-शब्दाकरितां 'नागफणा' हा शब्द घातला.)

[1]जों चांचपी [2]तयाच्या, [3]मृगपतिच्या जेंवि फेरुं आंगातें, ।
[4]करिती [5]करकर, [6]जाणों म्हणति जँडवरासि 'मरसि कां?' गातें. ॥१२८
'[7]आलों तुज भेटाया घेउनि सर्वस्व हें [8]उपायन, हो ! ।
प्रमदे ! त्वत्प्राप्तीस्तव बहु केली [9][10]विफल हा उपाय न हो. ॥ १२९
[11]असतां [12]दीप तरि सुमुखि ! मानुनि मज मूर्तमदन रमतीस, ।
लटकी म्हणूनि हृदयामाजि न देतीस पद [13]नरमतीस.' ॥ १३०
हळुच म्हणे भीम, 'तुम्हीं [14]सुमहागुणनदनदीप, [15]कोशाला ।
दीप? प्रकाशली [16]कीं पावुनियां [17]वदनदीपका शाला. ॥ १३१

---

१. जों=जेधवां, जेव्हां. [कवितेंत कधीं कधीं संबंधी क्रियाविशेषणानंतर येणाऱ्या तदनुरूप दर्शकक्रियाविशेषणाचा अध्याहार असतो, या नियमाचें हें उदाहरण आहे. येथें 'तों'-दर्शक क्रियाविशेषण अध्याहृत समजावें.] २. त्या भीमाच्या. ३. सिंहाच्या. हा उपमालंकार जाणावा. ४. कोल्हा. ५. करकर असा अनुकरणबोधक ध्वनि. ६. हा उत्प्रेक्षालंकार जाणावा. याचें लक्षण:—'संभावनमथोत्प्रेक्षा प्रकृतस्य परेण यत्.' जेथें प्रकृत उपमेयावर हें उपमानच काय अशी कल्पना (संभावना) केली असते म्हणजे प्रकृतावर अप्रकृताच्या धर्माचा आरोप अनिश्चितपणें केलेला असतो तेथें हा उत्प्रेक्षालंकार होतो. याची योजना करण्यांत 'जाणों' 'जणूं काय' 'वाटे' 'भासे' 'कीं' 'जेंवि' 'जणो' अशा शब्दांचा उपयोग करतात. या अलंकाराचे हेतूत्प्रेक्षा, फलोत्प्रेक्षा इत्यादि अनेक भेद आहेत. वनपर्व—अध्याय १२ गीति १०-१५ यांत सेतूवर बाहुत्व अतित्व असे अप्रकृत धर्माचे सहा आरोप केले आहेत म्हणून त्यांत उत्प्रेक्षालंकार झाला आहे. प्रस्तुत पद्यांत 'करकर करणें' या प्रकृत (प्रस्तुत) क्रियेवर अप्रकृत (अप्रस्तुत) 'मरसि कां—असें म्हणणें' या क्रियेचा आरोप (संभावना—कल्पना) अनिश्चितपणानें केला आहे. ७. मोठ्या वजनदार कीचकास; (पक्षी) महामूर्खास. ८. पलंगाचीं लांकडें. ९. ही कीचकोक्ति आहे. [अध्याय २२ श्लोक ४४-४६.] १०. नजराणा. ११. केला=केलेला. १२. हें 'संभावन' नामक अलंकाराचें उदाहरण आहे. याचें लक्षण पूर्वी दिलें आहे. येथें 'असता दीप' हें पूर्ववाक्य संकेतदर्शक आहे, आणि 'तरि सुमुखि ! मानुनि मज मूर्त मदन रमतीस' हें उत्तरवाक्य अनुमानदर्शक आहे. येथें संकेत खरा नाहीं म्हणून अनुमानही खरें नाहीं असा अर्थ जाणावा. १३. मनुष्यत्वबुद्धीस. नरमतिस (नररूपी बुद्धीस, मी मनुष्य आहें देव नाहीं ह्या बुद्धीला) लटकी म्हणूनि (खोटी समजून) हृदयामाजि (हृदयांत, मनांत) पद (जागा) न देतीस. तूं दिवा असता तर त्याच्या उजेडानें माझें मदनतुल्य सौंदर्य पाहून मी देव नाहीं मनुष्य आहें ह्या बुद्धीला आपल्या हृदयांत जागा न देतीस म्हणजे तूं मला देव मानलें असतेंस. माझ्याविषयींचीं तुझी नरमति लटकी म्हणून तीस आपल्या हृदयांत पद न देतीस. १४. उत्कृष्टगुणनदीचे समुद्र. १५. कक्षाला. १६. कीं=अशाकरितां कीं, कांकीं, कारण. १७. मुखरूप दीपकास.

तुमचें लोकांत, अहो! कीचक! सामान्य काय हो! [1]शील? ।
परि तूं [2]वरटेसि [3]कैरट नीच कसा [4]मान्यकाय होशील? ॥ १३२
संगासि [5]उर्वशीच्या स्वप्नीं तरि [6]काय गा! [7]ढवा लाहे? ।
[8]सैरंध्री वीरवधू या तुज [9]नरकाय गाढवाला हे. ॥ १३३
[10]नारद म्हणे मिळविलें यश निर्मुनि हेंचि [11]रत्न [12]मत्तातें, ।
वंदावें [13]माथां [14]कीं तुडवावें त्वां धुळींत मत्ता! तें? ॥ १३४
धरितोसि जीविताशा तूं [15]गरलप [16]मंद नीच [17]कांशाला? ।
[18]वृक्तकर्दमें ही आतांचि भरेल कीचका! शाला. ॥ १३५
[19]भगिनी रडेल तुज अनुमोदुनि नरकालयासि पाठवुनी; ।
दुर्मत्रीं [20]सुख पावे जी, हेमंतांत जेंवि पाठ [21]उन्नीं'. ॥ १३६
ऐसें बोलुनियां [22]धृतखलगल [23]बलजलधि तो भला बुकली, ।

---

१. स्वभाव. २. वरटा=हंसी. ३. कावळा. ४. मान्य शरीर ज्याचें असा. ५. उर्वशी—नरनारायण मुनींच्या ऊरुसमीपस्थ भागापासून (मांड्यांपासून) उत्पन्न झाली म्हणून या स्वर्वेश्येस 'उर्वशी' असें नांव इंद्रानें ठेविलें. हिची कथा पुराणांत वर्णिली आहे ती:—बदरिकाश्रमीं राहून तप करणाऱ्या नरनारायणांचें इंद्रास भय पडलें. तेव्हां त्यांस विघ्न करण्यासाठीं इंद्रानें वसंत, काम आणि देवांगना यांस निलाप्रमाणें पाठविलें. इंद्राच्या आज्ञेप्रमाणें अप्सरांनीं त्या ऋषींला भुलवून टाकण्याचा पुष्कळ प्रयत्न केला, परंतु ते काष्ठलोष्ठाप्रमाणें अगदीं निर्विकार होते. याप्रमाणें त्या सर्वांचे प्रयत्न निष्फळ झाले. तेथील स्त्रियांचें लावण्य पाहून काम आणि अप्सरा यांस लाज वाटली. तेव्हां त्यांनीं परत स्वर्गास जाण्याचा बेत केला. हें जाणून नरनारायणांनीं 'इंद्रासाठीं आश्रमांतील स्त्रियांपैकीं एकीस घेऊन जा,' असें सुचविलें. तेव्हां त्यांनीं ऊरुसमीपस्थ स्त्री पाहिजे अशी इच्छा दर्शविली, ती नरनारायणांनीं आपल्या तप:प्रभावानें पूर्ण करून उर्वशीला त्यांजबरोबर पाठविलें. (भागवत—स्कंध ११ अध्याय ४ पहा.) ६. असंभवद्योतक. प्रश्न. येथें सप्ताक्षरात्मक यमक आहे. ७. ढवा=हिजडा; कलावंतिणीचा साजिंदा. ढवा हा निंदाव्यंजक शब्द साजिंद्यास लावतात. 'ढवा' हा शब्द 'नामसुधाचषक' गीति ८८ यांत आला आहे. ८. वीरपत्नी, वीरभार्या. ९. नरशरीरी गाढवाला. १०. द्रौपदी. ११. माझ्या पित्यानें (ब्रह्मदेवानें). १२. माथां= मस्तकीं. ['आं' हा सप्तमीचा प्रत्यय आकारांत पुल्लिंगी नामास लागतो—माथां, गळां (गळ्यांत).] १३. 'कीं' याचे विकल्प, प्रश्न, आधार, कारण, असे अर्थ आहेत. प्रस्तुतस्थळीं 'कीं' म्हणजे 'किंवा' असें समजावें. १४. विषपान करणारा. १५. मंद=हतभाग्य, मूर्ख. ['मंदोऽतीक्ष्णे च मूर्खे च स्वैरे चाभाग्यरोगिणोः । अल्पे च त्रिषु पुंसि स्याद्धस्तिजात्यंतरे शनौ ॥' इति मेदिनी.] १६. कशाला. १७. तुझ्या रक्ताच्या चिखलानें. १८. मुदेष्णा. १९. जी बाईट मसलतींत सुख पावते, जशी हेमंतीं उन्हांत पाठ लौकर तापून सुख पावते, पण अंतीं ताप येऊन बाईट वाटतें. २०. उन्हांत. २१. धरला दुष्टकीचकाचा गळा ज्यानें तो. (भीम.) २२. बलसमुद्र.

पावेल जय कसा प्रभुसेतुसवें करिल जो अलावु कली? ॥ १३७
प्राणा मुकेल इच्छुनि सिंहीचे गजहि सबहुमान मुके, ।
कां न मुके कोल्हा? कां ही म्हणतिल त्या जनाधमा न मुके? ॥ १३८
प्रबलासीं करिल स्त्रीस्तव आमृति कां न नीच मूढ कली? ।
सुकविहि दशमुख निजतनुसह कालवृकाननीं चमू ढकली. ॥ १३९
ब्रह्याकरवीं स्मरवी मधुसूदनचरित जें पवनभू तें, ।
कांपवि शेषफणेतें न विराटाच्याचि त्या भवनभूतें. ॥ १४०

---

१. श्रीरामाच्या सेतूवरोवर. २. भोपळा. ३. कलह. हा प्रश्नालंकार आहे. येथें काकूर्थ घेतला पाहिजे. ४. ही सगळी गीति उत्तम सुभाषितांत गणण्यालायक आहे. सबहुमान गजही सिंहीचे मुके इच्छुनि प्राणा मुकेल; कोल्हा कां न मुके? त्या जनाधमा मुके ही कां न म्हणतील? मोठा हत्ती (गजश्रेष्ठ) देखील सिंहीच्या मुक्याची इच्छा करून मरेल; तर मग कोल्हा कां न मरेल? अर्थात् मरेल. (आतांपर्यंत आलंकारिक भाषणानें कवीनें इष्टार्थ सुचविला, फिरून ज्यास्त स्पष्ट रीतीनें तोच अर्थ सांगितला आहे). आपल्यापेक्षां ज्यास्त पराक्रमी पुरुषाच्या स्त्रीचा अभिलाष जर कोणी धरील तर त्या जनाधमाला मुके देखील ही कां न म्हणतील? गजानें सिंहीच्या मुक्याची इच्छा करणें यांत काव्यलिंग अलंकार होतो. 'कां न मुके कोल्हा' यांतही प्रश्नालंकार व कैमुतिकन्याय होतात. तसेंच 'त्या जनाधमा मुके ही कां न म्हणतील?' यांत 'अप्रस्तुतप्रशंसा' किंवा 'अन्योक्ति' झाली आहे. ५. चुंबनें. ६. मुकणार नाहीं? ७. बलाढ्यजनाशीं. ८. मरेपर्यंत. ९. पंडित असूनही. [रावणानें वेदार्ची खंडें पाडिलीं इत्यादि प्रकार सुप्रसिद्ध आहे.] १०. कालरूप वृकाच्या (लांडग्याच्या) आननांत (मुखांत.) ११. सेना. १२. यांत 'स्मरणालंकार' झाला आहे. स्मारक पदार्थ पाहून पूर्वानुभूत पदार्थाची स्मृति झाली म्हणजे 'स्मरणा'लंकार समजावा. यांत 'स्मरणें' धातूचा किंवा तदर्थक धातूचा प्रयोग अवश्य असतो. यार्ची उदाहरणें:—(१) अलिपुंज देखतां मज सीतेचे केश लक्ष्मणा **स्मरती**; । तत्कबरीसम हे शिखी-पिच्छ-कलाप स्वमानसीं भरती. ॥ (मंत्ररामायण—किष्किंधाकांड गीति ४.), (२) बहु रक्त दिसे, खेळुनि होय जसा काय बा! गुलालातें; । पळतां कर्ण **स्मरले** भिउनि पळे पोर बागुलालातें. ॥ (द्रोणपर्व—अध्याय १२ गीति ८३), (३) अरिहरिपाशुनि सुटतां करि करि भूपति पलायन त्वरित, । **स्मरले** सुरांसि तेव्हां कालयवनभीत शौरिचें चरित. ॥ (कर्णपर्व—अध्याय ३१ गीति ४३), (४) पार्थाचा धैर्य न दे रिपुदमनीं त्या तदा शर थिरोंया; । तेव्हां मज **आठवला** वालिवधख्यात दाशरथिराया. ॥ (कर्णपर्व—अध्याय ३६ गीति ४५). १३. भीम. १४. भीमानें ज्या वेळेस कीचकाला आपटून ठार केला त्यावेळेस नुसती विराटराजाच्या घराखालील जमीनच कांपली नाहीं, तर शेषफणा कांपली म्ह० संपूर्ण पृथ्वीला धक्का बसला. या कृत्यानें ब्रह्मदेवाला विष्णूनें मधुकैटभ दैत्यांस मारिलें त्या प्रसंगाची आठवण झाली. 'विराटाच्याचि त्या भवनभूतें' हें पद श्लिष्ट आहे. ज्यावेळीं विष्णूनें क्षीरसमुद्रांत मधुकैटभांला मारिलें त्यावेळेस फक्त विराटपुरुष जो भगवान् त्याची भवनभू (शेषफणा) हीच कांपली नाहीं तर तो धक्का सर्व पृथ्वीला पोंचून ती मस्तकीं धारण करणाऱ्या शेषाच्या फणेला सुद्धां कंप सुटला. येथें मधुकैटभ

दावी दुरूनि नरकग्रामाची भीम कीचका वेस, ।
कलिमाजि लघुत्वप्रद शक्तीस तसेचि नीच कावेस. ॥ १४१
जें सुयश पाकशाला मिरवी न हेतेभकेसरिगुहा तें; ।
हें किति? असो; नियुद्धाविषयीं याची न ये सरि गुहातें. ॥ १४२
जातां भीम म्हणे, 'गे! अपराध तुझा करूनि पर मेला; ।
वांचेल नीच कीचक कैसा लावूनि पाय परमेला? ॥ १४३
त्या सीतेला वाससविवाययसा, तुजहि कीचक विटाळी, ।

दैत्यांस विष्णूनें मारिलें या कथेवर कटाक्ष आहे. सहस्रफणाधारी शेष आपल्या एका कलेनें क्षीर-समुद्रीं राहतो व त्याजवर विष्णु आपल्या एका कलावतारानें सर्वदा शयन करितो असा समज आहे, त्यास अनुलक्षून हें वर्णन आहे.

१. द्वार. २. कलियुगांत. ३. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. ४. काव=गेरू. नीच (नीच लोक) कलिमाजि (कलियुगामध्यें) जसे कावेस तसेच शक्तीस लघुत्वप्रद (नीचपणा आणणारे) होतात=कावेचा जसा दुरुपयोग करतात तसाच शक्तीचाही दुरुपयोग करतात. प्रस्तुत स्थळीं कीचकानें आपल्या शक्तीचा यथोचित उपयोग केला नाहीं म्हणून त्यास नरकग्रामद्वार पाहण्याची वेळ आली असें सूचविलें आहे. जर त्यानें आपल्या शक्तीचा योग्य उपयोग केला असता, तर त्याजवर असा प्रसंग आला नसता आणि त्याच्या शक्तीस लघुत्व प्राप्त झालें नसतें, त्याच्या नीचपणानें त्याच्या शक्तीस लघुत्व आलें. कावेलाही नीच पुरुषांच्या योगानें लघुत्व प्राप्त होतें, कारण तिचा उपयोग संन्यासी यति इत्यादिकांनीं करावयाचा, असें असतां तदन्य लोक करतात आणि तेणेंकरून तिचा मान कमी होऊन तिला लघुत्व (हीनत्व) प्राप्त होतें. जो वास्तविक संन्यासी नाहीं तो केवळ कावेचा उपयोग करून संन्यासी बनतो आणि स्त्रियांशीं संबंध ठेवून कावेला (कषायवस्त्राला) कमीपणा आणतो. तसेंच नीच पुरुष गरीबास अथवा अनाथास गांजून आपल्या शक्तीचा दुरुपयोग करतो व कमीपणा आणतो. ५. मारिला आहे इभ (गज) ज्या केसरीनें (सिंहानें) त्याची गुहा. यांत 'व्यतिरेक' अलंकार झाला आहे. येथें 'पाकशाला' उपमेय असून त्याचें 'गुहा' या उपमानाहून आधिक्य वर्णिलें आहे. या पूर्वार्धांत उपमेय आणि उपमान यांचें साधर्म्य दाखवून पहिल्याचें आधिक्य दर्शविलें आहे. ६. नियुद्ध=भुजयुद्ध. ७. समता, बरोबरी. ८. षडाननातें. गुह हा देवांच्या सेनेचा नायक म्हणून याला सेनानी असें म्हणतात. ९. शत्रु. १०. श्रेष्ठेला, श्रेष्ठ अशा तुला. ११. इंद्रकाकासारखा. या प्रसंगाची कथा रामायणांत आहे ती अशी:—राम अरण्यांत चित्रकूटपर्वतावर सीतेसह वास करीत असतां एकदां इंद्रकाक नामक कावळ्यानें सीतेच्या लावण्यास भुलून स्तनप्रदेशावर पक्षतुंडनखांनीं क्षत केलें. तेव्हां रामानें त्यास या अविनयाबद्दल शासन करण्यासाठीं त्यावर इषीकास्त्राचा प्रयोग केला, म्हणजे इषीका नांवाचें एक तृण (काश) आहे त्याची काडी अभिमंत्रित करून ती त्यावर सोडिली. त्या अस्त्रापासून आपला बचाव करण्यासाठीं तो कावळा पुष्कळ फिरला, पण त्याचें रक्षण करण्यास कोणी धजला नाहीं. तें इषीकास्त्र त्याची पाठ धरून होतेंच. तेव्हां तो निरुपाय होऊन, अस्त्राघात सोसण्यास असमर्थ

त्या[1] यांहि दंडितो प्रभु, साहे दोषासि नीच, कैवि[2] टाळी. ॥ १४४
व्यसनीं प्रभु रक्षी, मी काय[3]? विसरलीस काय गे! हरितें[4]? ।
तत्स्मरणदीप नसतां[5] व्यापिल तम कां न कायगेह रितें[6]? ॥ १४५
ऐसेचि खल विदारुनि देइल बहु लाज [7]भीमकर [8]पविला, ।
[9]ज्यांहीं न हाच[10] चित्तीं तोहि [11]सतीकांत [12]भीम [13]करपविला.' ॥ १४६
[14]गुर्वाज्ञा म्हणउनि ती जाय सती [15]मृतविटासि लक्षाया, ।
मानी दिधला कालव्याघ्राला मांसपिंड भक्षाया. ॥ १४७

होत्साता रामास शरण आला. सर्वनाशापेक्षां एकनेत्रनाश बरा अशी त्यानें आपल्या मनाची समजूत केली. तेव्हां रामानें त्याचा एक डोळा काढून घेऊन त्याला मुक्त केलें–अशी कथा आहे. [अयोध्याकांड–सर्ग ९५.] या वेळेपासूनच काकाला 'एकाक्ष' 'एकनेत्र' असें नांव पडलें. अध्यात्मरामायणांत सीतेच्या पायांचा आंगठा काकानें नखांचे आणि चोंचीचे प्रहार करून फोडला असें वर्णन आहे. [अध्यात्मरामायण–सुंदरकांड–सर्ग ३ श्लोक ५३-६०.] कावळ्याचा स्पर्श अशुचि मानतात ही गोष्ट सुप्रसिद्ध आहे.

१. त्या इंद्रकाकाला. २. या कीचकाला. ३. मुळ, पंडित. ४. हा पाद सुभाषितरूप आहे. ५. येथें 'काय' याचा अर्थ 'तुच्छपणा' असा समजावा. ६. त्या हरीचें स्मरण हाच दीप. ७.नसतां=जर नाहीं, तर=जर नसेल तर. [कवितेंत कधीं कधीं जर तर, जरी तरी हीं संकेतवाचक दोनही अव्ययें गाळतात, या नियमाचें हें गीत्यर्ध उदाहरण समजलें तरी चालेल.] ८. शरीररूप गृह. ९. ही गीति कव्युक्ति मानावी हें बरें दिसतें. कारण वरीलच गीतींत 'माझ्या हातून काय झालें? हें सर्व कृष्णप्रसादाचें फळ आहे.' असें भीम द्रौपदीजवळ म्हणतो. व यांत तो आपल्या पराक्रमाची महती गातो हें कसें संभवेल? तेव्हां भीमोक्तीचा शेवट १४५ गीतीच्या शेवटीं मानून ही कव्युक्ति समजावी. शिवाय भीमाच्या पराक्रमाची महती १४२ गीतींत कवीनें आपण तिन्हाइतपणें गाइली आहे तेव्हां भीमोक्ति १४३-१४५ समजावी. असें किसेकांचें म्हणणें आहे. पण १४६व्या गीतीच्या पूर्वार्धांत 'भीमकर' असें पद आहे त्याचा अर्थ (विष्णुकर) मनांत आणिला असतां आणि उत्तरार्धांत 'हाच' व 'तोहि' अशीं पदें आहेत त्यांचा अर्थसंदर्भ पाहिला असतां, भीमोक्ति १४३-१४६ पर्यंत आहे असें म्हणणें भाग पडतें. सारांश 'भीमकर' 'हाच' 'तोहि' हीं पदें पूर्वोक्त अर्थास बाधक होतात आणि भीमोक्तींतून १४६ वी गीति काढून टाकली असतां ह्या पदांचा निर्वाह नीटपणें होत नाहीं. शिवाय ह्या गीतींत भीम आपल्या पराक्रमाची महती गातो आहे हें म्हणणेंही या गीतीचा जो अर्थ दिला आहे त्याला अनुसरून नाहीं. १०. परमेश्वराचे (विष्णूचे) भयंकर हात. ११. वज्राला. १२. ज्या खलांनीं. १३. मी भीम. १४. तो सतीकांत (पार्वतीपति) भीम (शंकर). १५.शिव. १६.संतापविला, त्रासविला. १७.गुरु=नवरा. 'पतिरेको गुरुः स्त्रीणाम्' या न्यायानें गुर्वाज्ञा [गुरु+आज्ञा=पति+निदेश] म्हणजे भीमाची आज्ञा असेंच समजावें. [अध्याय २२ श्लोक ८४.] हा श्लोक असा आहे:—'गुरुरग्निर्द्विजातीनां वर्णानां ब्राह्मणो गुरुः । पतिरेको गुरुः स्त्रीणां सर्वस्याभ्यागतो गुरुः ॥'. १८. मेलेल्या जारास.

स्मित करुनि म्हणे, 'पापा ! कां रे ! [1]प्राणादिसर्वहानीच्या ।
बीजा व्यभिचारित्वा भजलासि धरूनि गर्व, हा ! नीचा !' ॥ १४८
[2]साध्वी तेथूनि निघे चिंती पतिभुज मनांत [3]हरिसारे, ।
[4]राजसभापाळांतें दूरूनि म्हणे, 'समस्त [5]परिसा रे ! ॥ १४९
[6]मत्पति गंधर्व, तिहीं [7]सोडविलें, वधुनि कीचका, मातें. ।
मेले दशाननादिक, तरि वश होतात नीच कामातें.' ॥ १५०
[8]सैरंध्रीनें कथितां कीचकवधवृत्त, धांवले लोक, ।
तदनुज उपकीचक शत [9]सुदेष्णविराट पावले शोक. ॥ [10]१५१
तें देखत, [11]खांबाला आलिंगुनि, दूर राहिली होती, ।
कृष्णा [12]मृतबंधूंनीं [13]सश्रूंत निरश्रु पाहिली हो ! ती. ॥ १५२
[14]बहुधा काल म्हणे तिस, 'मारिन खळ तव बळें, नसें [15]दूरे, ।
[16]अरिरक्त पहा [17]दक्षिप्रय, [18]गणपमुखस्थहि असा न सेंदूर.' ॥ १५३
[19]खेळ [20]म्हणति, 'सस्मितमुखी ही सैरंध्री पहा उभी, मरण ।
[21]गुरु पावला [22]यदर्थें करुनि पतींसीं जिच्या [23]सुभीम रण. ॥ १५४

---

१. प्राणादिक सकल नुकसानींच्या मूळ कारणाला. २. 'हरिसारे' याचा अर्थ सिंहासारखे असा करावयाचा नाहीं, तर हरि म्ह० सिंह त्याचें सार म्ह० बल ज्यांत ते सिंहासारखे बलवान् (भुज) असा करावा. या पद्यांत–पतिभुज हरि (सिंह) चिंती सारे=सगळे समस्त=सगळें इतिवृत्त–असाही शब्दार्थ केला तरी चालेल. ३. सभेंतील थोर पुरुषांला. [अध्याय २२ श्लोक ९० पहा.] ४. सारेजण, किंवा सकलवृत्त. ५. परिसणें=परिश्रवणें=ऐकणें. ६. त्यांनीं. ['हीं' हा तृतीयेचा बहुवचनीं प्रत्यय प्राय: कवितेंत येतो, जसें 'कुळशीलगुणांहीं तूं योग्या.'] ७. कथिलें तेन्हां. ८. त्याचे (कीचकाचे) अनुज (धाकटे भाऊ). हे एकंशें पांच होते. (गीति १६६ पूर्वार्ध पहा.) ९. सुदेष्णेसह विराट. १०. अध्याय २३ श्लोक ४ पहा. ११. मृत (मेलेला) आहे बंधु ज्यांचा अशा उपकीचकांनीं. १२. रोदन करणाऱ्यांत. १३. नि:+अश्रु=रहित+बाष्पोदक=अश्रु न ढाळणारी, रोदन न करणारी. १४. बहुधा=जसें काय, जणूं काय. येथें कवीच्या भाषणांत 'उत्प्रेक्षा' असून, 'कृष्णा निरश्रु' होती म्हणून ही उत्प्रेक्षा कवीनें घेतली आहे. कालाच्या भाषणांतील उत्तरार्धांत 'व्यतिरेक' आहे. उत्तरार्धांत 'अरिरक्त' आणि 'गणपमुखस्थ सेंदूर' या उपमेय उपमानांचें साधर्म्य (दक्षिप्रयत्व) सांगून लगेच वैधर्म्य (आधिक्य) दाखविलें आहे, म्हणून हा व्यतिरेकालंकार झाला आहे. १५. दूर असूं नको, जवळच उभी रहा, आणि मी दुष्ट उपकीचकांचा नाश करतों आहे तें पहा; असेंच जणूं काय काल तिला म्हणतो म्हणून ती जवळ खांबापाशीं होती. १६. शत्रूचें रक्त. १७. दृष्टीस प्रिय. १८. गणपतीच्या मुखावरील. १९. दुष्ट उपकीचक. २०. खलांचें भाषण १५६ व्या गीतीच्या शेवटीं संपतें. २१. ज्येष्ठ बांधव. (कीचक.) २२. जिच्यासाठीं. २३. अत्यंत भयंकर.

हूं, आणा, बांधा, हो! एकाकी[1] वीर हा न सेवु चिता, ।
मेला स्वसंगकामें[2], तत्सहगति[3] कसि इला नसे उचिता? ॥ १९५
भावोजी! जेणें या दासीस प्राप्त होय सुरता[4], तें ।
वाइट काय? म्हणा हूं, स्वर्गी दोघें करूत सुरतातें.' ॥ १९६
चालविली कृष्णसखी धांवुनि जसि ती स्वबंधुची किरंडी[5], ।
चिरंडी[6] तत्काळ न त्यां भीम विवेकी[7] भला, न तो चिरंडी[8]. ॥ १९७
नेतां सती म्हणे, 'जरि वधितां मज, मारिता न हो[9] कामी[10], ।
[11]गंधर्वराजसुत! हो! दीनापरि मारित्यें न हांका[12] मी. ॥ १९८
धांवा, उडीच घाला, मानी[13] घाली[14], न नीच कांस[15], रणीं ।
रक्षा स्वकीर्ति, घालूं पाहति[16] मजसहित कीचका सैरणीं[17].' ॥ १९९
श्रमला, परि भीम उठे, सुचवी, 'व्याकुळ न हो' असें तिजला. ।
गज गांजितां व्रजस्था[18] सिंही, राहेल सिंह कां निजेला[19]? ॥ १९०

---

१. एकटा. २. जिच्या संभोगाच्या इच्छेनें. ३. त्याच्या बरोबर सहगमन. ४. भावोजी! (हे विराटराजा!) या दासीला (द्रौपदीला) सुरता (सुरपणा=देवपणा) जेणेंकरून प्राप्त होईल तें वाईट काय? उपकीचक आपल्या मेहुण्याला (विराटाला) 'भावोजी' असें म्हणतात. बहिणीच्या नवऱ्याला 'भावोजी' असें म्हणण्याची वहिवाट आहे. या पूर्वार्धाचा अर्थ कोणी कोणी अन्य प्रकारें करतात तो असा:—'भावो, जी! जेणें या दासीस प्राप्त होय सुरता तें'=जी! (अहो!) ज्या योगें या दासीस (द्रौपदीला) सुरता (देवपणा) प्राप्त होईल तें (ही दासी) भावो (तें हिला आवडो. त्यांत वाईट काय आहे?). ५. देवपणा. ६. अध्याय २३ श्लोक १०-११ पहा. ७. तिरडी. ८. चुराडा करी, मारी. ९. विचारशील. १०. चिरडखोर. ११. नेली तेव्हां, नेत असतां. १२. हा कामुक कीचक लत्ताप्रहार करता ना. १३. गंधर्वराजपुत्र जे धर्मभीमार्जुनादिक त्यांचीं सांकेतिक नामें जय, जयंत, विजय, जयत्सेन आणि जयद्बल अशीं यथानुक्रम होतीं. [अध्याय २३ श्लोक १२ पहा.] १४. मी दीनवाणी तुम्हांस हांका मारिल्या नसत्या. १५. स्वाभिमानी पुरुष कांस घालतो, नीच पुरुष कांस घालीत नाहीं. कांस घालणें=तयार होणें, सिद्ध असणें. १६. येथें 'घाली' हें क्रियापद काकाक्षिगोलकन्यायानें योजावें. १७. कच्छ, कासोटा. १८. इच्छिती. [पाहणें=इच्छिणें. पृष्ठ २८ टीप ६ पहा.] १९. चितेवर. २०. श्रमलेला, थकलेला होता तथापि. २१. व्रजांत (कळपांत) असणाऱ्या, कळपांतल्या. २२. निजला=निजलेला. हा 'प्रतिवस्तूपमा' नामक अलंकार जाणावा. यांतील समानधर्म अगदीं उघड आणि प्रत्यक्ष नाहीं, बराच अनुमेय आहे. 'भीम उठे' आणि 'राहेल सिंह कां निजला?' यांत भीम (उपमेय) आणि सिंह (उपमान) यांचा जागृत असण्याचा धर्म एकच असून 'उठे' आणि 'कां निजला राहेल?' या भिन्न शब्दांनीं मात्र दाखविलेला आहे म्हणून ही प्रतिवस्तूपमा होय. यांत अन्योक्तीचीही छटा मारते. जेथें उपमानवाक्यांत आणि उपमेयवाक्यांत समानधर्म (साधर्म्य) शब्द-

निजवेषासह टाकी प्राकारावरुनि तो उडीला, हो ! ।
कां जीव म्हणेल पतन जरि हें लाहेल तरि कुडी लाहो? ॥ १६१
धाया त्या दुष्टांच्या जणु अंतःपूर्व पुर विलापाला, ।

भेदानें दाखविलेला असतो तेथें **प्रतिवस्तूपमा** अलंकार होतो. 'आकाशांत रवि शोभतो, रणांत शूर साजतो'–यांत शोभणें हा एकच अभिन्न धर्म **शोभतो** आणि **साजतो** या भिन्न शब्दांनीं दाखविला आहे म्हणून ही प्रतिवस्तूपमा झाली. हिचें लक्षण:—'प्रतिवस्तूपमा तु सा । सामान्यस्य द्विरेकस्य यत्र वाक्यद्वये स्थिति: ॥' [काव्यप्रदीप–१० उल्लास १५-१६ कारिका पहा.] हें गीत्यर्ध सुभाषितपर आहे.

१. गंधर्वाच्या वेषासारखा वेष करून. [अध्याय २३ श्लोक १७ टीका पहा.] २. तटावरून. मूळांतही 'प्राकार'च शब्द आहे. ३. तो भीम. (श्लोक १७-१९ पहा.) ४. यांत 'म्हणेल' शब्दाऐवजीं 'म्हणे न' असे दोन शब्द घालावेत म्हणजे अर्थ जमतो, असें दिसतें. 'जरी हे कुडी पतन लाहेल तरी लाहो, (असें) जीव कां न म्हणे?' प्रश्नालंकार. उत्तर–म्हणेल. भीमानें एवढ्या उंच जागेवरून उडी टाकिली हें मोठें साहस केलें. त्याचें कारण कवि सांगतात:—भीमाला त्या वेळेस असें झालें कीं जरी उंचावरून उडी मारण्यानें मरण आलें तरी पत्करलें, पण द्रौपदीला सोडविल्याशिवाय जगणें व्यर्थ आहे. या पद्याचा अन्य प्रकारें अर्थ कोणी कोणी करतात आणि तोच सरसही भासतो:—भीमानें आपला सगळा पोषाख घालून तटावरून खालीं उडी घातली. जिवंत मनुष्य (जीव=प्राणी) हें पतन जर प्राप्त होणार तर कुडीला प्राप्त होवो असें कां म्हणेल? शरीराला (पतनापासून) दुखापत व्हावी असें कोणी जिवंत मनुष्य म्हणणार नाहीं हें उघड आहे. याच कारणास्तव दुखापत होऊं नये या हेतूनें भीमानें सगळा पोषाख चढवून उडी टाकली. ५. लाभो, मिळो. ६. जाणो. ७. अंत:पूर्वपुर म्हणजे अंत:पुर. (अंत: आह पूर्वी असें जें पुर तें=अंत:पूर्वपुर=अंत:पुर, अंत:पुरांतील स्त्रीमंडळ.) त्या दुष्टांच्या अंत:पूर्वपुर विलापाला जणुं धाया—अन्वय. यांतील अलंकार उत्प्रेक्षा होय. 'अंत:पूर्वपुर' या शब्दावरील कोटी-प्रमाणें अन्य शब्दांवर केलेल्या कोट्या पंतांच्या काव्यांत क्वचित् आढळतात:—(१) 'आधीं **भ** या वर्णापुढें यावे **रत** स्थापी असें' (सूरारामायण). (२) 'यन्नामीं आधि **त्रि** प्रांतीं **टा** हा **ज**-कार त्यांमध्यें' (दिव्यरामायण). (३) '**ण** पुढें मागें **रा** ज्या, तो राय कपीस भेटला वानी' (मात्रा-रामायण). (४) 'सुमृदु सुमंत्रीहि म्हणुनि त्यांशि म्हणे नामगा नसावि **स्त्री**' (वनपर्व–अध्याय १३). (५) '**स्वा**द्या **मित्रा** तीचे दोघे तज्जन्में धन्यत्वा तो घे' (सौम्यारामायण). (६) 'यन्नामीं **ल**-**क्ष्मा**च्या अंतीं **ण** प्रेमानें ध्यावा संतीं' (सौम्यारामायण). (७) 'होतें त्यांगीं **भट**पण त्याचा आला उमाप तिटकारा । त्यांतचि मला दुसरिया देता झाला उमापति **ट**कारा ॥' (अनुशासनपर्व–अध्याय ६ गीति ३२). (८) 'दवडाया दीनांचीं दु:खें सर्वस्व वेचिती संत । संतप्ता निववी घन वन शृं-गारी **व**कारवान् संत ॥' (नामरसायन ६४). (९) 'प्रथमचि सुगल मथी त्या; ज्याच्या नामांत **या** पुढें ये **तू**' (द्वितीय स्तोत्ररामायण–गीति ५६ उत्तरार्ध.) (१०) '**य** प्रथम बंधु जीचा देह अग्नी भेटली पथीं रामा । ते प्रेमें अनुलेपन देउनि दे तोष माधवा रामा ॥' (मंत्रभागवत–दशमस्कंद, गीति ५१७.) यासारखीं थोडीं बहुत स्थलें पंतांच्या काव्यांचें पर्यालोचन केलें असतां आढळणार आहेत.

जाउनि पुढेंचि भीमें[1] तरु उपटुनि, त्यासि नुरविला पाला. ॥ १६२
'बा! विटलासि सुविरुदा केंवि?' असें केशवास[2] हसतीला[3] ।
जाळावयासि घेउनि गेले जों ते शवासह[4] सैंतीला, ॥ १६३
तों तो गर्जोनि म्हणे, 'हा आलों, सर्व मारितों खळ गे! ।
हे केवळ कंटक[5] या राष्ट्रीं न बरे, जसे पथीं खळगे.' ॥ १६४
बहु खळबळ[6] खळबळ[7] करि पाहुनि कुरुनायका, द्रवे[8]; यश तें ।
अद्भुत, पक्षिपतिपुढें[9] ठाकावें[10] काय काद्रवेयशतें[11]? ॥ १६५
त्यजुनि पळाले पंचोत्तरशत[12] मनुजाकृती पशु चिततें, ।
अंजि! साहतील[13] कैसें? शुचिदुःसह तेज जें अंशुचि ते तें. ॥ १६६
भीमप्रतापतपनें[14] झाले बहु शुष्क ते जसे पळवे[15], ।
पळ[16] वेंचे[17] तों गांठी, हरिणाला हरिपुढें[18] कसें पळवे? ॥ १६७

---

१. भीम वाटेंत एक मोठा तालवृक्ष उपटून स्कंधावर ठेवून साक्षात् दंडपाणि यमाप्रमाणें स्मशानांत सर्वांच्या आधीं चितेसमीप जाऊन उभा राहिला असें वर्णन आहे. (श्लोक २०-२४ पहा.) २. 'जों ते शवासह हसतीला सतीला जाळावयासि घेउनि गेले, तों केशवास 'बा! सुविरुदा केंवि विटलासि' असें [व तिला] 'गे! हा आलों, सर्व खळ मारितों. हे केवळ कंटक या राष्ट्रीं न बरे, जसे पथीं खळगे [न बरे, असें] तो गर्जोनि म्हणे'—असा या युग्माचा अन्वय. ३. उत्तम प्रतिज्ञेला. स्वभक्तांचें पालन करणें या प्रशस्ततम व्रीदाला (प्रतिज्ञेला) तूं देवा! कंटाळलास काय? ४. कृष्णास. ५. हंसणारीला. ६. कीचकप्रेतासह. ७. साध्वी द्रौपदीला. गीति १६३-१६४ यांचें हें युग्मक आहे. दोन पद्यांचा अन्वय असतां 'युग्म,' तीन पद्यांचा असतां 'संदानितक' 'विशेषक' किंवा 'गुणवती,' चार पद्यांचा असतां 'कलापक' किंवा 'प्रभद्रक,' पांच पद्यांचा असतां 'कुलक' अथवा 'बाणावली,' अशा श्लोकसमूहास विशिष्ट संज्ञा आहेत. ['द्वाभ्यां युग्ममिति प्रोक्तं त्रिभिः श्लोकैर्विशेषकम् । कलापकं चतुर्भिः स्यात्तदूर्ध्वं कुलकं स्मृतम् ॥,' 'द्वाभ्यां तु युग्मकं संदानितकं त्रिभिरिष्यते । कलापकं चतुर्भिश्च पंचभिः कुलकं मतम् ॥'. अपरे तु पंचात्मकस्य बाणावलीति संज्ञामाहुः । यथा—'एकः श्लोको भुक्तकं स्यात् द्वाभ्यां युगलकं स्मृतम् । त्रिभिर्गुणवती प्रोक्ता चतुर्भिस्तु प्रभद्रकम् । बाणावली पंचभिः स्यात् षड्भिस्तु करहाटकाः ॥.' ८. तेव्हां. ९. कांटे. १०. खळसमूह. ११. चळवळ. १२. भीमा. १३. पळे. १४. गरुडापुढें. १५. ठाकणें=समोर उभें राहणें, सामना करणें. हा पादाधिक गीतांश सुभाषितपर आहे. १६. सर्पशतें. (काद्रवेय=कद्रूसुत. कद्रू=प्राचेतस दक्षाची कन्या, कश्यप ऋषीच्या तेरा स्त्रियांतील एक आणि समस्त सर्पांची माता.) १७. पांच अधिक शंभर कीचकबंधु. १८. हे धृतराष्ट्रा. १९. निष्पाप नरालाही जें सोसण्यास कठीण. २०. ते पापी. २१. भीमप्रतापरूप सूर्यानें. (तपन=सूर्य.) २२. पाचोळा-वेळू-कडबीचा पाला. २३. अल्प काळ, क्षण. २४. जाई, वेंचून जाई. २५. सिंहापुढें. २६. हा पाद सुभाषितरूप आहे.

वधिले खल अपराधी गरुडें [1]अहिसे, न लागतां पळ, ते; ।
वधिताचि भीम गांठुनि जरि [2]लंघुनि [3]सप्तसागरां पळते. ॥ १६८
[4]पुष्पोत्कटाचि दुसरी गणितील अजान कीचकवितीतें ।
जी कृष्णा साध्वी कां म्हणतील न जानकीच कवि [5]तीतें? ॥ १६९
भीम म्हणे, 'करिन तुझें सति! मर्दुनि रिपुशंतायुतें हित मी, ।
बुडवी बळें अकाळीं [6]साधुद्वेष [7]महाशतायुतेंहि तमीं. ॥ १७०
छळिले दशाननें, परि झाले [8]प्रभुदार काय [9]कांतर ते[10]? ।
भीती [11]द्वंद्वासि कसे [12]हरिजन [13]भवसिंधुनायका [14]तरते? ॥ १७१
जें कर्म [15]सिंधुं इतरां, मज हरिदासासि [16]आड वाटे तें, ।
जा तूं आल्याचि पथें, [17]जातों मी धरुन [18]आडवाटेतें.' ॥ १७२
जोडुनि यश मिरवे जन, परि [19]भगवज्जन कशास मिरवेल? ।
[20]बहु पानवेल मिरवी तेंवि न मिरवी यशास [21]मिरवेल. ॥ १७३

---

१. सर्प जसे. २. उल्लंघन करून, वलांडून. ३. सप्तसागर=सात समुद्र=क्षारसमुद्र, क्षीरसमुद्र, दधिसमुद्र, घृतसमुद्र, इक्षुरससमुद्र, मद्यसमुद्र आणि स्वादुजलसमुद्र असे सात सागर. ['क्षीरोदो लवणोदश्च दध्योदश्च घृतोदकः । स्वादूदकः सुरोदश्च तथैवेक्षुरसोदधिः ॥' इति वायुपुराणे-चा० हे०.] ४. पळाले असते तरी. ५. अपह्नुति व प्रश्नालंकार यांचा संकर. किंवा रूपक व प्रश्नालंकार यांचा संकर या पद्यांत झाला आहे. ६. रावणमातेचि. पुष्पोत्कटा ही सुमाली राक्षसाची कन्या आणि विश्रवा मुनीची भार्या. हिचे पुत्र दशमुख आणि कुंभकर्ण; विश्रवा+राका यांचीं अपत्यें खर आणि शूर्पणखा; विश्रवा+मालिनी यांचा बिभीषण, असें वर्णन भारती रामायणांत आहे. [वनपर्व-अध्याय १० गीति ९-१२ पहा. काव्यसंग्रह-पृष्ठ १३९-१४० पहा.] ७. अज्ञ पुरुष. ८. कीचकाचे आईस, कीचकातें विणारीला. ९. ला कृष्णेला. १०. शतदशसहस्र शत्रु. ११. साधुद्वेष. १२. महाशत (वर्षें) आयु (जीवित) ज्याला त्याला देखील, देवांचीं शंभर वर्षें ज्याचें आयुष्य आहे त्याला साधुद्वेष तमीं (दुःखांत-अंधकारांत) बुडवितो. १३. सीता. १४. भयाभीत. १५. ते प्रभुदार-असा अन्वय. येथें 'ते' हा पुल्लिंगी बहुवचनांत शब्द योजिला आहे, कारण त्याचें विशेष्य 'दार' आहे. दार (विवाहित बायको) हा शब्द संस्कृतांत पुल्लिंगी व नित्य बहुवचनी आहे आणि त्याचा तसाच प्रयोग येथें केला आहे. दुसरें उदाहरण:-'आमंत्रुनि सत्येनें सर्व श्रीकृष्णदार जेवविले.' १६. सुखदुःखास. द्वंद्व=परस्परविरुद्धधर्मक जें पदार्थद्वय तें; जसें-सुख व दुःख, उष्ण व शीत इत्यादि. १७. हरिदास, भगवद्भक्त. १८. भवसमुद्रा. (सिंधु=नदी.) १९. तरणारे. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. २०. सागर. २१. कूप. २२. विराटाच्या महानसाला जातो. २३. आडमार्गानें, चोरवाटेनें, गूढवाटेनें. (अध्याय २३ श्लोक ३०-३१ पहा.) २४. हरिदास. २५. ही गीति सुभाषितरूप आहे. हें दृष्टांत अलंकाराचें उदाहरण आहे. याचें लक्षण:-जेथें प्रकृत अर्थाचें, अप्रकृत अर्थाचा दाखला (उदाहरण-दृष्टांत) देऊन समर्थन केलें असतें तेथें **'दृष्टांत'**

ज्या[1] स्तवुनि म्हणति हरि[2]भुज[3], 'कवि हो! आम्हांत पौरवा[4] घाला,' ।
त्यासि जसे ते भ्याले[5], स्वप्नींहि तसे न पौरं[6] वाघाला. ॥ १७४
भाद्रचतुर्थी[7] कृष्णा[8]देहचि[9], बहुधा कलाप[10] हा[11], याला ।
स्त्री बाल वृद्ध साधुहि पुरजन बहु धाकला[12] पहायाला. ॥ १७५
स्त्रीस विराट[13] म्हणे, 'गे! सैरंध्रीला निरोप दे, विनवीं, ।
म्हण तीस त्वदतिक्रमजन्यें यावीं भयें न देवि! नवीं. ॥ १७६

अलंकार होतो. यांत बिंबप्रतिबिंबभावानें अथवा वस्तुप्रतिवस्तुभावानें दोन अर्थांतील साम्याचें वर्णन असतें, आणि दोन वाक्यें स्वतंत्र निरनिराळीं असतात. याचे साधर्म्यवैधर्म्यरूपामुळें दोन प्रकार आहेत. येथें 'जन यश बोडुनि मिरवे, परि भगवज्जन (यश) कशास मिरवेल?' हा विशेष अर्थ प्रकृत आहे, आणि याच्या समर्थनार्थ 'बहु पानवेल·····मिरवेल' ह्या अप्रकृत अशा विशेष अर्थाचा दाखला (दृष्टांत) दिला आहे. मनुष्याचें मिरवणें मुख्य असून मिरवेलीचें मिरवणें लाक्षणिक असून, हे दोन्ही अर्थ स्वतंत्र वाक्यांत आहेत म्हणून 'दृष्टांत' होय. याचीं दुसरीं उदाहरणें:— (१) 'करिल कसें मांजर जें, दुष्कर हरिहनन काज वाघांस । न शकति अग्निविधु कसा, दिनमणिचा करिल काजवा घांस ॥' (२) भूप म्हणे, 'न वरावा वत्से! जरि सुगुणसागर लवायु । शीतल मंद सुगंधहि वद सेवावा कसा गरलवायु ॥' [वनपर्व—अध्याय १३ गीति २१ पहा.] २६. मिऱ्यांची वेल.

१. ज्या स्तवुनि. ज्या म्हणजे भीमाला. २. विष्णूचे भुज. ३. पुरुवंशोद्भव भीमाला. ४. गणना करा. 'अहो कवि! आम्हांमध्यें या पौरवाला (भीमाला) घाला' असें ज्याची प्रशंसा करून (दुष्टांचें निर्दाळण करणारे असे) हरिभुज (विष्णूचे ही बाहु) म्हणतात त्या भीमाला पाहून पौर अत्यंत घाबरून गेले.—विष्णुभुजांसारखा भीम दुष्टजनविध्वंससमर्थ होता असें येथें सूचविलें आहे. ५. त्या भीमाला. ६. नगरवासी लोक. ७. गणेशचतुर्थी. ८. द्रौपदीदेह. ९. चंद्र. १०. हा=भीम चंद्र होय. हा रूपकालंकार होय. येथें भाद्रचतुर्थी हें उपमान आणि कृष्णादेह हें उपमेय यांचा अभेद वर्णिला आहे म्हणून हा रूपकालंकार. तसेंच कलाप हें उपमान आणि हा भीम हें उपमेय यांचाही येथें अभेद वर्णिला आहे म्हणून हा रूपकालंकार होय. गणेशचतुर्थीच्या रात्रीं चंद्राला गणपतीचा शाप असल्यामुळें कोणी पाहत नाहीं, ही गोष्ट सुप्रसिद्ध आहे. गणपतीचें बेडौल रूप पाहून चंद्राला हसूं आलें तेव्हां गणपति रागावला आणि त्यानें 'तुला जे कोणी पाहतील त्यांजवर मिथ्यापवाद येईल' असा चंद्राला शाप दिला. पुढें प्रसन्न होऊन चतुर्थीच्या रात्रीं जे चंद्राला पाहतील त्यांजवर आळ येईल असा गणपतीनें उःशाप दिला. ही कथा स्कंदपुराणांत नंदिकेश्वरसनत्कुमारसंवादांत आहे. [श्रीविश्वनाथदैवज्ञकृत व्रतराज—चतुर्थीव्रत—स्यमंतकोपाख्यान.] ११. भ्याला. १२. कीचकवधानंतर संपूर्ण नगरवासी लोक सैरंध्रीविषयीं संशयग्रस्त झाले. हिच्या योगानें सकल नगराचा नाश होईल, हिचे पति गंधर्व महाबलाढ्य, ही स्वतः रूपवती आणि पुरुषास तर विषय अत्यंत इष्ट, तेव्हां हिचा समागम अकल्याणप्रद होय असें पौरजनांचें भाषण ऐकून राजासही तसेंच वाटलें, तेव्हां तो सुदेष्णेला म्हणाला. १३. अध्याय २४ श्लोक ९-१० पहा. १४. तुझी अमर्यादा केल्यानें झालेलीं.

भुलविल गंधें, रुचिर स्त्री मूर्तिमती सुरा, न राहो ती; ।
दुःसह कामविकार स्त्रीरत्नास्तव सुरां नरां होती. ॥ १७७
गंधर्वभयें काळिज धडधड उडतें करें पहा गे! हें ।
त्वद्बंधूंचीं झालीं युगपत् शून्योत्सवें महा गेहें'. ॥ १७८
येतां मार्गीं पाहे यद्द्वारीं भीम तें महानस ती ।
स्वविवाहमंडप गणी, मानी वृत्तोपयम महा न सती. ॥ १७९
स्मित करुनि म्हणे, 'त्रास्या त्या गंधर्वाधिपा असो नमन, ।
विसरेल कसें व्यसनीं अभयें सुख पावलें असोन मन?' ॥ १८०
बल्लव म्हणे, 'विराजे पाणि श्रितसमवनें न वलयशतें, ।
केलें कलत्ररक्षण पतिनें, तरि काय हो! नवल यश तें?' ॥ १८१
ये उत्तरा पहाया सांडुनि गाण्यास नाचण्यासहित, ।
केंवि म्हणेल रसज्ञा सोडुनि शालीस नाचण्यास हित?' ॥ १८२
रोमांच तिच्या देहीं विजयश्रवणीं उभारती, वांटे ।
भेटे खळबळविजयी साक्षादेवीस भारती, वाटे. ॥ १८३

---

१. सुंदर नारी. २. वारुणी. ही गीति सुभाषितरूप आहे. ३. एकदम. ४. उत्सवविहीन. हें **पर्यायोक्त** नामक अलंकाराचें उदाहरण आहे. जेथें वाच्यवाचकांशिवाय रूपांतरानें (पर्यायानें) एकाद्या गोष्टीचें प्रतिपादन असतें तेथें हा अलंकार होतो. येथें तुझ्या भावांचीं गेहें शून्योत्सवें झालीं असें पर्यायानें प्रतिपादन केलें आहे, तुझे बंधु मरण पावले असें वाच्यवाचकांच्या योगें थोडक्यांत सांगितलें नाहीं. ५. ज्याच्या द्वारांत. ६. वृत्त (झाला) उपयम (विवाह) ज्यांत (असा मंडप). ७. ती तें महानस स्वविवाहमंडप गणी (समजे), सती (पतिव्रता,) वृत्तोपयम [मंडप] (वृत्त=झालेला; उपयम=विवाह ज्यांत तो मंडप) महा (मोठा) न मानी; प्रथम सैरंध्रीला तो महानस आपल्या विवाहमंडपासारखा वाटला, पण फिरून विचार करितां तो विवाहमंडपापेक्षांही जास्त महत्त्वाचा वाटला. 'तें महानस ती सती (द्रौपदी) स्वविवाहमंडप गणी (समजे), [या] वृत्तोपयममहा (ज्यांत विवाहोत्सव झाला अशा) [मंडपाला स्वविवाहमंडप] न मानी (समजली नाहीं),' असा या पद्याचा अर्थ सरळ आणि सुरस दिसतो. ८. रक्षणकर्ता. (अध्याय २४ श्लोक १५.) ९. शोभे. १०. आश्रितजन रक्षणानें. ११. कंकणशतें. १२. वायकोचें रक्षण. १३. जिव्हा. यांत 'दृष्टांत' अलंकार झाला आहे. यांत 'पाहणें' आणि जिव्हेनें 'चाखणें' हे दोन धर्म भिन्न असल्यामुळें बिंबप्रतिबिंबभाव समजला पाहिजे. १४. तिच्या (उत्तरेच्या) देहीं विजयश्रवणीं (सैरंध्री दुष्टांच्या तावडींतून सुटून सुखरूप आली हें ऐकून) रोमांच उभारती, खलबलविजयी (दुष्टांचे सैन्य जिंकणाऱ्या) देवीस (महिषासुरमर्दिनी दुर्गेला) भारती (सरस्वती) वाटे (वाटेनें) भेटे (भेटली)—[असें] वाटे (वाटलें) यांत उत्प्रेक्षालंकार झाला आहे. १५. मार्गांत. १६. खलसैन्य जिंकणाऱ्या. १७. प्रत्यक्ष दुर्गेला. १८. सरस्वती.

'गे ! सखि ! सैरंध्रि ! कसें झालें ? कसि गे ! सुटोनि आलीस ?' ।
ऐसें बृहन्नडाही तीस पुसे जेंवि आलि आलीस. ॥ १८४
तीस म्हणे सैरंध्री, 'तुज मजसीं काय उत्सवद नातें ? ।
स्पर्शेल, वृत्त वदतां, खेलनाम प्राप्तकुत्स वदनातें. ॥ १८५
तुज लाभ काय यांत व्यासंग त्यजुनि नृत्यगानाचा ? ।
जा सकळा, मद्वृत्तश्रवणानें काय कृत्य ? गा, नाचा.' ॥ १८६
बोले बृहन्नडा, 'प्राक्सहवासें दुःख सुख तुझें शिवतें, ।
नेणे जन मन, साक्षी विश्वाचा एक जाणतो शिव तें.' ॥ १८७
गेली राजगृहीं तों तीस सुदेष्णा म्हणे, 'न कोपावें, ।
सैरंध्री ! भूप भितो, तूं या नगरीं वसों नको, पावें.' ॥ १८८
कृष्णा म्हणे, 'त्रयोदश दिवस वसों दे' असेंचि वद राजा, ।
अयश न यावें तुमच्या यावें अल्प सुयश पदरा जो. ॥ १८९
तेथुनि नेतील मला गंधर्व, बहु प्रसाद करितील, ।
हरितील ताप तुमचे, ज्ञाति सपूर्वजहि कीर्ति वरितील.' ॥ १९०
वदतां असें समंजस मग केंवि म्हणेल तीस ती 'जाच' ? ।
अपराधलवहि नसतां कां हो ! सोशील ती सती जाच ? ॥ १९१

---

१. अध्याय २४ श्लोक २० पहा. २. सखी. ३. सखीस. ४. माझ्या वृत्तांतानें तुला आनंद होईल असें तुझें माझें काय नातें आहे ? ५. दुष्टाचें नांव वदनाला स्पर्श करील. ६. ज्याला कुत्सा (निंदा) प्राप्त झाली तें. ७. उद्योग. ८. सगळ्या जणी जा. ९. माझी हकीकत ऐकून तुम्हाला काय करावयाचें आहे ? १०. गान करा, आणि नृत्य करा. ११. पूर्वसहवासामुळें. १२. जाणत नाहीं. १३. महादेव. १४. द्रौपदी उत्तरादि राजकन्येसह सुदेष्णेच्या मंदिरांत आली तेव्हां तिला विराटाज्ञेनें म्हणाली. १५. राजा तुझ्या गंधर्वांना भितो. १६. प्रसन्न हो. १७. तेरा दिवस. (अध्याय २४ श्लोक २९.) वामनकृत विराटपर्व—अध्याय ३ श्लोक २५३-२६१ पहा. १८. बहु. १९. ज्या तुमच्या पदराला. २०. तुमचें कल्याण करतील. २१. वडिलांसहित. (अध्याय २४ श्लोक ३०.) २२. जाच=निघून जा, राहूं नको. सर्व कामें एकीकडे ठेवून चालती हो. [येथें 'च'चा अर्थ 'आग्रह' मानावा.] २३. जाचणूक. पंतांच्या या एका अध्यायांतील कथाभाग वामनानें तीन अध्यायांत वर्णिला आहे. जेथें पंतांच्या १९१ गीति आहेत तेथें वामनाचे ५२० श्लोक आहेत, हें पंतांच्या विस्तारभीरुत्वाचें उत्तम दर्शक होय.

अध्याय दुसरा.

[1]गंधर्वांनीं वधिला, सिंहांनीं चपळ नीच [2]कपि साच, ।
होता [3]मद्यप निर्लज्ज [4]परयोषित्सक्त कीचक पिसाच. ॥ १
तो आपणचि न केवळ पावे [5]सानुजहि [6]पातकी नाश, ।
देतो [7]सकुटुंबाही पापरता नरकपात [8]कीनाश. ॥ २
ऐशी वार्ता परिसुनि गेले दुर्योधनाकडे [9]चर ते ।
जे [10]पांडवशोधार्थ क्षितिवरि [11]सर्वत्र नित्य [12]संचरते. ॥ ३
ते चर कथिती त्या [13]धृतराष्ट्रसुता [14]पांडवप्रभावार्ता, ।
हे मात्र कीचकाची [15]तदरिहृदंबुजरविप्रभा वार्ता. ॥ ४
[16]कीचकनिधन [17]परिसतां, तो पांडवशत्रु [18]परमकर्कश तें ।
कोणाचें कृत्य असें पाहे शोधुनि मनांत [19]तर्कशतें. ॥ ५
मग बोले, 'सर्वत्र [20]भ्रमले निरलस [21]सुदास हे रानीं, ।
[22]पांडवशोध कराया चित्त न केलें उदास हेरांनीं. ॥ ६
[23]कर्णा! ते मेले, [24]कीं गेले योगें [25]सकाय बाहेर?.।

---

१. येथें कीचकवधपर्व संपलें, आतां गोहरणपर्वास आरंभ होतो. अनेक गंधर्वांनीं कीचकास मारिलें असेंच मूळांत आहे. [अध्याय २५ श्लोक २१.] २. वानर. ३. मद्य पिणारा. ४. निर्लज्ज. ५. परस्त्रीलंपट. (योषित्=स्त्री.) ६. धाकट्या भावांसह. (अध्याय २५ श्लोक १.) ७. यांत 'काव्यलिंग' अलंकार झाला आहे. 'पातकी' या शब्दांत 'नाश पावे' याचा हेतु आहे, म्हणून हा 'काव्यलिंग' अलंकार समजावा. समर्थनीय अर्थाचें समर्थन केलें असतां 'काव्यलिंग' अलंकार होतो. ८. कुटुंबसहित पापासक्त जनांला. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. या उत्तरार्धांत **'अर्थांतरन्यास'** नामक अलंकार झाला आहे. ९. यम. १०. दूतहेर. (पांडवांचा शोध लावण्यासाठीं दुर्योधनानें अनेक हेर बाहेर पाठविले होते तेच हे दूत.) ११. पृथ्वीवर. १२. संचार करणारे. १३. दुर्योधनाला. १४. पांडवपराक्रमानें पीडिलेला अशा. १५. तत्+अरि+हृद्+अंबुज+रवि+प्रभा=त्याचे (दुर्योधनाचे)+शत्रु+हृदय+कमळ+सूर्य+कांति=त्या दुर्योधनाचे शत्रु जे पांडव त्यांच्या हृदयकमळास सूर्यप्रभेप्रमाणें संतोषप्रद (वार्ता). १६. कीचकाचें मरण. १७. परिसलें तेव्हां. १८. फार भयंकर, मोठ्या साहसाचें. (कर्कश=साहसिक.) १९. शेंकडों तर्क करून, अनेक कल्पना मनांत आणून. हें ठरीव यमक. २०. फिरले. २१. आलस्यरहित. २२. उत्तम दूत. २३. गुप्त बातमी काढणाऱ्या दूतांनीं. २४. किंवा. [येथें 'कीं' विकल्पार्थक आहे.] २५. योगसामर्थ्यानें. [समाधियुक्त योग्यास अलौकिक शक्ति प्राप्त होतात. योग्यास भूत भविष्य आणि वर्तमान कळतें, त्यास ताऱ्यांच्या गतीचें ज्ञान होतें, ताराव्यूहाचें ज्ञान होतें, दुसऱ्याच्या चित्तवृत्ति त्यास कळतात, कंटकांचा त्रास त्यास होत नाहीं, तो पाण्यावरून सहज चालून जाऊं शकतो, त्यास भूक तान लागत नाहीं, त्यास आकाशमार्गानें जातां येतें, कोणतेंही शस्त्र त्यास मारूं शकत नाहीं–इत्यादि अनेक अमानुष शक्ति योग्यास प्राप्त होतात असें वर्णन योगशास्त्रावरील ग्रंथांत आढळतें.] २६. देहासहित.

हे शोधितील [1]असतां, नसतां, करितील काय वा! हेर? ॥ ७
बोला हो! सभ्य! तुम्ही योग्य वदाया [2]मतिप्रति, [3]ज्ञाते।
हरितिल न पद, प्राणहि, नेउनि सिद्धिप्रति प्रतिज्ञा ते. ॥ ८
सुचली युक्ति करावी, मग जरि दैवें न होय शोध न [4]हो, ।
अज्ञातवास उरला अत्यल्पचि कीं अहो! [5]यैशोधन हो? ॥ ९
दूर चढोनि पडावे ते गो[6]मयगोलकार कीटकसे ।
[7]अस्खलित उच्चपदवीप्रति [8]लंघूं पाहतात नीट कसे?' ॥ १०
कर्ण [9]म्हणे, 'प्रेपावे ते देवां! देव[10]पतिसमा! हेर, ।
[11]ज्यांच्या वाटे प्रभु[12]चें लघुहि गुरुहि कार्य मतिस [13]मोहेर. ॥ ११

---

१. [पृथ्वीवर] असतां (असले तर) हे हेर [या पांडवांस] शोधितील [पण पृथ्वीवर] नसतां (नसल्यास) काय वा! (कर्णा!) [हे हेर] करितील? २. मतिप्रति (बुद्धिवादाला) वदाया योग्य तुम्ही [आहां.] ३. ते ज्ञानी (विचारशील) [पांडव] प्रतिज्ञा (त्रयोदशवर्षे वनवासांत काढण्याची) सिद्धिप्रति (यथासांग शेवटास) नेउनि, पद (राज्यपद) न हरितिल प्राणहि [हरितिल.] पांडव त्रयोदशवर्षे वनवासांत काढून (१२ वर्षे वनवास व १ वर्ष अज्ञातवास) फक्त आपलें राज्यच हरणार नाहींत, तर खाबरोबर आपले प्राणही हरतील. कारण दुर्योधन पांडवांस राज्य देण्यास तयार नव्हता, तेव्हां कौरवांचे प्राण घेऊन राज्य घेणें पांडवांस आवश्यक होतें. ४. न हो=न होओ=न होवो. ५. सभ्य हो! (यज्ञ हें धन ज्यांचें ते). ६. गोमयाचे (शेणाचे) गोलकार (गोळे करणारे). [गोमय=शेण. 'मय'प्रत्यय नामांला लागून नाम प्रदर्शित वस्तूचा 'केलेला' अथवा 'झालेला' अशा अर्थाचीं विशेषणें होतात, परंतु 'गो'शब्दापुढें हा प्रत्यय पुरीषार्थी होतो असा नियम आहे.] ते (पांडव) गोमयगोलकार (शेणाचे गोळे करणाऱ्या) कीटकसे (किड्यांप्रमाणें) दूर चढोनि पडावे (उंच चढून पुन्हा घसरावे) [असें असून] अस्खलित (स्खलन न पावतां, न घसरतां) उच्चपदवीप्रति (उंच जागेवर) नीट (सरळ) कसे लंघूं पाहतात=जाऊं इच्छितात? शेणांत उद्भवणारे किडे भिंतीवर कांहीं अंतरावर चढून तेथून घसरतात; पुन्हा चढण्याचा प्रयत्न करतात पण फिरून घसरतात याप्रमाणेंच अगदीं शेवटाला जाण्याचा त्यांचा प्रयत्न सिद्धीस पावत नाहीं. [हा चमत्कार पावसाळ्यांत तर पुष्कळदां पाहण्यांत येतो;] त्याप्रमाणेंच ह्या नीच पांडवांची स्थिति व्हावी असें असून ते कांहींएक अडथळा न येतां थेट राज्यपद मिळविण्याचा प्रयत्न कसा करितात? शेणाचे गोळे करणाऱ्या किड्यांप्रमाणें आजपर्यंत दूर चढलेले (अज्ञातवासांत) असे पांडव खालीं घडघडले पाहिजेत, परंतु तसें न होतां, ते उच्चपदवीचें (सार्वभौमाचें=दुर्योधनाचें) उजू उल्लंघन करूं पाहतात हें कसें? गोमयगोलकार=शेणाचा गोळा करणारे=ज्यांचें जीवित केवळ व्यर्थ असे. ७. पतन पावल्यावांचून. ८. लंघूं पाहतात=लंघायास इच्छितात=लंघण्याची इच्छा करतात. ९. अध्याय २६ श्लोक ८-१२ पहा. १०. राजा!. ११. इंद्रसमा!. १२. ज्या हेरांच्या मतीला. १३. स्वामीचें. १४. येथें 'माहेर' शब्द किती सभ्यकप्रयुक्त आहे पहा.

न दिसति, म्हणवुनि केवळ काय नसति गुर्जरीस[1] कुच[2]? राजा!।
वेडाचि तो, न दिसले भूमिगतहि पांडुपुत्र कुचरा[3] जो.' ॥ १२
तों दुःशासन बोले[4], 'ते भोगुनियां श्रमा न वांचावे,।
कां न मरावे व्यसनीं ज्यां आधिमहाहि मानवां चावे?' ॥ १३
श्रीद्रोण म्हणे, 'शिव! शिव! मरतील महानुभाव कां गा! ते?।
व्यसनीं जरि गडबडते साधु, तरी यांसि सुज्ञ कां गाते? ॥ १४
रवि नढळेचि, गिळी परि उगळी खळ मलिन मंद राहु टळे,।

---

१. गुर्जरी=गुजराथ देशांतील स्त्रीस. २. हा दृष्टांत पंतांस कां पसंत पडला कोण जाणें. गुर्जर देशांतील स्त्रियांचे स्तन इतके झांकलेले असत कीं ते असूनही नाहींत असें वाटे. जगन्नाथराय यांनीं श्लोकाचा अर्थ कसा असावा याविषयीं एक पद्य केलें आहे त्यांतही गुर्जरीस्तनगूढत्वाचा उल्लेख केला आहे:-'अर्थो गिरामपिहितः पिहितश्च कश्चित्सौभाग्यमेति मरहट्टवधूकुचाभः । नांध्रीपयोधर इवातितरां प्रकाशो नो गुर्जरीस्तन इवातितरां निगूढः ॥' याचा भावार्थ:-मरहट्ट (मारवाडी) स्त्रियांच्या स्तनाप्रमाणें जेव्हां कवितेचा अर्थ धड उघडा नाहीं व धड झांकलेला नाहीं तेव्हां फार खुलतो; परंतु आंध्रदेशांतील स्त्रियांच्या स्तनाप्रमाणें जेव्हां अगदीं उघडा असतो अथवा गुर्जर देशांतील स्त्रियांच्या स्तनाप्रमाणें जेव्हां अगदीं अत्यंत गूढ (झांकलेला) असतो तेव्हां शोभत नाहीं. ३. पृथ्वीवर असणारे. ४. पृथ्वीसंचार करणाऱ्या (हेरास) (अधम दूताला). ५. जा=ज्या (कुचर हेराला). ६. अध्याय २६ श्लोक १४-१८ पहा. ७. न वांचावे=वांचले नसावे. [श्रमा भोगुनियां-श्रम भोगिले यामुळें वांचले नसावे. 'वांचावे'=(वांचावेत) हें संशयार्थदर्शक विध्यर्थाचें अनेकवचनीं रूप समजावें. वांचण्याचा संभव नाहीं-असें येथें ह्या विध्यर्थरूपानें सूचविलें. [निबिड अरण्यांत सर्पदंश होऊन पांडव मृत झाले असतील अथवा संकटांत पडून नष्ट झाले असतील, अशा अर्थाचें दुःशासनाचें भाषण मूळांत आहे.] ८. न मरावे=मेले नसावेत. ते कां न मरावे?=अर्थात् मेले असावेत-असा काकु अर्थ येथें इष्ट आहे.' हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. ९. संकटीं. १०. मानसव्यथारूप सर्प. ११. अध्याय २७ श्लोक १-१० पहा. १२. थोर, उदारमनस्क, उदारमति, महामनस्क, महाशय. १३. भ्रम पावते, मोह पावते. १४. पंडित. १५. गाते. हें संकेतार्थी तृतीयपुरुषाचें अनेकवचन आहे. या गीत्यर्धातील दोन वाक्यें **जरि तरी** या संकेतदर्शक अव्ययांनीं जोडिलीं आहेत. यांत 'साधु जरि व्यसनीं गडबडते' हें संकेतदर्शक पूर्ववाक्य होय आणि 'तरी सुज्ञ यांसि कां गाते' हें अनुमानदर्शक उत्तरवाक्य होय. येथें पूर्ववाक्यांतील संकेत खरा नाहीं, तेव्हां उत्तरवाक्यांतील अनुमानही खरें नाहीं, पण जर संकेत खरा नसतांही तो खरा मानिला तर अनुमान खरें होईल-असा याचा अर्थ आहे. याचें दुसरें उदाहरण:-'प्राकृत पांडव **असते**, तरी हेही केंवि न भ्रमते' मोरोपंत. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. १६. न हाले. रवि नढळेचि, खळ मलिन मंद राहु गिळी परि उगळी, टळे; साधु गुर्वापदेंही न भी, न चळे, जेंवि अचळ बाहुटळे [न चळे]-अन्वय. सूर्य हा आपल्या जागेवरून तिळभर हालत नाहीं; जरी दुष्ट राहु त्याला

गुर्वापदेंहि साधु न भी, न चळे जेंवि अचळ वाहुटळे. ॥ १५
त्या आधिस्तव होइल आवडि भलत्याहि काय हो! मरणीं?।
तैशा धीरां वीरां करणारां स्वपरकायहोम रणीं. ॥ १६
न पडो दृष्टि पैरांची म्हणुनि तपःसिद्धिनें स्वपदरानें।
ते झांकिले न दिसती, पांडव गेले मरोनि न दरानें.' ॥ १७
भीष्म म्हणे, 'या कुरुगुरुसम हितें मित अन्य बोलका नाहीं,।
हितेकामें प्राशावे यांचेचि, न अन्य बोल कानांहीं. ॥ १८
जरि विश्वगुरुत्व असे कर्तृत्वास्तव अजा, तरि पुराणा।

गिळतो तरी पुन्हा सोडतो व टळतो (आपण नाहींसा होतो). जे साधु लोक आहेत ते मोठ्या विपत्तींत मुद्धां डगत नाहींत व मोठें वावटळ आलें असतां ज्याप्रमाणें अचल (पर्वत) बिलकुल हालत नाहीं त्याप्रमाणेंच ते न हालतां स्वस्थ असतात. १७. ओकून टाकी, सोडी.

१. मोठ्या आपत्तीनें. २. वाहुटळ=वावटळ=वाहटळ=वायघूळ=चक्रवात. ही गीति सुभाषितरूप आहे. ३. त्या आधिस्तव (वनवास व अज्ञातवास ह्या संकटामुळें) भलत्याही (भलत्याच मनुष्यांला, असाधारण पुरुषांना) [भलत्याही याचें प्रयोजन काय तें पहा] तैशा धीरां वीरां स्वपर काय होय रणीं करणारां मरणीं आवडि होईल काय हो? पांडवांना जरि वनवासासारखीं संकटें भोगावीं लागलीं तरि त्यांच्यासारख्या धैर्यशाली, बळवान् व आपल्या आणि शत्रूंच्या देहांचा धारातीर्थी बळी देणाऱ्या असाधारण पुरुषांना अन्य रीतिनें आपला प्राणांत करण्याची इच्छा होईल काय?' कधीं नाहीं. 'पांडवांचें व्यालांनीं भक्षण केलें असेल अथवा विषमस्थिति प्राप्त होऊन ते नष्ट झाले असतील' अशा आशयाचें जें दुःशासनाचें म्हणणें आहे तें केवळ चुकीचें अथवा अगदीं असंभाव्य असें द्रोणाचार्य सिद्ध करूं पाहतात. पांडव शुद्धात्मे नीतिमान् सत्यवान् शुचि शूर आणि धर्मज्ञ आहेत, तेव्हां ते भलत्याच मार्गानें आपला देहांत करून कधींही घेणारे नाहींत व त्यांचा नाशही झाला नाहीं, असें द्रोणाच्या भाषणाचें तात्पर्य आहे. हा प्रश्नालंकार. ४. आपल्या आणि शत्रूंच्या देहांचा होम. ५. शत्रूंची (दुष्टांची) दृष्टि न लागो म्हणून. ६. आपल्या पदरानें. हें द्रोणाचें भाषण मूळाशीं ताडून पाहिलें असतां लक्ष्मीसुतानें सत्यवतीसुतावर कडी केली आहे असें कोण म्हणणार नाहीं? ७. झांकिले=झांकिलेले. ८. अध्याय २७ श्लोक ६ पहा. ९. भयानें. १०. अध्याय २८ श्लोक २-३३ पहा. ११. द्रोणासारखा. १२. कल्याणप्रद. १३. वक्ता. [बोलका=फार बोलतो तो, बोलण्याचा ज्याचा स्वभाव तो. धातूस 'का' प्रत्यय लागून धातुप्रदर्शित क्रिया करण्याचा स्वभाव ज्याचा—अशा अर्थाचे शब्द होतात. 'बोलका' या शब्दांत थोडी निंदाव्यंजकता आहे तथापि वक्ता, वाग्मी याचा अर्थी त्याचा प्रयोग प्रकृत स्थळीं केला आहे असें समजावें. द्रोणास मूळांत 'तत्त्वार्थदर्शिवान्' असें म्हटलें आहे.] १४. हितेच्छु पुरुषानें. १५. कानांहीं प्राशावे=आदरपूर्वक ग्रहण करावे=मन लावून प्रेमपुरःसर ऐकावे. १६. या द्रोणाचे. १७. विश्वाचें जनकत्व, सकल जगताचें कर्तृत्व. १८. विश्व उत्पन्न करण्यास्तव. १९. ब्रह्मदेवा. २०. अनादि (पुरुषाला).

ज्या पुरुषा ध्यातो त्या कृष्णासहि मेत अजातरिपु राणा. ॥ १९
जेथें ते तेथें कृतयुगधर्म समस्त, तोचि वर देश, ।
ऐसा तन्महिमा कीं त्यां हरिहरही प्रसन्न वरदेश. ॥ २०
धर्मस्थिति तेथें कृतयुगगुण हे स्पष्ट दाविली खुण, गा! ।
उमगा बरें चतुर हो! तो साधु तपःसमृद्धिचा कुणगा. ॥ २१
प्रासाद सद्गुणांचे ते पांच, तसीच ती सभा सावी, ।
त्यांची भेटि अशुचि जी दृष्टि न झालीच तीस भासावी. ॥ २२
उघडहि निधी अभाग्या न दिसे, मलिना जनाहि अत्रिज, गा! ।
तेजस्वी कां मरतिल? भीतिल ते कोपल्याहि न त्रिजगा. ॥ २३

---

१. अजा ज्या पुराणा पुरुषा ध्यातो त्या कृष्णासहि अजातरिपु राणा मत (मान्य) [असे]–असा अन्वय. २. मान्य. ३. धर्मराज. (ज्याला शत्रु उत्पन्न झाला नाहीं तो–हा यौगिक अर्थ होय, पण 'धर्मराज' हा रूढ अर्थ आहे.) ४. ते=पांडव. ५. कृतयुगधर्म=कृतयुग हें चार युगांतील एक होय. यालाच सत्ययुग म्हणतात. युगानुरूप धर्म निरनिराळे आहेत. कृतयुगांत प्रधान धर्म तप आहे. या युगांत धर्म चतुष्पाद असतो. यांत कोणालाही अधर्में करून कशाचीही प्राप्ति होत नाहीं. या युगांतील लोक सदा प्रियवादी, दांत, सत्यपर, शुचि, दानशील, वदान्य, अनसूयक, अनभिमानी असे असावयाचे. यापमाणें कृतयुगधर्म आहेत. ६. उत्तम, श्रेष्ठ. ७. या पांडवांचा महिमा (मोठेपणा.) ८. वरदात्यांचे ईश्वर. ९. धर्माची वसति. १०. तो धर्मराज. ११. एकांतीं संग्रह करून ठेवण्याची जागा, गुप्त भांडार. १२. गृह. १३. सद्गुणांची सभा. १४. सहावी. ते पांच (पांडव) सद्गुणांचे प्रासाद तसीच ती सावी [सद्गुणाची] सभा; जी दृष्टि अशुचि न झालीच तीस त्यांची भेटि भासावी. पांच पांडवांना पुरुष म्हणून सद्गुणांचे प्रासाद म्हटलें आहे, त्याचप्रमाणें सहाव्या द्रौपदीला स्त्री म्हणून सद्गुणांची सभा म्हटलें आहे. जी दृष्टि (अशुचि न) पवित्र आहे (मलहीन; पक्षीं पापहीन) तीस त्यांची (पांडवाची भेट होईल). जे पुण्यवान् लोक आहेत त्यांच्या पांडव दृष्टीस पडतील, इतरांना त्यांचा शोध लागावयाचा नाहीं. ते पांचजण सद्गुणांचे वाडे (प्रासाद) आणि ती सहावी सद्गुणांची सभा. ज्यांच्या दृष्टींवर पापाचें पडळ आलेलें नसेल त्यांस या पांडवांची ओळख पटल्याशिवाय राहूं नये. ज्यांची दृष्टि अपवित्र झालेली नाहीं अशा शुचिजनांच्या दृष्टीस ते पांडव पडतील. १५. अभाग्या (दुर्दैवी पुरुषाला) उघड ही निधी (द्रव्यसंचय, ठेवा जरि उघड्या जागेवर असला तरि) न दिसे [तसेंच] मलिना जनाही (पापी नरांनाही) अत्रिज (अत्रिऋषीपासून झालेली दत्तमूर्ति, दत्तात्रय) [न दिसे] गा (अगा.) 'गुरुचरित्रां'त असें लिहिलें आहे कीं, श्रीदत्तात्रेय हे दररोज वेष पालटून (कधीं मलंगाचा वेष, कधीं योग्याचा इ०) भिक्षा मागण्याकरितां पृथ्वीपर्यटन करित असतात. जे पुण्यवान् लोक आहेत तेच फक्त दत्ताची फेरी आपल्या घरीं आली असतां हे दत्त म्हणून ओळखतात, परंतु पाप्यांना ते मुळींच ओळखवत नाहीं. १६. दत्तात्रेय. १७. पांडव मेले नाहींत आणि मरावयाचे नाहींत, त्याचा नाश व्हावयाचा नाहीं, ते स्वबीर्यानें कोठें तरी गुप्त आहेत, असा भीष्माच्या बोलण्याचा कटाक्ष आहे.

अज्ञातवासपण म्हणउनि सुनिपुण गुणसमुद्र ते, जैन हो ! ।
लावाया वेड तुम्हां म्हणतात, 'प्रकट आत्मतेज नें हो'. ॥ २४
कृपहि म्हणे, 'कुरुवर्या ! तन्मार्गण तों अशक्य दैक्षमतें, ।
जें पाठवाल यावरि चतुर चरप्रवरलक्ष अक्षम तें. ॥ २५
अज्ञातवास दुष्कर, परि तदवधि निपट अल्प उरला, गा ! ।
त्वच्छस्त्रांस म्हणेलचि भीमाचें वज्रकल्प उर 'लागा'. ॥ २६
गांठी तुम्हांसिं त्यांसीं पाडीलचि वाढला विरोध रणीं, ।
वाटे म्हणालचि, 'असृक्सिंधूंत विरेल, तरि विरो धरणी.' ॥ २७
शोध कराल तरि करा, सत्वर सिद्धा कराचि परि सेना, ।
गुरुसुहृदाप्तोक्तातें राया ! हितकाम कोण परिसेना ?' ॥ २८
बोले त्रिगर्तराज, 'प्रस्तुत पांडवदशा विराटा हो. ।
प्राप्ताहि त्यजुनि म्हणे न शिखंडीचा परां विरा टाहो. ॥ २९
मेला कीचक घेता पीडुनि बहुधा करा त्रिगर्तांच्या, ।
त्याचा आम्हां, तेंवि न पांथा बहु धाक रात्रिं गर्तांचा. ॥ ३०

---

१. अज्ञातवास करण्याची प्रतिज्ञा केली म्हणून. २. कौरव्य जन हो ! ३. स्वप्रभा, स्वपराक्रम. ४. न म्हावें, होऊं नये. ५. अध्याय २९ श्लोक २-१४ पहा. ६. त्यांचें शोधन, त्या पांडवांचा शोध. ७. चतुरमतें. ८. दूतश्रेष्ठ चरप्रवरलक्ष=श्रेष्ठ दूतांचे लक्ष, लक्षावधी श्रेष्ठ दूत. ९. पांडवांचा शोध लावण्यास असमर्थ. १०. त्या अज्ञातवासाचा अवकाश. ११. अगदीं. १२. वज्रासारिखें कठोर. १३. पाडील=घडवील. विरोध रणांत गांठी पाडील—असा अन्वय. १४. वाढलेला. १५. वैमनस्यभाव. १६. रक्तसागरांत. १७. विरणें=झरणें=विरळ होणें=विरघळणें=रस—द्रव होणें. १८. वडील, मित्र आणि स्वजन यांच्या वचनातें. १९. हा प्रश्नालंकार जाणावा. २०. सुशर्मा. (अध्याय ३० श्लोक २-१३ पहा.) २१. पांडवांची दशा विराटराजाला प्राप्त होवो—असा भावार्थ. २२. प्राप्त+अहि=प्राप्त झालेला सर्प. २३. मोराचा (टाहो—केका). शिखंडीचा टाहो प्राप्ताहि त्यजुनि परां (अन्य सर्पाला) विरा [असें] न म्हणे. मयूराचा टाहो ऐकल्याबरोबर सर्प गर्भगलित होतात या समजूतीस अनुलक्षून हें वर्णन आहे. मयूराचा टाहो आपल्या हस्तगत झालेल्या सर्पाला सोडून अन्य सर्पाला विरा (विरघळून जा, मृतवत् पडा) असें म्हणत नाहीं. पकडलेल्या सापाला सोडून देऊन दुसऱ्या (सापाला) [तुम्ही भयानें] विरघळून जा असें मोरांचा शब्द म्हणत नाहीं. Cf. 'A bird in the hand is worth two in the bush.' त्याप्रमाणेंच सध्या विराटाचें राज्य हस्तगत करण्याचें सोडून पांडवांचा शोध करण्याच्या नादीं लागणें चांगलें नाहीं. २४. विरघळून जा. २५. पथिकाला. २६. खलग्यांचा, खांचांचा.

कीचकरहित विराट स्पष्ट जसा सर्प [1]नीरदन दीन, ।
[2]अल्प अनल्प बळें तो तूं संप्रति, जेंवि नीरद [3]नदीन.' ॥ ३१
[4]कर्ण म्हणे, 'त्या [5]मत्स्या [6]ग्रासूं आम्हीं तुम्हीं समस्त बक; ।
[7]बहुसुखशोभाप्रद न [8]स्वस्तरुचाही यशासम [9]स्तंबक. ॥ ३२
• पांडव मेले गेले, त्यांची आतां वृथा कथा राहो, ।
निर्दीप [10]निलय जैसा अंधारा, [11]आंधिला न [12]थारा हो.' ॥ ३३

---

१. निर्दंत. [निर्+रदन=नीरदन=निरस्त+दांत=दंतहीन.] २. अल्प अनल्प बळें तो तूं, संप्रति जेंवि नीरद नदीन. संप्रति तो (विराट) बळें (बळानें अथवा सैन्यानें) अल्प (कमी) तूं (दुर्योधन) [बळें] अनल्प (भारी) [तो, तूं] जेंवि नीरद नदीन. सध्या विराट हा शक्तीनें कमी आहे व तूं त्याजपेक्षां पुष्कळ भारी आहेस. तुम्हां दोघांना मेघ व समुद्र यांची उपमा अनुक्रमें चांगली शोभते; म्हणजे तो पाण्याचा वर्षाव करणाऱ्या मेघाप्रमाणें आहे व तूं पाण्यानें आधींच तुडुंब भरलेल्या अगाध समुद्राप्रमाणें आहेस. मेघाचा कितीही वर्षाव झाला तरी त्यानें समुद्राइतकें पाणी पृथ्वीवर एकदम जमत नाहीं. येथें **'यथासंख्य'** अलंकार झाला आहे. जेव्हां पदार्थांचें वर्णन ज्या क्रमानें पहिल्यानें झालेले असतें त्याच क्रमानें त्यांचा संबंध (अन्वय) पुनः दुसऱ्या पदार्थांशीं लागत असला, म्हणजे **'यथासंख्य'** अलंकार होतो. 'तो बळें अल्प जेंवि नीरद, तूं बळें अनल्प जेंवि नदीन'–असा यांत पूर्वीच्या क्रमाशीं जुळणारा दुसरा क्रम आला आहे म्हणून 'यथासंख्य' अलंकार झाला. 'शत्रूंस, मित्रांस आणि विपत्तीला जिंक, राख आणि पिटाळ' या वाक्यांत शत्रु, मित्र, आणि विपत्ति या शब्दांचा ज्या क्रमानें उल्लेख झाला आहे त्याच क्रमानें जिंक, राख, आणि पिटाळ या शब्दांशीं त्यांचा संबंध लागला आहे म्हणून हा 'यथासंख्य' अलंकार झाला. याचीं अन्य उदाहरणें:—(१)जयभीमवधाविषयीं कर्णसुयोधन करोत बकबकरे । कैसे करितील तिमिग्रास दहनमेपभंग बक बकरे ॥ [द्रोणपर्व–अध्याय १२ गीति ९१], (२) मानी मनोजशर हार तुरे फुलांचे कंदर्पकोपवचनें ध्वनि कोकिलांचे । राकाशशी मदनदर्पण भाविलाहे नेघेचि तो न परिसे न तयासि पाहे ॥ [रघुनाथपंडित–नलदमयंतीस्वयंवराख्यान]. या अलंकारास 'क्रमालंकार' असेंही नांव आहे. ३. मेघ. (नीर+दः=उदक+देणारा.) ४. समुद्र. (नदी+इन=नद्दीचा स्वामी.) ५. अध्याय ३० श्लोक १४-१८ पहा. ६. मत्स्यराजाला; (पक्षीं) जलचरमाश्याला. ७. हल्ला करूं-गिळूं. ८. पुष्कळ सुख आणि शोभा देणारा. ९. कल्पवृक्षाचा. [स्वर्+तरुचा=स्वर्ग+वृक्षाचा.] हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. १०. गुच्छ. या अर्धांत रणवीराच्या यशाचा महिमा गाइला आहे. कल्पवृक्षाचा पुष्पगुच्छही रणवीराच्या यशापुढें तुच्छ होय असें यशोमहत्त्व दर्शविलें आहे. यश हें कीर्तीपेक्षां श्रेष्ठ असें मानतात. पराक्रमानें यश मिळतें, दानपुण्यानें कीर्ति मिळते, यश सर्वदिशाव्यापी असतें, कीर्ति एकदिशागामी. असा यश आणि कीर्ति यांजमध्यें भेद आहे. 'दानपुण्यकृता कीर्तिः पराक्रमकृतं यशः । एकदिग्गामिनी कीर्तिः सर्वदिग्विस्तृतं यशः ॥' [कुमारसंभव–सर्ग २ श्लोक ४७ अवचुरिकृत टीका.] ११. गृह. १२. चिंतेला. १३. स्थान, आश्रयस्थान, ठाण.

राजा[1] म्हणे, 'बहु बरें, पात्र तुम्हीं या यशा सुशर्मा[2] व्हा,' ।
प्रेषी[3] पुढें कराया गोग्रहण खळा नृपा सुशर्माव्हा[4]. ॥ ३४

आपण[5] सकर्ण सानुज जींत गुरु द्रौणि[7] शांतनव[9] कृप तो ।
सर्वातिशूरपूर्णा सेना घेऊनियां निघे नृपती[10]. ॥ ३५

संपूर्ण पांडवांचा नुगता अज्ञातवास सरला, जों ।
लागे विराटनगरा तों प्रविकासोन्मुखाब्जसर लाजों[11]. ॥ ३६

सेनानी[12] कीचकसा[13] तो ये चित्तास कंक[14] राजाच्या, ।
श्रीरामाच्या तैशा बहु मान्या रीति शंकरा ज्याच्या[15]. ॥ ३७

इतुक्यांतें तो सुशर्मा[16] दंडाहतपन्नगोग्र हानीच[17] ।
व्हाया स्वकीर्तिची, करि पावोनि विराटगोग्रहा[18] नीच. ॥ ३८

परिसे त्रिगर्तपतिकृतगोग्रहण विराट गोपवेदनांहीं[19], ।
रदनांहीं[20] अधरातें चावे; रिपुसम असह्य गदे[21] नाहीं. ॥ ३९

---

१. दुर्योधन म्हणे. (अध्याय ३० श्लोक १९-२४.) २. सु+शर्म=उत्तम+सुख. ३. 'प्रेषी' याचा कर्ता राजा दुर्योधन याचा येथें अध्याहार केला आहे. ४. गाई धरणें. ५. सुशर्मनामका. [आव्हा=नाम.] ६. आपण=तो स्वतः. ७. द्रोण. ८. अश्वत्थामा. (द्रोण–द्रौणि, दशरथ–दाशरथि, कृष्ण–कार्ष्णि, रावण–रावणि, मरुत्–मारुति; येथें 'इ'प्रत्यय लागून अपत्यार्थक नामें झालीं आहेत). ९. शांतनव=भीष्म. [शांतनु–शांतनव, भृगु–भार्गव, यदु–यादव, सुमित्रा–सौमित्र.] १०. राजा दुर्योधन. ११. प्रफुल्लकमलयुक्त सरोवर. विकसूं पाहतात कमळें ज्यांतील असें सरोवर विराटनगराची शोभा पाहून लाजूं लागलें. अज्ञातवासाची मुदत सरत येऊन विराटनगरांत सर्वत्र आबादानीचा प्रसंग दिसतो म्हणून पांडव तेथेंच असावे, असें सूचविलें. १२. सेनापति. १३. धर्म. तो कंक (कंकरूपी धर्मराज) सेनानी कीचकसा (सेनापति कीचकाप्रमाणें) राजाच्या (विराटाच्या) चित्तास ये (मनास आला. त्याला त्यानें आपला सेनापति केला). [जैशा] श्रीरामाच्या रीति शंकरा (महादेवाला) बहुमान्या तैशा ज्याच्या (ज्या कंकाच्या) [रीति विराटा बहुमान्या]. कंक हा रामचंद्राप्रमाणें विराटाला सर्व गोष्टींत मान्य होता. महादेव हा रामाचें ध्यान करितो तेव्हां रामाचें करणें महादेवाला मान्य होणें हें साहजिकच आहे. १४. विराटराजाच्या. १५. ज्या कंकाच्या. १६. त्रिगर्तराज. हा दुर्योधनपक्षीय संशप्तकराजा. यास भारतीयुद्धांत अर्जुनानें मारिलें. १७. दंडताडित सर्पाप्रमाणें उग्र. १८. विराटराजाच्या धेनूंचें हरण. १९. गोपांच्या (गवळ्यांच्या–गोरक्षकांच्या) मुखानें. [गोरक्षक गोपानें राजास असें सांगितलें कीं, त्रिगर्तराज सुशर्मा शतसहस्र धेनु घेऊन जात आहे, त्या तो नेणार नाहीं असें करावें. यानंतर विराटानें सैन्याची तयारी केली. अध्याय ३१ श्लोक ७-८.] २०. दंतांनीं. २१. ओष्ठातें. २२. शत्रूसारखा. हा भाग सुभाषितरूप आहे. २३. रोग.

न रणा भ्याला, ल्याला क्रोधानलतप्तकाय तो कवच; ।
प्रियही जीवित वीरा; धीरा भुलवील काय तो कवच? ॥ ४०
देउनि रथादि घेता झाला कंकादिकांहि चवघांस; ।
वीर स्वशक्ति चतुरां कळविति, गंधेंचि जेंवि चव घांस. ॥ ४१
ते गांठिले त्रिगर्त द्युमणिविरामींच मत्स्यसेनांहीं, ।
केले भट सुभटांही, प्रवळांहीं अबळ मत्स्यसे नाहीं. ॥ ४२
उग्र, परि सुखद शिवसा, सुकवींस न वर्ण्य काय संगर तो? ।
कीं जो म्हणे, 'सकळ जन पावुनि सुरयुवतिकायसंग रतो.' ॥४३

---

१. क्रोधाग्नीनें तापलेलें शरीर ज्याचें असा. २. चिलखत. ३. कवच घेण्याचें कारण यांत सांगितलें आहे. कोणी पुरुष मोठा वीर जरी असला तरी त्याला स्वप्राण प्रिय आहेच, स्वजीवितरक्षणाचा उपाय करणें हें सर्वांस उचित आहे. ४. मोहील, भ्रमवील. हा पाद सुभाषितरूप आहे. ५. बालभाषण. ६. रथ, कवचें आणि आयुधें पांडवांस देऊन विराटानें त्यांस आपल्या समागमें घेतलें असें वर्णन आहे. (अध्याय ३१ श्लोक २४-३०.) ७. भीम, नकुल, सहदेव आणि धर्म अशा चवघां जणांला. ८. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. ९. सूर्याच्या अस्तीं. (अध्याय ३२ श्लोक १.) १०. विराटाच्या सेनानीं. ११. बलवान् मत्स्यांहीं. 'प्रवळांही' यांत 'हीं' हा तृतीयेचा बहुवचनी प्रत्यय होय. १२. मत्स्यासारिखे. १३. वर्णीयास उचित. १४. संग्राम. १५. कारण कीं. १६. जो संगर म्हणे. १७. देवांगनांचा शरीरसमागम. रणांत पाठ न दाखवितां, सन्मुख उभें राहून जे वीर धारातीर्थीं प्राण देतात त्यांच्या गळ्यांत अप्सरा माळ घालतात अथवा ते सूर्यमंडळास भेदून वर ब्रह्मलोकास जातात असें शास्त्रांत सांगितलें आहे, या गोष्टीवर येथें लक्ष ठेवून वर्णन केलें आहे. असें वर्णन संस्कृतांत वारंवार आढळतें:—(१) उद्दंडे भुजदंडे तव कोदंडे परिस्फुरति । अरिमंडलरविमंडलरंभाकुचमंडलानि वेपंते ॥, (२) सूचीमात्रविभेदसंभ्रमगुणः क्षोणीशवामभ्रुवामुत्तुंगस्तनमंडलेषु लभते लीलारतिं कंचुकः । नाशत्रैर्निविडैर्विभिन्नवपुषां पुंसां महायोधने स्वर्गश्रीकुचकुंभसंभ्रमपरीरंभः कथं दुर्लभः ॥, (३) विपक्षशस्त्रक्षपणैः पुनः पुनः क्षताखिलग्रंथि निजास्थिपंजरम् । चकार चंडद्युतिमंडलोदरे सुखप्रवेशार्थमिवापरो भटः ॥, (४) द्वाविमौ पुरुषव्याघ्र सूर्यमंडलभेदिनौ । परिव्राड् योगयुक्तश्च रणे चाभिमुखो हतः ॥. यांचा भावार्थः—(१) हे राजा! तुझ्या बलाढ्य बाहुदंडावर धनुष्य चढलें असतां, शत्रुमंडल, सूर्यमंडल आणि रंभाकुचमंडल हीं कांपूं लागतात. (२) केवळ सुईनें टोंचून घेतल्यामुळें जर कंचुकाला नृपांगनांच्या उन्नत स्तनमंडळांवर विलास करायास मिळतें, तर रणांगणांत छिन्नगात्र झालेल्या योद्ध्यांस देवांगनांच्या कुचकुंभालिंगनाचा लाभ घडला, त्यांत आश्चर्य कसचें? (३) एक वीर आपणास सूर्यमंडलांत प्रवेश करतां यावा म्हणूनच काय शस्त्रांनीं आपल्या अस्थिपंजराच्या ग्रंथि तोडिता झाला. (४) दोघे सूर्यमंडळाचा भेद करणारे होत; एक योगी व एक धारातीर्थीं मरण पावलेला वीर. याच अर्थाचीं प्रसिद्ध कवींचीं वचनें अनेक आढळतात. १८. रममाण होवो. सकल वीरांनीं प्राणांत होईपर्यंत युद्ध करावें—असा भावार्थ.

करिते झाले दारुण रण ते [१]दोघेहि सिंहसम राजे, ।
पाहति कौतुक तेथें उरले होते करूनि समरा जे. ॥ ४४
[२]धरिला विराट लाजे, वरि न करी [३]कैंधरा त्रिगर्तांत; ।
नेणे कर्तव्य, जसा [४]पेंडला [५]अंधरात्रि गर्तांत. ॥ ४५
धर्मा न सोसवे, जें धरि गो[६]रक्षणपरा सुशर्मा तें, ।
कीं [७]सौसुहि दुःखातें पावे भंगें [८]परासु [९]शर्मातें. ॥ ४६
धर्म [१०]म्हणे, 'भीमा ! हूं, हो [११]व्यसनाब्धींत [१२]नाव गा ! [१३]त्यातें; ।
भलत्यातेंहि [१४]उपेक्षी बुध, हरिचें जेंवि नाव [१५]गाण्यातें. ॥ ४७
वा ! अनद [१६]आश्रयद व्यसनीं जो, केंवि तो न सेव्य जना ? ।
[१७]पालकतापहरत्वें मान जेंडा अन्यथा नसे [१८]व्यंजना. ॥ ४८
[१९]त्यां भीमें द्विज तो, त्वां रक्षावा हाहि [२०]अंतकाननग; ।
चापचि हो पात्र [२१]यशा, दुष्टांच्या मूर्त अंतका ! न [२२]नग.' ॥ ४९

---

१. विराट आणि सुशर्मा. २. धरलेला. (अध्याय ३३ श्लोक ८-९ पहा.) ३. मान. ४. पडलेला (मनुष्य). ५. निबिडतिमिरयुक्त रात्रीस=फार काळोख्या रात्रीस ['अंधं तु तिमिरे क्लीवम्' इति मेदिनी.] ६. गोरक्षणोद्युक्त (विराटास). ७. सप्राणहि. ८. पराभवानें. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. ९. मृत. १०. सुखातें. ११. अध्याय ३३ श्लोक ११-१३ पहा. १२.संकटसागरांत. १३. नौका. १४. त्या विराटराजातें. १५. जो गातो त्यातें. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. १६. आश्रय देणारा. या अर्धांत प्रत्येक मनुष्यानें आपलें कर्तव्यकर्म बजाविण्यास दक्ष असलें पाहिजे असें नीतितत्व ध्वनित करून सेव्यसेवकसंबंधास अनुरूप असें आपलें वर्तन या प्रसंगीं विराटाच्या संबंधानें असावें– असें धर्मानें भीमाला उपदेशिलें आहे. अशाच उपदेशपर आणि उदाहरणपूर्ण काव्यांच्या अभ्यासानें वाचकांचीं मनें सुसंस्कृत होऊन आध्यात्मिकनीतितत्वांविषयीं प्रीति आणि पूज्यबुद्धि उत्पन्न होणारी आहे. १७. पालणाराचा ताप नाहींसा करतो या कारणास्तव, पालनकर्त्याचा (बाळगणाराचा) ताप दूर करण्याच्या धर्मास्तव. १८. अचेतना (व्यजना). हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. १९. पंख्याला. २०. त्या भीमें (त्या महादेवानें) तो द्विज (मार्कंडेय) जसा रक्षिला तसा त्वां (भीमें) हा रक्षावा. २१. कृतांतमुखगत. २२. यशा चापचि पात्र हो. दुष्टांच्या मूर्त अंतका! (हे दुष्टांचा संहार करणाऱ्या मूर्तिमान् यमा! भीमा!) नग (वृक्ष) [पात्र] न [हो]. भीमाची नेहमींची युद्ध करण्याची रीति आडदांड असे. वृक्षपाषाणादिकांनीं तो शत्रूंना जेर करी. (मोरोपंत–विराटपर्व अध्याय १ गीति १६२ उत्तरार्ध पहा, वनपर्व–अध्याय १ गीति ९४ पहा, तसेंच युद्धप्रकरणांतील भीमयुद्धवर्णन पहा.) तेव्हां धर्माला धाक पडला कीं नेहमींच्या रीतीस अनुसरून भीमानें युद्ध केल्यास आपण पांडव म्हणून ओळखले जाऊं, पण इतक्यांत प्रकट होणें तर त्यांना इष्ट नव्हतें म्हणून मुद्दाम येथें धर्मानें भीमाला धनुष्याच्या साहाय्यानें शत्रूशीं युद्ध करण्यास सांगितलें आहे. धनुष्यबाणांनीं युद्ध करून विराटाला त्रिगर्तांपासून सोडविण्याचें यश संपाद; वृक्षादिकांनीं युद्ध करून तें संपादूं नको. (अ० ३३

भीम म्हणे, 'हो! त्यांचा लेखा आम्हांसि कायसा, राया!।
सिद्ध समस्तहि आहों युष्मत्कार्यार्थ काय सांराया.' ॥ ९०
ऐसें वदोनि धांवे, अरिवर गेले न रामबाण तसे;।
साधुमनांत गुरुकथित हरिनाम तसेंचि काम बाणतसे. ॥ ९१
क्षुद्र विलंघील कसा त्या पौरवसत्तमा? कडा हो! तो।
हेमाद्रिचा, न हरिसहि लंघ्य, कसा मत्त माकडा होतो? ॥ ९२
गांठी भीम, जसा अहिपति हरितां सुप्रभा वरमणीला,।
टपतो सुकीर्तिला बहुतर, तेंवि न सुप्रभाव रमणीला. ॥ ९३
झाला भग्न सुशर्मा, हरिसीं पडतांचि गांठि सिंधुरसा,।
रस मिसळोनि खेंबलें जिंकीसा कवण लवणसिंधुरसा? ॥ ९४
अरि धरिला, असतांही असि शक्ति धनुष्य पूर्णशर भाते.।

श्लोक १८-२१.) 'न्यायमृकंडुसुताच्या दुस्तरधृतराष्ट्रजाब्धिसाधुवटा' [वनपर्व—अध्याय ५ गीति ५५] ह्या विकर्णोक्तिचें स्मरण होतें. जलप्रलयसमयीं मार्कंडेयाचें वटवृक्षानें संरक्षण केलें ही पौराणिकी कथा येथें अनुसंधेय आहे. २३. वृक्ष.

१. कथा, पर्वी, केंवा, पाड, किंमत, प्राज्ञा. २. आपल्या कामासाठीं. ३. शरीर. ४. पुढें देण्याला, खर्ची घालण्याला. ५. 'भीम' हा 'धांवे' या क्रियापदाचा अध्याहृत कर्ता आहे. ६. शत्रूवर. (रावणावर.) ७. सज्जनांच्यां चित्तांत. ८. गुरु (वडील पुरुष, पिता, आचार्य) यानें सांगितलेलें. येथें अर्थसंदर्भानें साधु=भीम आणि गुरु=धर्म असें समजावें. ९. कार्य, कृत्य. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. १०. ठसतसे. ११. हलकट. (सुशर्मा.) १२. पराभूत करील. १३. त्या भीमा. १४. सिंहाला. १५. उत्तम प्रभा(कांति)युक्त अशा. १६. श्रेष्ठ मण्यास. १७. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. १८. सुप्रभाव (पराक्रमी पुरुष) सुकीर्तीला (उत्तम कीर्तीला) बहुतर (फार) टपतो (जपतो, रक्षण करितो) तेंवि रमणीला (सुंदर प्र प्राणप्रिय स्त्रीला) न [टपतो]. हें अर्थांतरन्यास अलंकाराचें उदाहरण होय. थोर पुरुषाला आपल्या प्रत्यक्ष सुंदर जीवलग स्त्रीपेक्षां कीर्तीची चाड जास्त असते. १९. अध्याय ३३ श्लोक ५०-५१ पहा. २०. गजासारखा. २१. स्वपराक्रमानें. २२. जिंकी असा. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. २३. कवण=कोणता. ['कवण' हा शब्द कवितेंत मात्र आढळतो.] २४. क्षारसमुद्राच्या पाण्याला. यांत 'प्रतिवस्तूपमा'नामक अलंकार झाला आहे. 'झाला भग्न' आणि 'कवण ही जिंकीसा नाहीं' या दोन वाक्यांतील बिंबप्रतिबिंबभाव स्पष्ट नसून हें वैधर्म्य आहे, साधर्म्य नव्हे. [पृष्ठ ५ टीप ४ व पृष्ठ ३६ टीप २२ पहा.] २५. खड्ग. हा पूर्वार्ध असा लिहावा:— अरि धरिला; असतांही असि, शक्ति, धनुष्य, पूर्णशर भाते. भीमानें शत्रूजवळ खड्ग, शक्ति, धनुष्य, शरानें खचून भरलेले भाते इतकें सर्व साहित्य असतांही शत्रूला (त्रिगर्तराजाला) धरिलें. याला दृष्टांत द्वितीयार्धांत दिला आहे. २६. आयुधविशेष. २७. पूर्ण आहेत शर ज्यांत असे (भाते). २८. जरी खड्ग, चाप, आणि भाते इत्यादि युद्धाची सामग्री शत्रूजवळ (सुशर्म्याजवळ) होती तरी त्याला धरिलें.

खरतरहि[1] नखर हरिचे[2] करितिल समरांत काय शरभा ते[3]? ॥ ९५
उग्रा त्रिगर्तपालव्याला तो वीरवर[4] सुपर्ण[5] कुटी[6]; ।
दे तापतापसाला[7] करुनि तयाची तनू[8] सुपर्णकुटी[9]. ॥ ९६
भीमें[10] धर्मापासीं ओढित नेला धरूनि शेंडि खळ, ।
झाला सुमृदु विराला; उदकीं केवळ विरे जसें डिंखळ. ॥ ९७
सुटला[11] गरुडें[12] धरिल्या श्येनापासूनि काय तो लावा[13]? ।
कीं शरभधृतमृगेश्वरमुक्तेभासींच[14] राय[15] तोलावा. ॥ ९८

---

१. अतितीक्ष्णहि. २. सिंहाचे. ३. ते हरिचे नखर काय करतील? त्यांचें कांहीं चालायाचें नाहीं, ते शरभापुढें हतवीर्य होत–असें उत्तर. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. ४. त्रिगर्ताधिपरूप सर्पाला. भीमानें त्रिगर्ताच्या शरीराला मुष्टिमोदक देऊन त्याला अतिशय दुःख दिलें. ५. वीरनायक भीमरूप (गरुड). हें रूपकालंकाराचें उदाहरण. ६. गरुड. ७. ठेंची. ८. पर्णशाला. तापरूप तापसाला (तपस्व्याला) तयाची (त्या त्रिगर्तराजाची) तनू (देह) सुपर्णकुटी (उत्तम पर्णशाला) करूनि दे–असा अन्वय. येथें ताप हाच तापस (तपस्वी) होय. त्याला राहण्यासाठीं सुपर्णकुटी पाहिजे; तेव्हां भीमानें सुशर्मराजाची तनू हीच सुपर्णकुटी करून त्याला दिली. तापरूप तपस्वी त्रिगर्तराजतनुरूप पर्णशालेंत राहूं लागला–असा भावार्थ. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. ९. मूळांत 'गळा धरून' असें आहे. (अ० ३३ श्लो० ५५.) १०. गीति ५८-६२ यांतील वर्णन पंतांच्या पदरचें आहे, यास मूळांत आधार नाहीं. पंतांच्या वर्णनांतील खुबी मूळांत कोठेंही दृग्गोचर होत नाहीं. प्रस्तुत वर्णन आणि त्यांतील अलंकार हे किती अनुगुण आहेत हें प्रसंगाकडे लक्ष दिलें असतां कळणार आहे. ११. श्येनपक्षी लावकपक्ष्यावर झडप घालून त्याला हैराण करून मारतो–अशी ख्याति आहे. १२. शरभ+धृत+मृगेश्वर+मुक्त+इभासीं=सिंहारि+धरलेला+सिंह+सोडलेल्या+गजाशीं=शरभानें धरलेल्या सिंहापासून सुटलेल्या गजासीं. पूर्वार्धांत उपमागर्भ उत्प्रेक्षा अलंकार आहे. भीमानें त्रिगर्ताला धरिलें तेव्हां त्यानें (त्रिगर्तानें) धरिलेल्या विराटराजाची सहजीच सुटका झाली. ही गोष्ट कवि दोन निराळ्या उपमा देऊन सांगतात. पूर्वार्ध:—श्येनपक्ष्यानें आपल्या तोंडांत लाव्याला धरून तो त्यासह आकाशांत परिभ्रमण करित असतां गरुडानें श्येनपक्षावर झडप घातली. तेव्हां श्येनपक्षी गर्भगळीत होऊन, त्यानें धरिलेला लावा मात्र पटकन सुटला. जसा काय तो लावापक्षी (विराटराज) श्येनापासून (त्रिगर्तराजापासून) सुटला, कारण श्येनाला (त्रिगर्तराजाला) गरुडें (भीमानें) पकडलें, अशी ही उत्प्रेक्षा आहे. उत्तरार्ध:—किंवा राय (विराटराजा) शरभधृतमृगेश्वरमुक्तेभासींच (सिंहशत्रु शरभानें धरिलेल्या सिंहापासून सुटलेल्या हत्तीशीं) तोलावा (उपमा द्यावी). मृगराजसिंहानें हत्तीला धरून तो त्याला भक्षण करणार इतक्यांत शरभानें सिंहाला धरिलें. शरभाची (भीमाची) व सिंहाची (त्रिगर्तराजाची) झटापट होते आहे इतक्यांत सिंहाच्या तावडींत सांपडलेल्या हत्तीनें (विराटराजानें) पळून आपली सुटका करून घेतली. शरभ हा सिंहाला मारणारा प्राणी होय. १३. विराट.

भासे तो[1] शंभुपुढें स्मर, यूपाजवळ कांपता पशु कीं[3], ।
धर्मी भूतदयेस्तव उठले जैसेचि कांप ताप शुकीं[4]. ॥ ५९
भीम म्हणे, 'उघड दिसे हेंचि खरें काय? जी! वंदा नातें'. ।
धर्म म्हणे, 'हा याचक, तूं दाता काय जीवदानातें. ॥ ६०
जोंवरि नसे कवळिला, तोंवरि मंडूक दापितो भुजगा, ।
जो स्पर्शिला रणीं त्वां, न धरी कंडू कदापि तो भुज गा! ॥ ६१
हा वीरश्रीस करस्थित अनुचित, भारतीस वायससा, ।
सोड, वधावा सिंहें केला अपराध म्हणुनि काय ससा?' ॥ ६२
भीम म्हणे, 'मी तुमचा दास असें स्पष्ट बोल, पापा! हूं'. ।
धर्म म्हणे, 'जाऊं दे, शंकें मी या धृतत्रपा पाहूं. ॥ ६३

---

१. तो सुशर्मा. तो सुशर्मा शंभूपुढें (शंकरापुढें) स्मर (काम) असा भासे. [शंकरानें कामाला मारिलें ही पौराणिकी कथा येथें ध्यानांत असली पाहिजे.] किंवा तो (सुशर्मा) यज्ञांतील खांबाजवळ कापून मारण्यासाठीं बांधलेल्या पशूसारखा (अजासारखा—बकऱ्यासारखा) भासे. धर्माची भूतदया (भूतानुकंपा) शुकाच्या भूतदयेसारखी म्हणून तो धर्म कापूं लागला व तापून गेला. शंभूपुढें जसा स्मर तसा भीमापुढें तो सुशर्मा—असा अर्थसंबंध. २. यज्ञस्तंभाजवळ. ३. किंवा. ४. श्री-शुकाचार्यांत. ५. भीम म्हणतो:—हे धर्मा! या सुशर्म्याचें आणि माझें जें काय नातें आहे तें मला कृपा करून कळवा. तो वध्य आणि मी त्याचा वधिता (मारणारा) असें जें उघड उघड नातें आतां दिसत आहे तेंच खरें काय? मी या सुशर्म्याला मारून टाकावें किंवा कसें तें सांगा. उघड-रीत्या म्हटलें तर तो वध्य आणि वधिता असें नातें आहे. सुशर्मा याचक आणि भीम जीवदान देणारा असें नातें धर्मानें भीमास सांगितलें आहे. ६. 'देता' असा अन्यपाठ. ७. सदेह प्राण-दानाला. ८. बेडुक. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. ९. सर्पास. १०. जो भुज. ११. खाज. (भुजयुद्ध करण्याची खाज.) १२. हा सुशर्मा. १३. हातांत राहिलेला. १४. वाणीला, सरस्वतीला. [भारतीला मोर उचित आणि वायस अनुचित—असें समजतात.] १५. कावळ्यासारिखा. १६. हा प्रश्नालंकार आहे. हें वचन सुभाषितरूप आहे. दुसऱ्यानें अपकार केला असतां त्याजबद्दल त्याला क्षमा करणें हें अत्यंत थोरपणाचें लक्षण होय, थोर मनाचे जे लोक असतात त्यांनीं सदा क्षमाशील असावें हें त्यांस योग्य होय—या तात्त्विक सिद्धांताचें स्मरण वाचकांस होणार आहे. असला उत्तम नीतिबोध पंतांच्या काव्यांत जागोजाग आढळतो, मात्र लक्षपूर्वक त्यांचें परिशीलन केलें पाहिजे. १७. अध्याय ३३ श्लोक ५९ पहा. १८. हे अधमा त्रिगर्ताधिपते. १९. ही धर्मोक्ति पंतांच्या पदरची आहे. हींत 'जाऊं दे' याला मात्र मूळांत आधार आहे. बाकीचा सगळा भाग पंतांच्या प्रसंगानुरूपवर्णन करण्याच्या शैलीची उत्तम साक्ष देतो. २०. लज्जायुक्तास.

नमन पुरे, रे[1]! जा रे! ध्याव्या, गाव्या, दिसोत गाईशा[2]।
शिवमूर्ति[3], किं रे! यांचें लंघन सोसेल काय गा! ईशा[4]?' ॥ ६४
अभय दिल्हें, परि काढी, नमुनि विराटा, निकाम नीच पळ[5]।
बोधीं बाहेर निका[6] होय, परि नव्हे निका मनीं चपळ[7]. ॥ ६५
यश[8] सोडवूनि वसविति, पावुनि विजयोत्सवा[9], रणाजिर[10] तें।
अभिमान हरिसि[11] ज्यांचा कैसें तद्वस्तु वारणा[12] जिरतें[13]? ॥ ६६
पांडुसुतांतें पूजुनि, मत्स्यपति म्हणे, 'दिली तुम्हां मही[14] म्यां,।
हे काय प्रत्युपकृति[15]? गाइन तुमच्याचि नित्य या महिम्या. ॥ ६७
कंका! हो राजा, हे वल्लवमुख[16] सचिवराय होऊत,।
तुमचें[17] यश शुचि, याहुनि दुग्धाचा[18] अधिक काय हो! ऊत[19]? ॥ ६८

---

१. 'रे' इति हीनसंबोधने अधमामंत्रणे वा. [स्तुतिकुसुमांजलि–स्तोत्र ९ श्लोक ६५-६६ टीका.] २. चित्तांत आणाव्या. ३. स्तवाव्या. ४. शिवाच्या मूर्ति. ५. अतिक्रमण, अपमान, धर्षण. ६. ईश्वरास. ७. अभय दिल्हें असतांही पळ काढी. अभयलाभामुळें पळण्याचें कारण नव्हतें तरी पळ काढी. 'परि'च्या स्थानीं 'तरि' असा अन्यपाठ आहे. ८. यथेष्ट. ९. शुद्ध. १०. मनांत शुद्ध (निका) नव्हता, चपळ होता. चपळ=चंचळ, कुत्सित, कलुषित. ११. गोधनरूप यश शत्रूपासून मुक्त करवून. १२. विजयानंदा. १३. रण+अजिर=रण+अंगण=समरभूमि. १४. सिंहाला; (पक्षी) कृष्णाला. १५. गजास; (पक्षी) सुशर्मा हाच गज त्याला. १६. वार्धीही जिरणार (पचणार) नाहीं–असा अर्थ. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. या उत्तरार्धांत **'अप्रस्तुतप्रशंसा'** किंवा **'अन्योक्ति'** नामक अलंकार झाला आहे. [पृष्ठें १७-१८ टीप १९ पहा:] १७. पृथ्वी. १८. प्रत्युपकार, उलट उपकार. १९. वल्लवप्रमुख. २०. प्रधान. २१. या उत्तरार्धांत **'प्रतीप'** नामक अलंकारध्वनि आहे. उपमान जें दुग्ध त्याला उपमेय जें यश त्याजसारखें मानिलें आहे म्हणून येथें **प्रतीप** अलंकार झाला असें दिसतें. खरोखर जें उपमान त्यास उपमेय मानिलें अथवा जें उपमेय त्यास उपमान मानिलें म्हणजे **'प्रतीप'** अलंकार झाला. डोळ्यासारिखें कमळ, मुखासारिखा चंद्र असें म्हटलें म्हणजे 'प्रतीप' झाला. या टीकाविषयक आर्यार्धांत **'व्यतिरेका'**चा ध्वनि आहे असें म्हटलें तरी चालेल. उपमानास तुच्छत्व आल्यास 'प्रतीप' आणि उपमेयास आधिक्य आल्यास 'व्यतिरेक' असें समजावें. प्रतीपाचें लक्षण:—'प्रतीपमुपमानस्योपमेयत्वप्रकल्पनम्' [कुवलयानंद.] 'प्रसिद्धस्योपमानस्योपमेयत्वप्रकल्पनम् । निष्फलत्वाभिधानं वा प्रतीपमिति कथ्यते ॥ उक्त्वा चात्यंतमुत्कर्षमन्युत्कृष्टस्य वस्तुनः । कल्पितेऽप्युपमानत्वे प्रतीपं केचिदूचिरे ॥' [साहित्यदर्पण–७४१-७४२.] 'आक्षेप उपमानस्य प्रतीपमुपमेयता । तस्यैव यदि वा कल्प्या तिरस्कारनिबंधना ॥' [काव्यप्रदीप–१०-४७.] २२. 'दुग्धधिचा' असा अन्य पाठ जुनाट तीन हस्तलिखित प्रतींत आढळतो. दुग्धधिचा=क्षीरसागराचा.

हे[1] क्षिति किति? योग्य तुम्हीं भोगाया सार्वभौमपदवीतें, ।
ऐशा सुयशस्तीर्था ज्या तुमचें सत्त्वविष्णुपद[4] वीतें.' ॥ ६९
कंक म्हणे, 'आम्हांला राज्यादिक सर्व पावलें, नृपते! ।
ज्यां करद[6] स्खलनीं जे त्यांचीं नमिताति पावलें नृप! ते. ॥ ७०
स्वाश्रयभजन स्वभजन, न परार्थ, स्वार्थ यत्न, हा, राजा! ।
त्या आपुल्याचि केल्या सत्कृति चिंताख्यरत्नहारा! जा. ॥ ७१
आधीं निजविजय पुरीं चोर प्रेषूनि शीघ्र[15] कळवावा, ।

---

१. या पृथ्वीची काय कथा? २. उत्तम यश हेंच तीर्थ त्याला. ३. सत्त्वगुणरूप विष्णुपद. ४. प्रसवतें. [विष्णुपदापासून जसें गंगातीर्थ उत्पन्न झालें तसें तुमच्या सत्त्वगुणापासून सुयश उत्पन्न झालें–असा भाव.] येथें रूपक आहे. ५. हे विराटा! ६. हात देणारे. ७. पतनांत. ८. हात देणारांचीं. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. ९. जे (लोक) ज्यां (ज्या पुरुषांला) स्खलनीं करद [होतात] त्यांचीं (त्या लोकांचीं) पावलें ते (पुरुष) [हे] नृप! (विराटनृपते!) नमिताति–असा अन्वय. हे विराटा! ज्यांनीं आम्हांला संकटकालीं हात दिला त्यांच्या चरणांला आम्ही सदां शिरोवंदन करावें हें आम्हांस उचित आहे असें धर्मोक्तीचें तात्पर्य आहे. येथें जे=करद, त्यांचीं=करदांची (विराटासारख्यांचीं), ज्यां=ज्यांला आश्रय मिळाले ते (पांडवांसारखे)–असें समजावें. १०. आपल्याला ज्याचा आश्रय (आधार) त्याचें भजन (सेवन.) स्वाश्रयभजन (आपल्याला आधार ज्याचा त्याची सेवा करणें) [हें] स्वभजन (आपली सेवा करणें) [होय]. राजा! (हे विराटा!) हा (तुझी आम्ही त्रिगर्तापासून सुटका केली हा) परार्थ [यत्न] (दुसऱ्याकरितां केलेला प्रयत्न, अस्मदितर यत्न) न (नाहीं), [तर] स्वार्थ यत्न (स्वतःच्या फायद्याकरितां केलेला यत्न) [होय.] [हे] चिंताख्यरत्नहारा (चिंता हें नांव ज्याचें तो चिंतामणि, हींच रत्नें त्यांचा हार अशा हे चिंतामणिहारा!–अर्थसंदर्भानें हे विराटराजा!–जा (ज्या) सत्कृति (आतिथ्य, आदर) केल्या त्या आपुल्याचि–असा उत्तरार्धाचा अन्वय. कंक विराटराजाला म्हणाला, 'हे राजा! आपण आपली सुटका केल्याबद्दल जें आमचें बहुमानपूर्वक गौरव करितां त्याला आम्हीं योग्य नाहीं. यांत आम्ही जास्त कांहीं केलें नसून आमचीच आम्ही सेवा केली. तुमचें रक्षण आम्ही न करितों तर आमचाच आधार तुटता. तेव्हां यांत आम्ही आपल्या स्वतःवरच उपकार केले. तुम्ही मात्र आम्हाला आश्रय देऊन आमच्यावर उपकार केले. आपल्या आश्रयदात्याची सेवा ती आपलीच सेवा होय. आश्रयदात्याला संकटांतून सोडविणें यांत परार्थ नाहीं, तर यांत स्वार्थच आहे. चिंतामणींच्या हाराचा आदरसत्कार केल्यास तो केवळ स्वार्थासाठीं होय, त्या चिंतामणिहारासाठीं नव्हे, त्यापासून आपल्याला स्वार्थ साधावयाचा म्हणून होय–असा तात्पर्यार्थ. या धर्माच्या भाषणापासून वाचकांच्या मनावर अनेकप्रकारें सुखकर संस्कार होणारा आहे. सेव्यसेवकसंबंध कसा असला तर सुखावह होतो, दैवानें जी स्थिति प्राप्त झाली असेल तिला अनुरूप असें आचरण ठेवून स्वकर्तव्य कसें यथासांग बजावावें इत्यादि नीतिबोधानें धर्माचें भाषण भरलेलें आहे. ११. हे विराटा! १२. हे चिंतामणिरत्नहारा! १३. ज्या. १४. हेर. १५. सत्वर.

नरसिंहा! क्षिप्र सुहृद्धृदयसरोगाधिनाग पळवावा.' ॥ ७२
राय म्हणे, 'चर हो! जा, चिंतातटिनींत तें न पुर वाहो, ।
सांगोनि विजय निर्जनकर्णसुधापानकाम पुरवा, हो! ॥ ७३
नगर अलंकृत करवा, अमरीकृतपुष्पवृष्टिला जांची ।
शोभा विपक्ष ऐसी स्त्रीनिकर करूत वृष्टि लाजांची.' ॥ ७४
कथिलें पुरासि धांवत जाउनि तें विजयवृत्त हेरजेनीं, ।
पुरंजन म्हणती, 'चिंता सरली, परि कसि सरेल हे रजेनी?' ॥ ७५

---

१. सुहृद्+हृदय+सरस्+ग+आधि+नाग=मित्र+चित्त+सरोवर+गेलेला+चिंता+गज=मित्रहृदयसरोवरीं प्राप्तमनोव्यथारूप गज. २. 'हे दूत हो! तुम्ही नगरांत जाऊन संग्रामामध्यें माझा विजय झाला असें सर्वांस सांगा. नगरांतील कुमारिका अलंकार धारण करून नगराहून मला सामोऱ्या येवोत, तसेंच उत्तमप्रकारें अलंकृत अशा गणिका अनेक वाद्यांसह मला सामोऱ्या येवोत अशी आज्ञा करा' असें वर्णन मूळांत आहे. [अध्याय ३४ श्लोक १७-१८.] येथें मूळांतील वर्णन आणि पंतकृत वर्णन यांत कोणतें सरस आणि स्वादुतर आहे याचा निर्णय रसिकांस सहज करतां येईल. पंतांनीं स्वप्रतिभाप्रभावानें मूळच्या वर्णनावर ताण केली आहे असें कोण म्हणणार नाहीं? पंतांच्या वर्णनांत जे अलंकार आहेत त्यांचा मूळांत गंध सुद्धां नाहीं. पंतांची कविता मूलग्रंथाशीं ताडून पाहिली असतां पंतांनीं काय अपूर्व करामत केली आहे हें कळून येतें आणि त्यांच्या अलौकिक कर्तृत्वाविषयीं मनांत पूज्यबुद्धि उत्पन्न होते. पंतांनीं आपल्या मातेला 'सत्यवतीची आली' म्हटलें आहे तें सर्वथैव यथार्थ होय असें कोण म्हणणार नाहीं? ३. चिंतानदींत. येथें चिंता व तटिनी हे पदार्थ भिन्न आहेत, एक नव्हत, असें असतां त्या दोहोंमध्यें अभेद आहे अशी कल्पना पंतांनीं केली आहे. जेथें भेदाच्या ठिकाणीं (भिन्न पदार्थांच्या ठिकाणीं) अभेदाची कल्पना केली असते तेथें **'अतिशयोक्ति'** होते. या प्रकारच्या **अतिशयोक्तींत** रूपकाची झांक मारते म्हणून तिला **रूपकातिशयोक्ति** म्हणतात, तेव्हां या ७३ व्या गीतींत रूपकातिशयोक्ति आहे. ४. स्वजनांचे कर्णांची [विजयवार्तारूप] सुधापान (अमृतपान) करण्याची इच्छा (काम). ५. देवांगनांनीं केलेल्या पुष्पवृष्टीला. ६. ज्यांची. ७. शत्रु. ८. स्त्रीसमुदाय. ९. लाह्यांची. राजा नगरांत प्रवेश करूं लागला म्हणजे पौरकन्यांनीं आणि सुवासिनींनीं त्याजवर लाह्या उधळाव्या असा आचार प्राचीनकाळीं प्रचलित होता त्यास अनुसरून हें वर्णन आहे. [रघुवंश—सर्ग २ श्लोक १०, सर्ग ४ श्लोक २७, सर्ग ७ श्लोक १५; कुमारसंभव—सर्ग ७ श्लोक ६९-८० पहा.] नगरप्रवेशकालीं राजावर लाजवर्षण करणें हें मंगलप्रद समजतात. पुष्पांचें आणि लाजांचें (लाह्यांचें) शुभ्रत्व आणि मांगल्यिकत्व हीं अन्योन्यसादृश्यसूचक आहेत. १०. मत्स्यपुरास. ११. येथें दक्षिणगोग्रहणकथावर्णन संपलें. १२. दूतांनीं. १३. नगरवासी लोक. १४. रात्र.

अध्याय तिसरा.

मत्स्यपुरोत्तरभागीं प्रातःकाळींच ये सुयोधन, हो! ।
ज्यांसि जयप्राप्ति मनीं म्हणती भीष्मादिही सुयोध न हो. ॥ १
सहसा व्रजांत गांठुनि, बहु ताडुनि, करुनि बद्धभुज गवळी, ।
पष्टिसहस्र सुगोधन तो कुरुकुळचंदनद्रुभुजग वळी. ॥ २
गोपाध्यक्ष रथावरि बैसुनि धांवे नृपासि सांगाया, ।
चित्तीं म्हणे, 'बुडाया कुर्वधमा! हरिसि धेनु कां? गा! यां.' ॥ ३
तो राजगृहीं जाउनि रायाच्या उत्तराख्यतनयातें ।
नमुनि म्हणे, 'हो! नेतो दुर्योधन धेनु करुनि अनयातें. ॥ ४
गोधन षष्टिसहस्र व्रज ओस करूनि नेतसे कुटिल, ।
लुटिल प्रजाहि, जो गोपीडक तो ब्राह्मणा न कां कुटिल? ॥ ५

---

१. मत्स्यदेशाच्या राजधानीच्या (विराटनगरीच्या) उत्तरदिशेच्या बाजूस. "पांडव अज्ञातवास करण्याकरितां विराटनगरीं राहिले होते. तेव्हां विराटाचा सेनापति कीचक ह्यानें द्रौपदीविषयीं दुर्वासना दर्शविल्यामुळें भीमानें त्यास ठार मारिलें. हें ऐकून विराटापासून फार त्रास पावलेला त्रिगर्तदेशाचा राजा सुशर्मा ह्यानें दुर्योधनास सुचविलें कीं, 'ही संधी विराटनगरावर स्वारी करण्यास बरी आहे.' तो विचार दुर्योधनास पटून त्यानें त्या नगराच्या दक्षिणेचे बाजूस सैन्यासह सुशर्म्यास पाठविलें, आणि आपण स्वतः मोठें सैन्य घेऊन त्याच्या उत्तरेच्या बाजूस आला. ह्या प्रकरणांत उत्तरेकडील सैन्यानें विराटाच्या गाई हरण केल्या, हा प्रकार ह्या आख्यानांत वर्णिला आहे ह्यासाठीं ह्यास उत्तरगोग्रहण म्हणतात." (नवनीत.) २. ज्यासि (दुर्योधनाला) जयप्राप्ति (अर्जुनाची गांठ किंवा जयलाभ) न हो (न व्हावी) [असें] भीष्मादि सुयोधही (उत्तम वीरही) मनीं म्हणती—असा अन्वय. ३. भीष्म, द्रोण, कृप इत्यादि सुयोध. ४. चांगले योद्धे. ५. न होवो. ६. गवळवाड्यांत, घोषांत. ७. बांधले भुज ज्यांचे ते. ८. साठ हजार. ९. उत्तम गाईंचा समुदाय. १०. कुरुकुलरूप चंदनवृक्षावरील सर्प (दुर्योधन). दुर्योधनाला 'भुजग' असें विशेषण लावून त्याची दुष्टमति ध्वनित केली आहे. ११. मुख्य गवळी, गवळ्यांचा नायक. १२. विराटपुत्राला. [मूळांत मत्स्याधिपपुत्र भूमिंजय याला गोपाध्यक्षानें उत्तरगोग्रहणाची वार्ता सांगितली असें आहे. भूमिंजय हें विराटाचा कनिष्ठ पुत्र जो उत्तर त्याचें नांव. ज्येष्ठ पुत्राचें नांव शंख असें होतें. या प्रसंगीं विराटराजा दक्षिणगोग्रहण करणाऱ्या सुशर्म्याचा पराभव करून परत आला नव्हता. तो उत्तरालाच शून्यपाल (राजा संनिध नसतां असणारा राज्याचा पालक) करून युद्धासाठीं बाहेर गेला होता. १३. आपला नाश करून घेण्यासाठीं या गाईंचें हरण कां करतोस? १४. कुरु+अधमा=कुरुकुळांतील नीचा. १५. या धेनु. १६. उत्तर आहे आख्या (नांव) ज्याची त्या मुलाला. १७. अहो! १८. अन्यायातें. (जबरदस्ती करून.) १९. खल, दुष्ट. २०. गाईला पीडा देणारा. २१. ठोकील, ठेंचील.

कवची धन्वी खड्गी व्हा, चित्तीं रामचंद्रहि असा ध्या, ।
बैसा रथीं, जयश्री गोविप्रावनपरासि न असाध्या.' ॥ ६
उत्तर म्हणे, 'असें जरे मी एकाकी लहान, परि सवतें ।
यश जोडितोंचि असता सारथि तरि, कथन मज न परिसवतें. ॥ ७
होता परम निपुण परि त्या ख्यात रणांत सारथि गळाला, ।
झांको छिद्र भलतसें, अडले म्हणतात सार थिगळाला. ॥ ८
कर्णादिकांसि देता समरीं वैराटिकेसरी करिता ।
जिष्णुपुढें असुरजनीं कोणी वैरा टिके सरी करिता. ॥ ९
मिळवा कोणी तरि, हो! धैर्याचा मात्र उदधि सारथि जो, ।
कुरुभटसमूह पाहुनि मज, जेंवि हिमौसि सुदधिसार थिजो'. ॥ १०
ऐसें बहुतचि बोले तो बालिश बोल बायकांमाजी. ।

---

१. कवच धारण करणारे. २. धनुर्धर. ३. खड्गधर. ४. कवची, धन्वी व खड्गी असा. ५. स्मरा. ६. गोब्राह्मणपालनपरासि, गाई व ब्राह्मण यांच्या रक्षणाविषयीं जो तत्पर त्यास. ७. अप्राप्य, अलभ्य. ८. ज्या समयीं गोपाध्यक्षानें कुरुवीरकृत उत्तरगोग्रहणाची वार्ता उत्तरास कळविली तेव्हां तो अंत:पुरांत स्त्रियांच्या समाजांत बसला होता असें येथें ध्यानांत ठेवावें. ९. स्वताचें, वेगळें. [विराटयशासारिखें स्वतंत्र यश मिळविलें असतें.] १०. अश्वकोविद असा सारथि. ११. ऐकवतें. [सारथि असता तर, माझ्यानें ही वार्ता ऐकविली देखील नसती, मी शत्रूचा पराभव लागलाच केला असता—असा भाव.] १२. पूर्वी उत्तरानें अठ्ठावीस रात्री अथवा बहुधा एक मास मोठें युद्ध केलें त्यांत त्याचा सारथि मरण पावला—या कथेचा उल्लेख आहे. [अध्याय ३६ श्लोक ३ पहा.] १३. नामांकित. १४. न्यून, उणेपण. [कसें तरी हें न्यून भरून येवो, उघडें न पडो, अडलेले मनुष्य थिगळाला देखील उत्कृष्ट समजतात, पण छिद्र बाहेर न दिसो असें इच्छितात—असा भावार्थ. १५. श्रेष्ठ, उत्कृष्ट. हा चरण सुभाषितरूप आहे. १६. थिगळ=ठिगळ=फाटक्या वस्त्राला भोंक बुझविण्यासाठीं दुसऱ्या वस्त्राचा लहान तुकडा लावतात तो, कपी. १७. (करिता=हत्तीपणा) देणारा झाला असतां. १८. उत्तररूप सिंह. १९. गजपणा. २०. इंद्रापुढें. २१. बरोबरी करणारा. २२. सागर. २३. कौरवयोद्ध्यांचा समुदाय. २४. थंडीस. २५. उत्तम दह्याचें सार, तूप. २६. ज्याप्रमाणें थंडीच्या कडाक्यानें तूप थिजून जातें त्याप्रमाणें मला पाहून कौरवांकडील वीरसमुदाय थिजून जावो (स्तिमित—भयग्रस्त—स्तब्धगात्र होवो.)२७. तो उत्तर. २८. मूर्ख बालक. २९. "बायको" या शब्दाची उत्पत्ति चमत्कारिक दिसते. 'बाला' आणि त्यापासून झालेला 'बालिका' शब्द, यांचा अर्थ कन्या किंवा तरुण स्त्री. या 'बालिका'शब्दाचा अपभ्रंश 'बाइका'. हा मूळचा एकवचनी शब्द. याचें बहुवचन 'बाइकाओ;' यांचेंच 'बायको,' 'बायको' असें रूपांतर झालें. अर्थात् हा मूळचा बहुवचनीं योजायाचा शब्द. सत्कारपूर्वक बोलायाचें असतां, एका स्त्रीच्या अर्थीही, 'बायका बाहेर गेल्या आहेत, आतां येतील' असें जसें

चित्रपटकटकसें शिशुभाषण येईल काय कामा जी ! ? ॥ ११
तें परिसुनि एकांतीं पार्थ म्हणे, 'देवि ! कृष्णसखि ! जावें ।
उत्तरसारथि होउनि म्यां, त्वां मजवरि कदापि न खिजावें.' ॥ १२
कृष्णा म्हणे, 'बहु बरें, व्हा मारुत, हो पलाल खळबळ तें, ।

सध्यां बोलतात, तसेंच पूर्वी एका स्त्रीच्या अर्थीही 'बायको' या शब्दाची योजना सत्कारास्तव होऊं लागली, आणि कालांतरानें अर्थाकडे दुर्लक्ष होऊन हाच शब्द एकवचनीं चालूं लागला, आणि इतर स्त्रीलिंग शब्दांच्या धोरणानें याचें पुन: 'बायका' असें आकारांत बहुवचन झालें. सारांश 'बायका' हें मूळचें एकवचन आणि 'बायको' हें बहुवचन असून, सध्यां त्यांचा अर्थ अशा रीतीनें उलट झाला आहे, असें दिसतें. 'बालिका' याचाच दुसरा अपभ्रंश 'बाइआ' आणि याचें बहुवचन 'बाइआओ' अथवा 'बायो.' परंतु हाही शब्द आतां एकवचनीं चालतो. 'ताटका' नांवाची मोठी धिप्पाड राक्षसी होती; यावरून, तशीच कोणी धिप्पाड आणि अस्ताव्यस्त अमर्याद बायको असली, तर तिलाही 'ताटका' शब्द लावितात. 'ताटका' हा शब्द तर मूळचा निर्विवाद एकवचनीं चालणारा; आणि अजून तो तसा चालतो. परंतु त्याचेंच रूपांतर असा 'ताटको' हा जो दुसरा एक शब्द, त्याचें पुन: बहुवचन 'ताटका' हेंच आहे. यावरून एथेंही असें दिसतें कीं, 'बायको' शब्दाप्रमाणें 'ताटको' हें जुनें बहुवचनरूप आहे. इतकाच भेद कीं, 'बायको' या शब्दामध्यें जो सत्कारसूचक अर्थ दिसतो, त्याच्या स्थानीं एथें ढमालपणाचा अर्थ आहे. तथापि दोहों शब्दांच्या उत्पत्तीचा म्हणून जो प्रकार, त्यामध्यें कांहीं भेद दिसत नाहीं. 'ढंबो' शब्दामध्येंही तोच प्रकार दिसतो. जुन्या प्राकृत भाषेमध्यें बहुतेक शब्दांपुढें बहुवचनीं, 'ओ' प्रत्यय लागत असे. जसें रमा–रमाओ. अद्यापि गुजराथी भाषेमध्यें तसेंच आहे. जसें, विद्या–विद्याओ. गोमंतकी मालवणी, इत्यादि कोंकणी भाषांतही तोच प्रकार आहे. जसें बाईल–बाइलो. आणि यावरून असें वाटतें कीं 'बाइलो,' 'बाइकाओ' अथवा 'बाइको' हे शब्द मूळचे एकच. या सर्व गोष्टी लक्षांत आणितां, पूर्वोक्त तर्काला तितकी बळकटी येते. 'बायकूं' असें कुत्सितार्थक रूप आधीं असून त्यापासून मग 'बायको' असा शब्द झाला असावा, असा तर्क कित्येकांनीं केला आहे. त्याला कांहीं आधार दिसत नाहीं. आतां शंका काढणाराला एक स्थळ आहे. तें असें कीं 'बालक' हा जो पुल्लिंग शब्द, त्याचें प्राकृत भाषेंत 'बालको' आणि 'बालका' किंवा 'बायके' आणि 'बायका' अशीं क्रमश: एकवचनीं आणि बहुवचनीं रूपें होण्याचा संभव आहे. परंतु स्त्रियांना पुल्लिंगनामें चालू झालीं, अशी राठस कल्पना करणें, किंवा वर दाखविल्याप्रमाणें 'बायकूं' शब्दापासून 'बायको' शब्द निघाला असें मानण्यापेक्षां आपल्या लोकांच्या सभ्य चालीस अनुसरून स्त्रीला सत्कारबोधक 'बायको' हे मूळचें बहुवचनी नाम चालू झालें, असें मानणें विशेष संभाव्य व प्रशस्त दिसतें." [विविधज्ञानविस्तार–पुस्तक २२ पृष्ठ २४-२४ अ.]

१. चित्रपटांतील सैन्य जसें. २. हे द्रौपदि! [अर्जुन एकांतीं द्रौपदीला म्हणाला:–हे कल्याणि ! उत्तराला असें सांग कीं हा (बृहन्नडा) पूर्वी पांडवांचा सारथि होता, हा अश्वयानकुशल आणि युद्धदक्ष आहे, हा तुझा सारथी होईल. अध्याय ३६ श्लोक १२-१३.] ३. खिजणें=चिडणें, रागावणें. ४. वायु. ५. पलाल=धान्याचें तृण. केरकसपट (बाजरीचे सरम, वाटूक; जोंधळ्याचा कडबा; भाताचा पेंढा इत्यादि.) ६. खळाचें (दुर्योधनाचें) बळ (सैन्य).

मद्धृदय न अरिसैन्यें, तुमच्या दैन्येंचि फार खेळवळतें'. ॥ १३
त्या उत्तरासि सांगे, 'सारथ्य बृहन्नडा करिल, यातें ।
सूत करुनि विजयानें नेले बहु खांडवीं अरि लयातें. ॥ १४
सारथ्यगीतनृत्यप्राप्तीचा हेतु जिष्णुसहवास; ।
पूर्णत्वाचा लागे पशुपां भ्रमतांहि विष्णुसह वास. ॥ १५
भगिनीमुखेंचि विनवा, तन्मतिला उत्तराचि वळवील, ।
अतिसहवासिंवच मना, कतक कलुषिता वना निर्वळवील'. ॥ १६
उत्तर म्हणे, 'कुरुकटक न पशूंस, यशासहि, स्वसे! नेतें, ।
अवकाश पळहि नाहीं कळवाया वृत्त हें स्वसेनेतें. ॥ १७

---

१. माझें हृदय. २. क्षुब्ध होतें, तळमळतें, व्याकुळ, विव्हळ होतें. [येथें १३ व्या गीतींत जें द्रौपदीचें वीरपत्नीत्वानुरूप स्वाभिप्रायदर्शक उत्तर आहे त्यास मूळांत आधार नाहीं. हें पंतांनीं आपल्या पदरचें घालून मूळावरही ताण केली आहे असें कोण म्हणणार नाहीं?] ३. द्रौपदी सांगे. [अध्याय ३६ श्लोक १६-१९ पहा.] ४. या बृहन्नडेतें. [या ठिकाणीं 'यातें' असें पुल्लिंगबोधक सर्वनाम योजिलें आहे त्याचें कारण 'बृहन्नडा' शब्द बृहन्नट, बृहन्नल असा पुल्लिंगीही आढळतो. महाभारतांत बृहन्नलेस उद्देशून 'योऽसौ बृहद्वारणाभो युवा सुप्रियदर्शनः' असें पुल्लिंगी शब्द योजिलेले आढळतात. विराटपर्व-अध्याय ३६ श्लोक १६ पहा.] ५. सारथि. ६. अर्जुनानें. ७. खांडव नामक वन अग्नीला भक्षणार्थ (दहनार्थ) अर्जुनानें दिलें त्या प्रसंगीं; (किंवा.) खांडवीं=खांडवप्रस्थीं= इंद्रप्रस्थीं. 'या सारथ्याच्या योगें अर्जुनानें खांडवप्रस्थीं राहत असतां सर्वभूतें आपल्या कबज्यांत आणिलीं होतीं' असें मूळांत आहे. [अध्याय ३६ श्लोक १९ पहा.] ८. या बृहन्नडेला सारथ्यादि प्राप्त होण्याचें कारण अर्जुनसंगति होय. ९. अर्जुनसहवास. १०. गोपाळांस. ११. कृष्णासह. [कृष्णाच्या सहवासानें फिरत असतां पशुपांस (गोपाळांस-अज्ञान गुरासी गवळ्यांस) परमेश्वर जो कृष्ण त्याचे सर्व गुण प्राप्त झाले, कृष्णाच्या पूर्णत्वाचा वास गोपाळांला लागला. गोपाळ परिपूर्णगुण झाले.] १२. संबंध, गंध. १३. उत्तरेच्या मुखें. १४. अत्यंत सहवास करणाऱ्याचे वचन, अतिपरिचयाच्या मनुष्याचें भाषण. १५. निवळीची बी. कतकवृक्षाचें फळ कलुषजलस्वच्छताजनक आहे म्हणून त्याला 'अंबुप्रसादन' असें अन्वर्थक दुसरें नांव आहे. पंताच्या काव्यांत कतकाचा उल्लेख अनेकस्थळीं आढळतो. [वनपर्व-अध्याय ११ गीति ५५.] 'फलं कतकवृक्षस्य यद्यप्यम्बुप्रसादकम्' [मनुस्मृति-६।६७.] १६. गढुळा. १७. उदकास. १८. स्वच्छ करील, सुधारील. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. १९. कौरवसैन्य गाईचेंच हरण करीत आहे असें नाहीं, तर आपल्या कीर्तीचेंही हरण करीत आहे. या अर्धातील अलंकारास **'अतिशयोक्ति'** असें म्हणतात. प्रस्तुत वस्तूचें लोकमर्यादातिरिक्त वर्णन केलें म्हणजे **अतिशयोक्ति** होते. **काव्यादर्श**ांत तिचें लक्षण दिलें आहे:—'विवक्षा या विशेषस्य लोकसीमातिवर्तिनी । असा**वतिशयोक्तिः** स्यादलंकारोत्तमा यथा ॥' [**काव्यादर्श**-द्वितीय परिच्छेद २१४.] **आग्नेय**पुराणांतही असेंच लक्षण केलें आहे:—'लोकसी-

माझें सारथ्य करू तुझिया वचनें बृहन्नडा, गमला ।
हाचि सदुपाय, वत्से ! लागो अपकीर्तिचा न डाग मला.' ॥ १८
ती धांवत जाय म्हणे, 'गोनादिक हें बृहन्नडे ! राहो, ।
समयीं सारथ्यगुणा नुघडूनि कदर्युचा न डेरा हो. ॥ १९
गोधन षष्टिसहस्र स्वपुरा नेतो हरूनि कौरव हो ! ।

मातिवृत्तस्य वस्तुधर्मस्य कीर्तनम् । भवेद्**तिशयो** नाम संभवोऽसंभवो द्विधा ॥.' सारांश जेथें वर्ण्य वस्तूचें प्रतिपादन लोकमर्यादेच्या बाहेर–वाजवीपेक्षां ज्यास्त–केलेलें असतें तेथें **'अतिशयोक्ति'** अलंकार होतो. याचे अनेक प्रकार (भेद) आहेत. (१) भेदीं अभेदाची, (२) अभेदीं भेदाची, (३) योगीं अयोगाची,=संबंधीं असंबंधाची, (४) अयोगीं योगाची=असंबंधीं संबंधाची, (५) कार्यकारणांच्या सदक्त्वाचो (समकालत्वाची) आणि कार्यकारणांच्या पौर्वापर्यव्यतिक्रमाची (पौर्वापर्यविपरीत्याची) कल्पना केलेली असते, तेथें **अतिशयोक्ति** होते. श्रीमदप्पदीक्षितप्रणीत 'चित्रमीमांसें'त 'भेदेऽभेदः, अभेदे भेदः, संबंधेऽसंबंधः, असंबंधे संबंधः, [चित्रमीमांसा–पृष्ठ १०२.] असे **अतिशयोक्ती**चे चारच प्रकार वर्णिले आहेत. या अलंकाराचे **संशयातिशयोक्ति, निर्णयातिशयोक्ति, आश्रयाधिक्यातिशयोक्ति** इत्यादि भेद **काव्यादर्शात** सांगितले आहेत. **साहित्यदर्पणांत** या अलंकाराचे पांच भेद सांगितले आहेत:—'भेदेऽप्यभेदः संबंधेऽसंबंधस्तद्विपर्ययौ । पौर्वापर्यास्यय: कार्यहेत्वोः सा पंचधा ततः ॥' [साहित्यदर्पण–१०।६९४] या अलंकाराला इंग्रजींत Hyperbole असें म्हणतात. प्रस्तुत पद्यांत 'पशूचें नेणें' हें कारण व 'यशाचें नेणें' हें कार्य असून कार्यकारणाचें पौर्वापर्य विपरीत झालेलें आहे. कार्यकारणांचें पौर्वापर्य विपरीत करण्याचा हेतु कारणाची शीघ्रकारिता (कारणाच्या व्यापाराची अतित्वरा) आणि कार्याची शीघ्रोत्पत्ति दाखविण्याचा आहे. येथेंही कारणाचा व्यापार सुरु होत आहे नाहीं तोंच अथवा त्याच्याहीं आधीं कार्योत्पत्ति झाली असें दर्शविलें आहे. या अलंकारास 'अत्यंतातिशयोक्ति' असें नांव आहे. हिचें लक्षण:—'अत्यंतातिशयोक्तिस्तु पौर्वापर्यव्यतिक्रमे' (कुवलयानंद.) 'कार्यकारणयोश्चैव पौर्वापर्यविपर्ययः । विज्ञेयातिशयोक्तिः सा ॥' [काव्यप्रदीप–१२५ दशम उल्लास १५.] १५. हे भगिनि उत्तरे !

१. उत्तम उपाय. [ह्या उत्तराच्या भाषणावद्दल मूळांत एक श्लोकार्ध आहे. (२३ श्लोक.) मोरोपंतांस निवळ शब्दार्थभारवाही भाषांतरकार म्हणणारांनीं उत्तराचें उत्तरेशीं झालेलें भाषण मूळग्रंथांतील व पंतांच्या काव्यांतील ताडून पहावें म्हणजे त्यांचा अभिप्राय किती भ्रममूलक आहे हें त्यांचें त्यांसच चांगलें कळेल.] २. गायन वादन नर्तन वगैरे. ३. सारथ्य करण्याच्या गुणाला. ४. उघड न करून. ५. कृपणाचा, अधमाचा. ६. डेरा=रांजण, मातीचें मोठें भांडें, द्रव्याची घागर. "कृपणानें डेऱ्यांत पुरून ठेविलेलें द्रव्य कधींच कोणाच्या उपयोगीं न पडल्यामुळें व्यर्थ होय. तसा तुझा सारथ्यगुण समयीं प्रकट न होईल तर व्यर्थ होय' असें तात्पर्य." (नवनीत.) सारथ्य करण्याचा जो गुण तुझ्या अंगीं आहे तो न दाखवून कृपण होऊं नको. सारथ्यगुण दाखविण्याचा आतां प्रसंग आला तो व्यर्थ घालवूं नको. ७. गाई. ८. साठ हजार. ९. हस्तिनापुराला.

गौरव[2] हो न बुधजनीं, त्या मेल्याला अनंत रौरव[3] हो. ॥ २०
आवरि जातो उत्तर, त्याचें सारथ्य ये करायास, ।
सुखद[5] इहामुत्रहि गोविप्रत्राणोत्थ जे करायास. ॥ २१
देता झाला पूर्वी तुज निजसारथ्य सव्यसाची[9], हो! ।
सैरंध्रीची वाणी व्हाया गोवत्सभव्य साची[11] हो'. ॥ २२
उठल्या उत्साहाच्या त्या शांतश्रीमदुदधिवरि लहरी; ।
धरितां[14] हनु, न नु[15] म्हणतां, प्रणताचें कां न सुदधि[16] वरिल हरि? २३
देवातें भक्ति तसी पार्थातें[17] ने करूनियां वश, हो! ।
त्याच्याहि मनीं होतें कीं विश्वामाजि आपुलें यश[12] हो. ॥ २४
उत्तर म्हणे, 'वहु वरें, देउनि वचनास मान आलीस.' ।
बोले बृहन्नडा स्मितपूर्वक, 'विटवील कोण आलीस? ॥ २५
वाद्य असो, नृत्य असो, हो अभिनय[21], किमपि गान अथवा हो, ।
जाणोनि कसें म्हणतां समरांत बृहन्नडाचि रथें वाहो?' ॥ २६

---

१. बुधजनांत (सुज्ञजनांच्या समुदायांत) त्या दुष्ट कौरवाचा गौरव न व्हावा. २. रौरव नामक नरक. ३. प्राप्त होवो. ४. त्या दुष्ट कौरवावर. ५. सुख देणारे (आयास). हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. ६. इह आणि परलोकीं. ७. गोब्राह्मणरक्षणोत्पन्न. ८. हातांचे श्रम. ९. सव्यसाचिन्=अर्जुन. ['सव्येन वामेन हस्तेन साचितुं शरान् संधातुं शीलं यस्य स सव्यसाची' म्हणजे सव्य (डाव्या हातानें) बाण जोडून मारण्याचें ज्याचें शील आहे तो सव्यसाची होय. (भगवद्गीता—अध्याय.११ श्लो० ३३.) महाभारतांत या नांवाची व्युत्पत्ति दिली आहे:—'उभौ मे दक्षिणौ पाणी गांडीवस्य विकर्षणे । तेन देवमनुष्येषु सव्यसाचीति मां विदुः ॥' माझे दोन्ही हात गांडीव धनुष्याचें आकर्षण करण्यांत कुशल आहेत म्हणून मला मनुष्य आणि देव सव्यसाची असें समजतात.] १०. गोवत्सकल्याण. ११. खरी. १२. होऊ. १३. शांत अशा अर्जुनसमुद्रावर. १४. हनु (हनवटी) धरितां. हरी, नु न म्हणतां, प्रणतांचें सुदधि कां न वरिल—असा अन्वय. प्रेमळ भक्तानें (प्रणतजनानें) आर्जवानें दिलेलें (हनु धरितां) उत्तम दहीं (सुदधि) हरी नु (नको) न म्हणतां कां न स्वीकारील? अर्थात् तो भक्तप्रिय हरि स्वीकारीलच. त्याचप्रमाणें समरप्रिय सव्यसाचीला दुष्ट दुर्योधनावरोबर युद्ध करण्याची उत्तरेची विज्ञापना कशी रुचणार नाहीं? १५. नाहीं, नको. १६. उत्तम दधि. १७. ने=नेती झाली. (उत्तरा) यांत उपमा आहे. १८. मंदहास्यपूर्वक. (पृष्ठ २६ टीप १६ पहा.) १९. सखीस. २०. हस्तादिकांच्या खुणांनीं दुसऱ्याचे मनांतील भाव सुचिवणें. २१. कोणतेंही. (हें गानाचें विशेषण.) २२. मला वाद्य वाजविण्याची, नृत्य करण्याची, हावभाव करण्याची, किंवा गाण्याची आज्ञा केली असतां, तें सर्व मी करीन—असा भावार्थ. २३. समजून उमजून मी समर करण्यास अथवा सारथ्य करण्यास असमर्थ होय असें कळत असतांही. २४. युद्धांत. २५. रथ वाहो=सारथि होवो.

वैराटि[1] म्हणे, 'नर्तक[2] हो कीं वादक तैथैव गायन[3] हो, ।
सारथि हो या समयीं, एकहि वंश कौरवांसि गाय न हो.' ॥ २७
ऐसें वदे, कवच दे त्या श्रितकुशलावहास[4] ल्यायाला, ।
तद्धारणीं चुके तो, कन्या[5] पाहोनि हांसल्या याला. ॥ २८
ज्याचें किरातरूपिप्रभुधिक्कृतिगर्भ[6] गोय[7] नाक[8] वच, ।
हांसे आपणहि, म्हणे, 'ठावें मज काय गायना कवच[9]?' ॥ २९
लेववितें राजसुतें[10], जाणों त्याला कधीं न तो[11] कवच, ।
सच्चरित[12] अप्रगल्भहि हृदयहर[13] जसें स्वधीन[14] तो केवच[15]. ॥ ३०
होउनि सिद्ध रथावरि चढतांचि, सहोत्तरा[16] तिच्या आली[17] ।
म्हणती, 'बृहन्नडे! तुज वीरश्री गौरवावया आली. ॥ ३१
दिव्यरुचिरवस्त्रांतें आण करायासि बोहुल्या, कटकें[18] ।
जिंकुनि अरिचींहि, तुम्ही बहु शोभाया स्वबाहु, त्यां कटकें[19]'. ॥ ३२
'उत्तर आणिल तें जें निर्माया तुजं सुबाहुल्या लागे, ।

---

१. विराटाचा पुत्र—उत्तर. २. नाचणारा. ३. वाद्यें वाजविणारा. ४. श्राप्रमाणें. ५. गाणारा—गायक. [गायन='अन' प्रत्यय गै धातूला लागून 'गायन' असें रूप झालें. 'अन' प्रत्यय शब्दार्थक अकर्मक धातूंस लागून कर्तृत्ववाचक शब्द उत्पन्न होतात. जसें:—ज्वलन (जाळणारा), गर्धन (खादाड), रवण (शब्द करणारा), मंडन (शोभविणारा) इत्यादि. मूळांत गायन आणि नर्तन या शब्दांचा प्रयोग केला आहे, यावरून 'नर्तन हो कीं वादन तथैव गायन हो' असाही पाठ असता तरी चालतें असें दिसतें. अ० ३७ श्लो० २२.] ६. हस्तगत, स्वाधीन. ७. आश्रितांचें कुशल करणाऱ्या (अर्जुनाला). ८. धारण करण्यासाठीं. ९. तें कवच धारण करण्यांत. यांत हास्यरस आहे. १०. कुमारिका. (अ० ३७ श्लो० २४.) ११. ज्या अर्जुनाचें. १२. किरातरूपी प्रभु शंकराचा धिक्कार ज्याच्या पोटीं आहे असें (वच). [येथें अर्जुनाच्या किरातरूपी शंकराधिक्षेपोक्तीचा उल्लेख केला आहे. ही कथा वनपर्वांत आहे. अध्याय ३ पहा.] १३. गातो. १४. स्वर्गलोक. [येथें नाक म्हणजे नाकस्थ लोक असा अर्थ उपादानलक्षणेनें घेतला पाहिजे.] १५. उत्तरानें. १६. तो अर्जुन. १७. संतचरित. १८. अप्रौढहि. १९. हृदयाकर्षक. २०. सु+अधीन=अत्यंत हस्तगत, अत्यंत स्वाधीन. आपण खेळवूं तसें खेळणारें असें जें तोक (बालक) त्याचें वचन; अत्यंत अधीन (लालनानुकूल) जें तोक त्याचें भाषण. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. २१. बालवाक्य. २२. उत्तरासह (अर्जुन—बृहन्नडा) रथावर चढतांच, किंवा उत्तरेसह आली (सख्या)—असे दोन्ही अन्वय संभवनीय दिसतात, मात्र विरामचिन्हांची योजना अन्वयास अनुसरून केली पाहिजे. २३. सख्या. २४. उत्तम सुंदर अशा वसनांतें. [पुढें अध्याय ६ गीति २८ पहा.] २५. पांचालिका, पुत्तलिका. २६. सैन्यें. २७. धारण करा. [आपले भुज सुरेख भूषविण्यासाठीं तुम्ही कटकें (वलयें) धारण करा.] २८. कडीं. २९. तुला उत्तरेला.

मज कवच लेववुनि, [1]हा आपणचि पहा सुवाहु [2]ल्याला, [3]गे !' ॥ ३३
ऐसें बोलुनि हांकी उत्तररथरत्न [4]कृष्णसारथि [5]तें ।
सांगे स्वदास्य सिंहा हरवाया तेज [6]कृष्णसार [7]थितें. ॥ ३४
म्हणति स्त्रिया प्रयाणीं, 'तुजला मंगल बृहन्नडे ! हो तें ।
जें [8]खांडववनदाहीं [9]नरसारथ्यांत जाहलें होतें'. ॥ ३५
द्विज म्हणति, 'या यशस्वी होउनि, जयदायि [10]औज्यजिर तें, हो ।
[11]खेलवल सदाश्रितजनीं, [12]देहनीं पुष्कळहि [13]औज्य, जिरतें, हो !' ॥ ३६
सत्वर बृहन्नडा नृपसुतरथ नेऊनि जाय बाहेर, ।
त्यासि म्हणे, 'हेरावें [14]म्हणसी कुरुकटक काय बा ! [15]हेर.' ॥ ३७
आपण चित्तांत म्हणे, 'मेळवितों आजि, नीच हो ! यश मी, ।
शिवमूर्तिसी स्मशानीं [16]अस्मज्जयहेतु तीच होय [17]शमी.' ॥ ३८
कुरुकटकासि पहातां तो उत्तर बाळ फार [18]गडबडला, ।
[19]स्वपरबळाबळ [20]नेणुनि [21]बोलिश बहु बायकांत बडबडला. ॥ ३९
बोले, 'बृहन्नडे ! हें कुरुबळ [22]कल्पांतसिंधुसें गमतें, ।
ने रथ पुरांत, माझें मन नयनहि पाहतां बहु [23]भ्रमतें. ॥ ४०

---

१. हा उत्तर. २. कवच ल्याला. ३. अगे उत्तरे ! हें अर्जुनाचें उत्तरेस प्रतिवचन आहे. ४. कृष्ण सारथि ज्याचा. (अर्जुन.) ५. 'तें' यांचें विशेष्य 'उत्तररथरत्न' आहे. ६. लहान हरिणशिशु. (काळवीट.) [कृष्णेन सारः शबलः कृष्णसारः । 'कृष्णसाररुरुन्यंकुरंकुशंबररौहिषाः । गोकर्णपृषतैणर्श्यरोहिताश्चमरो मृगाः' इत्यमरः.] ७. थोडें, अल्प. हें तेजाचें विशेषण आहे. [थितें हा शब्द पंतांनीं अनेक स्थळीं याच अर्थानें योजिला आहे. तीर्थरामायण—गीति १३, भीष्मपर्व—अध्याय ९. गीति ५५. 'सार थितें' हें पंतांचें आवडतें ठरींव यमक होय]. ८. स्त्रिया, कन्या आणि सुव्रत ब्राह्मण म्हणतात—असें मूळांत आहे. ९. खांडववनदाहसमयीं अर्जुनाचें सारथ्य करून पूर्वी जें मंगल झालें तें आतां उत्तरासह कौरवांना रणांत भेटून तुला होवो—असें मूळांत आहे. १०. अर्जुनाच्या (नराच्या) सारथिपणांत. १२. आजि+अजिर=रण+भूमि=रणांगण. १३. दुष्टांचें बल संतांच्या आश्रित जनांत जिरतें (नष्ट होतें, नाश पावतें). १४. अग्नींत. (दहन=जळणारा अग्नि. येथें 'अन' हा प्रत्यय कर्तृत्ववाचक आहे.) १५. तूप. १६. बा ! कुरुकटक हेरावें म्हणसी काय ? हेर (पहा)—असा अन्वय. १७. हलकें पहा. 'बाहेर' 'बा ! हेर' हें पंतांचें आवडतें यमक होय. १८. आमच्या जयाचें कारण. १९. याच शमीवृक्षावर पांडवांनीं आपलीं आयुधें ठेविलीं होतीं. (विराटपर्व—अध्याय १ गीति ५ पृष्ठ २ पहा.) २०. घाबरला. २१. आपलें तसेंच शत्रूचें बळ व अबळ, आपली व शत्रूची सबळदुर्बळता, आपलें व दुसऱ्याचें सामर्थ्य असामर्थ्य. २२. न जाणून. २३. मूर्ख. २४. प्रलयकाळच्या समुद्रासारखें. [कल्प+अंत+सिंधुसें=पृथ्व्यंत, प्रलय+शेवट+सागरासारखें.] २५. घाबरतें, भ्रांति पावतें.

दुर्योधन दुःशासन कर्ण कृप द्रोण भीष्म ज्या[1] कंटकीं ।
त्यांत मरेनचि शिरतां, कांद्यांवरि घालितां चिरे[2] पैट कीं. ॥ ४१
एकाकी मी, रिपु बहु, ह्या ऐशा कीर्ति काय हो ! मरणीं ? ।
पैश्वर्यें केंवि करूं सर्वपुमर्थदसुकायहोम[6] रणीं ? ॥ ४२
आज्ञा नसतां आलों, रागें न भरेल काय हो ! तात ? ।
रोमांच[8] घर्म कंप प्रगट, व्यापूनि काय, होतांत[9]. ॥ ४३
पार्थ म्हणे, 'राजसुता ! आतां वदतोसि हें अहा ! काय ? ।
शय्येवरि न पडाया योग्य, रणक्षितिवरीच[12], हा काय. ॥ ४४
तेव्हां स्त्रियांत[13] तैसें बोलुनि, आतां असें कसें वर्तसी[14] ? ।
एकहि बाण न सुटला, नाहीं अद्यापि झळकला सदैसी[15]. ॥ ४५
गोभुक्त्यर्थ[16] न शिरतां धैर्यें, या वीरनायकानीकीं[17], ।
करिजेल[18] हास्य[19] आस्य[20] प्रेक्षुनि नगरांत बायकानीं कीं. ॥ ४६

---

१. ज्या सैन्यांत. २. फाटे. ३. वस्त्र. यांत भयानकरस चमकता आहे. ४. एकटा. ५. गाई-करितां. ६. सर्वपुरुषार्थदायक अशा सुंदर देहाचा होम. धर्मार्थकाममोक्षांस पुमर्थ असें म्हणतात. ७. भयानें अथवा मोहानें अंगावरले केंस उभे राहणें. ८. घाम. ['घर्मः स्यादातपे ग्रीष्मे ऊष्मस्वेदलवेऽपि च' इति विश्वलोचनः.] ९. शरीर. उत्तराला रण कसें भयंकर वाटलें याचें चित्र पंतांनीं येथें सुरेख चितारिलें आहे. १०. अध्याय ३८ श्लोक १०-१८ पहा. ११. युद्धभूमीवरच. १२. हा क्षत्रियाचा देह समरभूमीवर पडावयास योग्य आहे. [भगवद्गीता—अध्याय २ श्लोक ३१-३७ यांत असेंच प्रतिपादन केलें आहे. क्षत्रियाला स्वधर्मास अनुकूल अशा युद्धावांचून श्रेयस्कर असें दुसरें कांहीं नाहीं. युद्ध हें उघडलेलें स्वर्गाचें द्वार होय. हें ज्या क्षत्रियांना मिळतें ते मोठे भाग्यशाली होत. जे क्षत्रिय धर्म्यसंग्राम करीत नाहींत त्यांस पाप लागतें आणि त्यांच्या धर्माचा आणि कीर्तीचा नाश होतो. जो प्रतिष्ठित क्षत्रिय आहे त्याला अपकीर्ति मरणाहून अधिक दुःखप्रद आहे.] १३. गीति ७-१०, १७-१८, २७ इत्यादिकांत उत्तराची आत्मश्लाघोक्ति आहे. १४. बोलसी. १५. उत्तम तरवार. १६. गाईची मुक्तता करण्यासाठीं. १७. वीरश्रेष्ठांच्या सैन्यांत. १८. करिजेल=हें कर्मणि रूप, इजे हा आगम धातु आणि भविष्यकाळाचा 'ल' प्रत्यय यांजमध्यें येऊन, झालें आहे. कवितेंतील वर्तमानकाळच्या रूपाला 'ल'प्रत्यय लाविला असतां भविष्यकाळींचीं रूपें सिद्ध होतातः—'धौम्याभिप्रायहि हा जैं **वरिजेतील** कुरु परेतलें. । गातील पुढें कुरुगुरु दर्भ धरूनियां करीं परे तलें. ॥', 'धर्म यश विपुल पावें स्वमुखें **वाखाणिजेल** तुज शक्रें' **मोरोपंत**. धरिजेल, कीजेल, होइजेल अशीं रूपें कवितेंत मात्र वारंवार आढळतात. या व अशा अनेक प्रयोगांवरून पंतांनीं संस्कृतांतील व्याकरणप्रयोग मराठी कवितेंत आणण्याचा प्रयत्न केला आहे असें दिसतें, इतकेंच नव्हे, तर मराठीभाषेला संस्कृत व्याकरणनियमांनीं आळें घालण्याचा त्यांचा रोख जेथें तेथें दृष्टीस पडतो. १९. मुख. २०. पाहून.

देउनि सारथ्य मला घेउनि आलासि काय उत्साहें? ।
नेणसि काय पलायन करितां लोकांत होय कुत्सा हें. ॥ ४७
निजवृत्तिरसीं लोभी हो, साधो! बुद्धि अन्यथा न करीं, ।
निजहितलोभें धरितो शिशुहि मुखीं एक अन्य थान करीं. ॥ ४८
सैरंध्रीनें कथिलें माझें सारथ्यनिपुणपण साचें, ।
टाकिति न बाह्यरंगें फळ नीरस म्हणुनि निपुण पणसाचें. ॥ ४९
मी भांडेन, स्थिर हो, तुजहि मजहि विहित आजि न परतणें, ।
हरितील न गाईतें, भीतिल, करितील आजि न परतणें. ॥ ५०
मरतीच, न दाखविती पाउलहि पळोनि तोंड लेंक विल्या, ।
म्हणती 'सद्यः कीर्तिप्रज्ञाघ्नस्पर्श तोंडलें' कवि ल्या. ॥ ५१

---

१. निंदा. २. क्षात्रधर्मरसीं क्षत्रियाच्या धर्माची–युद्धकर्माची आवड धर. आपली वृत्ति (धर्म–युद्धधर्म) हाच रस त्यांत लोभी हो, त्या वृत्तीचा लोभ धर. ३. दुसरें थान (स्तन.) 'अन्य थान करीं' हें ठरींव यमक होय. ४. हस्तीं. ५. सैरंध्रीचें लक्षणः—'चतुःषष्ठिकलाभिज्ञा शीलरूपादिशालिनी । प्रसाधनोपचारज्ञा **सैरंध्री** परिकीर्तिता ॥.' ६. शहाणे, सुज्ञ मनुष्य. ७. फणसाचें. हें गीत्यर्थ सुभाषितरूप आहे. हा फणसाचा दृष्टांत मूळांत नाहीं, पंतांनीं स्वतः समयास अनुरूप म्हणून दाखल केला आहे. यांत अर्थांतरन्यास नामक अलंकार झाला आहे. ८. योग्य, उचित. ९. युद्ध. १०. शत्रुरूप तृणें. यांत कर्ता एक असून त्याचा संबंध अनेक क्रियांशीं झालेला आहे म्हणून 'कारकदीपक' अलंकार झाला आहे. ११. बापास. १२. तात्काळ. १३. कीर्तिरूप प्रज्ञा (बुद्धि) हिचा घात करणारा आहे स्पर्श ज्याचा (असें तोंडलें). रणांतून पळून जाणारा लेंक हा तोंडलें होय असें ज्ञाते पुरुष म्हणतात. तोंडलें ज्याप्रमाणें प्रज्ञेचा (बुद्धीचा) नाश करतें त्याप्रमाणें पळपुटा मुलगा कीर्तीचा नाश करतो. तोंडलें (तोंडल्यांची भाजी) भक्षण केल्यानें जिव्हा जड होते आणि तद्द्वारा बुद्धीला मंदता येते व तिचा ऱ्हास होतो अशी समजूत आहे. बुद्धि व जिव्हा या दोहोंमध्यें संबंध आहे असें साधारणतः लोक कल्पितात, ही गोष्ट लक्ष्यांत बाळगिली पाहिजे. 'रणभीरु लेंक तोंडलें आहे' असें येथें म्हटलें आहे म्हणून **'रूपक'** झालें- या गीतींत 'सद्यः कीर्तिप्रज्ञाघ्नस्पर्श' असें 'तोंडलें' याचें विशेषण योजिलें आहे, पण हें विशेषण विशेष्यास तोलण्यासारखें नाहीं. एका लहानशा निबळ मराठी शब्दाला एवढें लांब संस्कृत सामासिकपद विशेषणाच्या रूपानें जोडणें अनुचित होय. 'तोंड लेंक विल्या' हें यमक साधण्यासाठीं ही खटपट पंतांनीं केली असें म्हणावें लागतें. उचित विशेषणांनींच विशेष्याचा अर्थ खुलतो असें श्रीक्षेमेंद्रकृत **'औचित्यविचारचर्चा'** नामक ग्रंथांत आहे. 'विशेषणैः समुचितैर्विशेष्योऽर्थः प्रकाश्यते' [औचित्यविचारचर्चा १४. काव्यमाला प्रथम गुच्छक–पृष्ठ १४२] या वचनानुरोधानें पाहिलें तर विशेषणें विशेष्याला साजण्यासारखीं असलीं पाहिजेत असा इत्यर्थ निघतो. त्याचें अन्य उदाहरणः—'हो सत्कर प्रसादें कुब्जा तैसी मदीय मति सरळी । खळकृतनिंदा सुखदा हो श्यामलकृता

कज्जल कसें करूं जें सैरंध्रीकृत[1] दुधासम[2] स्तवन?। ।
सन्मन[3] अनृता भीतें, जेंवि कुंठारायुधा[4] समस्त[5] वन. ॥ ९२
[6]ती या मुखीं न[7] येतां, यावी सुयशेंकरूनि सुखमा[8] जी, ।
दावाया सैरंध्रीप्रति[9] हें मति वरिल केंवि मुख[10] मांजी? ॥ ९३
चाल, उगाचि अपयशें न तुझें मुखचंद्रमंडळ मळावें, ।
होतों वैलाब्धिपारद[11], पारदतुल्य[12] न तुवां डळमळावें[13].' ॥ ९४

जसीच मतिस रळी ॥' [मोरोपंतकृत–सन्मनोरथराजि, गी० २३ पहा.] प्रज्ञाघ्न=प्रज्ञा नाश करणारा. 'घ्न' हा प्रत्यय 'हन्' धातूपासून झालेला आहे. घ्न (घातक, दूर करणारा)–कृतघ्न, शत्रुघ्न, ज्वरघ्न इत्यादि. १४. ज्ञाते पुरुष.

१. दुधासारखें शुभ्र. स्तुति शुभ्रवर्ण होय असा कविसमय प्रसिद्ध आहे. हे कविसमय अनेक आहेत, त्यांचा समावेश पुढच्या पद्यांत केला आहे:—'मालिन्यं व्योम्नि पापे यशसि धवलता वर्ण्यते हासकीर्त्योः रक्तौ च क्रोधरागौ सरिदुदधिगतं पंकजेंदीवरादि । तोयाधारेऽखिलेऽपि प्रसरति च मरालादिकः पक्षिसंघो ज्योत्स्ना पेया चकोरैर्जलधरसमये मानसं यांति हंसाः ॥,' 'पादाघातादशोकं विकसति बकुलं योषितामास्यमद्यैर्यूनामंगेषु हाराः स्फुटति च हृदयं विप्रयोगस्य तापैः । मौर्वी रोलंबमाला धनुरथ विशिखाः कौसुमाः पुष्पकेतोर्भिन्नं स्यादस्य बाणैर्युवजनहृदयं स्त्रीकटाक्षेण तद्वत् ॥,' 'अह्नग्रभोजं निशायां विकसति कुमुदं चंद्रिका शुक्लपक्षे मेघध्वानेषु नृत्यं भवति च शिखिनां नाप्यशोके फलं स्यात् । न स्याज्जाती वसंते न च कुसुमफले गंधसारद्रुमाणामित्यात्युन्नेयमन्यत्कविसमयगतं सत्कवीनां प्रबंधे ॥.' [श्रीविश्वनाथकविराजकृत साहित्यदर्पण–सप्तमपरिच्छेद]. दुसऱ्या कांहीं पद्यांत या कविसमयांचा समावेश केला आहे ते असे:—'पादाघातादशोकस्तिलककुरबको वीक्षणालिङ्गनाभ्यां स्त्रीणां स्पर्शात्प्रियंगुर्विकसति बकुलः सीधुगंडूषसेकात् । मंदारो नर्मवाक्यात्पटुमृदुहसनाच्चंपको वक्त्रवाताच्चूतो गीतान्नमेरुर्विकसति च पुरोनर्तनात्कर्णिकारः ॥' [मेघदूत–मल्लिनाथकृत संजीविनी नामक टीका, उत्तरमेघ श्लोक १५], 'आलिंगनैः कुरबकस्तिलकः कटाक्षैः शिंजाननूपुरपदाहननैरशोकः । गंडूषसीधुपतनैर्बकुलोऽगनानामभ्येति माधवमये समये विकासम् ॥' [स्तुतिकुसुमांजलि–स्तोत्र ११ श्लोक ११० टीका.], 'करीन्द्रजीमूतवराहशंखमत्स्याहिशुक्त्युद्भवेणुजानि । मुक्ताफलानि प्रथितानि लोके तेषां तु शुक्त्युद्भवमेव भूरि ॥', 'पादाहतस्त्यजति शोकमशोकवृक्षः पुष्पं दधाति बकुली मुखशीधुसिक्तः । आलोकितः कुरुबकः कुरुते विकाशमालोडितस्तिलक उत्कलिको विभाति ॥,' 'सुनूपुररवेण स्त्रीचरणेनाभिताडनम् । दोहदं यदशोकस्य ततः पुष्पोद्गमो भवेत् ॥.' (कुमारसंभव–पंडित नवीनचंद्र विद्यारत्नकृत टीका.) २. असल्याला. ३. कुठार (कु-हाड) आहे आयुध (हत्यार) ज्याचें त्याला. कु-हाड हातीं बाळगणाऱ्या पुरुषाला. ४. सगळें. हा वनाचा दाखला मूळांत नाहीं. यांत 'उपमा' अलंकार आहे. ५. शोभा. ६. या माझ्या बृहन्नडेच्या. ७. न आली असतां. ८. सुषमा म्हणजे शोभा. ९. सैरंध्रीप्रति हें मुख दावाया माजी मति केंवि वरिल (पत्करील)–असा अन्वय. वरणार नाहीं–असा येथें काकर्थ इष्ट जाणावा. १०. माझी. ११. सेनासमुद्रांतून पार करणारा. १२. पाऱ्यासारखें. १३. डळमळणें=अस्थिर होणें, चंचल होणें. [स्थिरो भव–असें मूळांत आहे. अध्याय ३८ श्लो० १९-२९ पहा.]

ऐसें पार्थ वदे तों भिउनि [1]कटकवागुलासि पोर पळे, ।
[2]शत्रुप्रतापदावज्वालांनीं तो [3]कुरंग होरपळे. ॥ ९५
पार्थ म्हणे, 'प्रभुपाशीं वर हा घे, हेंचि याचितों, [4]डमरो ! ।
बोलेलें बहु निरर्थक तो स्वजनीं दावितांचि तोंड मरो.' ॥ ९६
त्यासहि म्हणे, 'अरे ! [5]रथगिरिशिखरच्युत [6]महोपल ! [7]उभारे, ।
आली तुला वराया कीर्ति, परांमुख न हो, पळे उभा रे ! ॥ ९७
[8]हरिनीलहार [9]कृष्णव्याल नव्हे, [10]स्वभ्रमें पळविलास, ।
वरितां अकीर्ति न रुचे [11]रंभेसीं [12]हरिसही पळ विलास.' ॥ ९८
तो किमपि न दे [13]उत्तर उत्तर, उत्तरदिशेसि सोडूनी ।
जाय पळत, [14]दक्षिणदिग्गत नगरीप्रति, अकीर्ति जोडूनी. ॥ ९९
जाय पुरीप्रति, जोडी अपकीर्ति, सुकीर्ति हातिची दवडी, ।
मातेप्रति पोर जसें [15]मुद्रा हरवूनि मेळवी कवडी. ॥ १००
धांवे पार्थ धराया कीं त्यासहि अपयशीं न [16]मज्जन [17]हो, ।
उपदेशी भगवान् कीं, 'असि [18]मज्जनरीति ही [19]नमज्जन हो !' ॥ १०१

---

१. सैन्यरूपी वागुलास. २. शत्रुप्रतापरूप दाव (वणवा) त्याच्या ज्वालांनीं. ३. हरिण. ४. होरपळणें=भाजणें. ५. शंकरापाशीं असा वर घे. ६. हे डमरो ! मी तुझी प्रार्थना करतों कीं तूं शंकरापासून वर मागावा. तो वर असा–'बोलेल बहु निरर्थक–तोंड मरो' या पार्थोक्तीस मूळांत आधार नाहीं. ७. हे डौरा. ८. हें गीत्यर्थ सुभाषितरूप आहे. ९. उत्तरालाही [मान व दर्प यांस टाकून, सशर चाप समरांगणावर ठेवून रथावरून खालीं उतरून उत्तर जेव्हां पळूं लागला तेव्हां अर्जुन त्यास म्हणतो. श्लो० २८.] १०. रथरूप पर्वतशिखरापासून च्यवन (पतन) पावलेल्या मोठ्या दगडा ! (महा+उपल=मोठा+दगड.) ११. मोठा पाषाण. १२. चढे. १३. पाठमोरा. १४. क्षणभर. १५. इंद्रनीळमण्याचा हार. १६. कृष्णसर्प, कालसर्प. १७. आपल्या भ्रांतीनें. १८. दूर दवडिलास. १९ इंद्रासही. हा कृष्ण व्यांळ नव्हे (काळा सर्प नव्हे, तर) इंद्रनील मण्यांचा हार आहे. तुझ्या भ्रमानेंच (हा सर्प आहे, हार नव्हे–या भ्रमानें) तुला पळविलें आहे. [अरे उत्तरा ! तुला वरण्यासाठीं हा कीर्तिरूप इंद्रनीलमणिहार आला असून तूं त्याला काळसर्प समजतोस–हा तुझा भ्रम आहे.] अकीर्ति वरण्यास आली असतां, (तुजसारख्यासच काय, पण) इंद्रासही रंभेशी पळभर देखील विलास (सुखोपभोग) रुचत नाहीं. [अरे उत्तरा ! तुला कीर्ति माळ घालण्यासाठीं आली आहे, तर तिला सर्परूप न समजतां तिचा स्वीकार कर आणि अकीर्तीशीं रममाण होऊं नको–रणांतून पळून जाऊन अकीर्ति पदरीं घेऊं नको–असा भावार्थ.] २०. कांहीं. २१. येथें 'उत्तर' शब्द तीनदां आला म्हणून हें एक जातीचें यमक झालें आहे. २२. दक्षिणदिशेला. २३. नाणें, आंगठी. २४. बुडणें. २५. व्हावें. २६. माझ्या जनाची रीति. २७. नमन करणारे भक्तजन हो !

[1]सकळा [2]सकळा विद्या [3]श्रुतमात्रा [4]ज्यासि राहिली पाठ, ।
[5]अरिनीं कुसंगतीस्तव त्या [6]तैशाचीहि पाहिली पाँठ. ॥ ६२
वाँटे पुढें पळे तो [7]स्त्रीसंगविरक्तधी [8]कुमारमणी, ।
पुत्रस्नेहें धांवे यामागें शंभुची उमा रमणी. ॥ ६३
[9]किति [10]हांसले विलोकुनि, झाले किति चकित [11]बद्धनय [12]शस्त्री, ।
कीं वांछील भगवतीहुनि [13]अन्या, करुनि युद्ध न, यश, स्त्री. ॥ ६४
कौरव म्हणति, 'नव्हे स्त्री, [14]व्यक्त [15]स्त्रीवेष पुरुष [16]तर्कशतें, ।

---

१. कलांसहित, चौसष्ट कलांसहित. या कलांचीं नांवें:—१ अभिधानकोश, २ अक्षरमुष्टिकाकथन, ३ आकारज्ञान, ४ आकर्षक्रीडा, ५ आलेख्य, ६ उत्साहन, ७ उदकघात, ८ उदकवाद्य, ९ ऐंद्रजाल, १० काव्यसमस्यापूरण, ११ कर्णपत्रभंग, १२ केशमार्जनकौशल, १३ क्रियाविकल्प, १४ क्रौंचमारणयोग, १५ गंधयुक्ति, १६ गीत, १७ चित्रयोग, १८ चित्रशाकापूपभक्तविकारक्रिया, १९ छंदोज्ञान, २० छलितयोग, २१ तंदुलकुसुमबलिप्रकार, २२ तर्ककर्म, २३ तक्षण, २४ दशनवसनांगराग, २५ दुर्वाचकयोग, २६ देशभाषाज्ञान, २७ द्यूतविशेष, २८ धातुवाद, २९ नाटकाख्यायिकादर्शन, ३० नाट्य, ३१ नृत्य, ३२ नेपथ्ययोग, ३३ पट्टिकावेत्रबाणविकल्प, ३४ पानकरसरागासवयोजना, ३५ पुष्पवाटिकानिमित्तज्ञान, ३६ पुष्पास्तरण, ३७ पुस्तकवाचन, ३८ प्रतिमाला, ३९ प्रहेलिकाकूटवाणीज्ञान, ४०, बालक्रीडन, ४१, भूषणयोग, ४२ मणिभूमिकाकर्म, ४३ मणिरागज्ञान, ४४ मानसी काव्यक्रिया, ४५ माल्यग्रथनविकल्प, ४६ मेषकुक्कुटलावकयुद्धविधि, ४७ म्लेंच्छितकविकल्प, ४८ यंत्रमातृकाधारणामातृकासंवाय, ४९ रौप्यरत्नपरीक्षा, ५० वस्त्रगोपन, ५१ वाद्य, ५२ वास्तु, ५३ विशेषकच्छेद्य, ५४ वीणाडमरुवाद्य, ५५ वृक्षायुर्वेदयोग, ५६ वैजयिकविद्याज्ञान, ५७ वैतालिकविद्यादान. ५८ वैनायिकविद्यादान, ५९ शयनरचना, ६० शुकसारिकाप्रलापन, ६१ शेखरापीडयोजना, ६२ सूचीवानकर्म, ६३ सूत्रक्रीडा, आणि ६४ हस्तलाघव, हीं कलांचीं नांवें श्रीमद्भागवत—दशमस्कंध—अध्याय ४५ श्लोक ३६ याच्या टीकेंत दिलीं आहेत. तसेंच श्रीवात्स्यायनप्रणीत **'कामसूत्र'** नामक ग्रंथाच्या प्रथम अधिकरणाच्या 'विद्यासमुद्देश' नामक तृतीय अध्यायांत सविस्तर दिलीं आहेत. २. समस्ता. ३. नुसत्या श्रवणानें. ४. ज्या अर्जुनाला. ५. कौरवांनीं. ६. तशा स्त्रीवेषधारी अर्जुनाची पाठ (तो उत्तराच्या पाठीस लागला असतां) पाहिली. ७. पृष्ठभाग. ८. ही उपेक्षा आहे. हा उत्तराच्या पलायनाचा प्रसंग पंतांनीं कसा वर्णिला आहे पहा. हें सुरेख आणि हृदयंगम वर्णन करणारा कवि भाषांतरकार ठरेल काय? या पद्यांतील गोडी चाखण्यास अंगीं बरेंच सहृदयत्व पाहिजे इतकें खरें, सर्वांस त्या गोडीचा सारखा प्रत्यय येणार नाहीं. यांत वीररस असून वत्सलरसाची छटा मारीत आहे. ९. स्त्रीसंगाविषयीं विरक्त धी (बुद्धि) ज्याची. १०. कार्तिकस्वामी. ११. अनेक कौरवपक्षीय सैनिक. १२. नीतिमत्, नीतिज्ञ. युद्धनीतींत (समरकलेंत) ज्यांस अनुभव प्राप्त झाला असे, युद्धनीतिनिपुण. १३. शस्त्रधर. १४. श्रीदुर्गेहून इतर स्त्री. १५. स्पष्ट. १६. स्त्रीवेषधारी. १७. शंभर वाटेनें.

मृदुलप्रकृति स्त्रीवपु, ऐसंविध धावनीं न कर्कश तें. ॥ ६५
सौरूप्य अर्जुनाचें, बाहु परिघसे, तसेंचि कीं शिर तें, ।
पय रुचिकसम, परि रसिकमन काय पयीं तसें चिक्कीं शिरतें? ॥ ६६
हा क्लीवसमहि वेषें, क्लीबीं ऐसें परंतु तेज नसे, ।
वाटति देखावेसे काय पुरुषवेष पंढ ते जनसे? ॥ ६७
काल त्रिगर्तपतिनें गोग्रहें केला म्हणोनि पृतनेला ।
घेउनि विराट गेला, बहुधा तो पितृवनीं न मृत नेला. ॥ ६८
तत्सुत उत्तर होता नगरीं, तो परिसतांचि गोहरणा, ।
पार्थासि करुनि सारथि आला जो वांछ सुलभ मोहरणा. ॥ ६९
हरिण जसा सिंहीला, सेनेला पाहतांचि तो भ्याला; ।
सुयशाहुनि जीवित बहु वाळाला, जेंवि वित्त लोभ्याला. ॥ ७०
कातर रथी पळाला तो अयशःसागरीं तरायाला; ।
मीनी अर्जुन सारथि त्यामागें धांवला धरायाला'. ॥ ७१
वदति असें कुरु, जों तों पदेशत धांवोनि कुतलीं धरिला; ।
जाणों अपकीर्तिनदीपतित शिशु वळेंकरूनि उद्धरिला. ॥ ७२
स्वमनीं पार्थ म्हणे, 'रे! जरि विहित रडेंचि मानितोस, रड; ।
मी प्रभु हें अज्ञ पदीं कीं कुपणीं बसुनि मानितो सरड'. ॥ ७३

---

१. मृदु (सौम्य) आहे प्रकृति (स्वभाव) ज्याची असें (वपु). २. स्त्रीशरीर. स्त्रियांचें शरीर स्वभावतः मृदु, तें पुरुषांसारखें धावण्यांत काटक—सोसक—नाहीं. ३. याप्रकारें. ४. कठोर. ५. सारखेपण. ६. 'बाहू परिघोपमौ' असेंच मूळांत आहे. [अ० ३८ श्लो० ३४.] ७. अडसरासारखे. ८. दुग्ध. हें गौत्यर्ध सुभाषितरूप आहे. ९. रुईचा चीक. १०. पंढासारखा. ११. पुरुषाचा वेष आहे ज्यांस असे (पंढ). पुरुषवेषधारी पंढ हे इतर जनासारखे (खऱ्या पुरुषांसारखे) देखावेसे वाटति काय? देखावे असें वाटत नाहीं—हें उत्तर. १२. सुशर्म्यानें. १३. धेनुहरण. १४. सेनेस. १५. मसणवटींत, स्मशानांत. तो मृत, पण अर्जुन पितृवनीं नेला नसावा, म्हणून पुत्र उत्तर आज यथें येऊं शकला. १६ त्या विराटाचा पुत्र. १७. विराटरहित नगरीं. १८. अध्याय ३८ श्लो० ३७ पहा. १९. बालभावानें आला, पौरुषानें आला नाहीं—असा भाव. २०. मोहरूप युद्धास. २१. प्राण. हें गौत्यर्ध सुभाषितरूप आहे. २२. भित्रा. २३. अपकीर्तिरूप समुद्रामध्यें. २४. अभिमानी, मानधन. २५. झंभर पाऊलें. २६. केशीं, केशपाशीं धरिला. २७. अपकीर्तीच्या नदींत पडलेला. यांत उत्प्रेक्षा अलंकार आहे. २८. योग्य. २९. मूर्ख. ३०. हें गौत्यर्ध सुभाषितरूप आहे. कुपणांत बसून मी प्रभु आहें असें अज्ञ सरडा मानितो. येथें 'कुपण' हेंच 'पद' (प्रभुपद) होय असें समजावें.

[1]उत्तर म्हणे, 'नको, गे! पायां पडतों बृहन्नडे! सोड, ।
जोड[2] दिली, दुखवुं नको, केवळ पितृ[3]करतलस्थ हा फोड'. ॥ ७४
जों[4] जों वैराटि रडे, तों तों तो पार्थ सदय, परि साचा ।
खळसा[5] हांसे, लोहा निंद्य नव्हे भावभाव[6] परिसाचा. ॥ ७५

---

१. या गीतीवर निबंधमालाकार यांचा आक्षेप आहे तो असा:—"अश्लीलत्व म्हणजे प्रौढ काव्यांत न खपण्यासारख्या ग्राम्य शब्दांचा प्रयोग व केवळ व्यावहारिक दाखले हे होत. सत्कवींची शब्दपद्धति व अर्थपद्धति लक्षपूर्वक पाहिली असतां ही गोष्ट सहज लक्षांत येण्यासारखी आहे, कीं दोहोंमध्यें ग्राम्यतेचा लेशही त्यांस खपत नसतो; नुसती वाक्यरचना ही कांहीं व्यावहारिक भाषेहून निराळी असावी लागते. आणि त्यांतून शब्द व दृष्टांत हे तर प्राकृत व्यवहारांतले व ग्राम्य भाषेंतले मुळींच उपयोगी नाहींत. काव्याचा उद्देश मनोरंजन हा असल्यामुळें, व जे विषय नेहमींच्या व्यवहारांतले व अत्यंत परिचित त्यांच्यापासून वरील उद्देश साध्य होत नसल्यामुळें, त्यांचे वाचक शब्द व त्यांचे दृष्टांत हे मनास आल्हाद देत नाहींत; उलटें असें मुद्धां होतें कीं, एकादें पद्य सुंदर साधलें असून त्यांत मोठा प्रौढ अर्थ संगृहीत केलेला असतो, पण वरच्या प्रकारच्या एका शब्दानें किंवा दाखल्यानें दुधांत मिठाचा खडा टाकल्याप्रमाणें होऊन जातें." + + + + + + + + + + + + + "[ह्या] (७४ व्या) आर्यैतील उपमा तर केवळ अश्लील होय. सामान्यतः व्यवहारांत तशा प्रकारची भाषापद्धति आहे खरी, पण ती कवितेंत शोभा पावणार नाहीं." (निबंधमाला अंक ६३ पृष्ठें १४-१५.) या आक्षेपाचें निरसन रा० लेले शास्त्री यांनीं केलें आहे तें:— "**मोरोपंता**च्या कवितेवर मुख्यत्वें ग्राम्यत्वाचा दोष दिला. परंतु ग्राम्य म्हणजे नागरहांके वगैरे हलके लोक यांच्याच मात्र भाषणांत येणारे जे शब्द, त्यांचा प्रयोग केला असतां हा दोष होतो. पण तसें **मोरोपंता**च्या कवितेंत आढळत नाहीं. त्या कवितेंत ज्या शब्दांचा प्रयोग केला आहे ते शब्द सभ्यांच्याही भाषणांत येणारे असे आढळतात, म्हणून तो ग्राम्यत्वरूप दोष आहे असें म्हणतां येत नाहीं. तसेंच सभ्य लोकांच्या व्यवहारांत येणाऱ्या गोष्टी दृष्टांतत्वें करून सांगितल्या असतां तोही ग्राम्यत्वरूप दोष नव्हे. हा उलटा अर्थ सौलभ्यरूपानें गुणच होय असें म्हणण्यास बाध दिसत नाहीं."+ + + + + + + + + + + + [प्रकृत आर्यैतील] "पितृकरतलस्थ हा फोड, हाही अर्थ सदरील कारणामुळेंच ग्राम्य म्हणण्यास योग्य नाहीं." (निबंधमाला अंक ७०.)

२. संपत्ति. तुला हवी ती देणगी देतों. यास आधार—अध्याय ३८ श्लोक ४२-४४ पहा. उत्तर म्हणतो:—'हे कल्याणकारिणि सुमध्यमे बृहन्नडे! माझें वचन ऐक, लवकर माझा रथ माघारा फिरीव, जर मनुष्य वांचला तर संपत्ति तो मिळवील. शुद्ध सुवर्णाचे शंभर निष्क, आठ वैदूर्यरत्नें, हेमदंडप्रतिच्छन्न रथ, दहा मत्त हत्ती इत्यादि मी तुला देतों पण मला सोड.' ३. बापाच्या हस्ताच्या तळव्यावरील. ४. हा मी उत्तर (करतळावरील फोडाप्रमाणें बाप मला जपतो—असा भावार्थ). ५. खरोखर. ६. दुष्टासारखा. ७. भावभाव=दगडपणा. भाव=दगड, भाव=स्थिति, अवस्था. परिसाचा दगडपणा लोखंडाला निंद्य नाहीं (कारण परिसाच्या योगें लोखंडास सुवर्णत्व येतें) त्याप्रमाणें अर्जुनाचें हास्य उत्तराला निंद्य अथवा अग्राह्य नव्हतें.

दाटूनि हित कराया [1]तत्केशांतें धरूनि [3]आकर्षी, ।
वसवी रथीं बळें हरिभजनीं मंदासि जेंवि [3]नाकर्षी. ॥ ७६
[4]कुरवाळूनि म्हणे, 'गा ! राजसुता ! योग्य तूं न कांपाला, ।
[5]मृदुलत्व [6]म्लानत्व स्वीकारुनि जाहलासि कां पाला ? ॥ ७७
तुज [7]उत्साह नसे, तरि करितों घेउनि धनूस मी रण, हो ! ।
मज मेघासि कराया [8]शरवृष्टि सहाय तूं [9]समीरण हो. ॥ ७८
घे [10]रश्मि करीं, सारथि होउनि चालीव आजि हे [11]वाजी, ।
मी मथितों [12]कुरुपृतना, करिते [13]क्षुब्धाब्धिसींहि हेवा [14]जी.' ॥ ७९
जाय शमीप्रति किंचित्स्वस्थासि [15]रथीं बळेंचि वाहूनी, ।
आलिंगाया समरप्रियसख [16]गांडीवचाप [17]बाहूनीं. ॥ ८०
[18]द्रोण [19]म्हणे, 'कौरव हो ! काय पहातां रथाकडेचि रहा ? ।
[20]अद्भुत [21]अश्वाश्रुध्वजकंपाद्युत्पातही पहा चिरें [22]हा. ॥ ८१
परिसा बरें [23]शिवांचें रुदित अशुभसें [24]असुस्वर क्षण हो, ।
व्यूह रचा, हो ! रक्षा गोधन हें यश [25]असुस्वरक्षण हो [26]. ॥ ८२
न बुडे बळें बुडवितां, उसळेचि जळीं जसा [27]अलाबु, [28]बुळा ।
दिसतो, तसाचि जपतो स्वयशा, न जपे तसा भला बुबुळा. ॥ ८३

---

१. त्या उत्तराच्या केशांतें. २. ओढी. ३. देवर्षी. (नाक+ऋषी=स्वर्ग+मुनी.)४. गोंजारून.५. अंगीं कंप पावण्यास.६.मऊपणा. ७.कोमेजलेपणा. (हे दोन्ही पाल्याचे धर्म आहेत.) हें उत्तराच्या भीरुत्वाचें पंतांनीं केलेलें सुरेख वर्णन मूळग्रंथांतील कोणत्या श्लोकाचें भाषांतर आहे हें कोणी दाखवील काय ? ८. धैर्य, हौस, इच्छा.९.बाणवृष्टि; (पक्षी) जलवृष्टि. [शर=बाण; जल. 'शरस्तु तेजने बाणे दर्भमूले ना शरं जले' इति विश्वमेदिन्यौ.]१०. वायु.११. दोऱ्या, लगाम.१२. घोडे.१३. कौरवसेना.१४.क्षोभलेल्या समुद्राशीं. १५. अध्याय ३८ श्लोक ४६-५० पहा.१६. थोडासा स्थिर झालेल्या उत्तराला. (अध्याय ३९ श्लो० १.)१७. हेंच अर्जुनाचें धनुष्य.१८. भुजांनीं. १९. अध्याय ३९ श्लोक ४-१३ पहा. २०. आश्चर्यकारक. २१. अश्व+अश्रु+ध्वज+कंप+आदि+उत्पात=घोड्यांच्या डोळ्यांतून अश्रु पडणें, ध्वज कंपित होणें इत्यादि उत्पात (अशुभसूचक चिन्हें). [या समयीं झालेल्या उत्पातांचें वर्णन:—प्रचंड रुक्ष आणि वालुकावर्षी असे वायु वाहतात, भस्मवर्णसदृश तमानें आकाश व्याप्त होत आहे, मेघ रुक्षवर्ण आणि अद्भुतदर्शन दिसतात, विविध शस्त्रें बाहेर पडतात, भालू दारुण ध्वनि करतात, हय अश्रुमोचन करतात, अकंप्रित ध्वज कांपतात, इत्यादि. श्लोक ४-६ पहा.] २२. दीर्घकाळपर्यंत. २३. कोल्ह्यांचें. २४. कर्णकठोर. २५. प्राणधनरक्षण. २६. होवो. २७. भोंपळा. २८. तृतीयाप्रकृति, षंढ.

राया! भीष्मा[1]! सेकृदपि[2] या नयनीं पाहवेल न क्लीबा[3], ।
बहुरूप अर्धनारीश्वरसा[4] तद्भक्त[5] हाहि नेली[6] बा! ॥ ८४
आइकतों कीं हा कृश केवळ होता तपें, परि भवातें[7] ।
झाला बहुमत समरीं[8], करिल परांच्या[9] न कां परिभवातें? ॥ ८५
अस्मत्परिभव[10] करितो, आजि नभातें शरव्रजें[11] भरितो, ।
गोधन हरितो, वरितो कीर्ति, अशनिभृद्रिकरिघटाहरि[12] तो.' ॥ ८६
कर्ण म्हणे, 'कुरुगुरुजी[13]! स्तवितां मज यूथपतिपुढें[14] कलभा[15], ।
म्हणतां शोकलीं[16] बहु रविकांतगिरिपरिस[17] रवीपरिस[18] बल भा[19].' ॥ ८७
भूप म्हणे, 'कर्णा! हा जरि अर्जुन, देव पावला नरवेसा[20]; ।
जाइल पुन्हा वनाला[21] बंधुसह अरण्यवासि मानवसा. ॥ ८८
अथवा असेल दिसतो तैसा[22] तरि परिभवें बुळा लाजो, ।
मर्कट[23] नुरेचि, झोंबे हनुमत्पाणिस्थिता[24] गुळाला जो.' ॥ ८९

---

१. द्रोण भीष्मास म्हणतो. (श्लोक १० पहा.) २. एकवेळहि. ३. नपुंसकाला. ४. शंकरासारखा. [शिवाची प्रतिमा अर्धस्त्री आणि अर्धपुरुष अशी असून तिची पूजा कित्येक ठिकाणीं करतात. या आकृतीवरून त्याला अर्धनारीश, अर्धनारीश्वर, अर्धनारीनटेश्वर, असें नांव आहे. या मूर्तीत दक्षिणार्धी शिव आणि वामार्धी पार्वती अशी योजना असते. याचा विग्रहः—'अर्धं नार्या अर्धनारी सा ईश्वरा यस्य सोऽर्धनारीश्वरः' अनर्घराघव—रुचिपत्युपाध्यायकृत टीका—पृष्ठ २७२. काव्यमाला.] सोलापुर जिल्ह्यांत शिवाची अशी अर्धनारीनटेश्वर मूर्ति ज्यांत आहे असें एक मंदिर आहे. अशा रूपाविषयींचा उल्लेख संस्कृत ग्रंथांत अनेक स्थळीं आढळतो. कुमारसंभव—सर्ग १ श्लोक ५०; अनर्घराघव—अंक ७ श्लोक ३६; कीर्तिकौमुदी—सर्ग १ श्लोक ३; मालविकाग्निमित्र—अंक १ श्लोक १; स्तुतिकुसुमांजलि—स्तोत्र २१ वें पहा.] ५. त्या शंकराचा भक्त. ६. नकल्या, थट्टेखोर. ७. शिवातें. ८. मान्य. ९. किरातवेषप्रच्छन्नमहादेवसमरांत. [या समराचें वर्णन मोरोपंतकृत वनपर्व—अध्याय ४ था यांत पहा.] १०. शत्रूंच्या. ११. आमचा पराभव. ग्रांत 'कारक दीपक' झालें आहे. १२. बाणसमुदायानें. १३. इंद्रशत्रु (राक्षस) हीच करिघटा (हत्तिसमूह) त्याचा सिंह (अर्जुन). या उत्तरार्धांत सुंदर 'पर्यायोक्त' झालें आहे. १४. अध्याय ३९ श्लोक १४ पहा. १५. द्रोणा! १६. गजाधिपापुढें. १७. गजबाळकास. १८. सूर्यकांतमणिपर्वतापेक्षां आणि सूर्यापेक्षां (त्यांच्या) तुकड्यांत बल (सामर्थ्य—प्रभाव—प्रताप) आणि भा (कांति) बहु असें म्हणतां. १९. तुकड्यांत. २०. सूर्यकांतपर्वतापेक्षां. २१. कांति. २२. दुर्योधन. (श्लोक १५-१६.) २३. मी कृतकार्य झालों, फारच चांगलें झालें. २४. बारा वर्षें अरण्यवास करण्यासाठीं. [द्यूतप्रसंगीं केलेल्या पणाचा येथें उल्लेख आहे. सभापर्व—अध्याय ६ गीति ९५-९९ पहा. काव्यसंग्रह पृ० ६१.] २५. क्लीब दिसतो तसाच अर्जुनाहून अन्य कोणी मानव असेल तर. २६. वानर. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. २७. मारुतीच्या हातांतील.

जाउनि[1] शमीनिकेट[2] तो विजय म्हणे, 'स्वस्थ तूं कुमारा! हो; ।
पाहुनि मत्[3]कृतखलबलमथन चकित भगवती उमा[4] राहो. ॥ ९०
मद्[5]भुजबलानिलें हें ध्वस्त अहितकटक अभ्र[6] सारें हो[7], ।
परि हीं तुझीं धनुष्यें क्षणहि न टिकतील दैभ्रसारें[8], हो! ॥ ९१
आहेत पांडवांचीं दिव्यास्त्रें या शमीद्रुमीं[9] उतरीं[10], ।
पाहुनि पळोत त्या हरिनखरांतें[11] सर्व खलबलें[12] कुतरीं.' ॥ ९२
उत्तर म्हणे, 'शमीवरि शव[13] आहे ऐकिलें, न शिवेवेची[14], ।
सांगसि असें कसें गे! कुणपाचा[15] स्पर्श सर्व शिवे[16] वेची[17]. ॥ ९३
पार्थ म्हणे, 'कैंचें शव[18]? ठेंकवुन बुडवीन काय हो! यश मी? ।
त्या शस्त्रांला, असतां शव, आश्रय योग्य काय होय शमी[19]? ॥ ९४
वृक्षीं वेष्टन सोडुनि नमुनि म्हणें, रक्षें[20] आयुधग्रामा[21]! ।
आलों शरण तुला मी, लोक जसा रक्षिआयुधग्रामा[22]. ॥ ९५
जाणों सच्छस्त्रें हीं, साश्रयपांडवजयार्थ सुतपातें[23] ।
करिती, व्हाया सद्यश[24] लोकत्रितयांत[25] अंधसुतपातें.' ॥ ९६

---

१. अध्याय ४० श्लोक १ पहा. २. निकट=जवळ. [कट हा प्रत्यय कांहीं उपसर्गांस लाविला असतां नानार्थक शब्द होतात:—विकट, निकट, संकट, प्रकट, उत्कट.] ३. मी केलेलें दुष्ट सैन्याचें मर्दन. ४. पार्वती, भवानी. ५. माझ्या भुजबळवायूनें. ६. नष्ट. ७. शत्रु-सैन्यरूप अभ्र. ८. होवो. ९. अल्पबळ. [दभ्र+सार=अल्प बल.] १०. या शमीवृक्षावर. ११. खालीं आण, खालीं आणून दे. १२. सिंहाच्या नखांला. १३. दुष्ट दुर्योधनाचीं सैन्यें हींच कुतरीं. (अध्याय ४० श्लोक ३-८.) १४. प्रेत टांगलेलें आहे. (अध्याय ४१ श्लोक १-३.) एक शरीर बांधलेलें आहे असें ऐकितों. १५. मी मंत्रयज्ञवेत्ता राजपुत्र त्या शवाला कसा स्पर्श करूं? स्पर्श केला असतां, शववाहकांसारखा अशुचि आणि अव्यवहार्य होईन, यास्तव स्पर्श करवत नाहीं—असा भाव. १६. प्रेताचा. १७. कल्याण. १८. नष्ट करतो. हा चरण सुभाषितरूप समजावा. १९. या शमीवृक्षावर प्रेत नाहीं—असा भाव. २०. तुला (उत्तराला) फसवून. २१. [शमीवृक्षावर] शव असतां, त्या शस्त्रांला शमी योग्य आश्रय होय काय?—असा अन्वय. येथें काकर्थ इष्ट आहे. २२. शमीवृक्षावर जीं आयुधें ठेविलीं होतीं त्यांना वेष्टनें होतीं तीं वेष्टनें सोडून. २३. हे उत्तरा! तूं म्हण, त्वां म्हणावें—असें अर्जुन त्याला शिकवीत आहे. २४. रक्षण कर. २५. हे शस्त्रसमूहा! २६. राक्षसांचें आयुष्य दहन करणाऱ्या रामास. २७. उत्तम शस्त्रें. २८. आपणास आश्रय देणाऱ्या पांडवांचा जय होण्यासाठीं. २९. उत्तम तपातें. यांत सुरेख उपेक्षा आहे. ३०. उत्तम यश. ३१. तीन लोकांत. [त्रितय—तय प्रत्यय संख्यावाचकांपुढें अवयवार्थी अथवा समुदायार्थी होतो. जसें:—चतुष्टय, पंचतय, द्वितय, त्रितय.] ३२. धृतराष्ट्रपुत्रपतनानें.

वैराटि [1]चापखड्गाद्यायुधचिन्हें समस्त [2]वाखाणी, ।
[3]भवभीतिस कवि ज्यांच्या करुनि हरिस्तवसम स्तवा [4]खाणी. ॥ ९७
वर्णुनि शस्त्रांसि पुसे, 'कवणांचीं कवण यांत सांग मला, ।
त्या पांडवांसि यांचा व्यसनांत त्याग योग्य कां गमला?' ॥ ९८
पार्थ म्हणे, 'वैराटे! ज्यावरि [5]शतकनकबिंदु पाहसि तें, ।
गांडीव, यशें जोडी जेणें विधुहूनि [6]शुभ्रवाह [7]सितें. ॥ ९९
ब्रह्मा धरिता झाला गांडीवातें [8]सहस्रमित वर्षें, ।
धरिलें प्रजापतीनें [9]त्र्युत्तरपंचाशदब्द बहु हर्षें. ॥ १००
मग [10]पंचाशीति [11]सभा [12]शक्रें, [13]सोमेंहि [14]पंचशत अब्द, ।
वरुणें शत संवत्सर, याणें लागूं दिला न दुःशब्द. ॥ १०१
आहे पार्थापासीं [15]सार्धद्वात्रिंशदब्द हें चाप; ।
राहे [16]चैरमापल्याजवळी प्रेमार्द्रधी जसा बाप. ॥ १०२
जें [17]इंद्रगोपचित्रित तें धर्माचें धनुष्य जाणावें, ।
ज्यावरि [18]कांचनवारण तें भीमाचें मनांत आणावें. ॥ १०३

---

१. चाप खड्ग इत्यादि आयुधांचीं चिन्हें. २. प्रशंसा करी. ३. संसार(भव)भयास. ४. हरिस्तवसम (विष्णुस्तवाप्रमाणें) ज्यांच्या (ज्या आयुधांच्या) स्तवा करुनि कवि (बुधजन) भवभीतीस (संसारभयास) खाणी (खणून टाकी—नष्ट करी)—असा अन्वय. ५.उत्तर बृहन्नडेस पुसतो. [अध्याय ४२ यांत हें उत्तराचें भाषण आहे. त्यांत १८ श्लोक असून प्रत्येक आयुधाचें वर्णन करून हें आयुध कोणाचें असें उत्तर विचारीत आहे. या १८ श्लोकांचा संक्षेपार्थ पंतांनीं एकाच पद्यांत दिला आहे.] ६. कोणत्या पांडवांचीं कोणतीं शस्त्रें. ७.अध्याय ४३पहा. ८.सोन्याचे शंभर टिपके (ज्या धनुष्यावर पाहसि) [अ० ४२ श्लोक१ यांत या धनुष्यावर सोन्याचे शतबिंदु इत्यादि वर्णन आहे.] ९. चंद्रापेक्षां. १०. अर्जुन, श्वेतवाह. ज्याचे घोडे पांढरे तो शुभ्रवाह (अर्जुन). ११. शुभ्रें. (हें यशें यांचें विशेषण.)१२. सहस्रसंख्यापरिमित. [अध्याय ४३ श्लोक ५.] १३.दक्षप्रजापतीनें. १४.त्रेपन्नवर्षें. [त्रि+उत्तर+पंचाशद्+अब्द= तीन+शेवटीं+पन्नास+वर्षें=तीन अधिक पन्नास वर्षें. मूळांत 'त्रीणि पंच शतं चैव' असें आहे यावरून पांचशें तीन वर्षें असें पाहिजे होतें. 'त्र्युत्तर पंच शत अब्द' असा पाठ असता तर चाललें असतें.] १५. पंच्यायशी. १६. वर्षें. १७. इंद्रानें. १८. पांचशें वर्षें. १९. स+अर्ध+द्वात्रिंशत्+अब्द=अर्धासहित+बत्तीस वर्षें=साडे बत्तीस वर्षें. [मूळांत ६५ वर्षें असें वर्णन आहे. पण प्रत्येक संवत्सरांत दोन वर्षें (वृष्टिकाल) येतात, तेव्हां ६५ चें अर्ध म्हणजे ३२॥ हाच हिशोब अखेरीस ठरतो.] २०. शेवटील लेंकराजवळ. २१. प्रेमानें (प्रेमरसानें) आर्द्र (ओली) धी (मति—अंतःकरण) ज्याची असा (बाप). मोरोपंत हा भाषांतरकार होय, असें या कवितेवरून ठरेल काय? या सुरस पद्यावरूनही जर पंत भाषांतरकार ठरतील तर सर्व सुप्रसिद्ध कविजनांसही त्याच माळेंत ओंवण्याची पाळी येणार आहे. २२. इंद्रगोप नामक रक्तपीतभास्वरवर्ण कीटकविशेष (किडे) असतात त्यांजसारख्या टिपक्यांनीं चित्रविचित्रित केलेलें.(अध्याय ४३ श्लोक ९.)२३. सुवर्णाचे गज (वारण).

धरिजे तें त्र्यंकांकित कार्मुक नकुळें समस्तयोधनुतें, ।
सौवर्ण शलभ ज्यावरि सहदेवाचेंचि होय हो! धनु तें.' ॥ १०४
सांगे असेंचि वर्णुनि गुण तूण कृपाण बाण जाणाया, ।
तें गांडीवाद्यायुध उतरुनियां आपुलेंचि आणाया. ॥ १०५
'कोठें बृहन्नडे! ते ज्यांचे गुण हर्ष नित्य नव देती? ।
कोठें देवी? जी 'व्हा भस्म' असें त्यां खेळांसि न वदे ती.' ॥१०६
पार्थ म्हणे, 'वैराटे! जो अर्जुन तोचि मी, असें जाण, ।
जो कंक तोचि राजा धर्म, नव्हे अनृत हें, तुझी आण. ॥ १०७
वल्लव भीम, ग्रंथिक तोचि नकुळ, तंतिपाळ सहदेव, ।
सैरंध्री ती, जीचा कैवारी वृष्णिमूर्तमह देव.' ॥ १०८
वैराटि म्हणे, 'ज्यातें, जाणति, जपतीहि, पूज्यपाद शमी, ।
सांग वरें जाणतसें नामें त्या शक्रसूनुचीं देश मी.' ॥ १०९
सांगे, 'अर्जुन फाल्गुन जिष्णु किरीटी' असीं दहा नावें, ।

---

१. हें कर्मणि क्रियापद आहे. हें संस्कृत भ्रियते समान होय. या गीत्यर्धाचें संस्कृतरूप असें होईल:— समस्तयोधनुतेन नकुलेन तत्र्यंकांकितं कार्मुकं भ्रियते. २. तीन सूर्यांनीं चिन्हित. (तीन सौवर्ण सूर्य ज्यावर प्रकाशतात असें. अध्याय ४१ श्लोक ४.) ३. कर्म (काम) करण्यास समर्थ जें तें कार्मुक= धनुष्य. ४. सर्व वीरांनीं स्तुत अशा. ५. सौवर्ण=सुवर्णनिर्मित. सुवर्ण=कृष्णागुरुवर्ण द्रव्य=मीना, यानें निर्मिलेले शलभ (टोळ) ज्यावर आहेत तें. (नीलकंठ टीकाकार—अध्याय ४२ श्लोक ५.) ६. अर्जुन सांगे. ७. धनुष्याची दोरी. ८. भाते. ९. खड्ग. १०. गांडीव इत्यादि आयुध. ११. शमीवृक्षावरून खालीं काढून. १२. हा उत्तराचा अर्जुनाला प्रश्न आहे.१३. ते पांडव. १४. द्रौपदी. १५. त्या दुर्योधनप्रमुख दुष्टांस. १६. सुप्रसिद्ध पांचाली. [अ० ४४ श्लोक १-४ यांत उत्तराचे पांडवविषयक अनेक प्रश्न आहेत.] १७. असत्य. १८. शपथ. १९. पक्षपाती. २० यादवांचा मूर्तिमंत उत्साह असा भगवान् श्रीकृष्ण. २१. अध्याय ४४ श्लोक ७ पहा. २२. पूज्य (पूजार्ह) आहेत पाद (चरण) ज्यांचे असे. २३. जितेंद्रिय मुनि, शमवृत्ति मुनि.२४. इंद्रपुत्राची. २५. दहा. २६. अर्जुनानें आपलीं दहा नांवें व तीं तशीं पडण्याचीं कारणें विराटास सांगितलीं तीं हीं:—(अ) नांवें:— अर्जुन, फाल्गुन, जिष्णु, किरीटी, श्वेतवाहन, वीभत्सु, विजय, कृष्ण, सव्यसाची, आणि धनंजय. (ब) कारणें:—(१) मी सर्व देश पादाक्रांत करून तेथलें केवळ द्रव्यच आणून त्याच्या मध्यभागीं उभा राहतों यास्तव माझें नांव धनंजय पडलें आहे. (२) युद्धांत जे अजिंक्य असे गाजलेले आहेत त्यांच्याशीं मी सामना करतों आणि त्यांचा पराजय केल्याशिवाय मी युद्धांतून कधीं परत येत नाहीं म्हणून माझें नांव विजय पडलें आहे. (३) युद्धप्रसंगीं माझ्या रथास सुवर्णालंकारविभूषित शुभ्र अश्व जुंपले असतात म्हणून मी श्वेतवाहन या नांवानें प्रसिद्ध आहे. (४) हिमाचलाच्या

त्यांची[1] निरुक्तिहि[2] करी कीं[3] तेणें सर्व सत्य मानावें. ॥ ११०
दैत्यनामनिरुक्तीप्रति परिसुनि पार्थासि तो करी गमन, ।
प्रार्थूनि म्हणे, 'समरीं सारथि होउनि सुखी करीन मन.' ॥ १११
घेऊनि आयुधांतें उत्तर उतरे, परंतु संदेह ।
उठला, जेंवि रविपुढें उठती उदयींच दैत्य मंदेह[4]. ॥ ११२
'सत्यचि अर्जुन जरि तूं, कां क्लीब? क्लीबवेष कां धरिला?' ।
पार्थ म्हणे, 'गुर्वाज्ञा[5] म्हणुनि व्रत वर्ष एक आदरिला. ॥ ११३
बैस रथीं, तूं माझा सारथि हो, तरणिचा[6] जसा अरुण, ।

पूर्वभागीं उत्तरा आणि फल्गुनि हीं नक्षत्रें असतां दिवसा मी जन्म धारण केलें म्हणून मी फाल्गुन या नांवानें प्रसिद्ध झालों. (५) पूर्वी मी महापराक्रमी राक्षसांशीं युद्ध करीत असतां इंद्रानें माझ्या मस्तकावर सूर्यकांतीप्रमाणें किरीट ठेवला म्हणून मला किरीटीही म्हणत असतात. (६) मी युद्ध करीत असतां बीभत्स कर्म कधींही करीत नसतों यास्तव देव आणि मनुष्य यांत मी बीभत्सु (कल्याणेच्छु) या नांवानें प्रसिद्ध झालों आहें. (७) माझे दोन्ही पटु हस्त गांडीवनामक धनुष्याची प्रत्यंचा आकर्षण करण्यांत गुंतलेले असतात यामुळें माझें नांव सव्यसाची पडलें आहे. (८) साऱ्या पृथिवींत माझ्यासारिखा वर्ण कोठेंही सांपडणार नाहीं आणि माझें कर्मही शुक्ल असतें म्हणून मला अर्जुन (शुक्ल) म्हणत असतात. (९) माझ्यापर्यंत येण्याचें कोणाचें धैर्य होत नाहीं, व माझ्यावर कोणाची चाल करून येण्याची शक्तिही नाहीं, व माझ्या आंगीं दमन करण्याचा गुण आहे, व मी पाकशासनि (इंद्रपुत्र) आहें, यास्तव देवादिकांत व मनुष्यांत माझें नांव जिष्णु हें प्रसिद्ध झालें आहे. (१०) माझी कृष्ण व उज्ज्वळ कांती असल्यामुळें व मी लहानपणीं अत्यंत गोजिरवाणा होतों यामुळें माझें दहावें नांव पित्यानें मोठ्या आवडीनें कृष्ण (चित्ताकर्षक) असें ठेविलें. [महाभारत—विराटपर्व—अध्याय ४४ श्लोक १३-२२ पहा.]

१. त्या नांवांची. २. अन्वर्थता, व्याख्या, विवरण. ३. त्या उत्तरानें. ४. दहा नामांचें विवेचन, दहा नांवें पडण्याचें कारण इत्यादि विवरण. ५. मंदेह—या नांवाचे साडेतीन कोटी राक्षस सकाळीं व संध्याकाळीं सूर्याचा ग्रास करण्याकरितां उत्पन्न होत असतात. त्यांचा नाश करण्याकरितां गायत्र मंत्र म्हणून सूर्यास अर्घ्यें देण्याचा संप्रदाय आहे. गायत्रीमंत्रानें तयार केलेलें पाणी वज्ररूप होऊनी त्या राक्षसांचा नाश करितें असा समज होता. 'तिस्रः कोट्योऽर्धकोटी च मंदेहा नाम राक्षसाः । उदयंतं सहस्रांशुमतियुद्ध्यंति ते सदा ।। गायत्र्या चाभिमंत्र्योर्ध्वं जलं त्रिःसंध्ययोः क्षिपेत् । तेन शाम्यंति ते दैत्या वज्रभूतेन वारिणा ।। मंदेहान्युध्यतः क्रूरान्निःक्षिपेत्तेष्वथांजलिम् । × × एवं त्रिवारमावृत्य दग्धास्तांनसुरान्द्विजः ॥' सदर मंदेहांचा उल्लेख संस्कृत काव्यांतून अनेक ठिकाणीं आढळतो. उदाहरणार्थ—नैषधचरित सर्ग १७ श्लोक ९४, सर्ग १९ श्लोक ४१ पहा. ६. इंद्राज्ञा. ज्येष्ठ बंधु जो धर्म त्याची आज्ञा. [अध्याय ४५ श्लोक १४ यांत ज्येष्ठ भ्रात्याच्या आज्ञेनें हें व्रत मीं एक संवत्सरपर्यंत धरिलें आहे असें वर्णन आहे.] ७. सूर्याचा.

न्यावा चमूवरि तुवां रथ, तरुणीप्रति जसा स्मरें तरुण. ॥ ११४

१. सैन्यावर. २.मदनानें. ३.या गीतीवर 'विविधज्ञानविस्तार'कारांचा आक्षेप आणि 'निबंधमाला'-कारांनीं केलेलें त्याचें खंडन हीं येथें प्रसंगोचित म्हणून दिलीं आहेत:—"विराटपर्वांत अर्जुन उत्तरास सांगतो:–'न्यावा चमूवरि तुवां रथ तरुणीप्रति जसा स्मरें तरुण.' वीररसांत शृंगाररस मिसळल्यानें काव्यास कशी गोडी येते ती एक मोरोपंताचे भक्तच केवळ जाणत असतात; इतरांस अतर्क्य, अशाच एका प्रतीचें उदाहरण देऊन ह्वोरेशियस् नामें रोमी कवी म्हणतो:–Risum teneatis, amici ? मित्रहो! हें पाहून तुम्ही हंसल्याशिवाय रहाल काय ?" (विविधज्ञानविस्तार–पुस्तक १). 'निबंधमाला'काराचें म्हणणें असें:—"या आर्येंत वीररसांत शृंगाररसाची भेसळ झाली आहे ती आमचे आक्षेपकांस खपत नाहीं. वरील रससंकराच्या योगानें त्याच्या ठायीं हास्यरसाची उत्पत्ति होऊन तो जो वाहवत गेला आहे तो टैबर नदींत जाऊन पडला आहे! आम्ही रोमकभाषानभिज्ञ असल्यामुळें होरेशियस् बोवांचें कांय रससूत्र आहे व वरील हास्यरसोद्गार त्यांनीं कोणत्या संबंधानें प्रगट केला आहे हें आम्हांस माहित नाहीं. तरी गीर्वाणभाषेच्या आयुधागारांतील पुढील कालिदासीय अस्त्र आमच्या विचाऱ्या प्राकृतकवीचा बचाव करील असें वाटतें:—'राममन्मथशरेण ताडिता दुःसहेन हृदये निशाचरी । गंधवद्रुधिरचंदनोक्षिता जीवितेशवसतिं जगाम सा ॥' [(ताटकापक्षीं) रामाच्या दुःसह शरानें हृदयाचे ठायीं विद्ध झालेली ती राक्षसी दुर्गंधयुक्त रक्तानें न्हालेली होत्साती यमसदनास गेली.' '(अभिसारिकापक्षीं) मदनाच्या दुःसह शरानें विद्धहृदय होत्साती ती आभिसारिका सुगंधयुक्त रक्तचंदनाचा लेप केलेली अशी प्राणेशाच्या संकेतस्थानीं गेली.'] 'गेली सत्वर जीवितेशसदना लागोनि रात्रिंचरी, अत्यार्ता अभिसारिकेपरि बहु ती होउनी घाबरी ।' हें पद्य 'रघुवंशाच्या' अकराव्या सर्गांतलें आहे. प्रसंग ताटकावधाचा असून वरील पद्यांत ताटकेवर श्लेषेंकरून अभिसारिकेचें रूपक केलें आहे हें उघडच आहे. आतां शृंगारांत वीराचें मिश्रण आल्याचा प्रकार पहा:–'शांते मन्मथसंगरे रणभृतां सत्कारमातन्वती वासोऽदाज्जघनस्य पीनकुचयोर्हारं श्रुतेः कुंडलम् । बिंबोष्ठस्य च वीटिकां स्मितमुखी पाण्योर्रणत्कंकणे पश्चाल्लंबिनि केशपाशनिचये युक्तो हि बंधक्रमः ॥' [रतिसंगर आटपला असतां रणांगणीं ज्यांनीं चांगली चाकरी बजावली त्यांचा सत्कार करण्याकरितां स्त्रीनें जघनास वस्त्रदान केलें; पीनकुचांस हार व कर्णांस कुंडलें अर्पिलीं, बिंबोष्ठावर तर मर्जी सुप्रसन्न होऊन त्यास विडा दिला, व हस्तांस रणत्कार करणारीं कंकणें बहाल केलीं; पण युद्धांत मागच्या मागेंच राहिलेला जो केशपाश त्याचें मात्र राजद्रोह केल्याबद्दल बंधन केलें.] हें असंबंधातिशयोक्तीचें उदाहरण होय. वरील दोन उदाहरणांवरून वाचकांस कळून येईलच कीं, शृंगार आणि वीर, यांचा परस्पर केवळ विरोध आहे असें नाहीं. येवढें मात्र खरें आहे कीं, कोणी वीर रणावेशानें भरून गेला असतां त्याच्या तोंडून शृंगारोक्ति वदविणें किंवा कोणी अनंगरंगमग्न झाला असतां त्यानें वीरश्रीचें भाषण करणें, हें शोभणार नाहीं; पण उपमेकरितां शृंगारांत वीररस आला किंवा वीरांत शृंगार आला तर तो हास्यास्पद होतो असें नाहीं. लौकिक भाषेंतही 'रतियुद्ध' आणि 'रणनवरा' या शब्दांवरून वरिलच प्रमाण मिळतें. त्यांतून ज्या प्रसंगविशेषीं व-

* गीर्वाणकविमुकुटमणीच्या ग्रंथांतही पुढील उपमा आढळतात:–'स निर्विश्य यथाकामं तटेष्वालीनचंदनै। स्तनाविव दिशस्तस्याः शैलौ मलयदुर्दुरौ ।। असह्यविक्रमः सह्यं दूरमुन्कमुदन्वता ।

आतां सोडवितों पशु, खेळबळ पळ न लगतांचि पैळवीतों ।
मी विजय असें तुजचि न, सकळांही कौरवांसि कळवीतों.' ॥ ११५
धृतरश्मि कुमार म्हणे, 'दारुक कीं आजि मातली लाजो, ।
दंड करावा या कुरुसेनेला योग्य मातलीला जो.' ॥ ११६
काढूनि शंखवलयें ल्याला पुंभूषणें सितें वस्त्रें, ।
बांधूनि केश माथां, प्रौढ्मुख होऊनि आठवी अस्त्रें. ॥ ११७
तों तीं तदृष्टिपुढें गोचरें होऊनि करुनियां प्रणती, ।
'आम्हां स्वकिंकरांला आज्ञा काय, प्रभो!' असें म्हणती. ॥ ११८

रील शृंगारोपमा योजिली आहे तेथें तर ती विशेष शोभते असें आम्हांस वाटतें. ज्या महावीरानें पंजरस्थ सिंहाप्रमाणें बारा वर्षे वनवास काढला, व तेराव्या वर्षी तर ज्यास क्लीब वेष धारण करून स्त्रीवर्याचा निन्हव करणें भाग पडलें, आणि भावी समरप्रसंगाची ज्यास नुसती वार्ता कळल्यावरोबर 'उठल्या उत्साहाच्या या शांतश्रीमदुदधिवरि लहरी' अशी ज्याची अवस्था झाली, त्यास चिरकांक्षित जें शत्रुसेनेचें दर्शन तें घडलें असतां केवढा हर्ष होणारा आहे व रणतुंबळ करण्याविषयीं केवढें प्रबल बाहुस्फुरण होणार आहे? वरील बाहुस्फुरणास आमच्या मतें एकच अत्यंत समर्पक दृष्टांत होय." (निबंधमाला–अंक ५९ पृष्ठ ९-१३ महा.)

१.गाई. २.दुष्टांचें सैन्य, शत्रुसैन्य. ३. यांत 'विशेष' नामक अलंकार झाला आहे. एका क्रियेच्या योगें अनेक क्रिया झाल्याशा होणें अथवा एका क्रियेपासून अनेक क्रियारूप फळें उत्पन्न होणें याला 'विशेष' म्हणतात. येथें पशुमोचन (गोधनमोचन) क्रियेपासून दुष्टांचें सैन्य पळविणें इत्यादि क्रिया झाल्याशा आहेत म्हणून हा 'विशेष' अलंकार झाला. ४. अर्जुन. ५. धरिल्या (धृत) घोड्यांच्या दोऱ्या लगाम (रश्मि) ज्यानें तो. (कुमार उत्तर.) ६. कृष्णसारथि. ७. इंद्रसारथि. ८. उन्मत्त झालेलीस. ९. शंखांचीं कांकणें. (चुडे.)१०. पुरुषाचे अलंकार.११. शुभ्र. १२. अर्जुन वलयें व कुंडलें टाकून देऊन, भांगयुक्त कृष्ण केश श्वेत वस्त्रानें बांधून सर्व शस्त्रांचें ध्यान करीत बसला. [अ० ४५ श्लो० २५-२६.] १३. मस्तकीं. [माथां हें सप्तमीचें एकवचन आहे. आं सप्तमीचा प्रत्यय फारच थोड्या नामांस लागतो;–गळां माळ घातली, पायां पडला, इत्यादि प्रयोगांत तो आढळतो. १४. पूर्वाभिमुख. [अ० ४५ श्लो० २५-२६.]१५. दर्शनीय. १६. नमन. १७. आपल्या चाकरांना. [श्लोक २७.]

नितंबमिव मेदिन्याः स्रंस्तांशुकमलंघयत् ॥' [रघुवंश ४।५१-५२] द्रुतविलंबितवृत्त. [विमल चंदन ज्यावरि साजिरें मलय दर्दुर नामक शैल रे । । युवति दिक् विलसे जणुं दक्षिणा कुच तिचेचि जयांप्रति हो गणा ॥] उपजाति. [कामी निजस्त्रीकुचकुड्मलाचा, जसा करीतो उपभोग साचा । यथेच्छ तैसा उपभोग त्यांचा, करोनियां तो अधिप प्रजांचा ॥ सह्याख्य जो पर्वत थोर आहे, नितंब जाणों क्षितिचाच पाहे, । समुद्ररूपी बहु भव्य वस्त्र, राहे दुरी सोडुनि ज्या विचित्र ॥ स्त्रीच्या नितंबाप्रति वस्त्रहीना पती, जसा आक्रमितो मुजाणा, । तसा तया आक्रमुनी विशाळ, सेनेसवें जाय तई नृपाळ ॥].

त्यांसि नमुनि जिष्णु म्हणे, 'या, या [1]हृदयीं रहा, असीं न रहा, ।
[2]आधीं वीररसीं, मग बुडवावा सद्यशोरसीं नर हा.' ॥ ११९
शिरतां अस्त्रें चित्तीं, निर्[3]जतेजें भानुला मनीं कढवी, ।
चढवी गुण गांडीवीं [4]तन्नादें [5]कंप महिसही पढवी. ॥ १२०
उत्तर म्हणे, '[6]खरा तूं, नाहीं कोणीच कीं परि सहाय, ।
म्हणतों मनांत पार्था ! बहु [7]वनसार्थाधिपप्रपरिस 'हाय !' ॥ १२१
हांसुनि जिष्णु म्हणे, 'गा ! तुजला असहाय पार्थ कां गमला ? ।
आहे प्रसाद गुरुंचा, कोण अधिक [8]यापरीस सांग मला ? ॥ १२२
मागें [9][10]युद्धें केलीं, म्हणवूनि जनांत घेतलें धन्य; ।
तेव्हां गुरुप्रसादाहूनि मज सहाय कोण तो अन्य ? ॥ १२३
असतां द्रोण [11]सुरेश्वर हरि हर हे गुरु समर्थ, असहाय ।
एकाकी पार्थ कसा ? न म्हणावें त्यजुनि [12]वीररस 'हाय !' ॥ १२४

अध्याय चवथा.

स्मरतांचि [13][14]वानरांकध्वज गगनांतूनि उतरला महिला, ।
तो [15]स्थापिला रथीं [16]त्यां श्रीकृष्णसखें शमीतळीं पहिला. ॥ १

---

१. या माझ्या हृदयांत—प्रयोजनकाळीं स्मृतिगोचर व्हा. (नीलकंठ.) २. हें अर्ध पंतांच्या प्रतिभास्फूर्तीचें आणि सर्वसमर्पक योजनाचातुर्याचें ज्ञापक होय. यास मूळांत आधार नाहीं. येथेंही पंतांनीं मूळावर कडी केली आहे यांत संदेह नाहीं. ३. अर्जुनाचें दुःसह तेज वृद्धिंगत झाल्यामुळें सूर्याला जणुं काय कढ आला—असा भाव. ४. धनुष्याची दोरी—प्रत्यंचा. ५. त्या गांडीवाच्या नादानें (टणत्कारानें). ६. भूमिकंप झाला—असा भाव. ७. तूं खरोखर मध्यम पांडव. ८. वनांत फिरणाऱ्या काफल्याच्या नायकापेक्षां. ९. ब्यास्त हायहाय म्हणतो=खेद मानतों. [श्लोक ३३-३४.] १०. द्रोणाचार्यांची कृपा मजवर आहे. [शक्र, वैश्रवण, यम, वरुण, पावक, कृप, कृष्ण, माधव, आणि पिनाकपाणि शिव यांची कृपा मजवर आहे—असें मूळांत आहे. श्लो० ४०-४१.] ११. या अर्जुनाहून. १२. घोषयात्राप्रसंगीं गंधर्वांशीं युद्ध, देवदानवसंकुल खांडवदाहप्रसंगयुद्ध, निवातकवच आणि पौलोम यांच्याशीं युद्ध, पांचालीस्वयंवरोत्तर राजांशीं युद्ध, इत्यादि युद्धप्रसंगीं अर्जुनास कोणी सहाय नव्हता असें वर्णन मूळांत आहे. [श्लोक ३६-३९.] १३. इंद्र. १४. वीरोत्साह, धैर्योत्साह. १५. वानर(मारुति)रूप आहे अंक (चिन्ह) ज्यावर असा (ध्वज), वानरांक आहे ध्वज ज्याचा असा (रथ). अर्जुनास अग्नीनें दिलेल्या रथाचें वर्णन महाभारत—आदिपर्व—अध्याय २२५ श्लोक १०-१७ यांत पुढें लिहिल्याप्रमाणें केलें आहे:—ह्या रथास दिव्य घोडे जोडलेले होते,

जातां [1]कुरुकटकावरि वाजविला दिव्य [2]देवदत्त [3]दैर, ।
[4]तो [5]होय जनां जैसा [6]कल्पांतीं [7]रुद्रदेव [8]दैत्तदर. ॥ २
भ्याला उत्तर त्यातें जिष्णु म्हणे, 'पावलासि कांप दरें, ।
अद्यापि बांधिलेंसे तुझिया मतिनें अधैर्य कां पदरें ?' ॥ ३
तो वैराटि म्हणे, 'गा ! कोणाचाही असा न [9]दर वाजे, ।
बा ! लागले असावे [10]अमरपुरींचेहि आजि दरवाजे. ॥ ४

आणि त्याच्या ध्वजस्तंभीं कपिवर्य (मारुति) होता, ते घोडे शुभ्रवर्ण असून गंधर्वांचे होते, आणि त्यांच्या कंठीं हेममाला घातलेल्या होत्या, ज्याप्रमाणें पांढऱ्या अभ्रांची (ढगांची) कांति असते त्याप्रमाणें त्या अश्वांची कांति होती; व त्यांचा वेग मनोवायुसम होता. ह्या रथावर सर्व साहित्य अनुकूल ठेविलें असून त्याचा देव किंवा दानव यांकडून कधींहीं पराजय होणें शक्य नव्हतें. ह्याचा आवाज मोठा असून हा रथ तेजस्वी होता. व त्यावर संपूर्ण रत्नें जडविल्यामुळें मनोरम होता. सकलभुवनप्रभु जो **भौमन** म्हणजे विश्वकर्मा, यानें तपोबलानें हा रथ प्रथमतः उत्पन्न केला; प्रजापतीनें सूर्याप्रमाणें त्याला अवर्णनीय कांति दिली आहे; ह्यावर आरोहण करून सोमराजानें दानवांस जिंकिलें होतें. नूतन मेघांप्रमाणें त्याची कांति दिसत असून तो तेजाच्या योगानें जळतोच आहे कीं काय असा भास होई. ह्याचा ध्वजस्तंभ सुवर्णाचा असून उत्कृष्ट व सुंदर होता. त्यावर दिव्य वानर (मारुति) बसला असून त्याचें शरीर सिंहाप्रमाणें किंवा व्याघ्राप्रमाणें भीतिप्रद दिसत होतें व तो अगदीं ध्वजाच्या वर बसलेला असतां सर्व जाळूं इच्छितो कीं काय असा शोभत होता. ध्वजावर दुसरींही अनेक प्रकारचीं मोठमोठीं भूतें होतीं, व त्यांचा आवाज ऐकल्याबरोबर शत्रुसैन्य बेशुद्ध व्हावयाचें. [पुढें गीति ८१ पहा.] अर्जुनानें उत्तराचा रथ शमीवृक्षाच्या खालीं ठेऊन आपल्या रथाचें चिंतन केलें तेव्हां तें जाणून अग्नीनें प्रसाद म्हणून पूर्वी दिलेला वानरलक्षणध्वजयुक्त, दिव्यरूप, मनोरम आणि विचित्रांग असा रथ पृथ्वीवर पाठविला–असें वर्णन आहे. [अ० ४६ श्लो० १-६.] १. तो उत्तर. १७. त्या विजयरथावर.

१. कौरवसैन्यावर. २. देवदत्तनामक शंख. [देवदत्त हें अर्जुनाच्या शंखाचें नांव. देवानें दिलेला तो देवदत्त. या स्थळीं देव या शब्दानें इंद्रदेवाचें ग्रहण केलें पाहिजे. अर्जुनानें एका प्रसंगीं दानवयुद्धांत इंद्रास साहाय्य केलें होतें तेव्हां इंद्रानें प्रसन्न होऊन हा शंख अर्जुनास दिला. मोरोपंतकृत वनपर्व–अध्याय ५ गीति ११६-११७, काव्यसंग्रह पृ० ९१; महाभारत–वनपर्व–अध्याय १६८ श्लोक ८४-८५ पहा. कृष्णाच्या शंखाचें नांव पांचजन्य, भीमाच्या पौंड्र, धर्माच्या अनंतविजय, नकुलाच्या सुघोष आणि सहदेवाच्या मणिपुष्पक अशीं भिन्नभिन्न नांवें होतीं.] ३. शंख. ४. अर्जुन. ५. प्रलयकालीं. ६. महादेव. ७. दिलें आहे भय ज्यानें तो. (रुद्रदेव.) ८. शंख. ९. अमरांच्या (देवांच्या) पुरीचे (नगरीचे)=अमरावतीचे.

ते गज दिग्गज भ्याले बहुधा धैर्यावसानद रवा जे; ।
वाटे श्रीवृषवाहनविभुचाहि रणीं असा न दर वाजे. ॥ ५
भ्याली बहुधा विद्युत् कांपतसे यांचियाचि निस्त्रानें, ।
मी किति? ज्याला भी श्री त्याला भ्यावें कसें न निःस्त्रानें? ॥ ६
अर्जुन तुम्हींच कळलें, ठेऊं द्या दर, न मानसा दर हो; ।
रक्षा धृति, आहें मी सूतपणीं हरिसमान सादर हो.' ॥ ७
हांसोनि म्हणे हरिसख, 'हो गाढासन विकंपधी धीट, ।
न धरीं वा! दर, हा दर सोदर दे वाजवूं पुन्हा नीट.' ॥ ८
ऐसें वदे, करी मृदुपूर्व जलजवादनीं मग जवा, जी! ।
तेव्हां त्या कुरुकटकीं हगले मुतले समस्त गज वोजी. ॥ ९
द्रोण म्हणे, 'न दिसे जय, कां करितां औननें नत? पहा रे! ।

---

१. दिग्गज=दिक् म्हणजे दिशा आणि त्यांच्या ठिकाणीं स्थापिलेले जे गज ते दिग्गज. पृथ्वीला धरून स्थिर ठेवावी म्हणून प्रत्येक दिशेच्या ठायीं ठेविलेला जो मोठा हत्ती त्याला दिग्गज म्हणावयाचें. हे ऐरावत, पुंडरीक, वामन, कुमुद, अंजन, पुष्पदंत, सार्वभौम व सुप्रतीक असे आठ असून क्रमानें पूर्वादि आठ दिशांचें संरक्षण करतात—अशी पौराणिक कथा आहे. २. धैर्यलोपप्रद रवांला (नादांला, घोषांला). जे गज ते बहुधा धैर्यावसानदरवा भ्याले ते दिग्गज (होत)—असा अन्वय. ३. शिवाचाही. [श्रीवृष (नंदी) आहे वाहन ज्याचें तो विभु (शंकर).] ४. 'विद्युत्' हा शब्द संस्कृतांत स्त्रीलिंगी आहे म्हणून क्रियापदही तदनुरूप आहे. ५. याच्याच. ६. शब्दानें. ७. माझा काय पाड आहे, माझी कथा कशाला पाहिजे? मी तर बोलून चालून यःकश्चित् मनुष्य. ८. दरिद्रानें. ९. राहूं द्या. १०. शंख. ११. भय. १२. सारथ्यपणांत. १३. कृष्णासारखा. १४. अर्जुन. १५. दृढ आहे आसन ज्याचें असा. (बळकट बैस. आतां रथावर चांगला सांभाळून बैस.) १६. स्थिरबुद्धि, 'कंपरहित ज्याची बुद्धि तो—निर्भय. १७. भय. १८. शंख. या पद्यांत 'दर' पद अनेकवार आल्यामुळें हें एक प्रकारचें यमकच झालें आहे. यास 'मध्ययमक' असें नांव देतां येईल. १९. मनापासून. [अध्याय ४६ श्लो० २०.] २०. शंख वाजविण्यांत. पहिल्यानें जें जलजवादन (शंखवादन) मृदु होतें त्यांत नंतर जवा (वेगा) करी. २१. वेगा. २२. घोडे. २३. अर्जुनानें शंखाचा नाद केला तेव्हां दशदिशा आणि गिरिगुहा दणाणून गेल्या, उत्तर धावरून गेला आणि त्या शंखशब्दानें रथनेमिस्वनानें आणि गांडीवघोषानें भूकंप झाला. तेव्हां द्रोण म्हणाला. [अ० ४६ श्लो० २१-२३.] २४. अनेक उत्पात होतात यांवरून जयप्राप्तीची आशा नाहीं—असा भावार्थ. रथाचा निर्घोष, मेघगर्जना, भूकंप, शस्त्रांचा तेजोभंग, अश्वांच्या हेषणाचा अभाव, अग्निप्रभालोप, मृगांचा घोर रव, वातोत्पात, गोमायुरोदन, उल्कापात इत्यादि अशुभ उत्पात झालेले पाहून द्रोणाला जयाशा दिसली नाहीं. २५. मुखें. २६. नेत्र, खालीं वांकलेलीं.

आला विजय, जयाचें श्रीशंभुतपापुढें न तप हारे.' ॥ १०
गांधार म्हणे, 'गुरुजी! पैण न करुनि पूर्ण हौ प्रगटला, हो!।
पुनरपि वनवास करो गुरुघातकपातक प्रगट लाहो.' ॥ ११
कर्णाद्यासांसि म्हणे, 'तुमचे विजयी असोत हात रणीं;।
शरपटलाच्छादित हो अर्जुनशस्त्रप्रताप हा तरणी.' ॥ १२
'गुरुजींस काय पुसतां? चापीं गुण मद्वचेंचि चढवा, हो!।
याला हेंचि म्हणावें कीं आम्हा धर्मशास्त्र पढवा, हो! ॥ १३
प्रियशिष्यधनंजयगुण वर्णुनियां यांसि हृदय निववूं द्या,।
उत्पातोत्प्रेक्षेनें जरि आम्हा भिववितात भिववूं द्या. ॥ १४
पढवावें मात्र इहीं, भेदावें परहृदब्ज कटुकवचें;।
कीं दुरुनि दिसावे हे प्रेक्षकदृष्टीस युद्धपटु कवचें. ॥ १५

---

१. "ज्याचें (ज्या अर्जुनाचें) तप (तपश्चर्या) श्रीशंभूच्या तपापुढें (सामर्थ्यापुढें) न हारे—असा अन्वय. ह्याची कथा अशी आहे कीं, पाशुपतास्त्र मिळावें म्हणून अर्जुन हिमालयावर शिवप्रसादार्थ उग्र तप करीत असतां त्याच्या बलाची परीक्षा पाहण्याकरितां शिवानें भिल्लाचें रूप घेतलें आणि एक रानडुकर उत्पन्न केला. तो रानडुकर अर्जुन तप करीत होता तेथून कांहीं अंतरावरून जातांना त्यावर दोघांनीं एकदम बाण सोडून त्याचा प्राण घेतला, आणि तो मीं मारला असें म्हणून दोघेही त्याविषयीं भांडूं लागले आणि हातघाईवर आले. तेव्हां अर्जुनानें महान् पराक्रम करून शिवाला जेर केलें; तेणेंकरून शिव प्रसन्न होऊन त्यानें अर्जुनास पाशुपतास्त्र दिलें; ह्या कथेस लक्षून हें लिहिलें आहे". [नवनीत.] [द्रोणाच्या भाषणांत त्या समयीं होणाऱ्या उत्पातांचा आणि अपशकुनांचा सविस्तर उल्लेख आहे त्यास पंतांनीं टाळा दिला आहे. अ० ४६ श्लो० २४-३३ पहा.] २. दुर्योधन. ३. हे द्रोणचार्या! [मूळांत दुर्योधन भीष्मास बोलतो असें आहे. अ० ४७ पहा.] ४. प्रतिज्ञा. ५. हा अर्जुन. ६. गुरुहत्या करणाराचें पातक याला लागो. ७. स्पष्ट. ८. लाभो, मिळो. ९. कर्ण आदिकरून आप्तांस. १०. बाणांच्या (शरांच्या) समुदायानें (पटलानें—पडद्यानें) आच्छादित; (पक्षीं) शरांच्या (जलांच्या) पटलांनीं (पडद्यांनीं)=मेघांनीं आच्छादित (झांकलेला). ११. अर्जुनाच्या शस्त्रांचा प्रताप. १२. सूर्य. १३. हें (गीति १३-१६) कर्णाचें भाषण आहे. [अ० ४७ श्लो० २०-३४ पहा.] १४. गुरु द्रोण कारुणिक आणि अहिंसादर्शी आहेत, त्यांना युद्धांत विचारण्याचें कारण नाहीं असें सूचवून कर्ण द्रोणाचा उपहास करतो. १५. दोरी. १६. माझ्या वचनानेंचि. १७. द्रोणाचार्यानें आम्हास पाहिजे तर धर्मशास्त्र पढवावें, त्यांना तेंच शास्त्र कळतें, त्यांची युद्धशास्त्रांत कांहीं सल्लामसलत घेण्याची जरूरी नाहीं, तें युद्धशास्त्र आम्ही जाणतों, यास्तव त्यांत आमची मसलत घेतली पाहिजे आणि आमच्या आज्ञेप्रमाणें युद्धारंभ झाला पाहिजे—असा कर्णाचा कटाक्ष दिसतो. १८ अशुभचिन्हांच्या शंकेनें. १९. यांनीं. २०. दुसऱ्याचें हृदयकमळ. २१. कडु भाषणानें. २२. किंवा. २३. पाहणाराच्या दृष्टीस. २४. युद्धाविषयीं कुशल, रणचतुर. २५. कवच धारण केल्यामुळें.

प्रार्थुनि पुढें करावे हे यज्ञीं, कीं [३]सुभोजनावसरीं, ।
सिंधूंत तरेल कसी जी केली [२]केलिहेतु नाव [३]सरीं'. ॥ १६
खळकृतगुरुनिंदेतें वर्णील कधीं न विस्तरें [४]सुकवी; ।
कीं [६]ती श्रीगुरुभक्तिप्रेमामरपादपांकुरा [७]सुकवी. ॥ १७
कर्ण म्हणे, 'सत्य [८]वदसि, परि आजि तुझ्या नसो मनीं [१०]कांहीं, ।
यद्यपि [१२][१३]समरोत्साह त्यजिला अर्जुनभयें [१३]अनीकांहीं. ॥ १८
जावोत गोधनातें घेउनि हे, [१५]कीं उगेचि राहोत, ।
पाहोत युद्धकौतुक, परि [१६]भीतिनदींत हे न वाहोत. ॥ १९
ख्यात जगांत धनंजय, याहुनि मी कर्ण काय गा! ऊन? ।
गाती गातिलहि कवी, स्वगुण स्वमुखेंचि काय गाऊन? ॥ २०
[२०]होत सिद्ध विद्याधर मुनि [२२]गंधर्व देव शुद्ध रण, ।

---

१. सुग्रासभोजनाच्या समयीं. २. केलि (क्रीडा) आहे हेतु (उद्देश) जीच्या अशी (नाव—नौका). ३. सरोवरांत. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. ४. दुष्ट कर्णानें केलेल्या द्रोणाचार्यनिंदेतें. ५.कविश्रेष्ठ. ६. गुरुनिंदा. ७. श्रीगुरुभक्तिप्रेमरूप कल्पवृक्षाच्या अंकुरास. श्रीगुरुभक्तिचें प्रेम हाच अमरपादपाचा (कल्पवृक्षाचा) अंकुर (मोड—रोपा) ज्याला. ८. शुष्क करी, वाळवून टाकी. गीति १७ वी ही कव्युक्ति आहे. ९. अध्याय ४८ यांत ही कर्णाची विकत्थनपर उक्ति दुर्योधनाला संबोधून त्याच्या म्हणण्याला उत्तर म्हणून आहे. १०. गीति १२ पहा. ह्या गीतींत दुर्योधनाची उक्ति कर्णास आहे. [द्रोण, कृप, द्रौणि, विकर्ण इत्यादि वीर हे संभ्रांतमनस्क आणि निरुत्साह वसले आहेत. यांस समर करण्याचा उत्साह राहिला नाहीं, पण युद्धावांचून आपणांस अन्य कांहीं श्रेयस्कर नाहीं—इत्यादि दुर्योधनाचें भाषण मूळांत आहे त्यास अनुलक्षून ही कर्णोक्ति आहे. (अध्याय ४७ श्लोक १६-१७ पहा). पण हें दुर्योधनभाषण पंतांनीं गाळून टाकिलें असल्यामुळें प्रस्तुत कर्णोक्तीचा कथार्थसंदर्भ थोडासा विसंगत असा भास होतो. तेंच दुर्योधनाचें भाषण समग्र दिलेलें असतें म्हणजे अर्थसंदर्भ सुसंगत आणि सुगम झाला असता.] ११. उत्साहभंगलेंश, निराशालव. १२. जरी. १३. समर (युद्ध) करण्याचा उत्साह. १४. सेनांहीं.१५. किंवा [कीं याचे अर्थ विकल्प, प्रश्न, आधार, कारण असे आहेत.] १६. ही अतिशयोक्ति आहे. १७. कमी. (अ० ४८ श्लो० ८.) १८. आपल्या गुणांची स्तुति आपल्या मुखानें केली असतां काय फायदा आहे? कांहींच फायदा नाहीं, कारण तसें करणें म्हणजे स्वगुणांस लघुत्व आणणें होय. 'इंद्रोऽपि लघुतां याति स्वयं प्रख्यापितैर्गुणैः' हें संस्कृत वचन पंतांच्या वचनार्थीं ताडून पहावें. हा पाद सुभाषितरूप आहे. १९. कौरवपांडवीय संग्राम कोणकोण पाहत असत हें ह्या पद्यार्धावरून बरेंच निश्चित होतें. २०. ज्याला अणिमादि आठ सिद्धि प्राप्त झाल्या तो सिद्ध, अणिमादिगुणोपेत (विश्वावसुप्रभृति) सिद्ध. २१. विद्याधर=खड्गगुलिकांजनादिविद्याधारी कामरूपी खेचर. (जीमूतवाहन, पुष्पदंत, यांसारखा.) २२. गंधर्व=गंधं सौरभमर्वंतीति गंधर्वः. (तुंबुरु-हाहा-हुहु-प्रभृतिसारखा देवगायन.

करितों आजि सुयोधनहृच्छल्याचें सुखेंचि उद्धरण. ॥ २१
हो स्वस्थ, स्वमनस्था आधिनगा भरतसार्थपा! खाणीं, ।
मच्छरटंक सहाया कैंचें सामर्थ्य पार्थपाखाणीं? ॥ २२
म्यां जोडिलीं सदस्त्रें शस्त्रें झालींच आजि अनपार्थें, ।
देउनि दर्शन केलें माझें अंतिमात्र हृष्ट मन पार्थें. ॥ २३
श्रीभार्गवास्त्रतेजें भंगावें संगरांत सुत्राम्या, ।
आश्चर्य काय त्याच्या केलें जरि भग्न आजि पुत्रा म्यां.' ॥ २४
त्यासि कृप म्हणे, 'कर्णा! सुज्ञांहीं ऐकतांचि डोलावें, ।
ऐसेंचि बोलणें जरि, तरि पुरुषानें दहांत बोलावें. ॥ २५
तूं नीतिविरुद्ध वदसि साहस हें, फल न दे वचनयज्ञ, ।

---

१. दुर्योधनाच्या हृदयांतील कांट्याचें. (अध्याय ४८ श्लोक २१.) २. (अर्जुनाचा नाश करून) उपटून काढणें. ३. आपल्या मनांत असणाऱ्या. ४. आधि (चिंता)+नगा (पर्वताला) =मनोव्याधिरूप पर्वताला. ५. भरतसमुदायरक्षका, भरतसमूहनायका. ६. माझी शररूप टांकी. ७. अर्जुनरूप पाषाणीं.यांत 'रूपक' आहे. ८. उत्तम अस्त्रें. ९. उपयोगी, सफल. (अन्+अप+अर्थ=ज्यांपासून अर्थ (इष्टफल) गेला नाहीं अशीं.) १०. पुष्कळ. ११. संतोषित. १२. श्रीभार्गव+अस्त्रतेजें=जामदग्न्यापासून प्राप्त झालेल्या अस्त्राच्या तेजानें (प्रभावानें). द्रोणाचार्यांनीं कर्णास ब्रह्मास्त्रविद्या शिकविण्याचें नाकारिलें; कारण, त्या विद्येचे अधिकारी ब्राह्मण आणि क्षत्रिय मात्र होते. कर्ण हा सूतपुत्र म्हणून त्यास अधिकार नव्हता. तेव्हां तो महेंद्रपर्वतावर परशुरामाकडे गेला आणि 'मी भृगुकुलोत्पन्न ब्राह्मण आहें' असें मिथ्या सांगून अस्त्रविद्यासंपादनार्थ राहिला. कर्णानें आपल्या आचरणानें परशुरामास प्रसन्न केलें, तेव्हां त्यानें कर्णास अस्त्रविद्या पढविली. पुढें कर्णाचें कपट फार दिवस गुप्त न राहतां उघडकीस आलें, तेव्हां 'तुला ह्या अस्त्रविद्येचें युद्धप्रसंगीं विस्मरण होईल' असा जामदग्न्यानें याला शाप दिला. नंतर कर्ण खिन्नवदन होत्साता तेथून परत आला आणि 'मी विद्या संपादून आलों आहे' असें दुर्योधनास सांगून त्याजपाशीं राहिला. उद्योगपर्व–अध्याय १६८, शांतिपर्व–अध्याय ३, विराटपर्व–अध्याय ४८ श्लोक १८ पहा.] या जामदग्न्यास्त्राचा उल्लेख मूळांत आहे. पण ही परशुरामापासून प्राप्त झालेली अस्त्रविद्या समर्थी स्फुरद्रूप व्हावयाची नाहीं ही गोष्ट दुर्योधनास माहीत नव्हती. कर्णाचें कपट बाहेर कसें पडलें ही कथा शांतिपर्वाच्या ३ ऱ्या अध्यायांत आहे.] १३. समरांत. १४. इंद्रास. [सुत्रामन्=सुष्ठु त्रायते भुवनमिति सुत्रामा=जो भुवनाला उत्तम प्रकारें करून संरक्षितो तो सुत्रामा (इंद्र).] १५. इंद्राच्या पुत्राला (अर्जुनाला.) १६. अध्याय ४९. यांत कृपाचार्याचें भाषण आहे. १७. कर्णाचें भाषण 'सुज्ञांनीं ऐकतांचि डोलावें' अशा प्रकारचें नाहीं असें या पद्यानें सूचविलें. १८. नुसत्या बोलण्यानें फलप्राप्ति होत नाहीं; यज्ञापासून फल प्राप्त होतें, पण निरर्थक आणि नीतिविरुद्ध भाषणरूप यज्ञापासून फल मिळावयाचें नाहीं. १९. वचनरूप यज्ञ, शुष्क तोंडचा यज्ञ.

अद्भुत कर्म करुनिही बा! न वदति एकही वैच[3] नेयज्ञ.[2] ॥ २६
तूं भंगिसील कैसा? आला[3] बांधोनि काय हात रणीं? ।
सर्वाहितांधकारध्वंसकर[4] मनुष्यकाय[5] हा तरणी.[6] ॥ २७
ऐकेंचि खांडववनीं या पार्थें अग्नि तर्पिला, कर्णा[7]! ।
सर्वसुरांच्या स्वंधनुर्ध्वानेंचि[9] त्रास अर्पिला कर्णा. ॥ २८
एकेंचि भगवदनुजा[10] हरिली[11], भ्याला न लेश कलहाला, ।
जरि खवळला पिऊनि प्रभु[12] खलबलदलनदक्षबल हाला. ॥ २९
[13]एकेंचि ईश्वरासीं[14] केलें युद्ध प्रसिद्ध, राधेया[15]! ।
एकेंचि असुर[16] वधिले, तन्माया[17] एकही न बाधे यां.[18] ॥ ३०
एकेंचि जिंकिला तो गंधर्वाधीश चित्रसेन[19] रणीं, ।
[20]रोमांचिततनु होती वीरधनंजयपराक्रमस्मरणीं. ॥ ३१
एकें त्वां काय कधीं केलें[22] कर्णा! स्वकर्म वाखाण? ।
हीरकें[23] वीरकरगनवटकेंहि[24] चिरे न, जेंवि पाखाण.[25] ॥ ३२

---

१. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. हें कृपभाषण अन्योक्तिमय आहे. "अन्योक्ति हा एक अलंकार आहे. अन्य म्हणजे ज्यास किंवा ज्याविषयीं वास्तविक बोलावयाचें, त्यापेक्षां निराळा, आणि उक्ति म्हणजे भाषण, यावरून एकंदर अन्योक्ति शब्दाचा अर्थ असा होतो कीं, ज्याविषयीं किंवा ज्यास बोलावयाचें त्यापेक्षां निराळ्याविषयीं किंवा निराळ्यास बोलणें." × × × "या अलंकारांत अप्रकृत अर्थाच्या मिषानें प्रकृत मनुष्याची वगैरे मोठ्या खुबीनें निंदा किंवा स्तुति करितां येते. या अन्योक्तीच्या पद्यांत साधारण अर्थाकडे तात्पर्य असल्यामुळें ती प्रसंगोचित भाषणांतही फार उपयोगी पडते." (पद्यरत्नावली पृ० ३४.) २. नीतिवंत. ३. अर्जुन आला—असा संबंध. ४. सर्व शत्रुरूप तमाचा नाश करणारा. ५. मनुष्यदेहधारी. ६. सूर्य. ७. या कथेचा उल्लेख पंतकृत आदिपर्वात आहे. [आदिपर्व—अध्याय ३७ गीति ९३-९९. काव्यसंग्रह पृ० २१९-२२०.] ८. अ० ४९ श्लो० ५ पहा. ९. हे कर्णा. १०. धनुष्याच्या टणत्कारानें. ११. सुभद्रा. (भगवंताची धाकटी बहीण.) १२. श्लोक ६ पहा. १३. बळराम. [बळरामास सुरा फार आवडत असे—अशी प्रसिद्धि आहे. मेघदूत—पूर्वमेघ—'हित्वा हालामभिमतरसां रेवतीलोचनांकाम्' इत्यादि ४९ वा श्लोक पहा.] १४. शत्रुसैन्याचें दलन (नाश), करण्यांत दक्ष (कुशल—समर्थ) आहे बल ज्याचें असा (प्रभु) खलबलदलनदक्षबल प्रभु हाला पिऊनि जरि खवळला तरी त्याच्याशीं कलहाला (कलह करण्यास) [अर्जुन] लेश न भ्याला—असा अन्वय. १५. एकऱ्यानेंच. १६. किरातरूप शंकराशीं. १७. निवातकवच आणि कालखंज दानव. (श्लो० १०.) १८. त्या असुरांची माया. १९. या अर्जुनाला. २०. पंतकृत वनपर्व—अध्याय ७ गीति २७-५८ पहा. [काव्यसंग्रह—पृ० १०८-११३.] २१. विस्मयानें अथवा भयानें ज्यांच्या आंगावर कांटा उत्पन्न झाला असे (वीर). २२. अ० ४९ श्लो० ११ पहा. २३. हिरा. २४. वीरांच्या करांत (हातांत) असलेल्या नवीन टांकीनें. २५. पाषाण. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे.

घालूं पाहसि [1]दंष्ट्रा उपडाया [2]अहिमुखांत [3]आंगोळी, ।
ऐसें साहस करितां होइल [4]तेनुची पळांत रांगोळी. ॥ ३३
[5]कंठीं बांधोनि शिळा [6]बाहुबळें सागरांत तरशील, ।
परि साहसें न विजया, हें [7]शील नसो, असो इतर शील. ॥ ३४
[8]सैंवहि मिळोनि भांडूं, कर्णा! व्हावें न [9]साहसा मान्य, ।
यत्नें नृपयश रक्षूं आजि, नव्हे [10]श्वेतवाह सामान्य.' ॥ ३५
[11]द्रौणि [12]म्हणे, 'एकाकी तूंचि [13]क्षम [14]जिष्णुवारणा, [15]सूत! ।
बहुधा बद्ध करीलचि [16]लूतेचें [17]जिष्णुवारणा सूत. ॥ ३६
करिसि [18]विकत्थन, जिंकुनि नेलें नसतांहि गोधन [19]शिवेतें.' ।
[20]सत्प्रिय शुचि यश कर्णा! भलत्या न करूनि शोध न शिवे तें. ॥३७
साहे [21]विविधोपद्रव, वाहे पृष्ठीं [22]चतुर्विधें भूतें, ।

---

१. दाढा. २. सर्पमुखांत. ३. प्रदेशिनीतर्जनी. (अ० ४९ श्लो० १३.) हाच सापाचा दाखला मूळांत आहे. ४. देहाची. ५. भुजसामर्थ्यानें. हा दाखला मूळांत आहे (अ० ४९ श्लो० १६ पहा). ६. हा साहस करण्याचा स्वभाव. गळ्यांत दगड बांधून समुद्र तरून जाणें अत्यंत दुष्कर आहे, परंतु साहस केलें असतां तेंही साध्य होईल, पण साहस करूनहीं विजयाला (अर्जुनाला) जिंकून पार पडणें साध्य नाहीं; मग तुझा स्वभाव साहसप्रिय असला अथवा नसला (अन्य प्रकारचा असला) तरी त्यापासून काय हित व्हावयाचें आहे? तुझा स्वभाव, हे कर्णा! साहसी असो अथवा नसो, त्यापासून इष्टफलप्राप्ति व्हावयाची नाहीं. ७. द्रोण, दुर्योधन, द्रौणि, भीष्म इत्यादि सकल वीर. ८. अविचारी कर्माला. (अ० ४९ श्लो० २१.) ९. अर्जुन. १०. अश्वत्थामा. ११. अध्याय ५० वा यांत द्रौणिभाषण आहे. १२. समर्थ. १३. अर्जुनाला निवारण्याविषयीं. १४. हे कर्णा. १५. कोळ्याचें. [लूता स्त्री तंतुवायोर्णनाभमर्कटका: समाः' इत्यमरः, 'लूता तु रोगे पिपीलिकोर्णनाभयोः' इति हेमचंद्रः.] १६. इंद्रगजास, ऐरावताला. १७. दोरा. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. या गीतींत सप्ताक्षरी अंतिम यमक आहे. १८. व्यर्थ बडबड. १९. नगराच्या सीमेप्रत. २०. कर्णा! [जें] सत्प्रिय शुचि यश तें शोध न करूनि भलत्या न शिवे—असा अन्वय. साधुप्रिय आणि धवल असें जें यश आहे तें चांगला तपास केल्याशिवाय—शहानिशा केल्याविना—भलत्या सलत्या मनुष्याला सेवीत नाहीं. उत्तम यश उत्तम मनुष्यालाच मिळतें, इतरांस तें अप्राप्य होय. हे कर्णा! तूं अद्याप गोधनहरण केलें नाहींस आणि गोधन घेऊन हास्तिनपुरच्या शिवेंपावेतों आला नाहींस, असें असतां व्यर्थ बडबड कां करतोस, बडबड केल्यानें शुचियशाचा लाभ होत नसतो—असें म्हणण्याचें तात्पर्य. [अ० ५० श्लो० १.] २१. नानाप्रकारचे उपद्रव. २२. चार प्रकारचे प्राणी:—उद्भिज, अंडज, स्वेदज व जरायुज. उद्भिज म्हणजे भूमि भेदून, अंकुरादिरूपानें वर येणारे वृक्ष, तृण इत्यादि; अंडज म्हणजे अंड्यांपासून झालेले पक्षी, सर्प इत्यादि; स्वेदज म्हणजे घामानें आणि

आहे उगीच कर्णा! न कधीं बोलोनि दाखवी भू[1] तें. ॥ ३८
जाळी ज्वलन[2], न बोले; न वदेचि जरि प्रकाश करि तरणी[3]; ।
न वदोनि कुलज[4] पुरुषहि आले स्वयशःप्रकाश करित रणीं. ॥ ३९
पावूनि सर्वमहितें विगुणाहि[7] गुरूसि जे कुलज नर ते ।
सत्कारिति, अलि[8] कमलीं, तेंवि गुरुपदीं महाकुलजन[9] रते, ॥ ४०
राधेया[10]! उद्धत तूं, हा दुर्योधनहि फार उद्धत, रे! ।
गुरुनिंदक हो स्पष्ट व्यसनांत बुडे अशुद्ध, शुद्ध तरे. ॥ ४१

उबेनें उत्पन्न झालेले मत्कुणादि, आणि जरायुज म्हणजे मनुष्यपश्वादिक प्राणी. 'जरायु' नांवाचे चर्मानें मनुष्य पश्वादिकांचे गर्भ वेष्टित असतात, म्हणून त्यांस 'जरायुज' म्हणतात. जरायु म्हणजे व्यावहारिक माहाराष्ट्र भाषेंत 'वार' म्हणतात, तेव्हां ज्या प्राण्यांस उपजतेवेळीं वारेचें वेष्टण असतें ते प्राणी जरायुज. स्वेदज, अंडज आणि उद्भिज्ज यांजविषयीं विशेष माहिती मनुस्मृतींत आहेः—'पश्वश्व मृगाश्चैव व्यालाश्चोभयतोदतः । रक्षांसि च पिशाचाश्च मनुष्याश्च जरायुजाः ॥ ४३ ॥ अंडजाः पक्षिणः सर्पा नक्रा मत्स्याश्च कच्छपाः । यानि चैवं प्रकाराणि स्थलजान्यौदकानि च ॥ ४४ ॥ स्वेदजं दंशमशकं यूकामक्षिकमत्कुणम् । उष्मणश्चोपजायंते यच्चान्यत्किंचिदीदृशम् ॥ ४५ ॥ उद्भिज्जाः स्थावराः सर्वे बीजकांडप्ररोहिणः । ओषध्यः फलपाकांता बहुपुष्पफलोपगाः ॥ ४६ ॥ [म०स्मृ० अ० १ ला.] भावार्थः—पशु, मृग, दोन दंतपंक्तींनें युक्त असे व्यालादिक (सिंहादिक), राक्षस, पिशाच, आणि मनुष्य हे जरायु, म्हणजे गर्भाचें जें आवरणचर्म त्यांत प्रथम होऊन नंतर त्यांतून उत्पन्न होतात अतएव ते जरायुज होत. पक्षी, सर्प, मगर, मत्स्य आणि कांसव हे प्रथम अंडाचे ठायीं उत्पन्न होतात म्हणून हे अंडज होत, स्थलाचे ठायीं होणारे सरठादिक व उदकाचे ठायीं होणारे शंखादिक ते क्रमानें स्थलज व औदक जाणावे. डांस, माशा, यूका, मक्षिका, ढेंकूण हे घर्मापासून उत्पन्न होतात, अतएव ते स्वेदज होत आणि असे जे दुसरे प्राणी उष्मापासून होतात ते उष्मज होत. बीज व भूमी यांचा भेद करून जे उत्पन्न होतात (वृक्ष) ते उद्भिज्ज होत. ते दोन प्रकारचे आहेत; कितीएक बीजापासून होणारे व कितीएक त्या त्या शाखा भूमींत लावल्यानें होणारे. जे कितीएक [व्रीहि, यव इत्यादि] वृक्ष पुष्कळ फलपुष्पांनीं युक्त होऊन फलें पक्व झाल्यानेंच आपण नष्ट होतात ते औषधि होत. [म० स्मृ० प्रा० भा०].

१. पृथ्वी. २. अग्नि ३. सूर्य. [अ० ५० श्लो० ३ रा हा गीति ३८ आणि गीत्यर्ध ३९ यांस आधार आहे.] ४. कुलीन. ५. आपल्या यशाचा उदय. या गीतींत अष्टाक्षरी यमक अंतीं आहे. ६. पृथ्वीतें. [न्यायानें वागणारे पुरुष पृथ्वी जिंकूनही गुणहीन गुरूचा सत्कार करतात, पण तूं (कर्णा!) अन्यायानें पांडवांतें जिंकून साधु असे जे गुरु त्यांची निंदा करतोस—असा भाव. (अ० ५० श्लो० ७.] ७. गुणरहितांहि. ८. भ्रमर. ९. मोठ्या कुलांत झालेला पुरुष. १०. रममाण होतो, आसक्त होतो. ११. राधापुत्रा! कर्णा! [कर्णाला सूत, सूतपुत्र, राधेय, कानीन, वसुषेण, वैकर्तन, वृष अशीं नांवें आहेत.]

छद्मद्यूतें केल्या सत्सर्वस्वापहारकर्मातें ।
पुरुषार्थ श्लाघ्य असें मानुनि पावेल कोण शर्मातें? ॥ ४२
कोण्या रणांत पांडव जिंकुनि तद्राज्य साधिलें वदे रे! ।
कृष्णेसि जिंकिलें त्वां कोण्या समरांत सांग, रे! सदरे! ॥ ४३
तुज कीर्ति, पांडवां अपकीर्ति, म्हणे आयकावि कैतम रण? ।
सावध रे! कां घेसी मंदा! खलनायका! विकत मरण? ॥ ४४
सिंहासि द्वेष करुनि कोण बळी वारणांत उरेणारे? ।
कां भ्रमलासि? कसा त्वां जय पावावा रणांत उरणा! रे! ॥ ४५
अरिच्याहि सद्गुणातें प्रेमें वाखाणितात सुज्ञानी ।
खळ हो! मग वर्णावा कां न जगन्मान्य शिष्य सुज्ञांनीं? ॥ ४६
तुजहुनि विशिष्ट वीर्यें, चापीं जो शक्र, संगरीं जिष्णु, ।
कोणा सुज्ञासि नव्हे तो पूज्य स्तुत्य शंभुसा जिष्णु? ॥ ४७
सुत शिष्य सम, तयांत व्याधी खलमति, खरे असु ज्ञाते, ।

---

१. कपटद्यूतानें. (अ० ५० श्लो० ८ पहा.) २. केलेल्या. ३. साधूच्या सर्वस्वाचे हरणकर्मास. ४. पुरुषानें संपादावयाचे अर्थ. (धर्म, अर्थ, मोक्ष आणि काम.) ५. स्तुत्य. ६. सत्सर्वस्वापहार-कर्माला श्लाघ्य पुरुषार्थ असें मानुनी. ७. सुखातें. ८. कोणत्या. ९. अध्याय ५० श्लो० १०-१३ पहा. १०. धर्म, भीम इत्यादि. ११. बोल. १२. साधुद्वेष्ट्या! (कर्णा!) १३. कोणतें. १४. गजांत. १५. तगणारे. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. १६. मेंढ्या. [उरण=एडक. 'मेढ्रोरभ्रोरणोर्णायुर्मेषवृष्ण्य एडके' इत्यमरः.] १७. बुधजन, पंडित. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. १८. जगतास पूज्य असा. १९. छात्र. (अर्जुन.) २०. पंडितांनीं, (द्रोणाचार्य प्रमुख गुरुजनांनीं.) २१. अधिक. २२. पराक्रमानें. २३. धनुष्यामध्यें जो इंद्रसम (अ० ५० श्लो० १९). २४. युद्धांत. २५. जयशील, जित्वर. ['जिष्णुर्नो वासवेऽर्जुने । जित्वरे वाच्यवत्' इति मेदिनी.] [जिष्णु–जि आणि भू या धातूंला ष्णु प्रत्यय लागून योग्यता, कुल, शील, जाति, असे अर्थ दाखविणारीं विशेषणात्मक नामें होतात जसें:– भू+ष्णु=भूष्णु (भविष्णु=असणारा), जि+ष्णु=जिष्णु (जिंकण्यास समर्थ).] येथें जिष्णु म्हणजे कृष्ण (वासुदेव) असा अर्थ घेतला तरी चालेल. मूळामध्यें 'धनुष्यमरराटसमं वासुदेवसमं युद्धे' (अ० ५० श्लो० १९) असें आहे त्यास अनुसरून जिष्णु म्हणजे कृष्ण हा अर्थ सुसंगत दिसतो. २६. शंकरासारखा. २७. अर्जुन. २८. प्राण. २९. सुत (पुत्र) [व] शिष्य [हे] सम (सारखे–समान) [होत]. त्यांत (त्या सुत-शिष्यांमध्यें) [जे] खलमति (दुष्टबुद्धि सुत व शिष्य ते) व्याधी (व्याधी-सारखे पीडा करणारे) [होत.] [आणि त्यांमध्यें जे] ज्ञाते (सुज्ञ सुत व शिष्य) [ते] खरे (खरोखर) असु (प्राण) [होत.] पुत्र आणि शिष्य हे गुरूला सारखेच होत, पण त्यांत जे दुष्टबुद्धि असतात ते रोगासारखे पीडक होत आणि जे विचारशील असतात ते प्राणासारखें प्रिय गुरूला असतात.

प्रिय नसतील कसे जे साधुयशस्कर खरे असुज्ञ[1]! ते? ॥ ४८
केले[2] दुर्द्यूत[3] जसें, त्वां शक्रप्रस्थ[4] तें जसें हरिलें, ।
स्वसभेंत आणिलें त्वां साध्वीस जसें न भय मनीं धरिलें; ॥ ४९
आतांहि तसेंचि तुवां पार्थासीं धैर्य धरुनि भांडावें; ।
मांडावें कर्ण! शकुनिसंमत पांडित्य, अन्य सांडावें. ॥ ५०
पांचांसहि जो जिंकी सोडुनियां कुरुसभेंत[8] अक्ष[9] महा, ।
एकाशि शकुनिमामा जिंकाया काय आजि अक्षम[10] हा? ॥ ५१
आम्हीं आजि झगडतों, जरि येता तो विराट तरि त्यासीं ।
झगडोंना शब्देंही, पार्थासीं लेववहि[11] अघ न करित्यासीं.[12]' ॥ ५२
भीष्म[13] म्हणे, 'द्रोणे! तूं उत्तम वदलासि, कृपहि शुद्ध वदे, ।
धर्मन्यायोचित[14] जें तेंचि सुभाषण मनासि उद्बोध[15] दे. ॥ ५३

---

१. मूर्खा. २. गीति ४९-५० यांचें युग्म जाणावें. ३. कपटद्यूत. ४. उत्साहपूर्वक, परावृत्त न होतां, धैर्यानें. ५. इंद्रप्रस्थ–हिंदुस्थानाच्या उत्तरेकडे दिल्ली म्हणून यमुनेच्या कांठीं जें प्रसिद्ध शहर आहे त्याच ठिकाणीं भारतीययुद्धांत प्रसिद्धीस आलेलें इंद्रप्रस्थ नांवाचें शहर होतें. या शहराच्या सभोंवार खांडवप्रस्थ नांवाचें अरण्य होतें. पांडवांचा आपल्या मुलांबरोबर कलह होऊं नये, म्हणून धृतराष्ट्रानें, 'या ठिकाणीं शहर वसवून रहा,' असें पांडवांस सांगितलें. पुढें पांडवांनीं तें शहर वसविलें व त्याची रचना सर्वोत्कृष्ट झाल्यामुळें, त्याला 'शक्रप्रस्थ' असेंही म्हणूं लागले. भारतांतील प्रसिद्ध गोष्टी ज्या मयासुरसभा आणि राजसूययज्ञ, त्या याच ठिकाणीं घडल्या. हस्तिनापुराप्रमाणें इंद्रप्रस्थ हेंही कुरुदेशाच्या राजधानीचें शहर होतें. (भरतस्थलादर्श–पृ० ३१.) (मुक्तेश्वरकृत आदिपर्व–अध्याय ४६ ओंव्या १-२० पहा.) ६. युद्ध करावें. (श्लोक २२.) ७. शकुनीनें पसंत केलेलें पांडित्य (कपटरूप पांडित्य). ८. जो शकुनि कपटद्यूतानें जिंकी. ९. फांसे. १०. असमर्थ. या पद्यांत 'विषम' नामक अलंकार झाला आहे. एका पदार्थाच्या दुसऱ्या पदार्थाशीं भिन्नकाळीं झालेल्या संबंधांत अंतर (भेद) दर्शविला असला म्हणजे 'विषम' अलंकार झाला. जो शकुनि मामा पांचाही पांडवांस (द्यूतप्रसंगीं, जिंकी तोच शकुनि आज एकट्या अर्जुनाला जिंकण्यास असमर्थ आहे असा पूर्वीच्या व सांप्रतच्या संबंधांत भेद दाखविला आहे म्हणून हा 'विषम' अलंकार झाला. या अलंकाराचीं अन्य उदाहरणें:—(१) आदिपर्व–अध्याय १२ गीति ७८, (२) गदापर्व–अध्याय ९ गीति ८-१२, (३) गदापर्व–अध्याय १० गीति १४-१९, (४) गदापर्व–अध्याय ९ गीति २-३, (५) ऐषिकपर्व–अध्याय १ गीति ९.११.लेशही.१२.करणारांशीं. [अ० ५० श्लोक २७-२८.] गीति ३६-५२ यांत द्रौणिभाषण आहे. १३. हें भीष्मभाषण ५१ व्या अध्यायांत आहे. १४. धर्म व न्याय यांस योग्य उचित (ग्राह्य). हें गीतार्ध सुभाषितरूप आहे. या अर्धांत सुभाषणाची जी व्याख्या केली ती कोणास मान्य होणार नाहीं? 'हें गीतार्ध मूळांतील कोणत्या श्लोकाचें भाषांतर?' असा प्रश्न पंताला भाषांतरकार म्हणणारांस अवश्य केला पाहिजे. १५. हर्ष.

क्षत्रियधर्मे केवल इच्छितसे युद्ध कर्ण उत्साहें. ।
उचितचि, परंतु अनुचित करणें गुरुची दहांत कुत्सा हें. ॥ ९४
द्रोणद्रौणिकृपांहीं आजि करावी क्षमा, न कोपावें, ।
भेदें नसावा, बुध हो! भेदें स्वयश न पैरांसि ओपावें.' ॥ ९५
दुर्योधन नमुनि म्हणे, 'गुरुजी! मज अरिकरीं न सोपावें, ।
तेजोजननार्थ तसें वदलों, त्वन्मत्सरीं नसो, पावें.' ॥ ९६
हांसोनि द्रोण म्हणे, "आम्हां कोपों न देचि वत्सलता, ।
नसतें क्षमाकवच तरि हृदयीं त्वच्छब्द अशनिवत् सलता.' ॥ ९७
भीष्मासि मग म्हणे नृप, 'पुसतों अज्ञातवासपण पुरला, ।
कीं कांहीं मास तरी, पक्ष तरी, दिन तरी, असे उरला?' ॥ ९८
भीष्म म्हणे, 'गांधारे! पांडव पंडित खरे, न दे भ्रमती; ।
न भ्रमले; जे प्राकृत तेचि मनीं धरुनियां मद भ्रमती. ॥ ९९
कामी कोपी लोभी जे, संसारांत पावती भ्रम ते. ।
प्राकृत पंडित पांडव असते, तरि हेहि केंवि न भ्रमते? ॥ १००

---

१. क्षत्रियाच्या धर्मास अनुसरून. [अध्याय ५१ श्लोक १ पहा.] २. आचार्याची. (द्रोणाची.) ३. निंदा. (मागें गीति १३-१६ पहा.) ४. फितूर, विरोध. ५. शत्रूंस. [अध्याय ५१ श्लोक ६.] ६. अध्याय ५१ श्लोक १६ पहा. ७. उत्साहप्राप्त्यर्थ, वीरश्री प्राप्त व्हावी म्हणून, ईर्षा उत्पन्न व्हावी यासाठीं. ८. या द्रोणोक्तीला मूळांत आधार नाहीं, ही पंतांच्या पदरची आहे. ९. दयाळूपणा. १०. क्षमारूप कवच (चिलखत). ११. तुझा शब्द. (तुझें वचन.) १२. वज्रासारखा. १३. भीष्माला दुर्योधन म्हणतो. मूळांत (अध्याय ५१ श्लोक १८-२२) द्रोण भीष्मास बोलतो असें आहे. १४. दुर्योधन. १५. येथें 'पुसतों' च्या ठिकाणीं 'पुसतो' असें तृतीय पुरुषाचें एकवचनांत रूप योजावें म्हणजे ही गीति मूळांतील अर्थास अनुसरून आहे असें म्हणतां येईल. १६. स्वरूप प्रकट न करतां वास करण्याची प्रतिज्ञा. १७. किंवा. (येथें 'कीं' विकल्पार्थक आहे.) १८. दिवस, दिवसाचा अंश. १९. अध्याय ५२ श्लोक १. २०. हे दुर्योधना! २१. अल्पमती [दभ्र=अल्प. 'स्तोकाल्पक्षुल्लकाः श्लक्ष्णं सूक्ष्मं दभ्रं कृशं तनु' इत्यमरः.] २२. भ्रम पावले, चुकले. २३. हा गीत्यंश सुभाषितरूप आहे. २४. नीच. ['विवर्णः पामरो नीचः प्राकृतश्च पृथग्जनः' इत्यमरः.] या गीत्यर्धात 'प्राकृता'चें जें लक्षण केलें आहे तें सर्वमान्य नाहीं असें कोण म्हणेल? यापमाणेंच पंत हे आपल्या काव्यांत कोठें कोठें शब्दांच्या व्याख्या देतात त्या कोशकारांस फार उपयुक्त आहेत. २५. हें गीत्यर्ध सुभाषितरूप आहे. २६. [जर] पंडित पांडव प्राकृत असते, तरी (तर) हेही केंवि न भ्रमते?— असा अन्वय. हीं 'विरोधी संकेतबोधक' वाक्यें आहेत. जरी तरी या संकेतदर्शक अव्ययांत कांहीं विशेष आहे, तो असा:—'पूर्ववाक्य संकेतार्थी वर्तमानकाळीं असतां, उत्तरवाक्य संकेतार्थी वर्तमानकाळीं असतें. अशा वाक्यांनीं इतकें कळतें कीं पूर्ववाक्यांतील संकेत खरा नाहीं असें ठाऊक

शास्त्रमत मासद्वय पांचां वर्षांत अधिक लेखावें, ।
अज्ञातवास यास्तव सरलाचि असेंचि तेंव देखावें. ॥ ६१
तेरा वर्षांत अधिक दैश पक्ष द्वादश क्षेपा पडती, ।
चांद्रशरन्मानें हे संख्या सैंख्यावदादृता घडती. ॥ ६२
एंवंच चांद्रमानें तेराही स्पष्ट सारिले अब्द, ।
सत्यप्रतिज्ञ पांडव लागूं देती न आपणा शब्द. ॥ ६३

असतांही, तो खरा मानल्यानें उत्तरवाक्यांतील अनुमान खरें होईल'—प्रस्तुत वाक्यांत पंडित पांडव हे प्राकृत असते. हा संकेत खरा नाहीं असें ठाऊक असतांही, तो खरा मानल्यानें उत्तर वाक्यांतील अनुमान—हेही केंवि न भ्रमते?—हें खरें होईल.

१. शास्त्रमानानें, शास्त्रमतांप्रमाणें. २. सत्य. ३. दहा पंधरवडे. ४. रात्री. ५. चांद्र+शरद्+मानें=चंद्रसंबंधी+वर्ष+प्रमाणें=चांद्रवर्षाच्या मानानें. [अमावस्येपासून अमावस्येपर्यंत किंवा पूर्णिमेपासून पूर्णिमेपर्यंत जो काल जातो त्यास 'चांद्रमास' म्हणतात. एका संक्रांतीपासून दुसऱ्या संक्रांतीपर्यंत जो काल जातो त्यास 'सौरमास' म्हणतात. चांद्रमानानें वर्षाचे २४ पक्ष व सुमारें ३५४ दिवस धरिले जातात आणि सौरमानानें सुमारें ३६५¼. या दोन मासांत अंतर आहे म्हणून चांद्रमानानें कालमापन केलें असतां तेरा वर्षांत सुमारें ५ महिने १२ दिवस ह्यास्त धरिले जातात. याप्रमाणें कालगणना केली तर चांद्रमानाचा सौरमानाशीं मेळ पडतो. आपल्या देशांत चांद्रमानाचें वर्ष धरतात, त्यामुळें दोन वर्षें गेलीं म्हणजे तिसरे वर्षी एक अधिक महिना धरतात. यावरून पांच वर्षांत सुमारें दोन मास अधिक पडतात. आपल्या चालू महिन्यांचीं नांवें हीं चांद्रमासांचीं नांवें होत व ज्या नक्षत्रांवर चंद्र पूर्ण होतो त्या नक्षत्रांवरून तीं पडलीं आहेत. [अध्याय ५२ श्लोक १-४ पहा व त्यांवरील टीका पहा.] वनवासास जाण्याची प्रतिज्ञा केली तेव्हां कोणत्या मानानें वर्ष मोजावयाचें याचा निश्चय झालेला नव्हता, म्हणून पांडवांनीं तेरावर्षांत पांच मास बारा दिवस चांद्रमानानें अधिक घालून आपली प्रतिज्ञा पूर्ण केली. पांडवांचा द्यूतांत पराजय विजयादशमीस झाला. लोक प्रायः याच दिवशीं द्यूतक्रीडा करतात. तेव्हां येणाऱ्या विजयादशमीस पांडवांचीं तेरा वर्षें परिपूर्ण व्हावयाचीं अशी दुर्योधनाची समजूत होती. कौरव ग्रीष्मांत गोग्रहणार्थ प्रवृत्त झाले व याच वेळीं पांडव प्रकट झाले, तेव्हां येणाऱ्या विजयादशमीच्या पूर्वी पांडव प्रकट झाले असें समजून 'अज्ञातवासपण पुरला' किंवा 'कांहीं मास तरी, पक्ष तरी, दिन तरी, असे उरला' असें दुर्योधन विचारतो. विजयादशमीच्या पूर्वी पांच महिने बारा दिवस पांडव प्रकट झाले असते तरी त्यांची प्रतिज्ञा चांद्रमानानें परिपूर्ण झाली असती, तथापि प्रतिज्ञावधि परिपूर्ण होऊन कांहीं दिवस जाऊं देऊन प्रकट व्हावें हें उत्तम असें समजून, प्रतिज्ञाकालोत्तर कांहीं दिवस गेल्यावर ज्येष्ठ वद्य ७ स प्रकट झाले. भीष्माच्या मतें अज्ञातवासावधि संपून पांच महिने बारा दिवसांनीं पांडव आविर्भूत झाले. ६. गणना ७. संख्यावान् पंडित ह्यांनीं आदृत, स्वीकृत अशी संख्या. ज्योतिःशास्त्र जाणणाऱ्या पंडितांनीं स्वीकारलेली अशी. ८. याप्रकारें कालगणना केली असतां. ९. वर्षें.

येतां [1]अन्यायलवें अल्पायासेंहि इंद्रपद पदरा, ।
[2]हूं न म्हणतील, कालापासुनिही पावतील हे न [3]दैरा. ॥ ६४
युद्धेंकरूनि [4]पाक्षिक जय, त्यांतहि [5]विजय पातला समरा, ।
सम [6]रामासीं व्हा, हो शम राज्यसमर्पणें, हटें न मरा.' ॥ ६५
[7]कुर्वध्वम [8]म्हणे, 'युद्धचि हो, सख्य न हो, [9]पितांमहा! यासीं. ।
[10]शक्रहि बुडेल यातें [11]मद्भृत पद ओपितां महायासीं.' ॥ ६६
भीष्म म्हणे, 'तरि कांहीं [12]बळ घेउनि जा [13]पुरा, नका राहूं, ।
बा! 'हूं' मजचि [14]म्हण, न त्या द्विषदंगाराचिया [15]चकोरा 'हूं'. ॥ ६७
आम्हांपासीं राहो [16]अर्ध कटक पार्थासह घेराया, ।
एकें [17]भागें न्याव्या गाई, तूं एक [18]भाग घे, राया! ॥ ६८
मी कर्ण कृप द्रोण द्रौणि असे हे रणांत पांच [19]कसा ।
उतरों धनंजयाच्या, कीं नुतरों, तूंचि मात्र वांच कसा.' ॥ ६९
धाडुनि पुढें [20]नृपाला, [21]लौमागुनि गोधनासि सत्वरची, ।

---

१. लहानसा अन्याय करून. [इंद्रपद मिळत असलें तरी ते अलुब्ध व धर्मार्थकोविद पांडव यत्किंचित् अन्यायलेश करून तें ते स्वीकारणार नाहींत—असा भाव. मूळांत 'इंद्रपदा'च्या ठिकाणीं नुसता 'राज्य' असा शब्द आहे यावरून पंतांनीं मूळावरही मार्मिकपणें ताण केली असें म्हटलें पाहिजे. २. 'हूं' हें स्वीकारदर्शक अव्यय होय. ३. भया. ४. अनियमित, कोणत्या तरी पक्षाचा. (कोणत्या तरी एका पक्षावर रहाणारा.) ५. अर्जुन. ६. रामानें बापाचें वचन राखण्यासाठीं राज्यत्याग करून वनवास स्वीकारला आणि तेणेंकरून नीतीचा आदर केला, तसें तुम्ही न्यायास अनुसरून पांडवांस राज्य द्या—असा भाव. ७. राज्याचें अर्पण करून शम (शांति, विरोधशांति आणि सख्य) होवो. ८. दुर्योधन. ९. अध्याय ५२ श्लोक १५ पहा. मी पांडवांस राज्य देणार नाहीं, जें युद्धोपचारिक कर्म असेल तें त्वरित करावें, अशी दुर्योधनोक्ति आहे. १०. अहो आजोबा! (अहो भीष्म!) ११. मद्भृत पद (मीं घेतलेलें राज्यपद) यातें (या समरांत आलेल्या अर्जुनातें) ओपितां (देतां) शक्रहि महायासीं (योग्य संकटांत) बुडेल—असा अन्वय. १२. म्यां हरलेलें. १३. सैन्य—सैन्याचा चवथा भाग घेऊन जा असें मूळांत आहे. [अध्याय ५२ श्लोक १७.] १४. स्वनगराला. १५. होय म्हण. १६. शत्रुरूप इंगळाच्या. १७. शत्रुरूप अंगाराच्या (निखाऱ्यांच्या) चकोराला (अर्जुनाला)=शत्रुरूप अंगाराला खाणारा जो चकोररूप अर्जुन त्याला 'हूं' म्हणूं नको. [चकोरपक्षी निखारे खातात असा कविसमय आहे, त्यास अनुसरून हें वर्णन आहे.] १८. सैन्याचे दोन चवथे भाग. [श्लोक १८.] १९. सैन्याच्या चार भागांपैकीं एक भागानें. २०. सैन्याचा चतुर्थ भाग. २१. कसोटीस. २२. दुर्योधनाला हस्तिनापुरास धाडून. २३. त्या दुर्योधनाच्या पाठीमागून धेनुसमूहास पाठवून.

शास्त्रमतें व्यूहातें[1] तत्कालचि तो अगाधसत्व[2] रची. ॥ ७०
कर्ण पुढें[3], गुरु[4] मध्यें, ज्याच्या तेजासि शक्रहि न साहे; ।
दोभागीं द्रोणि कृप, व्यूहामागें नंदीज[5] तो राहे. ॥ ७१
द्रोण म्हणे, 'सैनिक हो! हा आला कीशकेतु[6] अर्जुन हो! ।
कोण सुहृत्[7] न म्हणेल ख्यात जगीं विजय विजय[8] अर्जुन हो? ॥ ७२
हे दोन बाण माझ्या चरणावरि उतरले, पहा, नमना[9], ।
या गौरवें मजपरिस[10] गमला कनकाद्रिही लहान मना. ॥ ७३
हे अर्जुननामांकितशर[11] मत्कर्णद्वयासि[12] लागोनी ।
पडले पहा, अहा! रण न करी[13], आज्ञा मला न मागोनी. ॥ ७४
झाले बहु[14], होतिल बहु, आहेतहि बहु, परंतु यांसम हा; ।
यास महादेवा! दे जय, पाहिन कधिं धनंजयास[15] महा.' ॥ ७५
पार्थ म्हणे, 'वैरांटे[16]! रथ कुरुकटकासमीप राहूं दे, ।
गोधन हरावयास्तव आले भेट[17] कोण कोण पाहूं दे. ॥ ७६
तो गुरु[18], तो गुरुनंदन[19], तो कृप, तो कर्ण, तो पितामह[20], रे! ।
यांहीं धेनु वळाव्या, शिव! शिव! गोपाळ कृष्ण! राम! हरे! ॥ ७७

---

१. सैन्यरचनाविशेषातें. [सैन्याचा जो रचनाविशेष त्याला व्यूह असें म्हणतात. हे व्यूह अनेक प्रकारचे असत:—चक्रव्यूह, सुपर्णव्यूह, परमव्यूह. या व्यूहांना नावें त्यांच्या आकारावरून प्राप्त होतात. जी सैन्यरचना चक्राचे आकारासारखी दिसते तिला चक्रव्यूह हणतात.] २. अगाधबळ अगाध (अतिशयित—मोठें) आहे (सत्व—बळ, गांभीर्य) ज्याचें तो (भीष्म). ३. अग्रभागीं. ४. द्रोणाचार्य. ५. सव्यभागीं अश्वत्थामा आणि दक्षिणभागीं कृप. (अध्याय ५२ श्लोक २१-२३.) ६. सैन्याच्या पश्चाद्भागीं. ७. भीष्म. ८. अध्याय ५३ श्लोक ३-९ पहा. [गांडीव धनुष्याचा टणत्कार करीत अर्जुन येत आहे असें पाहून द्रोण म्हणतात—असा अर्थसंदर्भ.] ९. वानरध्वज. १०. मित्र. ११. विशेष जय. १२. संपादून. १३. नमस्कार करण्यासाठीं. [अध्याय ५३ श्लोक ४-९.] १४. माझ्याहून. १५. मेरुपर्वतही. १६. अर्जुनाच्या नामानें अंकित (चिन्हित) असे शर (बाण) ज्यांवर अर्जुन हें नांव लिहिलें आहे असे शर. [अध्याय ५३ श्लोक ६.] १७. माझ्या दोन कानांस. १८. अर्जुन माझी आज्ञा घेतल्याशिवाय युद्ध करीत नाहीं. १९. बहुवीर झाले. २०. या अर्जुनासारखा एक अर्जुनच आहे. दुसरा कोणी नाहीं. हा 'अनन्वय' नामक अलंकार होय. जेथें ज्याची त्यालाच उपमा दिली असते म्हणजे जेथें उपमानत्व आणि उपमेयत्व हीं दोन्हीं एकाच वस्तूवर असतात, तेथें हा अलंकार होतो. जसें:—गगन हें गगनासारखें आहे, रामरावण हे रामरावणोपम होत. याचें लक्षण व उदाहरण—'उपमानोपमेयत्वं यदेकस्यैव वस्तुनः । इंदुरिंदुरिव श्रीमानित्यादौ तदनन्वयः ॥ गगनं गगनाकारं सागरः सागरोपमः । रामरावणयोर्युद्धं रामरावणयोरिव ॥'. २१. मोठा. २२. उत्तरा! (विराटपुत्रा!) २३. वीर. २४. द्रोणाचार्य. २५. द्रौणि. २६. भीष्म. [पितामह=आजा, बापाचा बाप, मातामह=आईचा बाप, या शब्दांस प्र लावल्यानें एक पायरी ते मागें जातात. जसें:—प्रपितामह, प्रमातामह (पणजा).

रे उत्तरा! शकुनिचा या व्यूहांत न दिसे मला भाचा, ।
त्यावांचुन यांसीं जो करणें संग्राम तो न लाभाचा. ॥ ७८

बहुधा गोधन घेउनि मागें गेला पळोनि कौतर तो, ।
सर्वहि खोटा व्यसनीं बुडतो, न पळो पळो, निका तरतो. ॥ ७९

हें कटक सोड, तिकडे चाल, तुझ्या हरुनि गोधना खळ तो ।
प्राणत्राणपरायण जिकडे निरपत्रपाग्रणी पळतो.' ॥ ८०

उत्तर निजतुरगांतें, द्याया अरुणासि कौतुक, पिटाळी; ।
तों गर्जोनि कुरुकटककर्णी बसवी ध्वजस्थ कपि टाळी. ॥ ८१

---

१. दुर्योधन. (शकुनीचा भाचा.) या अर्थात 'पर्यायोक्त' अलंकार झाला आहे. २. दुर्योधनावांचून जें युद्ध तें निरामिष होय–असा भाव.[अध्याय ५३ श्लोक १४.] "वांचून"–हें मूळचें 'ऊन' प्रत्ययांत धातुसाधित असून याचा अर्थ 'राहून' असा आहे. पण होतां होतां हें शब्दयोगी अव्यय बनलें आहे; जसें, 'त्याजवांचून त्याला घटकाभरही करमत नाहीं;' 'मजवांचून तें कोणास माहीत नाहीं.' इंग्रजी भाषेंतील या अर्थाचे शब्द–except, save,–यांचें असेंच व्याकरणांतर झालें आहे. हीं दोन्हीं मूळचीं आज्ञार्थक क्रियापदें होत; पण होतां होतां अव्ययें होऊन बसलीं. तसेंच संस्कृतांत या अर्थी 'परित्यज्य,' 'त्यक्त्वा,' 'विमुच्य,' 'हित्वा' इत्यादि धातुसाधितांचा अव्ययासारखा प्रयोग होतो. असो; तर याचप्रमाणें वरील शब्द जरी आतां अव्ययांतच मोडतो, तरी त्या पंक्तींत तो येणेंप्रमाणें गेला असावा:–'मज वांचून' म्हणजे 'मला सोडून' 'मला टाकून' असा अर्थ. आणि वास्तविक व्याकरणरीत्या पाहिलें असतां पहिलें रूप 'मी वांचून' असें असेलसें दिसतें. 'मी वांचून' हें संस्कृतांतील सति सप्तमीसारखें किंवा इंग्रजींतील Nominative Absolute या सारखें होय; आणि त्याचा अर्थ 'मी राहिलों असतां' असा समजायाचा." [निबंधमाला–अंक १८ पृ० २८-२९.] ३. या द्रोण भीष्म कर्ण इत्यादिकांशीं. ४. युद्ध. ५. अधीर, व्याकुलचित्त. ['अधीरे कातरः' इत्यमरः.] ६. ज्याचें आचरण खोटें आहे तो. ७. पळो अथवा न पळो. ८. जो निका (सत्य, स्वच्छ, प्रामाणिक) आहे तो मात्र निश्चयानें तरतो. (संकटांतून पार पडून जातो.) हें गीर्ल्यर्ध सुभाषितरूप आहे. ९. प्राण रक्षण्याविषयीं तत्पर. १०. निर्+अपत्रपा+अग्रणी=निर्गत+लज्जा+प्रमुख=निर्लज्जांत श्रेष्ठ असा. (दुर्योधन). [अपत्रपा=दुसऱ्याच्या समक्ष प्राप्त झालेली लज्जा. 'सापत्रपान्यङ्गः' इत्यमरः.] ११. आपल्या घोड्यांतें. १२. अरुणाला (सूर्याच्या सारथ्याला) आश्चर्य वाटावें या हेतूनें. अरुण सूर्याच्या अश्वांस जो वेग देतो त्यापेक्षांही ज्यास्त वेग उत्तरानें आपल्या घोड्यांला दिला–असा भावार्थ. १३. कौरवांच्या सैन्याच्या कानांत. १४. निशाणावर असणारा. (कपि=मारुति.) १५. कानटाळी. 'कर्णी टाळी बसविणें'=आवाज इतका मोठा करणें कीं तो ऐकण्याची कानाची शक्ति नाहींशी करवून आवाज न सोसेनासा असल्यामुळें कान हातांनीं बंद करविणें. 'कानठाळ्या बसणें'=कानिं टाळ्या बसणें.

कृप[2] सैन्यासि म्हणे, 'हो[2]! हो प्राप्तारिष्ट शांत, न वधावा ।
राजा पार्थें, सांगप सगुरु सगुरुसुत ससांतनव, धांवा.'॥ ८२
गांठुनि पार्थ, म्हणे, 'रे! आलों मी अनुज भीमसेनाचा, ।
ज्याच्या शरांसि म्हणती सुर असुरबळांत भीमसे नाचा. ॥ ८३
कोठें जाल? उभे रे! मत्स्येश्वरधेनुपश्यतोहर हो! ।
सोडा गोधन, नाहींतरि वधिन तुम्हांसि, वश्य तो हर हो.' ॥ ८४
शरपटलानें झांकी कुरुकटकालाचि तो न वांसवि, त्या ।
खेचर म्हणति, 'तेजस्वी लोपविता भेटला नवा सवित्या.' ॥ ८५
सुरदत्तधनुर्गुणरथनेमिध्वजवासिभूतनादानीं ।
कांपे न चमूचि, कुंही, स्वकुचांच्या जेवि पूतना दानीं. ॥ ८६
खेळबळजळनिधिमग्ना धेनु उसळल्या, अलाबु झाल्या, हो! ।
हांसे विजय, मनिं म्हणे, 'कां गोपसख्या मला बुझाल्या, हो!?' ॥८७

---

१. उत्तरानें रथाचे घोडे दुर्योधनाकडे फिरविले आणि अर्जुन त्याजकडे गेला, तेव्हां त्याचा अभिप्राय जाणून कृप म्हणतो. [अ० ५३ श्लो० १५-१६.] २. अहो सैनिक हो! भीष्मद्रोणादिकांसह धांवा. ३. प्राप्त झालेलें अरिष्ट. ४. कर्णासहित. ५. द्रोणपुत्र अश्वत्थाम्यासहित. ६. भीष्मासह. [सह (क्वचित् स) यानें होणारा समास बहुव्रीहि होय:—सफल, सानुज.] ७. दुर्योधनाचें रक्षण करण्यासाठीं त्वरित चला. ८. दैत्यांच्या सैन्यांत. ९. शंकरासारखे. [प्रलयकालीं शंकर आपले सहस्र बाहु पसरून नृत्य करतो-या कथेवर कविकटाक्ष आहे. अथवा त्रिपुरविजयकथेचा येथें संदर्भ दर्शविला आहे.] १०. विराटाच्या धेनु देखत लुटणारे हो! विराटाच्या गाई पाहतां पाहतां चोरून नेणारे दरवडेखोर हो! पश्यतोहर=चोर, पाहत असतां हरण करणारा. पश्यत:+हर=पश्यतोहर.] ११. अनुकूल. १२. शंकर. १३. अर्जुन. १४. देव. १५. लोपविणारा, झांकणारा. १६. सूर्यास. १७. देवदत्त शंख. १८. चक्रधारा. १९. देवदत्त (शंख), गांडीव चापाची दोरी (धनुर्गुण), रथचक्रधारा, व ध्वजावर बसणारा मारुति यांच्या नादांनीं. हें पूर्वार्ध एक सामासिक पद आहे. २०. सैन्य केवळ कांपे असें नाहीं. [अ० ५३ श्लो० २१-२५.] २१. पृथ्वीहि. २२. कंसाची अनुचरी राक्षसी. ही तरुण स्त्रीचें रूप घेऊन गोकुळांतील बालकांचा संहार करित नंदाचे घरीं गेली व कृष्णास आपले विषयुक्त स्तन पाजूं लागली. हें तिचें कपट कृष्णास कळून त्यानें स्तनपान करित असतां तिच्या स्तनांचें आकर्षण करून तिचा प्राण घेतला. (भागवत—दशमस्कंध—अध्याय ६ पहा.) २३. दुष्ट (कौरव) सैन्यरूप सागरांत बुडालेल्या. २४. बाहेर पडल्या. २५. भोपळा. २६. 'हांसुनि' असा अन्य पाठ आहे. २७. गाई. [गोपाच्या (गवळ्याच्या) सख्या गाई अथवा कृष्णाच्या मित्राला—मला, जो गोपसख (कृष्णसख-अर्जुन) त्यास गाईनीं बुजण्याचें कारण नाहीं—असें तात्पर्य.]

गेल्या पळोनि गाई पृष्ठावरि पुच्छभार वाहोनी, ।
राहोनि निश्चल क्षण विजय निवे त्यांकडेचि पाहोनी. ॥ ८८
येतांचि विक्रमलवें श्रीहरिचा दयितदास वीर गडी ।
हरि करिघटेसि तैसा त्या कुरुसेनेसि वासवी रगडी. ॥ ८९
अंगावरि गोरज तें श्रीगोपाळांघ्रिचेंचि भावुनि घे, ।
जाया सुयोधनावरि भीमाचा भीमशक्ति भाउ निघे. ॥ ९०
भीष्मादि म्हणति, 'गेला कीं हो! दुर्योधनांतकाम खरा.' ।
धांवोनि गांठिती त्यां जयलक्ष्मीदत्तकौतुका मखरा. ॥ ९१
पाहुनि 'बीभत्सु म्हणे, 'आला दुर्योधनावना कर्ण, ।
म्यां रिण 'पैरिग्रहाचें वारावें आजि, जेंवि नीकर्ण.' ॥ ९२
तत्काळ उत्तरें तो नेला कर्णाकडेचि रथ, वातें ।
घेनं गिरिकडे, सुवैद्यें स्वौषधे रुग्णाकडेचि अथवा तें. ॥ ९३
भंगुनि सहाय, मारुनि बंधु, हराया समस्त तन्मद हा ।
पार्थ शरांनीं झांकी; देखोनि म्हणे तदीयजन्मद 'हा!' ॥ ९४

---

१. शेपट्या उभारून, शेपट्यांचें ओझें घेऊन. २. स्तब्ध. ३. त्याकडे क्षणभर स्तब्ध राहून पाहून अर्जुनाला फार संतोष वाटला. ४. स्वल्प पराक्रमानें. ५. प्रियदास. ६. श्रीकृष्णाचा प्रियभक्त व मित्र वीर अर्जुन. ७. सिंह. ज्याप्रमाणें सिंह हत्तीच्या कळपाचा थोड्याशा पराक्रमानें चुराडा करून टाकतो त्याप्रमाणें अर्जुनानें कौरवसैन्याचा चुराडा करून टाकिला. येथें अर्जुनाला सिंहाची आणि कुरुसेनेला करिघटेची उपमा दिली आहे. ८. गजसमुदायास. [घटा=हस्तिसंघ. 'करिणां घटना घटा' इत्यमरः । 'घटा घटनगोष्ठीभघटनासु च योषिति' इति मेदिनी.] या आर्येत उपमालंकार आहे. ९. गाईच्या पायांची धूळ. १०. श्रीकृष्णाच्या चरणांचेंच. ११. मानून. १२. भयंकरशक्ति. १३. दुर्योधन+अंत+काम=दुर्योधनाच्या अंताचा (नाशाचा) काम (इच्छा) ज्यास तो; दुर्योधनाचा नाश इच्छिणारा. (अर्जुन.) १४. सुप्रसिद्ध अश्वा त्या (मखररूप अर्जुनाला). १५. जयलक्ष्मीला दिलें कौतुक ज्यानें त्या. १६. मखररूप अर्जुनाला. १७. अर्जुन. [कौरवांचें सैन्य आपल्याकडे येत आहे असें पाहून अर्जुन उत्तरास म्हणतो. अध्याय ५४ श्लोक ३-५ पहा.] १८. दुर्योधनरक्षणार्थ. १९. स्त्रीचें. (द्रौपदीचें.) ['पत्नी परिजनादानमूलशापाः परिग्रहाः' इत्यमरः.] २०. नाक+ऋण. स्वर्गाचें ऋण=देवाचें ऋण. २१. मेघ. २२. सु+औषध=उत्तम+औषध. २३. रोग्याकडे. २४. सोबती, मदतगार (चित्रसेन, शत्रुसह, विजय इत्यादि वीर. अ० ५४ श्लो० ७.) २५. कर्णाचा बंधु. [मूळांत 'वैकर्तनभ्राता' असें पद आहे. याचें नांव कदाचित् 'संग्रामजित्' असें असावें. अ० ५४ श्लो० १८-१९.] २६. कर्णाचा गर्व. २७. कर्णाचा जन्म देणारा. (सूर्य.)

दैव जेंवि तृणावरणा, वृप भस्म करी महाशरावरणा, ।
पार्थ म्हणे, 'करितो गिरिशकमंडलुसीं पहा शराव रणा.' ॥ ९५
कर्णहि ईपुनीं झांकी मग त्या मोक्षेच्छुमानसाध्वसखा, ।
रुंणानळा म्हणे जो, 'खांडव, सोडूनि सर्व सौध्यस, खा.' ॥ ९६
तें किति वर्णावें म्यां? पाहत होते विचित्रसमरा जे ।
कर्णाच्या अपयानावधि ते गमलेचि चित्रसम राजे. ॥ ९७

---

१. अग्नि, वणवा. २. तृणपटला. ३. कर्ण. ४. महा+शर+आवरणा=मोठ्या बाणांच्या आच्छादनाला. ५. शंकराच्या कमंडलूशीं. ६. पहा, काय वेडेपणा हा! येथें कर्णाला शरावाची आणि अर्जुनाला गिरिशकमंडलूची उपमा दिली आहे. ७. परळ, मालटी. ८. बाणांनीं. ९. मोक्षाची इच्छा करणाऱ्या (पुरुषाच्या) मनास अध्व म्हणजे जो मार्ग (मार्गदर्शक कृष्ण) त्याचा सखा. ज्या पुरुषांचीं मनें मोक्ष इच्छिणारीं आहेत अशांला मार्ग दाखविणारा जो कृष्ण त्याचा सखा (अर्जुन) त्याला कर्ण बाणांनीं आच्छादून टाकी. या पूर्वार्धांत 'पर्यायोक्त' अलंकार झाला आहे. १०. रोगिष्ट अग्नीस. [मागें पृष्ठ ८८ टीप ७ पहा. तसेंच विराटपर्व—अध्याय ३ आर्या ३५; अध्याय ४ आर्या २८ पहा.] ११. अर्जुन. १२. भय. १३. हें पंतांच्या वर्णनविस्तारभीरुत्वाचें उदाहरण आहे. १४. चमत्कारिक युद्धास. १५. कर्ण पराभव पावून पांडवबाणतप्त होत्साता संग्रामभूमीपासून पळून गेला. [अध्याय ५४ श्लोक ३५-३६.] १६. पलायनापर्यंत. १७. चित्रासारखे स्तब्ध, निश्चल. १८. "विराटपर्व हें स्वभावतः मोठें मनोवेधक आहे. त्यांत शृंगारवीरादि सर्व रसांचा समावेश आहे. तेव्हां वामनपंडित आणि मोरोपंत यांची तुलना करावयास ह्या पर्वासारखें पर्वच यावयाचें नाहीं; असें जाणून या पर्वाच्या संबंधानें पंतपंडितांची आम्ही तुलना करितों. ह्या लहानशा निबंधांत, पंतपंडितांच्या अतिविस्तृत, अपरिमित व सघन काव्योद्यानतरुवरजांच्या सकल पुष्पांची मालिका मासल्याकरितां लोकांपुढें ठेविण्यास, गुंफितां येणें परमाशक्य. यास्तव त्यांतले कांहीं मासले गुणदोषांसह आम्ही दाखविले आहेत. त्याप्रमाणेंच विराटपर्वांतील कांहीं कविताकुसमें आम्ही लोकांपुढें ठेवितों. विराटपर्वांतील कथा बहुतकरून सर्वत्र प्रसिद्ध आहे. शाळांतील क्रमिक पुस्तकांत उत्तरगोग्रहणकथेच्या आर्या घातल्या असून, नवनीतांतही त्यांचे वेंचे घेतले या योगानें, आणि गांवोगांव फिरणाऱ्या नाटकांची अतिप्रवृत्ति झाल्यानें, या कथेची लहान लहान मुलांस देखील उत्तम माहिती झाली आहे. यास्तव या पर्वांतील कथाभाग एथें सांगून विस्तार करण्याचें कारण दिसत नाहीं. उत्तरगोग्रहण म्हणून जो वरील पर्वांत चमत्कारिक कथेचा भाग आहे, तो उभयतां पंतपंडित यांनीं कसकशा प्रकारें वर्णिला आहे हें पाहिलें म्हणजे, स्थालीपुलाकन्यायानें सर्व पर्वाचा, किंबहुना उभयतांच्या सर्वच काव्यांच्या गुणदोषांचा निर्णय ठरवितां येईल. लावण्यवती चतुर कामिनी आपल्या सहज लीलेच्या नेत्रकटाक्षांनीं रसिक पुरुषास प्रेमानंदांत निमग्न करिते; मग ती जर सहेतुक कटाक्षक्षेप करील तर कोणाच्या हृदयास खिंकणार नाहीं. बरें? मोरोपंताची स्वाभाविक वाणीच झोंकदार,

अध्याय पांचवा.

कर्णापयानकोपें झालीं [1]सैन्यें समस्त एकवट, ।
त्यांत धनंजयरथ तो, जैसा प्रलयार्णवांत एक [2]वेट. ॥ १
जाणों बुभुक्षितांतें [3]तो दुष्काळांत अन्न दे खाया, ।
सैदयोदारा [4]शतमख [5]ये होउनि सुप्रसन्न देखाया. ॥ २
होते [6]यदंशशेषश्वासज्वलनांत हे [7]समिद्धरणी ।
[8]त्यांचा सखा [9]धनंजय होय [10]खलशलभलया [11]समिद्ध रणीं. ॥ ३
कोणाचेंहि शरीर [12]द्व्यंगुलहि [13]अविद्ध [14]तो न राहूं दे, ।
मुनि म्हणति,' खळांसहि [15]गति बा ! नारायणसखा ! [16]नरा ! हूं, दे.'॥ ४

प्रौढ आणि ओजोगुणविशिष्ट आहे. तिच्या सहज अवलोकनानेंच तींत मन गर्क होऊन जातें. तशांत विराटपर्वामध्यें पंतास बहार करावयास पुष्कळच स्थल मिळालें आहे, त्या योगानें त्यांतील भाषेंत सालंकार कवितेचें लावण्य अधिक देदीप्यमान भासत आहे. उत्तरगोग्रहणांत उत्तराचें, युद्धास जाण्याविषयीं उत्साहपूर्वक भाषण, बृहन्नडेचें कवचादि धारण, उत्तरेचें भाषण, भयंकर कौरवसैन्यास पाहून उत्तराचें घाबरणें, पळणें आणि बृहन्नडेनें त्यास धरून आणणें, कर्णदुर्योधनांनीं केलेली गुरुनिंदा व त्यावर कृपादिकांचें भाषण इत्यादि सर्वच भाग पंतांनीं फार मनोहर वर्णन केला आहे. ह्या कवितेचा रसपरिपाक इतका विशुद्ध व अविट उतरला आहे कीं त्याचें पुनः पुनः ग्रहण केलें तरी तो कंटाळवाणा न होतां, अधिक आनंददायकच होत जातो असें आम्हास वाटतें." [हंसकृत वामनपंडितांबरील निबंध पहा.]

१. सर्व वीरांचीं सैन्यें एकत्र होऊन अर्जुनावर चालून आलीं. २. प्रलयकालच्या अर्णवांत (समुद्रांत) एक वटवृक्ष मार्कंडेयाच्या संरक्षणासाठीं उत्पन्न होतो आणि सकल सृष्टि जलमय होऊन गेली असतां मार्कंडेय मुनि मात्र त्या वटवृक्षावर बसून वांचतो—अशी कथा आहे. (वनपर्व—अ० ५ गी० ५५; विराटपर्व—अ०२ गी० ४९.)३. तो=अर्जुन. ४. ज्याप्रमाणें एकदा उदारकृति दुष्काळांत अन्नसामग्री वांटून क्षुधितांना शांत करितो, त्याप्रमाणें वीर अर्जुन—घनशरवृष्टि करून शत्रूंची पुष्कळ दिवसांची समरक्षुधा शांत करितो—अशा भावार्थ. ५. सदय आणि उदार अशा अर्जुनास. ६. इंद्र. ७. अध्याय ५६ श्लोक ३-६ पहा. ८. ज्या देवाचा (विष्णूचा, कृष्णाचा) अंश शेष त्या शेषाच्या श्वासाग्नींत. [प्रलयकालीं प्रखर सूर्यकिरणांनीं पृथ्वी तापते आणि तिची आग शेषाच्या मस्तकास पोंचते, तेव्हां तो संतापून फूत्कार करतो व त्या श्वासवायूनें पृथ्वीचें जळून भस्म होतें—या कथेवर कविकटाक्ष आहे.] ९. धरणी समित्‌रूप होते. समिधेसारखी धरणी (पृथ्वी) जळून जाते. १०. त्या (देवाचा—कृष्णाचा.) ११. अर्जुन. रूपकास्तव अग्नि असें जाणावें. येथें 'धनंजय'शब्दावर श्लेष आहे. १२. दुष्टटोळांच्या नाशार्थ. १३. प्रदीप्त, फार पेटलेला. १४. दोन अंगुळें देखील. १५. अक्षत. १६. अर्जुन. १७. मुक्ति. १८. हें अर्जुना !

58215 Px-9.57

वाहति शोणितपूरीं शतश इभांचेहि कुंणप, टोळांचा ।
मद किति गरुडीं? सद्भटभुजभुजगहि वरिति गुण पैटोळांचा. ॥ ५
इतरांची काय कथा? अद्भुत संगर करी सहास कृप, ।
होय विरथ, सुर म्हणती, 'सिंह पथ न दे करीस हा सकृप,. ॥ ६
वीभत्सुपुढोनि विरथ सुविकळ कृप पळविला नरवरांनीं; ।
तद्धनुचा भयद भटां, हरिचाहि तसा गजां न, रवं, रानीं. ॥ ७
मग गगनगभिन्मुखमुरमत गुरुसींहि अनवमुनि नरं तो ।
कलह करी, कीं इतरीं गुरुकलहीं, यासि जन वमुनि, न रतो. ॥ ८
गुरुच्या प्रथम रथासीं रथ भिडवी क्षिप्र, मग अकोपार्थ ।
शिरं चरणासि, प्रार्थुनि 'करुणेसि' म्हणे, 'त्यजूं नको' पार्थ. ॥ ९

---

१. रक्ताच्या प्रवाहांत. २. शेंकडों. ३. हत्तींचे. ४. प्रेत. ५. मोठ्या योद्ध्याचे भुजरूप सर्प. ६. हा लाटानुप्रास जाणावा. ७. पडवळांचा. मोठमोठ्या वीरांचे भुजरूप सर्प हे पडवळासारखे नम्र शिथिल आणि दुर्बल झाले. ८. कृपाहून इतर वीरांची गोष्ट कशास हवी? ९. संग्राम. १०. हास्ययुक्त. ११. कृप रथहीन झाला. [कृपाचार्य आणि अर्जुन यांचा युद्धचमत्कार ५७ व्या अध्यायांय आहे तो पहावा. कृप विरथ, हताश्व, हतसारथि झाल्याचा उल्लेख ३९ व्या श्लोकांत आहे.] १२. हा सकृप सिंह (अर्जुन) करीस (गजास-शारद्वत कृपाचार्यास) पथ न दे–असा अन्वय. १३. अर्जुनास सकृप म्हणावयाचें कारण खालच्या आर्येंत आहे. १४. अर्जुनापुढून. १५. शरांनीं व्याकुळ झालेला. १६. अर्जुनधनूचा. १७. भय देणारा. १८. ध्वनि. १९. कृप विरथ होऊन रणांगणांतून माघारा गेल्यावर. २०. गगन+ग+नगभिद्+मुख+सुर+मत= आकाश+गेलेला+इंद्र (नगांचा=पर्वतांचा–भेद करणारा–गोत्रभिद्) प्रमुख+देव+संमत, मान्य= आकाशगत–इंद्रप्रमुख देवांस मान्य, मुख=मुख्य, प्रमुख, श्रेष्ठ. ['मुखं तु वदने मुख्ये तात्रे छद्मनि वा पुमान्' इति भागुरिः.]२१.द्रोणाशीं.२२.अनादि. २३. तो पुराणऋषि अर्जुन.२४.या गुरुकलहाला (सोडून). २५. टाकून. २६. युद्धरूप गुरुकलहाशिवाय इतरीं गुरुकलहीं (नर) न रतो; गुरुशीं जो शिष्यानें कलह करावयाचा तो युद्धांत मात्र करावा, कारण 'शिष्यादिच्छेत् पराजयम्' असा सर्वमान्य न्याय आहे. इतर कोणत्याही प्रकारें शिष्यानें गुरुशीं कलह करूं नये, समरभूमीवर गुरुशीं युद्ध करून त्यास पराभूत करावें, कारण ही गोष्ट उभयतांसही भूषणप्रद होय–अशी समजूत आहे. [अर्जुन इतर स्थळीं काय म्हणतो तें पहा–गीता अध्याय २ श्लोक ४-५. तसेंच जो गुरुशीं हुंबे तुंबे करून उपमर्द करतो तो, स्मशानांत वृक्ष होतो आणि त्याजवर कंक आणि गृध्र हे पक्षी असतात– असाही समज आहे. 'गुरुं हुंकृत्य तुंकृत्य विप्रं जित्वा च वादतः । स्मशाने जायते वृक्षो कंकगृध्रोपसेवितः ॥'. तेव्हां गुरुशीं जो कलह करणें तो रणकलह, अन्यकलह अनुचित होय–असें तात्पर्य.] २७. अकोप+अर्थ=क्रोधाभाव+हेतु=राग न यावा या हेतूनें. २८. शिर चरणासि भिडवी–असा अन्वय. [अध्याय ५८ श्लोक १६-१७.] २९. 'त्यजूं नको' हा पाठ त्र्यक्षरात्मक यमकाला फार अनुरूप व पोषक आहे, पण 'त्यजूं नका' असा पाठ असता तर अर्जुनाचें भाषण गुरु द्रोणाचार्यास उद्देशून असल्यामुळें विशेष खुललें असतें, आणि पूज्यांविषयीं पूज्यबुद्धि आदरार्थी शब्द योजिल्यानें व्यक्त झाली असती. 'नको' हें एकेरी रूप असून 'नका' हें आदरवाचक रूप आहे हें विसरतां कामा नये.

'गुरुजी! करा प्रहार प्रथम, तुम्हीं गुरु, अविप्र हा, रामीं ।
शांतनवसा, करीन, प्रमुदित व्हाया कवि, प्रहारा मी.' ॥ १०
सच्छिष्यावरि सद्गुरु आधीं प्रेमेंकरूनि आशीची, ।
मग वृष्टि वहि:कोपें सुबहु करी बहुविधेषुराशीची. ॥ ११
गुरुला विविधशरांची वाहे तो रागराशि लाखोली, ।
भेटे अस्त्रतति तया, जशि पाहों सागरा शिला खोली. ॥ १२

१. अध्याय ५८ श्लोक १७-१९ पहा. २. गुरूनें पहिल्यानें प्रहार करावा हेंच उचित. ३. क्षत्रिय हा (अर्जुन). ४. परशुरामीं. ५. भीष्मासारखा. [शांतनव=शंतनुपुत्र, भीष्म. भीष्मानें तेवीस रात्री परशुरामाशीं युद्ध करून त्यास जर्जर केलें. अशी कथा आहे. (शांतिपर्व-अध्याय ४५ श्लोक १४) भीष्म हा परशुरामाचा शिष्य होय.] द्रोण आणि परशुराम हे विप्र आणि अर्जुन आणि भीष्म हे अविप्र (क्षत्रिय) होत. भीष्माचें परशुरामाशीं जें युद्ध झालें त्याचें वर्णन स्वत: भीष्मानेंच केलें आहे. अंबा या नांवाची काशीराजाची ज्येष्ठ कन्या भीष्मानें विचित्रवीर्याकरितां जिंकून आणिली. परंतु तिचें प्रेम शाल्वराजावर जडलें असल्यामुळें भीष्मानें तिला परत पाठविलें. त्यानें अंबा ही परजिता असल्यामुळें तिचा स्वीकार केला नाहीं. तेव्हां ती परत येऊन 'मला वरा' असें भीष्मास म्हणूं लागली. ती गोष्ट भीष्मानें नाकबूल केली. तेव्हां तिनें आपणांस भीष्मानें स्वभ्रात्रर्थ वरावें असें परशुरामाकडून त्याजपाशीं बोलणें लाविलें. 'भीष्माकडून विचित्रवीर्याकरितां तुझा स्वीकार करवीन आणि तसें न झाल्यास भीष्माचा वध करीन' अशी घोर प्रतिज्ञा त्याप्रसंगीं परशुरामानें केली. पुढें भीष्मानें अंबेचा आपल्या भावासाठीं स्वीकार करण्याचें नाकारलें. त्यामुळें दोघांचें म्हणजे त्या गुरुशिष्यांचें तुमुल युद्ध तेवीस दिवसपर्यंत झालें. त्यांत परशुरामाचा पराभव झाला. [पंतकृत उद्योगपर्व-अध्याय १३.] अखेरीस अंबेनें भीष्माला मारण्याकरितां रुद्राचें आराधन करून, त्याच्या प्रसादानें पुढील जन्मीं द्रुपदाचे घरीं शिखंडिनी कन्यावतार घेतला. हिलाच 'शिखंडी' असें नांव पुरुषत्वलाभानंतर प्राप्त झालें. ६. साधु, पंडित. ७. उत्तम शिष्यावर. (अर्जुनावर.) ८. आशीर्वादाची. ९. 'वृष्टि' शब्दाची योजना काकाक्षिगोलकन्यायानें करावयाची. १०. बाह्यात्कारी कोपानें. (कारण अंत:करणांत प्रेम होतें.) ११. नानाप्रकारच्या बाणराशींची. १२. अर्पण करी. ['वाहे' हा शब्द गुरुशिष्यसंबंधाचा विचार केला म्हणजे किती समर्पक आणि यथोचित आहे हें कळतें. पूज्यपूजकन्यायानेंच या शब्दाचें सौरस्य व्यक्त होतें.] १३. कोपाचा राशी. [राग=क्रोध, प्रेम.] रागराशी हा शब्द श्लिष्ट आहे. रागराशी=१ प्रेमराशी, २ क्रोधराशी. अर्जुनानें गुरुपदावर विविधबाणांची लाखोली वाहून पूजा केली असें यांत दर्शविलें आहे. तेव्हां अर्जुनाचें गुरुविषयक प्रेम स्पष्टच होतें. १४. तया (गुरुला) अस्त्रतति (अस्त्रांची पंक्ति, शरसमुदाय) भेटे, जशी शिला (प्रस्तर, दगड) खोली पाहों (पाहण्यास) सागरा (समुद्रा) भेटे. अर्जुनशिष्यानें द्रोणगुरूवर जी शरवृष्टि केली ती जणूं काय त्याच्या शक्तिचें मापन करण्याकरितांच केली. जसें शिला समुद्रांत सोडून समुद्राच्या खोलीचा ठाव घेतात त्याप्रमाणेंच हें झालें. खोली पाहणें=To fathom the depth of the sea. "शिळा महासागरांतही टाकली असतां जशी ती त्याच्या थेट तळाशीं जाते, तसे नानाविध अस्त्रांचा प्रयोग करून जे बाण अर्जुनानें महापराक्रमी द्रोणावर सोडिले ते सर्व त्याच्या शरीरांत भेदून गेले-असा भाव." (नवनीत.) त्या द्रोणाला भेटे आणि त्याच्या शरीरांत शिरे-असा भाव. १५. शस्त्रपरंपरा.

शरसागरीं तिमिंगिल[1] गुरु, पळभरि होय शिष्य कंप्र [2]तिमी, ।
पैरिभूत[3] द्रोण म्हणे, 'श्रीभार्गवसाचि[4] धैन्य संप्रति मी.' ॥ १३
व्यासमयीं[5] शंभु म्हणे, 'जरि तूं रुससिल तरी उमे[6]! रूस, ।
गुह[7] काय? विदारिल हा वत्स विजय[8] शक्तिनें सुमेरूस.' ॥ १४
करिती सूर्यास्तोदय[9] एकमुहूर्तांत[10] एक शतदा ते, ।
त्यांत न एकासमही होती मेघांअसेहि[11] शत दाते. ॥ १५

१.मत्स्यविशेष. तिमिमत्स्याला खाणारा (गिळणारा) मोठा मासा.[हा मासा तिमिनामक मत्स्याला गिळतो म्हणून यास तिमिंगिल असें नांव पडलें. तिमि हा मासा शंभर योजनें लांब असतो. 'अस्ति मत्स्यस्तिमिर्नाम शतयोजनविस्तृतः० । तिमिंगिलगिलोऽप्यस्ति तद्गिलोऽप्यस्ति राघवः ॥' श्रीनिवासविलासचंपू–पूर्वभाग–इच्छ्वास ३ पृ० ६४.] २. चंचळमत्स्य. येथें गुरु द्रोण तिमिंगिल आणि शिष्य अर्जुन तिमि–असें समजावें. ३. पराभव पावलेला. ४. परशुरामासारखा; शिष्य भीष्मानें पराभूत केलेल्या गुरु भार्गवरामासारखा. ५. श्राध्यजीवित. येथें 'सर्वत्र जयमन्विच्छेत् शिष्यादिच्छेत् पराजयम्' या वचनावर कविकटाक्ष आहे. ६. पार्थानें द्रोणाचार्याचा पराभव केला त्या समयीं. ७. हे पार्वति !. पार्वतीला रुसण्याचें कारण तिच्या पुत्राची (गुहाची) निंदा आणि विजयाची (अर्जुनाची–पार्वतीचा पिता हिमालयपर्वत त्या पर्वताचा शत्रु इंद्र (गोत्रभिद्) त्याचा पुत्र अर्जुन त्याची) स्तुति या ठिकाणीं आहे हें होय. ८. कार्तिकस्वामी. ९. या अर्जुनापुढें कार्तिकस्वामी काय पदार्थ आहे? १०. गुहानें क्रौंच नामक पर्वताचें विदारण केलें म्हणून त्याला 'क्रौंचदारण' अशी संज्ञा आहे. गुहानें क्रौंच (कैलास) पर्वताचेंच विदारण केलें, पण अर्जुन असा पराक्रमी आहे कीं तो मेरुपर्वताचें विदारण करील. या आर्यैत 'वत्सविजय' हें पद चिंतनीय आहे. गुहाला वत्स असें विशेषण न लावतां विजयाला लाविलें आहे त्यावरून शंकराची अर्जुनप्रेमपक्षपातबुद्धि सुचविली. ११. अर्जुन. १२. सूर्याचा अस्त आणि उदय एक क्षणांत ते दोघे (द्रोणार्जुन) शूरवीर शेंकडों वेळां करीत होते. एकानें बाणवृष्टि करून सूर्याला आच्छादून सूर्यास्त करावा आणि दुसऱ्यानें बाणवृष्टीचा समूल च्छेद करून सूर्योदय करावा–असा प्रकार एका पळांत अनेकदां करीत होते. १३. मेघांअसेहि (मेघांसारखे देखील) शत दाते होती (जन्मतात) [पण] त्यांत (त्या दोघांत, द्रोणार्जुनांत) एकासमही (एकासारखा दुसरा एक) न (जन्मत नाहीं.) अर्जुनासारखा वीर एक अर्जुनच होय, द्रोणासारखा वीर एक द्रोणच होय, इतर तत्सम कोणी नाहीं, शंभर मेघांसारखे दाते पुरुष होतात, पण या एकेक वीरासारखा वीर होत नाहीं. मेघाचें पर्जन्यवृष्टी करून लोकांना संतुष्ट करण्याचें दातृत्व प्रसिद्धच आहे. रणांगणीं वीराचें दातृत्व झटलें म्हणजे शरवृष्टी करून प्रतिपक्षीय वीरांना आपल्या युद्धकौशल्यानें पुरेसें करणें होय. खरे वीर जे आहेत ते प्रतिपक्षीय वीरांनीं आपल्यास खरी अस्त्रविद्या किंवा तरवारबहादरी दाखविल्यास संतुष्ट होतात. अर्जुन व द्रोण यांचें शत्रूंना बाणांनीं त्रस्त करून टाकण्याचें दातृत्व अद्वितीय होतें. मेघासारख्या शंभर दात्यांपेक्षांही त्यांचें युद्धदातृत्व जास्तच होतें. द्रोणार्जुनांचें युद्धकौशल्य पाहून दोन्ही पक्षांच्या वीरांना जितका आनंद झाला तसा शंभर मेघांप्रमाणें दानशूर पुरुषाच्या दातृत्वानें याचकवृंदास व्हावयाचा नाहीं.

पाडिति शरपटलांनीं जेव्हां नभ भरुनि अंधकारा ते, ।
कौतर म्हणति, 'असमयीं करविसि कां कल्प अंधकाराते !' ॥ १६
द्रोणार्जुन तुल्यक्रिय बिंबप्रतिबिंबसेचि ते गमती, ।
किति कुरुकटकप्रेक्षक ? वृत्रघ्नाचींहि लोचनें भ्रमती. ॥ १७
समरीं शंकरसाच द्रोण गमे, जिष्णुही अजित साच; ।
त्रिजगद्विस्मयकर अतिअद्भुत परिभवहि तो अजि ! तसाच. ॥ १८
सुरमुनि म्हणति, 'छेत्रें छिन्नध्वजकवच गुरु पहा केला, ।
झालीं बळें पराङ्मुख, मारितसे कुमति कुरुप हाकेला. ॥ १९
अधिका न क्षत्रियता, न न्यूना विप्रता, पहा तरणा ।
नसतांहि कसा ज्याचे विक्षतहि न विप्रताप हात रणा. ॥ २०

---

१. बाणसमूहांनीं.(पटल=समुदाय, पडदा.) २. आकाश. ३. भ्याड, भितरे लोक. ४. अनुचित वेळीं. ५. प्रळय. ६. हे शंकरा ! ७. समप्रताप, तुल्यपराक्रम. ८. आरसा, उदक इत्यादिकांत एकाद्या पदार्थाचें जें प्रतिरूप (प्रतिच्छाया) दिसतें तें प्रतिबिंब आणि त्या प्रतिरूपाचें तो मूल पदार्थ बिंब होय. द्रोण आणि अर्जुन हे समप्रताप होते यास्तव यांत द्रोण बिंब आणि अर्जुन प्रतिबिंब असें म्हटलें तरी चालेल. बिंबप्रतिबिंबसे. "कोणतेंही प्रतिबिंब (प्रतिच्छाया) ज्या पदार्थाचें असतें, त्या पदार्थास (त्या प्रतिबिंबाचें) बिंब म्हणतात. पदार्थ आणि त्याचें प्रतिबिंब हीं जशीं सर्वांशीं सारखीं असतात, तसे द्रोण व अर्जुन पराक्रमानें अगदीं सारखे भासले." (नवनीत.) ९. कौरवसैन्यप्रेक्षकांची कथा काय ? १०. इंद्राचीं. ११. इंद्राला देखील द्रोणार्जुनांचा पराक्रम पाहून द्रोण कोणता आणि अर्जुन कोणता असा भ्रम पडला, कारण दोघांचाही प्रताप तंतोतंत समतोल होता. १२. अर्जुन. १३. विष्णु. १४. हें सुरमुनींचें भाषण मूळांत नाहीं. पंतांनीं प्रसंग मनांत आणून स्वकल्पनेनें घातलें आहे. कोठें कोठें मूळग्रंथांत जें कांहीं कमी न्यून आहे तें पंत पदरचा मजकूर घालून भरून काढतात आणि त्या त्या प्रसंगाचें चित्र वाचकांच्या नेत्रांपुढें हुबेहुब उभें करतात, असा विचार पंताचें काव्य वाचीत असतां मनांत घोळत असतो. १५. जिष्णें. (अर्जुनें.) १६. भग्न आहे (रथाचा) ध्वज आणि (आंगांतील) कवच (चिलखत) ज्याचें असा. १७. सैन्यें. १८. कुरुपति (दुर्योधन) हांकेला मारितसे (साहाय्य करायाला या, पळून जाऊं नका, चला समरांगणीं युद्धाला अशा हांका मारितसे.) १९. क्षत्रियपणा (क्षत्रियत्व) हा संग्रामशौर्यांत श्रेष्ठ असें—कांहीं म्हणतां येत नाहीं, तसेंच विप्रता(ब्राह्मणपणा) या गुणांत कमी असेंही पण नाहीं. द्रोणार्जुनांच्या समान पराक्रमावरून शौर्य हें जातीवर अवलंबून असतें असें दिसत नाहीं. २०. (तरणा) नसतांही कसा पहा; कसा=कशा तऱ्हेचा, कितपत ज्याचे विक्षतही हात रणा विप्रताप न—असा अन्वय. द्रोण तरुण नसूनही व त्याचे हात क्षतांकित झाले असूनही ते युद्ध करण्यास कमी समर्थ होते असें नाहीं; तर तो तरुणापमाणें अर्जुनाशीं झुंजला. ज्याचे=ज्या द्रोणाचे हात क्षतांकित सव्रण झाले असूनही युद्ध करण्याविषयीं विगतपराक्रम म्हणजे असमर्थ झाले नाहींत. विक्षत=बाणांनीं विशेष क्षतांकित.

केला शीघ्र स्वबळें शिष्यें परिभूत सत्वराशि कवी, ।
याचि सुयशोर्थ बहुधा न शिके हो, गुरुहि न त्वरा शिकवी. ॥ २१
अश्वत्थामा धांवे रक्षाया संकटांत जनकास, ।
जन कासया विते सुत? कसिते न करावया भजन कास. ॥ २२
इंद्रोपेंद्र तसे ते गुरुबंधु सखे कृपीपृथातनय, ।
धन यश ज्यांचें त्यांतहि उठवी वैरासि शकुनिचा अनय. ॥ २३

---

१. अर्जुनानें. २. धैर्यसागर. ३. श्रेष्ठ. (द्रोण.) ४. हा (अर्जुन शिष्य) याचि सुयशोर्थ (गुरूचा पराभव केल्यानें मिळणाऱ्या कीर्तिकरितां) बहुधा (बहुतकरून) न शिके (अस्त्रविद्या शिकला नसावा). अर्जुनाचें द्रोणावरील प्रेम अत्यंत सोज्वळ असल्यामुळें गुरूचा पराभव करून मिळणाऱ्या कीर्तीला तो पराङ्मुख होता—ती त्याला आवडत नव्हती. या गुरुपराभवकीर्तिलाभाकरितां मात्र अर्जुन उत्सुक नव्हता, बाकीच्या सर्व प्रकारच्या कीर्तिलाभाकरितां तो झटून प्रयत्न करी. द्रोणपर्व—अध्याय ९ यांतील पुढील गीति पहाः—द्रोण म्हणे, 'रे अर्जुन! तोठें जातोसि कां विसरलास? । शत्रुस न जिंकितां तूं निघसी कीं या पणा विसरलास'. ॥ ४३ ॥ पार्थ म्हणे, 'शत्रु न तूं माझा गुरुराज, बा! दयालो! कीं । जोडील कोण समरीं तुज जिंकुनि साधुवाद या लोकीं?' ॥४४॥ द्रोणाचार्यांनीं सच्छिष्य अर्जुनाला जी अस्त्रविद्या शिकविली ती त्याजकडून आपला पराभव व्हावा व गुरूपेक्षां शिष्य सवाई झाला असें लोकांनीं म्हणून त्याबद्दल आपणाला धन्यता वाटावी म्हणून नव्हे. हें सुयश व्हावें यासाठीं शिष्य (अर्जुन) शिकला नाहीं आणि गुरुहि (द्रोण) शिकविण्यास उतावळा झाला नाहीं. 'गुरुहि नत्वरा (नमनशीला—विनयसंपन्ना अर्जुनाला) [न] शिकवी—असा ही अन्वय (आणि तदनुरूप अर्थ) संभवतो. आपली कीर्ति व्हावी यासाठीं द्रोणानें विनीत आणि नम्र अशा अर्जुनाला शिकविलें नाहीं. ५. आचार्यपुत्र अश्वत्थामा द्रोणाचें संरक्षण करण्यासाठीं अर्जुनावर धांवून आला, तथापि अर्जुनाचें अद्भुत कर्म पाहून मनांत त्याचा सत्कार करिता झाला. [अध्याय ५८ श्लो० ७२-७४.] ६. दोन अर्धांस जोडणारें हें यमक आहे. ७. कशास. ८. हा उत्तरार्ध सुभाषितपर आहे. [सुत] भजन (भक्ति, सेवा, पूजा) करावया (बापाची संकटसमयीं मुक्तता करून त्याला सन्मान देण्याकरितां, बापासाठीं देह खर्चण्यास किंवा आपली कृतज्ञता अगर पूज्यबुद्धि दाखविण्याकरितां) कास (कंबर) न कसते (बांधते), [तर] जन सुत (पुत्र) कासया, (कशाला, कशाकरितां विते (उत्पन्न करिते). अर्थातरन्यास. मुलगे जर बापाला हरएक प्रकारचें साह्य देऊन आपली त्याजबद्दल सन्मानबुद्धि अगर कृतज्ञता प्रकट करणें आपलें कर्तव्यकर्म समजले नाहींत तर बापाला मुलें झाल्यापासून फायदा तो कोणता? व तसें असतें तर पुत्रप्राप्तीकरितां कोणीही इतकी खटपट केली नसती. ९. इंद्र+उपेंद्र=शक्र+विष्णु; इंद्राचा भाकटा बंधु विष्णु म्हणून त्याला उपेंद्र आणि इंद्रावरज अशीं नांवें आहेत. १०. द्रोणस्त्री आणि कुंती त्यांचे पुत्र. ११. ज्यांचें यश हेंच धन आहे अशा समरयशोधनरत अर्जुन आणि द्रौणि यांजमध्यें. १२. अन्याय.

तो [1]उत्तमर्णसा गुरु सोडुनि, [2]पुत्राकडे [3]हरिसख वळे, ।
[4]पितृप्रतापहरणें [5]द्रौणिहि [6]हृतमणिफणीपरिस खवळे. ॥ २४
[7]सांवर्तिकमेघांच्या लाजाव्या [8]द्रौणिसायकां धारा, ।
सत्ताताहुनि होइल [9]सुत म्हणवायासि 'हाय!' कां धारा?॥ २५
'अत्युग्र [10]राम कीं हा [11]द्विज' म्हणति असें पराशर व्यास ।
'काळहि चुकेल, यात्रा न चुकेलचि शर परा [12]शरव्यास.' ॥ २६
बहु कल्पना [13]सुकविसा, विजयहि बहु शरपरंपरा, [14]व्याला, ।
भंगूं पाहे समरीं गुरुपुत्रासहि, जसें [15]परा व्याला. ॥ २७

---

१. ऋणदात्यासारखा. [उत्तमर्ण=धनको, अधमर्ण=रिणको.] २. द्रोणपुत्राकडे. ३. अर्जुन. ४. अर्जुनानें आपल्या रथाचे घोडे द्रौणिकडे फिरवून आचार्यास समरांगणांतून जाण्यास मार्ग दिला. [अ० ५८ श्लो० ७५.] ५. पित्याच्या (द्रोणाच्या) प्रभावाचें (प्रतापें) हरण केल्यामुळें. ६. मस्तकावरील मणि हरण केलेल्या सर्पाप्रमाणें. [हा सर्पमणिदृष्टांत पंतांच्या काव्यांत अनेक स्थळीं आहे. सभापर्व—अध्याय ५ गीति ६८; अ० ७ गी० ९०.] ७. प्रलयकालीन मेघाच्या. [संवर्त=प्रलय, कल्प.] ८. द्रोणपुत्राच्या बाणांला. ९. उत्तम बापाहून. हें अर्ध सुभाषितरूप आहे. १०. अर्थांतरन्यास व प्रश्नालंकार. सुत (पुत्र) हाय म्हणवायासि (आपण कमी योग्यतेचे निपजून बापाला दुःख करावयास लावण्याकरितां) सत्ताताहुनि (थोर पित्यापेक्षां) धारा (कमी योग्यतेचा कां होईल? अर्थात् होणार नाहीं. थोर बापाच्या पोटीं काळोखी लावणारा पुत्र निपजला तर बापाला अतिशय दुःख वाटेल, म्हणून सुज्ञ पुत्र गुणांनीं बापावरही वरचढ करावयास पाहतात; निदान बापाची बरोबरी तरी करतात. "हाय म्हणावयास (अरेरे! हा कुपुत्र निघाला म्हणून दुःखाचे उद्गार काढविण्यास) सुत सत्ताताहुनि (पराक्रमी बापापेक्षां) धारा (कमी योग्यतेचा) कां होईल?—असा अन्वय. तात्पर्य—अश्वत्थामा द्रोणापेक्षां पराक्रमानें कमी नव्हता." (नवनीत). चांगल्या बापापेक्षां मुलगा (शत्रूंकडून) हाय म्हणविण्यास कमी कसा होईल? वीर पित्याप्रमाणेंच वीर मुलगाही शत्रूंकडून हायहाय म्हणवील—असाही अर्थ कोणी कोणी करतात. ११. लहान. १२. परशुराम. १३. हा ब्राह्मण अश्वत्थामा भार्गवरामच होय. १४. दूरच्या. [किंवा शत्रुरूपा.] १५. निशाणास. शरेभ्यः=शरवे हिंसाय हितम् । यद्वा शरान् व्यतीति शरव्यम्=ज्यावर शर मारतात तें निशाण. 'लक्ष्यं लक्ष्यं शरव्यं च' इत्यमरः. परा शरव्यास=शत्रुरूप निशाणाला—असा अर्थ केला तरी चालेल. १६. या प्रथमपादावरून पंतांना 'सुकवि' म्हणजे कसा असावा हें चांगलें कळत होतें असें स्पष्ट होतें. १७. प्रसवला, सोडिता झाला. व्याला='विणें' या क्रियेचा प्रयोग पशुजननाविषयींच प्रसिद्ध आहे, तथापि 'प्रसवणें' (मनुष्यजनन) आणि 'उत्पन्न करणें' अशा अर्थीही या क्रियेचा प्रयोग काव्यग्रंथभाषेंत वारंवार आढळतो. १८. परक्याला.

ज्या इषुंनीं क्षत होतां रागें वरि आंतही हर भरे हो, ।
ते द्रौणिशरा जैसे कपिला दासें दिले हरभरे हो! ॥ २८
तैं सुर नर हय गज 'हा!' म्हणति, न यांचेचि आट वाजी 'हा!'।
घडलें गुर्वघ जाया अद्भत संग्राम आठवा जी! हा. ॥ २९

---

१. ज्या इषुंनीं (बाणांनीं) क्षत होतां हर (शंकर) वरि (वरून, बाहेरून) आंतही (आंतूनही) रागें (क्रोधानें, पक्षी प्रेमानें) भरे (भरून गेला) ते (बाण) द्रौणिशरा (अश्वत्थाम्याच्या शरांना), जैसे कपिला (पाळलेल्या वानराला) दासें (भक्तानें) दिले (दिलेले) हरभरे (चणे), तसे झाले. पूर्वार्धांत किरातरूपी शंकराच्या अर्जुनाशीं झालेल्या युद्धाकडे कविकटाक्ष आहे. ती कथा पंतांच्या वनपर्वांतील तिसऱ्या अध्यायाच्या प्रारंभींच दिली आहे. किरातरूपी शंकरावर अर्जुनानें अतिप्रखर बाण मारिले व त्यामुळें किरातांचें शरीर क्षतांकित झालें व त्याला अर्जुनाच्या करसंधानाचें कौतुक वाटून प्रेम दाटलें (रागें भरे) त्या वेळेस अर्जुनानें किरातावर जी शस्त्रास्त्रवृष्टि केली ती किरातरूपी भगवंतानें गिळून टाकली. प्रसन्न झाल्यावर तीं सर्व शस्त्रास्त्रें अर्जुनाला शंकरापासून रत मिळालीं; पूर्वी शंकरावर सोडलेले बाणच यावेळेस अर्जुनानें अश्वथाम्यावर सोडले असे कवि म्हणतात. येथें 'रागें' हा शब्द श्लिष्ट आहे. जे बाण पूर्वी अर्जुनानें शंकराला मारून भगवंताच्या देहाला क्षतें पाडल्यामुळें किरातरूपी शंकर अर्जुनावर मनांत व बाहेर रागावला (किंवा अर्जुनाविषयीं बद्धप्रेम झाला) तेच बाण अश्वत्थाम्याच्या शरांनीं सांप्रत तोडून टाकिले. जसें दासानें (दरवेशानें किंवा भक्तानें) दिलेले हरभरे (चणे) वानर कडाकड खाऊन टाकितो तसेंच हें झालें. उत्तरार्धांत दरवेशी आस्वल, वानर वगैरेंना फिरवून आपलें पोट भरतात ह्या गोष्टीकडे किंवा पाळलेल्या वानरास दास (भक्त–भजक) हरभरे खाऊं घालतो, तेव्हां देवदर्शन भक्तास होतें [असे प्रसंग गुजराथेंत येतात] या गोष्टीकडे लक्ष आहे. २. बाणांनीं. ३. ताडित. ४. प्रीतीनें किंवा क्रोधानें. ५. वानराला. ६. सान्वयार्थ–तैं (तेव्हां) सुर नर हय गज (देव, मनुष्य, अश्व व हत्ती) हा! (हाय) म्हणति, यांचेचि (अर्जुन व अश्वत्थामा यांचेच केवळ) आठ वाजी (आठ घोडे) प्रत्येकाचे चारचार घोडे याप्रमाणें एकंदरू आठ घोडे) हा! (हाय, खेदवाचक अव्यय) न म्हणति. [द्वितीयार्धही कव्युक्ति होय.] जी (अजी) घडलें (घडलेलें) गुर्वघ (महापातक) जाया (नाहींसें करण्याकरितां) हा (अर्जुन द्रौणीचा) अद्भुत संग्राम (भयंकर युद्ध) आठवा (स्मरण करा.) अर्जुनाश्वत्थाम्यांचें युद्ध होत असतां दोन्ही पक्षांकडील इतकें सैन्य मेलें कीं नुसत्या ह्या दोघांच्या घोड्यांसच हाय म्हणावें लागलें असें नाहीं, तर देव, मनुष्य व इतर हय गज असे सगळे 'हा' (हाय) म्हणूं लागले. देवमनुष्यांस अदृष्टपूर्व असा हा संग्राम झाला व त्यांत पुष्कळ सैन्यहानि झाली. कवि म्हणतात कीं, तुमच्या महापातकांचें क्षालन होण्याकरितां तुम्ही ह्या भयंकर संग्रामाचें स्मरण करीत चला. ह्या युद्धश्रवणानें श्रोत्यांच्या पातकाचें क्षालन होईल. ७. खेदोद्गार. ८. या अर्जुनद्रौणींचे आठ घोडे 'हाय हाय' असें म्हणति असें नव्हे. ९. महापातक.

आचार्यसुतें केली छिन्ना[1] सोडूनि खरशरा[2] ज्या[3], तें[4]. ।
पाहुनि मुनिहि म्हणति, 'हा पावेल[5] अजातरिपु न राज्यातें'. ॥ ३०
भीष्मेंद्रमुखनरामर[6] म्हणति, 'भला गा! भला महाबाहो!। ।
त्वद्दोःप्रताप[7] अतितर अद्भुतचि, कधीं उणा न हा बा! होo[8].' ॥ ३१
हांसे नारायणसख[9] तें सज्य[10] पुन्हा करून कोदंड[11], ।
जें कालासि[12] म्हणे, 'गा! झांक, मजपुढें करूं नको दंड[13].' ॥ ३२
शोक[14] म्हणे, 'व्यर्थ भरीं हा, त्यजुनि विचार तर्क, विप्र[15] भरे, ।
वत्सा[16]! तुझ्या शरांनीं केला सुप्रभहि[17] अर्क[18] विप्रभ[19] रे!' ॥ ३३
स्त्रीस[20] म्हणे, 'वत्साचे तैसे गुरुसूनुचे[21] शचि! न भाते[22]।
अक्षय्यकार्य[23] असते, तरि करिते निरवकाशचि[24] नभा[25] ते.' ॥ ३४
प्रतिरवमिषें[26] शरांनीं भरतां, कुंथावयासि नभ लागे, ।
देवी[27] म्हणति, 'सख्यांनो! दारुण हा क्षात्रधर्म न भला गे!' ॥ ३५
करितां तुमुलतर समर, शर[28] सरले, गुरुसुतीं उणें होतें, ।
पूर्णत्व पांडवीं, हें एकें हरिदासतागुणें हो! तें. ॥ ३६
झाले भाते समरीं आणाया गुरुसुतीं उणीव[29] रिते, ।

---

१. भग्न. २. भयंकर तीव्र बाणांला सोडून. ३. धनुष्याची दोरी. ४. तें अर्जुनाच्या चापाचें ज्याछेदरूप अद्भुत कर्म. ५. अर्जुनाच्या चापाची दोरी तुटली, तेव्हां आतां त्याला रणांत यश येण्याचें चिन्ह नसल्यामुळें धर्माला राज्यप्राप्ति होणार नाहीं असें मुनींस वाटलें. ६. धम. ७. भीष्मप्रमुख नर, इंद्रप्रमुख अमर. ८. तुझा बाहुप्रताप. ९. होवो. १०. अर्जुन. ११. ज्यायुक्त, गुणान्वित. [अर्जुन आपल्या धनुष्यास दुसरी दोरी (मौर्वी) लावून बाण मारूं लागला. अध्याय ५९ श्लो० ९.] १२. चाप. (गांडीव.) १३. यमदंड. १४. इंद्र. १५. हा विप्र (अश्वत्थामा) भरीं भरे. [भरीं भरणें–ही क्रिया अविचार आणि अदूरदृष्टि यांची सूचक आहे.] १६. हे अर्जुना! १७. ज्याची प्रभा (कांति) उत्तम तो. १८. सूर्य. १९. निस्तेज. २०. इंद्राणीला. २१. इंद्र म्हणे–असा अन्वय. २२. द्रोणपुत्राचे. २३. ज्यांचें कार्य (काम) कधींही संपत नाहीं (क्षय पावत नाहीं) ते. २४. स्थलहीन. [विजयबाण कार्य करून पुनः परत जात–असा भाव.] २५. आकाशाला. २६. प्रतिध्वनीच्या निमित्तानें. हें 'मिषापन्हुति' नामक अलंकाराचें उदाहरण आहे. 'मिष'शब्दाचा अथवा त्याच्या समानार्थक अन्य शब्दाचा प्रयोग झाला असतां हा अलंकार होतो. २७. अप्सरा, देवस्त्रिया. २८. फार प्रचंड, भयंकर. २९. द्रौणीचे बाण सरले. [अध्याय ५९ श्लोक १५.] ३०. हरिभक्तत्वगुणानें. द्रोणपुत्रामध्यें भगवद्भक्तत्व हा गुण कमी होता. द्रौणि आणि अर्जुन हे समसमान, पण या एका गुणानें मात्र दोघांमध्यें भेद होता. ३१. कमीपण. ३२. समरीं गुरुसुतीं उणीव आणाया भाते रिते झाले–असा अन्वय.

देती सामग्री जय, तरि कां सन्नीतिला गुणी वरिते? ॥ ३७
भंगे अश्वत्थामा, अश्वत्था मा कचित्, सदा हरिला, ।
तसि इतरांसि जयश्री, नित्य हरिजनांसि, तो तिणें वरिला. ॥ ३८

---

१. सामग्री जर जय देती तर, नुसत्या साहित्यानें जर जय मिळता तर. भाते समरीं (युद्धांत) गुरुसुतीं (अश्वत्थाम्याचे ठिकाणीं उणीव (कमीपणा, उणेपणा) आणाया रिते (रिकामे) झाले. [कवि म्हणतात] सामग्री जय देती (उपकरणानें, किंवा फक्त साहित्यानें जय मिळता) तरि (तर) गुणी (गुणज्ञ पुरुष) सन्नीतीला (उत्तम नीतीला,) कां वरिते (स्वीकारते.) सामग्री जर जय देती तर एकट्या सामग्रीवरच लोकांची भिस्त राहती आणि लोकांनीं चांगली नीति वरलीच असती असें नाहीं. अश्वत्थाम्याचे भाते रिकामे झाले इतक्यामुळेंच त्याला युद्धांत कमीपणा आला असें नव्हे. वीर प्रत्येक दिवशीं ज्यांच्यां युद्ध करावयास येतात तेव्हां आपले भाते भरून आणतात.याप्रमाणेंच अर्जुन व अश्वत्थामा यांनीं या युद्धाच्या दिवशीं केलें. परंतु अश्वत्थाम्याचे भाते त्याला कमीपणा आणण्याकरितां रिकामे झाले. याचें कारण त्यानें पुरेसे बाण आपल्या भात्यांत भरून आणिले नाहींत हें नव्हे, तर त्या गुणी वीरानें सन्नीतिमार्गाचें अवलंबन केलें नाहीं हें होय. जरि अश्वत्थामा गुणी होता तरि तो सन्नीतीचा आश्रय न करतां वाईट पक्षास मिळाला यामुळें त्याचा अपजय झाला. याच्या आणखी स्पष्टीकरणार्थ गी० ३६-३८ पहा. त्यांत पांडवाच्या ठिकाणीं हरिदासत्वामुळें पूर्णत्व होतें व इतरांच्या ठिकाणीं हरिदासत्वाच्या अभावास्तव (सन्नीतीच्या अभावास्तव)' तें नव्हतें असें लिहिलें आहे. या गीतीचें उत्तरार्ध हें पुढील संस्कृत वचनाचें प्रतिबिंब आहे:-'क्रियासिद्धिः सत्त्वे भवति महतां नोपकरणे'=याचा भावार्थः-हरएक कृत्यांत सिद्धि (पूर्णता) पावणें हें थोर लोकांच्या सत्त्वावर (नीतिधैर्यावर-सत्पराक्रमावर) अवलंबून असतें, साधनसामग्रीवर अवलंबून असत नाहीं. 'क्रियासिद्धिः सत्त्वे' इत्यादि वचन हें कित्येक श्लोकांत चतुर्थचरणस्थानीं आढळतें ते श्लोक वाचकांच्या सोईसाठीं येथें देतोः—'विजेतव्या लंका चरणतरणीयो जलनिधिर्विपक्षः पौलस्त्यो रणभुवि सहायाश्च कपयः । तथाप्येको रामः सकलमवधीद्राक्षसकुलं क्रियासिद्धिः सत्त्वे भवति महतां नोपकरणे ॥१॥ रथस्यैकं चक्रं भुजगयमिताः सप्त तुरगा निरालम्बो मार्गश्चरणरहितः सारथिरपि । रविर्याखेवांतं प्रतिदिनमपारस्य नभसः क्रियासिद्धिः सत्त्वे भवति महतां नोपकरणे ॥२॥ धनुः पौष्पं मौर्वी मधुकरमयी चंचलदृशां दृशां कोणो बाणः सुहृदपि जडात्मा हिमकरः । तथाप्येकोऽनंगस्त्रिभुवनमपि व्याकुलयति क्रियासिद्धिः सत्त्वे भवति महतां नोपकरणे ॥३॥ विपक्षः श्रीकंठो जडतनुरमात्यः शशधरो वसंतः सामंतः कुसुमनिषधः सैन्यमबलाः । तथापि त्रैलोक्यं जयति मदनो देहरहितः क्रियासिद्धिः सत्त्वे भवति महतां नोपकरणे ॥४॥ घटो जन्मस्थानं मृगपरिजनो भूर्जवसनं वने वासः कंदैरशनमपि दुःस्थं वपुरिदम् । अगस्त्यः पाथोधिं यदकृत करांभोजकुहरे क्रियासिद्धिः सत्त्वे भवति महतां नोपकरणे ॥ ५ ॥' २. अश्वत्थामा पराभव पावे. ३. पिंपळाला. पिंपळापाशीं लक्ष्मीचा वास फारच थोडा असतो, फक्त शनिवारीं लक्ष्मी (मा) अश्वत्थापाशीं असते-अशी समजूत आहे. मा अश्वत्था क्वचित् वरिते-असा अन्वय. ४. शनिवारीं स्नान करून शुचिभूत होऊन सूर्योदयावरोवर जो अश्वत्थाची (पिंपळाची) मनोभावानें पूजा करील तो लक्ष्मीच्या

करितां पार्थें गुरुसुत [१]घटजमुनिवरें [२]समुद्रसाचि रिता, ।
धांवे [३]कर्णगजावरि हरि नखरांनीं [४]तया जसा [५]चिरिता. ॥ ३९
[६]कर्णधनुर्ध्वनि कर्णीं शिरतां, तिकडेचि पार्थ तो पाहे, ।
[७]रोहे अश्वत्थामा, [८]कंढले, चढले अपार कोपा [९]हे. ॥ ४०
पार्थ म्हणे, 'रे! कर्णा! बहु [१०]भेटे मजसीं भिडोनि गडबडती, ।
ही आजि [११]आजि आहे, [१२]नोहे केली [१३]संभेंत बडबड ती. ॥ ४१
तेव्हां पांचहि आम्हीं होतों दृढ [१४]धर्मपाशबद्ध रणीं ।
आतां सुटलों, खल हो! कसि हरिली कपट करुनि [१५]सद्धरणी? ॥ ४२
[१६]कर्त्थन सुकर, सुदुष्कर समर, अमर [१७]यमेरवींद्रमुखहि तुला ।
होउत सहाय, न जयें होय खलांच्या कधींहि सुख हितुला. ॥ ४३
जे गांजिली कुरुसभेमध्यें त्वां [१८]बायको निकर करुनी, ।
बांधावेंचि यमें तुज पुरतें तें नायकोनि [१९]केरेकरुनी. ॥ ४४
तेव्हां [२०]यमधर्माचें अस्मद्धर्मापुढें न बळ मांडे, ।
[२१]आजि तुम्हीं [२२]ओगरिला [२३]काळामत्रांत सर्व खळ [२४]मांडे.' ॥ ४५

कृपेनें श्रीमान् होईल; जो पिंपळास पारोशानें स्पर्श करील त्याच्या घरीं लक्ष्मीची वहीण अवलक्ष्मी वास करील, व तिला भेटण्यासाठीं लक्ष्मी शनिवारीं येईल—असें वर्णन महिपतिकृत 'कथासारामृत' नामक ग्रंथाच्या नवम अध्यायांत आहे. 'अश्वत्थामा—अश्वत्था मा' हा लाटानुप्रास जाणावा. ५. हरिभक्तांहून अन्यांला. ६. भगवद्भक्तांशिं. ७. तो (हरिजन) तिणें (जयश्रीनें) वरिला.

१. अगस्तीनें. २. हा उपमालंकार जाणावा. ३. कर्ण हाच गज त्याजवर. ४. सिंह. ५. त्या गजाला. ६. चिरणारा, चिरून फोडणारा. ७. कर्णाच्या धनुष्याचा शब्द. (अध्याय ५९ श्लोक १७.) ८. जिकडे कर्णानें धनुष्याचा ठणत्कार केला तिकडे. ९. एकीकडेच राहे. १०. क्षुब्ध, संतप्त झाले. ११. कर्णार्जुन क्रोधाग्निविष्ट झाले. १२. योद्धे. १३. युद्ध. १४. यांत 'प्रतिषेध' अलंकार झाला आहे. जेथें प्रसिद्ध निषेधाचें वर्णन केलेलें असतें तेथें प्रतिषेधालंकार होतो. याचें लक्षणः—'प्रतिषेधः प्रसिद्धस्य निषेधस्यानुकीर्तनम्' [कुवलयानंद.] १५. कौरवसभेंत पांचालीस आणून केलेली बडबड. १६. अध्याय ६० श्लो० ६ पहा. १७. संतांची धरणी=सज्जनांची भूमि. १८. बडबड. १९. यम, सूर्य, इंद्र हे प्रमुख ज्यांत असे अमर. २०. चित्तास. २१. स्त्री. (द्रौपदी.) २२. गीति ४१-४५ ह्या 'स्वभावोक्ति' नामक अलंकाराचीं उदाहरणें होत. झालेल्या अथवा होणाऱ्या गोष्टींची स्मृति वर्तमानकाळीं करून देणें अथवा भूतकाळाचा किंवा भविष्यकाळाचा संयोग वर्तमानकाळाशीं घालून देणें हें या स्वभावोक्तीचें लक्षण समजावें. २३. द्रौपदीचा छळ केला त्यावेळीं. २४. अध्याय ६० श्लो० १-८ यांत ही अर्जुनोक्ति आहे. मूळाशीं पंतांचें काव्य ताडून पाहून लक्ष्मीसुतानें सत्यवतीसुतावर सरशी केली आहे कीं काय या प्रश्नाचा निर्णय सहज करतां येईल. २५. वाढिला गेला. २६. काळरूप पात्रांत. [अमत्र=पात्र, भांडें.] २७. पक्वान्नविशेष.

कर्ण म्हणे, 'आलों वळ दावायास स्वयें पहायास, ।
शोभे समरींच, तसा न भटांचा भाषणीं महायास. ॥ ४६
बहु कर्म करी पंडित, कथनावसरींहि थोडकेंच वदे; ।
शाकांत प्रवर जसें पथ्यहि तैसें न दोडकें च्यव दे. ॥ ४७
केला पण पूर्ण म्हणसि, आलासि करावयासि कलहास, ।
ये, मजसीं युद्ध करीं, हो भग्न, करोत हे सकल हास. ॥ ४८
तूं काय? घासवासहि पळवीन रणांत अजि भंगुन, गा! ।
बहु हास्य येतसे, कीं पाहे लंघावयासि पंगु नगा.' ॥ ४९
पार्थ म्हणे, 'राधेया! करुनि पलायनहि तूं न लाजसि रे! ।
साध्वी विटांलयीं जसि तसि बहुधा त्वन्मनीं न लाज सिरे. ॥ ५०

---

१. भटांचा महायास (मोठा प्रयत्न) समरींच (रणामध्येंच) शोभे, तसा भाषणीं न (शोभे)—असा अर्थान्वय. हें अर्ध सुभाषितरूप आहे. २. बोलण्याच्या समयीं. ३. येथें शाकांचा दाखला दिला आहे तो ग्राम्यत्वास्तव अप्रशस्त होय असें कित्येक म्हणतात. "काव्यांत न खपण्यासारख्या ग्राम्य शब्दांचा प्रयोग व केवळ व्यवहारिक दाखले" [निबंधमाला—अंक ६३, पृष्ठ १४] पंतांच्या कवितेंत आढळतात असा त्यांच्या कवितेवर आक्षेप आहे, त्याचें प्रस्तुत पद्य हें उदाहरण होय. या आक्षेपावर उत्तर आहे तें असें:—"ग्राम्य म्हणजे नांगरहांके वगैरे हलके लोक यांच्याच मात्र भाषणांत येणारे जे शब्द त्यांचा प्रयोग केला असतां हा दोष होतो. पण तसें मोरोपंताच्या कवितेंत आढळत नाहीं. त्यां कवितेंत ज्या शब्दांचा प्रयोग केला आहे ते शब्द सभ्यांच्याही भाषणांत येणारे असे आढळतात. म्हणून तो ग्राम्यत्वरूप दोष आहे असें म्हणतां येत नाहीं. तसेंच सभ्य लोकांच्या व्यवहारांत येणाऱ्या गोष्टी दृष्टांतत्वें करून सांगितल्या असतां तोही ग्राम्यत्वरूप दोष नव्हें, तर उलटा अर्थसौलभ्यरूपानें गुणच होय असें म्हणण्यास बाध दिसत नाहीं." (निबंधमाला—अंक ७० पृष्ठ २५-२६.) ४. परवर. ५. हितकर. [पथ्य=पथापासून अनपेत (न सुटलें तें)=हितकर, योग्य. या सारखे झालेले शब्द अर्थ्य, न्याय्य, धर्म्य हे होत.] 'धर्मपथ्यर्थन्यायादनपेते' ४।४।९२ या सूत्राचे आधारें हा अर्थ होतो. ६. उपहास. ७. तुझी काय कथा? येथें हें वचन असामर्थ्यदर्शक होय. ८. इंद्रास. [अ० ६० श्लो० १३.] ९. पर्वताला. येथें पंगु अर्जुन आणि नग स्वत: कर्ण—असें सुचविलें आहे. १०. जारसदनीं. ११. सिरे=शिरे. येथें यमक साधण्यासाठीं 'श'स्थानीं सवर्ण जो 'स' त्याची योजना केली आहे. यमकासाठीं सवर्ण अक्षरांची योजना पंतांनीं अनेक ठिकाणीं केली आहे. सभापर्व—अध्याय १-२७; ३-६२; ४-१०८; ५-८५,१०४; ७-६२. इत्यादि गीतींत यमकप्रीत्यर्थ सवर्ण अक्षरें योजिलीं आहेत. कोणत्या अक्षरांस 'सवर्ण' समजावें हें पुढच्या श्लोकांत दर्शविलें आहे:—'रलयोर्डलयोस्तद्वज्जययोर्बवयोरपि । शसयोर्मनयोश्चांते सविसर्गाविसर्गयोः । सबिंदुका बिंदुकयोः स्यादभेदेन कल्पनम् ॥' [किरातार्जुनीय—सर्ग १५ श्लोक १० घंटापथटीका.] 'रलयोर्डलयोश्चैव शसयोर्बवयोस्तथा । वर्दंसेषां च सावर्ण्यमलंकारविदो जना: ॥'.

मारविला मजकरवीं त्वां [1]अनुज, न तारिला, न तारविला, ।
[2]जारविलासन्याय [3]स्मरला यां [4]खलतमाचिया रविला'. ॥ ९१
ऐसें वदोनि सहसा न पहावा [5]साधुधर्महानिकर, ।
म्हणुनि शरांचा सोडी झांकाया [6]त्यासि तो महा निर्कर. ॥ ९२
हस्तीं हाणुनि खरतर शर [7]नरमुष्टीस कर्ण समरांत ।
सहसा [8][9]विशीर्ण करिता झाला होताचि मान्य [10][11]अमरांत. ॥ ९३
त्या कर्णाच्या तोडी तो [12][13]हरितनुजनु धनुष्यवल्लीला, ।
जन म्हणति, 'मूर्त [14]कालचि हा, वरि दावी [15]मनुष्यवल्लीला.' ॥ ९४
उग्रें कोपें [16]रोपें भेदी मूर्छार्थ [17]अंगपोराला, ।
रविहि [18]तमींत बुडे हो! न घडूं द्याया [19]कुसंग पोराला. ॥ ९५
[20]हरिहरगुरुप्रसादज अमित निजें[21]भुजप्रताप कळवीला, ।

---

१. हे कर्णा! तूं मजकडून आपला बंधु मारविलास. [महाभारत–विराटपर्व अध्याय ५४ श्लोक १८-१९; पंतकृत विराटपर्व अध्याय ४ गीति: ९५ पहा.] कारण तूं त्याचें स्वत: रक्षण केलें नाहींस किंवा दुसऱ्याकडूनही करविलें नाहींस. हें पाहून दुष्टजनरूप अंधकाराला सूर्याप्रमाणें नाश करणारा जो मी त्या मला जाराच्या विलासाची रीति आठवते. [ती ज्याप्रमाणें क्षणभंगुर व तींतील प्रेम जसें नश्वर किंवा क्षणिक आणि लटकें त्याप्रमाणेंच तुझें भावावरचें प्रेमही अत्यंत क्षणभंगुर आणि खोटसाळ–असा भाव.] २. अध्याय ६० श्लोक १५-१६ पहा. जाराचा विलास हा केवळ क्षणिक उपभोग होय त्यासारखा. ३. हा स्मरणालंकार. ४. मज. ५. खलरूप अंधकाराच्या सूर्याला (मला–अर्जुनाला). ६. साधूंच्या धर्माची हानि करणारा, सज्जनांच्या आचाराला धरून न चालणारा. (कर्ण.) ७. त्या कर्णाला. ८. समूह. ९. कर्णानें बाणांनीं अर्जुनाच्या हातावर वेध केला तेणेंकरून नराची (अर्जुनाची) मुष्टि विशीर्ण (त्रुटित, भग्न) झाली. [अ० ६० श्लो० २१.] १०. दीर्ण. ११. देवांमध्यें. १२. हरि+तनु+जनु=इंद्र+देह+जन्म=इंद्राचा पुत्र. (अर्जुन.) १३. चापलतेला. वल्ली अथवा लता हें पद भ्रू, विद्युत्, भुज, खड्ग, चाप, या शब्दांशीं अथवा अशा अर्थाच्या शब्दांशीं अन्वित होऊन त्याचा अर्थ सौंदर्य, सौकुमार्य, सूक्ष्मता, तनुता, असा होतो:–भुजलता, भुजवल्ली, चापलता, धनुष्यवल्ली, विद्युल्लता, भ्रूलता. १४. मनुष्यवत्+लीला=मनुष्यासारखी+करणी. लोक म्हणतात जरि हा अर्जुन बाहेरून मनुष्यासारखा वागतो तरि पण हा मूर्तिमान् काळ(यम)च आहे. इतर मनुष्यांप्रमाणें अर्जुनाला सर्व विकार (रागद्वेषादि) आहेत व त्या संबंधानें तो जरि मनुष्याप्रमाणें दिसतो तरि त्याची युद्धांतील कृति यमाला साजेशी आहे. १५. बाणें. १६. कर्णाच्या उराला. (अ. ६० श्लोक २५.) १७. तमांत बुडे=सूर्यास्त झाला अथवा होण्याचा समय ठेपला. १८. कु+संग=पृथ्वी+संबंध, पृथ्वीवर पतन. १९. कर्णाला. २०. हरि (श्रीकृष्ण) हर (शंकर) गुरु (द्रोण) यांच्या प्रसादापासून उत्पन्न झालेला. २१. स्वबाहुप्रभाव.

वळवीला कर जाणों, [1]तो गर्वयशःसमेत पळवीला. ॥ ९६
[2]भीष्मावरि जातां धृतिमान् केला जेंवि वज्रकवचांनीं, ।
[3]श्रांत [4]भ्रांतस्वांत स्वांतत्रासार्त उत्तर वचांनीं. ॥ ९७
[5]तद्धैर्यार्थ स्वयशें वर्णी स्वमुखें, जरी न वानावीं, ।
स्थिर त्यासि रथीं करि, गुरु जैसा हरिच्या सुमानवा नावीं. ॥ ९८
[6]कुरुगुरुपितामहांसीं [7]जिष्णु करायासि जाय कालहातें, ।
कीं साधुच्याहि साधुहि पावे दुःसंगभंगफल हातें. ॥ ९९
[8]नारायणप्रियसखें सर्वमुनिवरें [9]नरें [10]सुरोपास्यें ।
प्रथमचि पितामहाचा-ध्वज तोडुनि पाडिला [11]सुरोपास्यें. ॥ १००

---

१. तो कर्ण. [कर्णानें पलायन केलें.] उत्तरार्धः—यांत सहोक्ति व उत्प्रेक्षा यांची संसृष्टि झाली आहे. त्या कर्णाला त्याचा गर्व व यश क्षणसहवर्तमान पळवून लावण्याकरितां जणूं काय या अर्जुनानें हात वळविला होता. (हात पुनः एकदां वळविला आणि युद्धांत कसा चालतो तो पाहिला.) २. कर्णास पळवून लाविल्यावर अर्जुन पितामह भीष्मावर चालून गेला. त्यासमयीं उत्तर फार भयाकुळ झाला. त्याला भीष्माकडे अर्जुनाचा रथ फिरविण्याचें धैर्य होईना. शूरांचे सिंहनाद गदापात, बाणवृष्टि इत्यादि पाहून त्याचें धैर्य गळालें. अश्वांचे रश्मि व प्रतोद हातांत धरण्याची शक्ति नाहींशी झाली, आणि त्याला स्वजीविताचाही संशय उत्पन्न झाला. उत्तराची ही दीनावस्था जाणून अर्जुनानें त्याला आश्वासनपर आणि उत्तेजनपर शब्दांनीं धैर्य देऊन त्याची ग्लानि दूर केली. अर्जुनाची शस्त्रसंपत्ति, त्याजवरील देवतांचा प्रसाद, त्याचें शौर्य इत्यादि साधनांनीं हा कौरवकुलाचें समूल उत्पाटन करण्यास समर्थ आहे असें जाणून उत्तरानें भीष्म होते तिकडे अर्जुनाचा रथ वळविला—असा कथाभाग आहे. [अध्याय ६१ श्लोक १-३४.] ३. थकलेला. ४. भ्रमयुक्त स्वांत (अंतःकरण) ज्याचें तो. (उत्तर.) ५. त्या उत्तराला धैर्य यावें, ह्या हेतूनें. ६. जैसा गुरु सुमानवा (उत्तम नराला—सच्छिष्या) हरिच्या (विष्णूच्या—देवाच्या) नांवीं (नामांत) स्थिर (अचल) करि. सद्गुरु जसा आपल्या सच्छिष्याला परमेश्वराच्या नामसंकीर्तनांत अक्षय गोडी लावून देऊन स्थिर (दृढ—विकाररहित) करतो तसा अर्जुन उत्तराला रथांत स्थिर करी. ७. 'कुरु—गुरु' हें एकप्रकारचें यमक आहे. ८. भीष्माशीं. ९. दुष्ट संगतीमुळें झालेला भंग (पराभव) हें फळ=दुःसंगभंगरूप फळ साधुहि (भीष्म) साधूच्याहि (अर्जुनाच्या) हातें पावला. भीष्मानें दुर्योधनादिक दुष्टजनांचा समागम केला म्हणून त्याला (तो स्वतः साधु असतांही) अर्जुनासारख्या साधूच्या हातें पराभवरूप फळ प्राप्त झालें. साधूनें ही दुर्जनांशीं समागम केला, तर त्याला अन्य साधूच्या हातानें शासन झाल्याशिवाय राहत नाहीं—असें तात्पर्य. १०. अर्जुनानें. (नारायणाच्या आवडत्या मित्रानें.) ११. देवांनीं उपासना करण्यास योग्य. ('नरें' या शब्दाचें विशेषण.) १२. सु+रोप+आस्यें=उत्तम+बाण+मुखें=उत्तमबाणमुखानें.

[1]पाखंडागम [2]रोधूं पाहति यैऊनि आड वेदास; ।
पार्थासि तसे कौरव, ज्या यावे एक आडवे दास. ॥ ६१
खल दुःशासन दुःसह आणि विविंशति विकर्ण हे चवघे ।
विजयें दमुनि पळविले, दोष जसे दाशरथिगुणें अवघे. ॥ ६२
सर्व [3]महारथ म्हणती त्या विजया, वासवा जसे नग, हूं, ।
केले पिष्ट असुरगिरि जेणें, किति [4]त्यास ते तसे न गहूं. ॥ ६३
हरिनीं गजसे, कुरुभट जिष्णुशरांनीं उदंड लोळविले, ।
दिव्यांगनासह गगनयानीं मग बैसवूनि बोळविले. ॥ ६४
[5]क्षतजनद्या पक्षिरवें म्हणती वीरांसि, 'आयका, मन द्या, ।
आम्हां ऐशा बुडवुनि करिति दुज्या पूर्ण काय काम नद्या?' ॥ ६५

---

१. पाखंड=नास्तिक; आगम=शास्त्रें=नास्तिकांचीं शास्त्रें. ['पाशब्देन त्रयीधर्मः पा रक्षण इति स्मृतेः । तं खंडयंति ये तर्कैस्ते पाखंडा इति स्मृताः' श्रीमच्छंकरदिग्विजय–सर्ग १ श्लोक ३३ टीका.] ज्या (पार्थाला) एक (फक्त) दास (सेवक) आडवे (सामोरे) यावे. ज्या अर्जुनाला फक्त सेवकजन सामोरे येत असत त्यालाच कौरव प्रतिरोध करण्याच्या इच्छेनें आड (मार्गाआड) आले. सेवकांचें आडवें येणें व शत्रूंचें आडवें येणें ह्या दोन्ही कृति निरनिराळ्या उद्देशानें घडतात. एकांत सन्मान होतो; दुसऱ्यांत अपमान होतो. एकांत आज्ञा ऐकण्यासाठीं दास सामोरे नम्रपणें उभे राहतात; दुसऱ्यांत गतिनिरोध अथवा मार्गप्रतिबंध करण्यासाठीं शत्रु मान वर करून उभे असतात. 'आडवे' ह्या शब्दावर श्लेष समजावा. २. कोंडूं. ३. महारथ–रथांत राहून युद्ध करणाऱ्या वीरांचे महारथ, अतिरथ, रथ, आणि अर्धरथ असे चार वर्ग मानले आहेत. त्यांची व्याख्या अशी:—'एको दशसहस्राणि योधयेद्यस्तु धन्विनाम् । शस्त्रशास्त्रप्रवीणश्च महारथ इति स्मृतः ॥ अमितान्योधयेद्यस्तु संप्रोक्तोऽतिरथस्तु सः । रथस्त्वेकेन यो योद्धा तन्नूनोऽर्धरथः स्मृतः ॥.' याचा भावार्थः—जो शास्त्रविद्येमध्यें प्रवीण असून एकटा दहा हजार धनुर्धर वीरांशीं युद्ध करतो त्यास 'महारथ' असें म्हणतात. जो अगणित धनुर्धारी वीरांशीं युद्ध करतो त्यास 'अतिरथ' असें नांव आहे. जो एकट्या वीराशीं लढतो तो 'रथ' आणि जो त्याहून कमी तो 'अर्धरथ.' यांसच महारथी, अतिरथी, रथी आणि अर्धरथी असें म्हणतात. ४. त्यास (त्या अर्जुनास) ते (शत्रु) किती? =त्या अर्जुनाला ते कौरव शत्रु केवळ क्षुद्र होत, त्याच्यापुढें शत्रु म्हणजे कःपदार्थ होत. तसे गहूं न=कौरवपक्षीय वीर जितके मऊ होते तसे गहूं देखील मऊ नसतात. गव्हांपेक्षांही कमी कठिण असे ते शत्रु होते. गहूं पिष्ट करण्यास जितका वेळ लागतो तितकाही वेळ त्या कौरवपक्षीय वीरास पिष्ट करण्यास अर्जुनाला लागला नाहीं; अर्जुनाला गहूं चिरडण्याला जितका अवकाश लागता त्यापेक्षांही कमी त्या शत्रुपक्षीय वीरांना चिरडण्यास लागला. ५. क्षतजनद्या (रक्तनद्या) पक्षिरवें (पक्ष्यांच्या शब्दांनीं) वीरांसि (शूर पुरुषांना) म्हणतातः—आयका (ऐका) मन द्या (सावधान चित्त असूं द्या), दुज्या (दुसऱ्या) नद्या (तीर्थें गंगायमुनादि) बुडवुनि (आपल्या जलांत स्नान करवून) आम्हांऐशा

युद्ध न हरिसख मांडी, त्या सद्यःस्वर्गहेतुसत्रास; ।
झाले सहस्रशः कृतकृत्य, न झाले कृतार्थ सत्रास. ॥ ६६
कर्ण कृप द्रोण पुन्हा धांवुनि पार्थासि एकदांचि तिघे ।
झांकिति दिव्यास्त्रांनीं, तैं तो पळभरि महाचलस्थिति घे. ॥ ६७
योजुनि इंद्रास्त्रातें, पळवी सकळांसि तो महातेजा, ।
भीतिल त्या रिपु न कसे? भीती गगनस्थही पहाते ज्या. ॥ ६८
द्रोणाद्यखिल पळवितां, भीष्मप्रभु कार्मुकासि आकर्षी, ।

(आमच्यासारख्या) [तुम्हांस] पूर्ण काम (सफलेच्छ, पूर्ण मनोरथ—वीरांचा लढण्यांत हेतु कीर्ति मिळविण्याचा असतो, किंवा स्वर्गप्राप्ति करून घेण्याचा असतो) करिती काय? नाहीं करीत—हें उत्तर. आमच्यासारख्या दुसऱ्या (वाकीच्या) नद्या तुम्हास बुडवुनि (स्नान घालून) पूर्ण (सफल-परिपूर्ण) काम (मनोरथ) करतात काय? नाहीं. रणीं मरतो तो उत्तम गति मिळवितो, ती गति आमच्याहून इतर (दुड्या) नद्या देत नाहींत. ही अपन्हुती, कारण क्षतजनद्यांनीं पक्षिरवंद्वारा आपला हेतु प्रकट केला आहे; यांत प्रश्नालंकार, संबोधनालंकार, आणि चेतनधर्मारोपोक्ति यांचा संकर आहे. गिधाडादि रक्तलोलुप पक्षी रक्तप्रवाह पाहून किलबिल चिलबिल शब्द करूं लागले त्यावर त्या रक्तनद्या पक्षिद्वारा बोलत आहेत अशी अपन्हुती बसविली. रक्तनद्या म्हणतात, 'वीरांनो! नीट लक्ष्य देऊन ऐका. आमच्यांत मज्जन करून (वीर मरतात तेव्हां त्यांचीं शरीरें एक तर रुधिरमय होऊन जातात किंवा तीं मरणानंतर रक्तप्रवाहांत सांपडतात) जशी तुमची इच्छा पूर्ण होते (स्वर्गप्राप्तिद्वारा किंवा कीर्तिद्वारा) तशी पवित्र तीर्थ नद्यांत स्नान करून ती पूर्ण होते काय? होत नाहीं. हें अपेक्षित उत्तर. धारातीर्थीं पतन पावणें हें शूर पुरुषांस तीर्थस्नानापेक्षांही जास्त श्रेयस्कर आहे—असा भावार्थ. वीरांना धारातीर्थीं पतन पावल्यानें स्वर्गप्राप्ति होते हें सुप्रसिद्धच आहे. शिवाय कीर्तिलाभ होतो तो निराळाच. हा होण्यास युद्धक्षेत्रांत मरणच यावयास नको तर तरवारबहादरी करतांना आंगातून रुधिर वाहूं लागलें म्हणजे पुरें आहे. म्हटलें आहे—'खंडिता एव शोभंते वीराधरपयोधराः.' यशःप्राप्तीची आशा मनुष्याकडून केवढीं केवढीं कामें करविते व तिचें महत्त्व किती आहे हें खालील मिल्टन् कवीच्या कवितेंतील अवतरण वाचून समजेल:—

"Fame is the spur that the clear spirit doth raise.
(That last infirmity of noble mind.)
To scorn delights and live laborious days."

Lycidas

६. ध्वनीनें, पक्ष्यांच्या शब्दानें.

१. सद्यः स्वर्गाला कारण अशा यज्ञास (मांडी). २. सभय, भयभीत. ३. पर्वतासारखा स्तब्ध राही. महा पर्वताची स्थिति (स्थैर्य) घे (धरी.) ४. पाहणारे.

केतुस्थ[1] वानराला तो ताडी, खिन्न होय नाकर्षी[2]. ॥ ६९
नर[3] तुच्छत्रें छेदी, लाजे पूर्णेंदु पांडुरा ज्यातें, ।
तत्सुतकृतनिजपूर्वजलंघनही श्लाघ्य पांडुराजातें[4]. ॥ ७०
चित्तीं भीष्म म्हणे, 'मजवर कर शस्त्रास्त्रवृष्टि वत्सा ! हूं, ।
आम्हीं पुण्ययशोर्थ स्वशरीरीं दिव्यवृष्टिवत् साहूं.' ॥ ७१
नरहि म्हणे, 'ज्यासि दिले स्वमुखींचे त्वां पितामहा ! घांस, ।
तो हा तुशीं झगडतो होउनियां स्थापिता महाघास[5].' ॥ ७२
पांधुरविलें स्वयें प्रियपौत्राला शस्त्रवस्त्र शांतनवें; ।
तत्काळ योजिलें हो ! पहिलें होतांचि अस्त्र शांत नवें. ॥ ७३
योजूंजी आजावरि शरपटल करुनि चाप सज्ज नातू, तें ।
पाहुनि कुळज कवि म्हणति, 'हें परम श्लाघ्य सज्जना ! तूतें.' ॥ ७४
भीष्में विजयेंचि समचि शस्त्रपटल सबहुमान वारावें, ।
अमररवेंचि[10] भरावें तें नभ बहु न बहुमानवारावें[11]. ॥ ७५

---

१. ध्वजस्थ. २. नारद. हें भारतीय युद्ध देव, यक्ष, ऋषि वगैरे सर्व मंडळी आकाशांतून पहात होती. त्यांत नाकर्षि (नारद) ही होता. नारद भारतीय युद्ध पहात होता याजबद्दल पुरावा द्रोणपर्व अ० १० श्लो० ३८-४५ यांत सांपडतो. त्यांत अर्जुनाच्या घोड्यांची चाकरी कृष्ण करित आहे अशा समयीं नारदाचें भाषण दिलें आहे. त्रेतायुगांत रामरावणयुद्धांत मारुतीनें केलेले पराक्रम स्मरून व अशी शोचनीय स्थिति त्याला यावी कीं भीष्मानें त्याला शरानें ताडण करावें (व अर्जुनाच्या ध्वजावर बसून राहावें लागावें) हा विचार मनांत येऊन नारदाला वाईट वाटलें व 'भवितव्यता बलीयसी' असें म्हणून एक सुसकारा टाकला. ३. नर (अर्जुन) ततूछत्रें (त्या भीष्माचीं छत्रें,) छेदी (छेदिता झाला, भग्न करता झाला,) ज्या पांडुरा (पांढऱ्या छत्रातें) पूर्णेंदु (पौर्णिमेचा पूर्ण प्रकाशित चंद्र) लाजे. (पूर्णेंदूचा पांढरेपणा हा छत्रांच्या पांढरेपणापेक्षां कमी होता—असा भावार्थ.) तें सत्सुतकृतनिजपूर्वजलंघन ही पांडुराजातें श्लाघ्य (होय). आपल्या उत्तम पुत्रानें (अर्जुनानें) केलेलें आपल्या पूर्वजांचें (भीष्माचें) लंघन (धर्षणपराभव अमर्यादा इत्यादि आचरण) पांडुराजाला श्लाघ्य (प्रशंसनीय) होय. 'सर्वत्र जयमन्विच्छेत्पुत्रादिच्छेत्पराजयम्' या न्यायानें अर्जुनानें भीष्माचा केलेला पराभव श्लाघ्यच होय. भीष्म हा पांडूचा पितृस्थानीय आणि अर्जुन तर पुत्रच, तेव्हां नातवानें आजोबाचा पराभव केलेला पाहून पांडुराजाला आनंद झाला हें ठीकच. पांडुनृपति भारतीय संग्राम देवगणांत बसून पाहत होता हें लक्ष्यांत असावें. ४. ज्या भीष्मातें. ५. 'तो हा तुजशीं झगडे' असा अन्य पाठ. ६. महा+अघास=मोठ्या+पापाला, अपराधाला. ७. अस्त्रयुद्ध समाप्त झाल्यावर शरयुद्धास आरंभ झाला त्या वेळेचें हें वर्णन आहे. (अ० ६४ श्लो० २६-२७.) ८. सवासव देव. (श्लो० ३६.) ९. भीष्म विजयाप्रमाणें (अर्जुनाप्रमाणें) समशौर्य होता म्हणून त्यानें अर्जुनाच्या बाणांचें निवारण करावें. १०. देवांच्या शब्दानें. ११. बहुत मनुष्यांच्या शब्दानें.

मानी[1] वृद्ध प्रेक्षक म्हणती, 'अपयश कधीं न येो[2] जीना.' ।
तरुण म्हणती, 'असोनी श्रीपाशुपतहि अधीन[3] योजीना !' ॥ ७६
साधु प्रेक्षक सुर[4] नर म्हणति, 'भला! साधु धन्य शांतनवा! ।
तूं रविसा, दीपकसा योद्धा होताचि अन्य शांत[5] नवा. ॥ ७७
पार्थप्रतिभट[6] गुरु, कीं जो होय निमित्त पूतना[7]मरणीं, ।
कीं तो प्रभु[8] विजयप्रद ज्याचें मुनिवित्त[9] पूत[10] नाम रणीं.' ॥ ७८
निजकुलगुरुस्तुतीप्रति[11] परिसुनि अभिमन्युचा पिता[12] महती[13] ।
तच्चापलता[14] खंडी, वर्णी धनुष्कता[15] पितामह ती. ॥ ७९
पार्थमनीं साधावी जिंकुनियां कुरुपितामहा[16] महि म्या, ।
ऐसाचि पात्र व्हावा सुरलोकीं गुरु पिता[17] महामहिम्या. ॥ ८०
केलें सज्ज धनु असें अतिसत्वर त्या समस्तयोधनुतें[18], ।
कीं देवशशताक्षहि[19] म्हणे, 'तुटलें नाहींच काय हो! धनु तें?' ॥ ८१
वरकड चित्रचि झाले केवळ तैं, चित्रसे[20] न ते[21], ज्यातें[22] ।

---

१. अभिमानी. २. येवो. ३. वृद्धास. ४. स्वाधीन, हातांत. ५. देवांना 'सुर' म्हणण्याचें कारण त्यांनीं सुरेचें (मद्याचें) ग्रहण केलें हें होय:—'सुराप्रतिग्रहाद्देवाः सुरा इत्यभिविश्रुताः । अप्रतिग्रहणात्तस्या दैतेयाश्चासुरास्तथा. ॥' [वा० रा० सर्ग ४६ श्लोक ३६-३८]. ६. मृत. ७. नूतन योद्धा. ८. ही साधुसुरांची उक्ति समजावी. ते म्हणतात:—पार्थप्रतिभट (पार्थासमान योद्धा, अर्जुनाशीं वीर्यांत व शस्त्रास्त्रयोजनेंत बरोबरी करणारा योद्धा) गुरु (देवगुरु—बृहस्पति.) [ज्या गुरूनेंच इंद्राला शस्त्रास्त्रविद्या शिकविली] कीं (किंवा) जो (श्रीकृष्ण भगवान्) पूतनामरणीं (पूतनावधांत) निमित्त (कारण) होय (झाला. भूतकाळार्थी वर्तमान.) कीं (किंवा) तो प्रभु (शंकर) ज्याचें मुनिवित्त पूत नाम (साधूंचे द्रव्य असें पवित्र नांव) रणीं (रणांगणांत) विजयप्रद (स्मरण केलें म्हणजे जय देणारें) [होय]. देव नर इत्यादि प्रेक्षक म्हणतात:—पार्थाची बरोबरी करणार असा वीर म्हटला म्हणजे एक देवगुरु बृहस्पति, दुसरा भगवान् श्रीकृष्ण व तिसरा शंकर. यांशिवाय बाकीच्या वीरांना अर्जुन अजिंक्य होय. यांत 'कृष्ण' आणि 'शंकर' असें सरळपणें वर्णन न केल्यामुळें हें सुरेख 'पर्यायोक्त' झालें. ९. पूतनेच्या नाशाविषयीं. १०. श्रीकृष्ण. ११. मुनीचें धन. १२. पवित्र. १३. भीष्माची स्तुति. १४. अर्जुन. १५. मोटी (चापलता). १६. त्या भीष्माची चापलता (धनुष्यवल्ली). [अर्जुन बाण सोडीत आहे असें पाहून भीष्मानें त्याचें वामभागीं ताडण केलें, तेव्हां सव्यसाचीनें पृथुधार बाणानें आदित्यसमप्रभ भीष्माच्या कार्मुकाचा छेद केला. अ० ६४ श्लो० ४६.] १७. (अर्जुनाचा) धनुर्धरपणा. [धानुष्क='धन्वी धनुष्मान् धानुष्को निषंग्यस्त्री धनुर्धरः' इत्यमरः.] १८. पृथ्वी, राज्य. १९. पांडु. २०. मोठ्या गौरवाला. २१. सर्व योद्ध्यांनीं स्तुत अशानें. (भीष्मानें.) २२. इंद्र .२३. बाहुल्यासारखे.२४. ते भीष्म आणि अर्जुन.२५. ज्या (भीष्मार्जुनांला.) चित्रसेन हरिहर मानुनि (समजून) तेव्हातें (त्यांच्या पराक्रमातें) हरिपाशीं वर्णी—असा अन्वय.

[1]हरिहर मानुनि वर्णी [2]हरिपासीं चित्रसेन तेजातें. ॥ ८२
देवी म्हणति, 'न भ्यावें, हो सावध, हे! सुरापगे! सारे!।
[5]त्वत्सुत ज्यांच्या पक्षीं, खळ केवळ हे सुराप गे! सारे.' ॥ ८३
त्यांचा श्रम शमवाया बहु शीतळ मंद [6]गंधवह वाहे,।
[7]शक्र स्वयेंहि त्यांवरि [8]पुष्पें प्रेमाश्रुबिंदुसह [9]वाहे. ॥ ८४
सुरपुष्पवृष्टिला न स्पर्शूं देती तयां [10]तदिषुवृष्टि,।
कीं [11]मधुपचुंबिता त्या [12]पतिता [13]त्यांच्या पडूं नये दृष्टि. ॥ ८५
खंडी धनुष्य, द्याया निजनिपुणत्वें प्रमोद पुनरपि [14]त्यां ।
स्वगुणोत्कर्षें पूर्वज जिंकुनियां सुखविती, न [15]कुनर पित्या. ॥ ८६
तुटलें कीं न, अशा या घाली जों [16]संशयांत देव पुन्हा ।
तों पार्थ म्हणे, 'आर्या! [17]स्वांबास्त्रें शुद्ध होउंदे वपु, न्हा.' ॥ ८७
साहुनि [18]पितामहाचे त्याच्या पार्श्वींच तो [19]असुख रचिते ।
हाणी सत्वर खर शर [20]दश, अमरांचेहि ते [21]असु खरचिते. ॥ ८८

---

१. विष्णु व शंकर. २. इंद्रापाशीं. ३. पराक्रमातें. (अ० ६४ श्लो० ३७.) ४. हे गंगे. ५. सारभूते. ६. तुझा पुत्र. (भीष्म.) ७. मद्यपी. ८. वायु. ९. शक्रानें भीष्मार्जुनांवर पुष्पवृष्टि केली व त्याच्या डोळ्यांतून प्रेमाश्रु वाहूं लागले—असा अर्थ. यांत 'सहोक्ति' नामक अलंकार आहे. १०. अ० ६४ श्लो० ४४ पहा. ११. ही सहोक्ति होय. जेथें 'सह'शब्दाचा प्रयोग चमत्कृतिजनक असा केलेला असतो तेथें 'सहोक्ति' नामक अलंकार होता. यांत वास्तविक दोन धर्म असून चमत्कार वाटण्यासाठीं ते अभिन्न मानिलेले असतात. याचीं अन्य उदाहरणें:—(१) मारुनि रावण, त्याचे दार तदस्त्रेंकरूनि न्हाणून,। गेल्या निजकीर्तिसह श्रीमत्सीतासतीस आणून ॥ ६३ ॥ [वनपर्व—अध्याय ११ वा] (२) अभिमंत्रुनि बाणत्रय गांडीवाच्या गुणासि तो लावी। सोडी अश्रुसह नृपा,ती अद्भुत शक्ति काय बोलावी? ॥१४०॥ [भीष्मपर्व—अध्याय ११.] (३) पूजन करुनी आज्ञा आशीर्वादासमेत दे मुनी। तत्पादासह राघव गेला,तेथूनि तत्पदें नमुनी ॥४९॥ [मंत्ररामायण—अयोध्याकांड.] (४) तेव्हां सुगल मरुत्सुत लक्ष्मण तारासुतादि वीरमणी । म्हणति विभो भेटेल क्षितिजेसह कीर्ति ही नवी रमणी ॥४२॥ [मंत्ररामायण—युद्धकांड]. १२. घाली. १३. त्यांच्या बाणांची वृष्टि देवांनीं केलेल्या कुसुमवर्षणास तयां (भीष्मार्जुनां) स्पर्शूं न देती=बाणवृष्टीनें पुष्पवृष्टीला वरचेवर अडवून धरिलें—असा भाव. १४. मधुपांनीं (भ्रमरांनीं; पक्षीं मद्यपांनीं) चुंबिलेल्या. १५. नीचा, (भ्रष्टा; पक्षीं पडलेल्या). १६. त्या भीष्मार्जुनांच्या. १७. त्या पूर्वजाला (पित्याला). १८. या अर्थात 'अर्थांतरन्यास' नामक अलंकार आहे. कुनर पित्या न [सुखविती] [परंतु सुनर] पूर्वज जिंकुनियां [पित्या] स्वगुणोत्कर्षें सुखविती असा अन्वय. १९. धनुष्य तुटलें किंवा नाहीं अशा संदेहांत. २०. स्वमातृनेत्रोद्भवें=भागीरथीच्या अश्रूंनीं. [असृ=अश्रु. 'असृः कोणे कचे पुंसि क्लीबमश्रुणि शोणिते' इति मेदिनी.] २१. भीष्माचे शर सोसून. २२. असुख रचणारे, दुःखदायक. २३. धनंजयानें भीष्माच्या स्तनांतरीं दहा बाण मारिले. (अ० ६४ श्लोक० ४७.). २४. प्राण.

त्या खरशरप्रहारें जों पावे मोह [1]आपगेय महा, ।
देवी [2]गंगेसि म्हणति, '[3]नातु न हा बाइ ! आपगे ! यम हा.' ॥ ८९
कुरु म्हणति, 'हाय ! हाय ! न व्हावा हा [4]हरिचियाहि [5]हेत हातें, ।
त्या प्राकृतांसि युक्तचि [6]गीर्वाणांलाहि म्हणवि [7]वेत हा ! तें.' ॥ ९०
दुःखदहि सुखद म्हणती कपि [8]नारद 'रामराम शिवशिव [9]तें' ।
[10]यद्ध्वनि पतिता जीवा, बापा मुलसें, [11]बळेंचि [12]शिवें शिवतें.' ॥ ९१
पडतां [13]मूर्छित नेला माघारां भीष्म [14]जाणत्या सूतें; ।
[15]ईशें[16]प्रहिता देइल दुःख न ज्यां [17]दिव्यें बाण त्या सूं तें. ॥ ९२

---

१. नदीज. २. हा उद्गार स्त्रीस्वभावास कितीतरी अनुरूप आहे म्हणून सांगावें? आपगेचा (गंगानदीचा) पुत्र भीष्म. ३. इंद्राच्याही. ४. नष्ट, गतप्राण. ५. देवांलाही. ६. खेदार्थी अव्यय. ७. हाय. ८. मारुति व नारद हे भीष्माची दशा पाहून हळहळले व त्यांनीं दुःखप्रदर्शक पण सुखदायी असे 'रामराम शिवशिव' उद्गार अनुक्रमें काढले. 'ते रामराम शिवशिव' शब्द दुःखप्रदर्शक तर खरेच, पण पापक्षय करण्यास समर्थ होते म्हणून सुख देणारे असे होत. यद्ध्वनि (ज्या रामनामाचा अथवा शिवनामाचा ध्वनि) हेंच शिव (कल्याण) पतिता जीवा (पापी प्राण्यांला) बापा (जनकाला, बापाला) मुलसें (मुलाप्रमाणें) बळेंचि (मुद्दाम नको नको असें म्हणत असतांही, बळानें) शिवतें (स्पर्शतें). याचा अर्थ कोणी कोणी असा करतातः—भीष्माला मूर्च्छा आलेली पाहून 'रामराम, शिवशिव' असे दुःखवाचक शब्द सैन्यांतील लोक मुखांतून काढूं लागले. यद्यपि ते शब्द दुःखवाचक होते तरि मारुति व नारद हे त्यांना सुखवाचकच समजले. कारण त्या शब्दांचा उच्चार केला असतां पापक्षय होऊन लोक सुखी होतील असें त्यांना पक्कें माहित होतें. द्वितीयार्ध—वरच्या स्पष्टीकरणार्थ कव्युक्ती समजावी. बाप नको नको म्हणत असतां जसें लहान मूल त्याला पटकन् धांवून शिवतें (त्याचा पदर धरतें) तसें पाप्यानें ईश्वरनामोच्चार केला म्हणजे तद्ध्वनिरूप शिव (कल्याण) त्या पतिताला शिवतें, मग त्याची इच्छा असो अथवा नसो. ९. रामराम शिवशिव म्हणणें. १०. ज्या रामनामाचा ध्वनी. ११. कल्याण. १२. भीष्म बेशुद्ध पडला असें पाहून त्याच्या सारथ्यानें त्याचा रथ रणभूमीपासून दूर नेला. १३. सुज्ञ सारथ्यानें. १४. ईश्वरानें पाठविलेली. १५. हें अर्ध अर्थांतरन्यासाचें उदाहरण समजावें. ज्या (ज्या मनुष्याला) दिव्यबाण जें दुःख न [दे] त्या (त्या मनुष्याला) ईशप्रहिता सू (ईश्वरानें पाठविलेली सूय) तें [दुःख] देइल. ईश्वर साह्यकारी असला म्हणजे दिव्य बाणानें सुद्धां कांहीं इजा होत नाहीं, पण जर कां तोच प्रतिकूळ झाला म्हणजे एवढीशी सूय देखील मोठी जखम करिते. 'सानुकूले जगन्नाथे विप्रीतः सुप्रीतो भवेत्' इत्यादि सुभाषितांतील अर्थ यांत ग्रथित केला आहे. किंवा पूर्वार्धाशीं याचा संबंध कल्पून पुढीलप्रमाणें अर्थ कोणी कोणी करतातः—ज्या (भीष्माला) दिव्यबाण (भीष्माशीं परशुरामाचें युद्ध झालें त्यांत रामानें पुष्कळ दिव्यबाणांची योजना भीष्मावर केली पण त्यामुळें त्याला काडीइतकीही इजा झाली नाहीं.) जें दुःख न [दे] त्या (भीष्माला) ईशप्रहिता सू

अध्याय सहावा.

झाले कर्णकृपगुरुप्रभृतिमहावीरभंग नेउ ठावे, ।
स्वबलसहित कुरुप उठे, जरि शिंक म्हणे 'कदापि न उठावें.' ॥ १
हॉणी भल्ल ललाटीं, त्यासि म्हणे पार्थ, 'हाण, चैवताळ, ।
धृष्टा! दुष्टा! भ्रष्टा! तुझिया वृत्तीं नसेचि चैंव तोळ.' ॥ २
हांसे तो भेटे तल्लज, भल्लज पीडा न तल्लु लाटांत, ।
हेतींत पोंहणारा सिंधूच्या जेंवि मल्ल लाटांत. ॥ ३

(अर्जुनानें मारलेला सुईसारखा क्षुद्र बाण) तें दुःख दे. [पूर्वी परशुरामानें भीष्मावर दिव्यबाण मारिला असूनही त्याला मुळींच किंवा फारशी इजा झाली नाहीं. पण आज अर्जुनानें सुईसारखा क्षुद्र बाण (जो मारिला असतां सुईप्रमाणें इजा व्हावी) मारून त्याला मूर्छित केलें.] अथवा ज्या ईशप्रहिता भीष्माला (ईश्वरानें पाठविलेल्या भीष्माला) [कारण भीष्म हा वसूंचा-देवांचा अंशभूत होता] दिव्यबाण दुःख न दे त्या (भीष्माला) सू (सूय) दुःख देईल काय? कैमुतिकन्याय व प्रश्नालंकार यांचा येथें संकर जाणावा. अर्जुनानें मारलेल्या बाणानें भीष्माला फक्त मूर्च्छा आली, जास्त कांहीं झालें नाहीं. १६. सुई.

१. कर्ण, कृप, द्रोण, अश्वत्थामा, दुःशासन, दुःसह, विविंशति, विकर्ण आणि भीष्म अशा नऊ वीरांचे पराभव विदित झाले. २. जरि शिंक कदापि न उठावें [असें] म्हणे [तरी कुरुप स्वबलसहित उठे-असा अन्वय. ३. दुर्योधन. शिंक झाली ती अपशकुनकारक झाली व तिनें युद्धास जाण्यासाठीं कोणी उठूं नये-असें जरी सूचविलें, तरी दुर्योधन स्वसैन्यासह युद्धासाठीं उठला. ४. अध्याय ६५ श्लोक २ पहा. ५. लोहमय बाण, अर्धचंद्राकृति बाणविशेष. ['भल्ल' हा शब्द रघुवंश-सर्ग ४ श्लोक ६३, सर्ग ७ श्लोक ५८, सर्ग ९ श्लोक ६६ यांत आला आहे.] ६. त्या दुर्योधनाला. ७. चवताळणें=रागावणें, संतापणें. ८. दांडग्या! ९. वर्तनांत, आचारांत. १०. रुचि, गोडी. ११. तारतम्य, मेळ. १२. अर्जुन. १३. वीरश्रेष्ठ. तल्लज=प्रशस्त. 'मतल्लिका मचर्चिका प्रकांडमुद्धतल्लजौ'। प्रशस्तवाचकान्यमूनि' इत्यमरः, मतल्लिका (स्त्री.), मचर्चिका (स्त्री.), प्रकाण्ड (स्त्री), उद्ध (पु.) आणि तल्लज (पु.) हे पांच शब्द, उत्कर्षार्थक अथवा प्रशस्तवाचक असून समासाच्या शेवटीं यांचा प्रयोग करतात. जसें पुरुषमतल्लिका-प्रशस्त पुरुष, ब्राह्मणमचर्चिका=प्रशस्त ब्राह्मण, गोप्रकाण्ड=प्रशस्त गो, मनुष्योद्ध=प्रशस्त मनुष्य, कुमारीतल्लज=प्रशस्त कुमारी. हे शब्द कोणत्याहि लिंगाच्या शब्दापुढें आले तरी यांचें लिंगांतर होत नाहीं. धेनुतल्लज पुं.=उत्तम धेनु (स्त्री.) नरमतल्लिका (स्त्री.) उत्तम नर. (पु.) १४. बाणोत्पन्न दुःख. १५. त्या अर्जुनाच्या ललाटांत (मस्तकांत). या अर्धांत 'ल्ल'काराची अनेकवार आवृत्ति झाली आहे म्हणून लकाराचा 'वृत्त्यनुप्रास' आहे. तसेंच 'तल्ल' आणि 'ल्लज' यांची आवृत्ति आहे म्हणून 'छेकानुप्रास' आहे. १६. शस्त्रांत. समुद्राच्या लाटांत मल्ल जसा सहज पोंहतो तसा अर्जुन हा समरसागराच्या शस्त्ररूप लाटांत सहज पोंहणारा होता म्हणून त्याला दुर्योधनाच्या बाणांनीं शिरोवेदना झाली नाहीं.

होय कुरुप नरशरपरिवृत देववृत जेंवि कुंज रानीं कीं ।
शिरला शरगणपंचानन त्या कुरुकटककुंजरानीकीं. ॥ ४
धांवे विकर्ण सत्वर कीं तो निष्फळ असो नरायास, ।
प्राणव्यसनीं सोडिल केंवि भ्राता असोन रायास ? ॥ ५
नर शर त्यावरि सोडी, वधिती तत्काळ तन्महेभा ते. ।
प्रेमें म्हणे, 'पुजावे म्यां धनुसह बहुत जन्म हे भाते.' ॥ ६
खळतत्सहायभंगचि निजसव्रत हें मनांत आणून, ।
प्रथम विकर्ण पळविला, मग नृप तदुरांत बाण हाणून. ॥ ७
मिळतां त्रिवर्ग सद्यश सज्जन भेदील कां न नीचोर ? ।
जो खल सर्वस्व हरी धर्माचें, जेंवि कोननीं चोर. ॥ ८
कुरुप म्हणे, 'वा ! सूता ! दे मज असुदान, हाक हाक हरी, ।
प्राकृत न म्हणतिल कसे कां खवळविला नेहाक हा केहरी ?'॥ ९
पळतां सुयोधनातें, पार्थ म्हणे, 'करुनि बाहुशब्द अरे ! ।

व्याप्रमाणें हुशार पहिलवान (मल्ल) समुद्राच्या लाटा हातांनीं मागें सारून सहज पोहत असतो त्याप्रमाणें अर्जुन शत्रूंशीं सहज झुंजत होता. मल्लाचें लाटांशीं झगडणें आणि अर्जुनाचें शत्रूंशीं झगडणें या दोन्ही क्रिया समानधर्मात्मक होत. 'मल्ल लाटांत' या ठिकाणीं कदाचित् 'भल्ल लाटांत' असा पाठ असावा असें दिसतें. भल्ल म्हणजे आस्वल, त्याची पोहून जाण्याची ख्याति आहे. 'भ'स्थानीं लेखकप्रमादानें 'म' पडण्याचा संभव फार आहे.

१. अर्जुनबाणानें वेष्टित.२. दवानें (वणव्यानें) वृत (व्याप्त).३. जाळी.४. बाणसमुदायरूप सिंह. (पंचानन=सिंह.) ५. कौरवसैन्यरूप कुंजरांच्या (गजांच्या) अनीकीं (सैन्यांत-कळपांत, समुदायांत). हा रूपकालंकार जाणावा. ६. अध्याय ६५ श्लोक ६ पहा. ७. नराचा (अर्जुनाचा) आयास (प्रयत्न). ८. दुर्योधनराजाला. ९. विकर्णाच्या मोठ्या गजातें. [इभ=गज.] १०. ते अर्जुनशर. ११. अर्जुन म्हणे. १२. खलाचा (दुर्योधनाचा) व त्याचा साहाय्यकर्ता (विकर्ण त्याचा) भंग (पराभव). १३. आपलें उत्तम व्रत. खलाचा आणि त्याचा सहाय (सहचर-साहाय्यकर्ता) असेल त्यांचा पराभव करणें हें आपलें श्रेष्ठ व्रत होय असें जाणून. १४. अध्याय ६५ श्लोक ११ पहा. त्या दुर्योधनाच्या उरांत (वक्षःस्थळावर). १५. धर्मार्थकाम. १६. नीचाचें उर. हा सामान्य सिद्धांत आहे. अशा अर्थांचीं वचनें ठिकठिकाणीं इतकीं आढळून येतात कीं, त्यांच्या योगें पंतांची कविता रमणीय आणि सुशोभित झाली आहे. अर्थसंदर्भानें येथें सज्जन म्हणजे अर्जुन आणि नीच म्हणजे दुर्योधन असें समजावें. १७. सकल धन.१८.वनांत. १९. प्राणदान. सुयोधन भीरुहृदय होत्साता प्राणदान द्या असें दीनवाणीनें विनवीत असतां त्यास तूं स्वर्दानास योग्य आहेस असें अर्जुनाचें म्हणणें आहे. (आर्या १४ पहा.)२०. अश्व.२१.व्यर्थ.२२. कहर करणारा. २३.अध्याय ६५ श्लोक १५-१८ पहा. २४. भुजध्वनि. (जयसूचक भुजांचा शब्द-दंड ठोकून.)

कोठें जाशिल, नाशिल तुज [1]दहना [2]मद्धनुष्यअब्द [3]अरे ! ॥ १०
[4]वृद्धांधगुरुमिथुन हो ! बहु धन्य, परंतु [5]पापरतरेतें ।
न मळो, झाला अससी ज्या शुद्धकुळीं [6]अपा ! परत रे ! [7]तें. ॥ ११
केले होते कीं त्वां गुरुपासीं क्षात्रधर्म मुखपाठ ? ।
देती वृद्धचि उष्णा कीं दहना व्हावयासि सुख पाठ ? ॥ १२
कांपसि भयें, रणसमय हेमंतसमय नव्हे, तुझी आण, ।
मी सत्य [9]धनंजय, परि पार्थ, नव्हे [10]असितपथ खरें जाण.॥ १३
म्हणता [11]पुण्ययशःसुखहेतु [12]स्वर्दान कां नको राहो ।
ऐका निज मतिचें [13]अभिमानमलनिरुद्ध कान कोरा हो ! ॥ १४

---

१. अग्नीला. हें रूपक आहे. २. माझा धनुष्यरूप मेघ. ३. शत्रो. ४. धृतराष्ट्र आणि गांधारी वृद्ध (गांधारी) अंध (धृतराष्ट्र) या गुरूंचें (पितरांचें) मिथुन (जोडपें). ५. पापाचे ठायीं रत जें रेत (दुर्योधनपुत्ररूप रेत) त्यानें=पापी पुत्राच्या योगानें पापी सुयोधनानें. येथें 'रेत' कारण आणि 'पुत्र' कार्य असून त्या दोहोंमध्यें कवीनें अभेद मानिला आहे. हो (अहो !) वृद्धांधगुरुमिथुन बहु धन्य, परंतु पापरतरेतें अपा ! (दादा दुर्योधना !) ज्या शुद्धकुळीं झाला अससी तें न मळो (तुझ्या रणांतून पळून जाण्यानें–रणपलायनानें कलंकित न होवो), परत रे ! (अरे माघारा फिर)–असा अन्वयार्थ. ६. बाबा. ७. तें शुद्धकुळ (न मळो). ८. क्षत्रियांचे धर्म. (क्षत्रियानें युद्धांतून पळून जाऊं नये, त्यानें धारातीर्थीं मरण आनंदानें पत्करावें इत्यादि क्षात्रधर्म.) ९. हें अर्ध सुभाषितरूप आहे. १०. अग्नि; (पक्षीं) अर्जुन. ११. अग्नि, असित (कृष्ण) आहे पथ (वर्त्म-मार्ग) ज्याचा तो, जेथें अग्नीनें जळून गेल्याची खूण असते तेथें सर्व काळें असतें. या गीतींत अर्जुन आपणच शंका काढून आपणच तिचें समाधान करीत आहे अथवा दुर्योधनाचा उपहास करीत आहे असें समजावें. दुर्योधनाच्या गात्रांला कंप सुटलेला पाहून अर्जुन त्याला म्हणतो:—तूं भीतीनें कांपतोस, कारण हा रणाचा समय आहे, मी आण घेऊन सांगतों कीं हा हेमंताचा समय नव्हे (थंडीपासून बाधा होऊन कंप सुटण्याचा समय नव्हे.) [रणाचा समय आहे म्हणूनच तूं कांपतोस, प्रस्तुत समय हा हेमंताचा नाहीं. जर तूं थंडीपासून कांपत असशील तर माझ्या जवळून पळूं नयेस, कारण शीतनिवारणार्थ लोक धनंजयाचा (अग्नीचा) आश्रय करतात–तेव्हां तूं जो कांपतोस तो रणाच्या भयानें हेंच खरें] मी धनंजय (अग्नि–पक्षी–अर्जुन) खरा पण पार्थ (पृथापुत्र–धनंजय) आहें. मी असितपथ (अग्नि–धनंजय) खरोखर नव्हे. तूं जो कांपतोस तो पृथापुत्र (पार्थ) धनंजयाच्या भयानें असितपथ धनंजयाच्या (अग्नीच्या) भयानें नव्हे–हें तात्पर्य. १२. पुण्य, यश आणि सुख यांस हेतु (कारण) असें (स्वर्दान). १३. स्वर्गदान. १४. अभिमानरूप मलानें बुजलेले. हें अर्जुनाचें भाषण पळून जाणाऱ्या दुर्योधनाला आणि त्याच्या सैनिकांला टोंचून लेष आणण्यासाठीं आहे असें समजावें. [अहो दुर्योधन दादा आणि वीर हो !] पुण्ययशःसुखहेतु [असें] स्वर्दान [तुम्ही] नको, राहो [असें] कां म्हणतां ?=पुण्य, यश आणि सुख यांस कारण असें जें स्वर्गदान (रणांत

स्वर्गतिकपिलादानचि घे बहुहित हेंचि तुज सुपात्रास, ।
असु वसुचि मानले, परि याला बहु कालदस्युचा त्रास. ॥ १५
यशचि यशोभिरता बहुमत, नामचि एक जेंवि नामरता, ।
अपयशचि कुजन-सेवी, जाणुनिही पथ्य जेविना मरता. ॥ १६
मान विसरलां ? कीं तो सरला ? रुसलां अहो ! सुयोधन ! हो ! ।
प्राणरहित हो, परि पळभरि मानरहित कधीं सुयोध न हो ॥. १७
जसि कीर्ति सदा हरिस, न तसि आवडली नवी रमा नवरी, ।
स्वांतःपुरांतही जो गतकीर्ति करी न वीर मान 'वरी.' ॥ १८

मरण पावल्यानें मिळणारें जें स्वर्गसुख) तें तुम्ही (भयानें रणांगणापासून पळून जाऊन) नको, राहूं द्या परतें एकीकडे, असें कां म्हणतां ? धारातीर्थी पतन पावल्यानें पुण्य, कीर्ति आणि सुख यांस मिळवून देणारी जी स्वर्गति तिचा तुम्ही पलायन करून धिक्कार कां करता ? [हें तुमचें करणें उचित नाहीं] निज मतीचें (म्हणणें–भाषण–सांगणें) ऐका=तुमचीच विचारबुद्धि तुम्हास काय म्हणते तें लक्षपूर्वक ऐका [आणि] अभिमानमलनिरुद्ध कान कोरा हो !=अहो ! गर्वरूप मलानें बुजलेले (भरून गेलेले) तुमचे कान कोरून साफ करा. अभिमानानें तुमच्या कानांत जो मळ भरलेला आहे तो काढून टाकून साफ करा आणि तुमची बुद्धि जें कांहीं तुम्हास सांगत असेल तें सावधानपणें ऐका. रणांतून शत्रूला पाठ दाखवून पळणें हें क्षत्रियाला चांगलें किंवा काय याचा विचार करा. म्हणजें तें अयोग्य आहे असें तुमचीच मति तुम्हांला सांगेल, मात्र अभिमान सोडून विचारबुद्धीचें म्हणणें ऐकिलें पाहिजे. या पद्यांत व्याजोक्ति आहे.

१. द्रष्ट्य. अर्जुन दुर्योधनाला व्याजोक्तिपूर्वक म्हणतो:—स्वर्गति हीच कपिला (उत्तम धेनु) होय, ही तूं घे. हें तुजसारख्या सुपात्रास योग्य दान होय, हें तुला बहुहित (कल्याणप्रद) आहे. असु (प्राण) वसुचि मानिले (धनासारखे रक्षिले) परि (परंतु) याला (या प्राणरूप धनाला) कालदस्युच (मृत्युरूप तस्कराचा) बहु त्रास (भय) आहे. आपल्या जीवाची कितीही काळजी घेतली तरी मरण केव्हां येईल याचा कांहीं नेम नाहीं म्हणून रणांत मृत्यूला भिऊन पळूं नका. 'दे मज असुदान' असें दुर्योधनानें सूताला (आर्या ८ पहा) म्हटलें आहे. त्याजवर तुला 'स्वर्दान' 'स्वर्गतिकपिलादान' योग्य होय असें अर्जुनानें सूचविलें आहे. तुला प्राणदान उचित नाहीं, स्वर्दानच उचित आहे—असें तात्पर्य. २. काळरूप चोराचा. ३. ही गीति सुभाषितांत गणण्यालायक आहे. ४. यशाच्या ठायीं जो रत (आसक्त) आहे त्याला. ५. हितावह. ६. मरणारा. ७. मृत. ८. सुयोध (उत्तम वीर.) प्राणरहित होवो, परंतु तो क्षणभर देखील मानरहित (स्वाभिमानशून्य) न होवो. ९. स्व+अंतःपुरांत, आपल्या अंतःपुरांत. १०. ज्याची नष्ट कीर्ति तो. ११. हें अर्जुनानें दुर्योधनास उद्देशून केलेलें सोपालंभ व तीक्ष्ण भाषण (गीति १०-१८) मूळांतील (अ० ६५ श्लो० १५-१८) भाषणाशीं अवश्य ताडून पहावें म्हणजे कोणतें ज्यास्त सरस आहे हें तेव्हांच कळून येणार आहे. अशीं स्थळें पाहून पंतांच्या सरस्वतीनें व्यासवाणीला आपल्या स्वादानें आणि माधुरीनें खालीं पहायाला लाविलें असें कोणीही सहृदय म्हणणार आहे. पंतांनीं या स्थळीं आपलें विस्तारप्रियत्वही दर्शविलें आहे.

इत्यादि नर वदे जें झालें त्या [1]कुंजरासि [2]अंकुश तें, ।
खलहृदय साधुवचनें दुखवे, न [3]सुतप्तलोहशंकुशतें. ॥ १९
परते पैर [4]पार्थावरि पदपीडितपुच्छभागतक्षकसा, ।
न [5]उगारेल [6]गरुडसा त्यावरि तो [7]दुष्टनाशदक्ष कसा? ॥ २०
तेव्हां [8]नृप रक्षाया सावध होता [9]नदीज त्यामार्गें, ।
कर्णहि [10]वामपार्श्वी रक्षियला, [11]निधि जसा [12]महानागें. ॥ २१
त्याच्या [13]दक्षिणपार्श्वी अश्वत्थामा, पुढें कृप द्रोण ।
[14]दुःशासनादि बहु खळ होते, [15]आर्यांत [16]योजितो कोण? ॥ २२
ते लागले समस्तहि शस्त्रांहीं एकदांचि [17]वर्षाया, ।
हांसत म्हणे धनंजय, 'या हो! या, एकदांचि [18]वर्षा या.' ॥ २३
जैं [19]स्वरथाही न शिवों एकाही [20]आशुगा न दे, वर्षे, ।
शक्र म्हणे, 'कर [21]हरिहरविजयांचें [22]आशु [23]गानें [24]देववर्षे!' ॥ २४
साधु म्हणति, 'हा होय द्रोणप्रियशिष्य, होय [25]हरदास, ।

---

१. हस्तीस. २. अंकुशासारखें टोंचणारें झालें. (अध्याय ६ श्लो० १-२.) ३. अत्यंत तापलेले जे लोखंडाचे खिळे त्यांच्या शेंकड्यानें. ४. शत्रु. अर्जुनाच्या सोळुंठनोक्तीनें क्षुब्ध होऊन सुयोधन सापासारखा अर्जुनावर परतला. ५. पायानें दुखविलेला पुच्छभाग ज्याचा अशा सापासारखा. ६. चढून जाईल. ७. दुष्टांच्या नाशाविषयीं समर्थ. (अर्जुन.) ८. दुर्योधन. ९. भीष्म. (अ०१० श्लो० ४.) १०. डाव्या बाजूचे ठायीं. ११. धनाचा ठेवा, पुरलेल्या धनाचा संचय. १२. मोठ्या सर्पानें. [धनवान् पुरुष पुढल्या जन्मीं साप होऊन आपण पुरून ठेवलेल्या धनाचें संरक्षण करतात अशी समजूत सर्वत्र प्रचलित आहे तिला अनुसरून हें वर्णन आहे.] १३. उजव्या बाजूला. १४. दुःशासन-विविंशतिप्रभृति. (अ० ६६ श्लो० ५.) १५. सज्जनांत; (पक्षीं) आर्या नामक वृत्तामध्यें. येथें 'आर्या' हा शब्द श्लिष्ट आहे. पंताच्या काव्यांत 'आर्या'शब्दावर श्लेषयोजना केलेली बऱ्याच ठिकाणीं आढळते. १६. वर्णन करतो; (पक्षीं) घालतो, गणना करतो. १७. शरवृष्टि कराया लागले. १८. शरांचा वर्षाव करा. १९. जैं एकाही आशुगा (बाणा) स्वरथाही शिवें न दे [आणि आपण स्वतः अर्जुन बाण] वर्षे, [तैं] शक्र म्हणे:—'देववर्षे! (नारदा!) हरिहरविजयाचें आशु (सत्वर) गान कर'—असा अन्वय. २०. आशुग=बाण. ['आशुगोऽर्के शरे वायौ' इति हेमचंद्रः । 'आशुगौ वायु-विशिखौ' इत्यमरः.] २१. विष्णु आणि शंकर यांच्या यशाचें (प्रतापाचें.) २२. शीघ्र. २३. गायन. २४. हे नारदा! [देव+ऋषि=देवांचा ऋषि. देव इव ऋषिः; देवानामपि ऋषिः पूज्यत्वात् नारद, अत्रि, अंगिरस् इत्यादि देवर्षि होत.] २५. साधुलोक इतरांना अर्जुनाच्या पूर्वपीठिकेची माहिती करून देऊन असा पराक्रम त्याकडून होणें हें साहजिकच आहे असा अभिप्राय दर्शवितात. साधु म्हणति—हा (अर्जुन) द्रोणप्रियाशिष्य (द्रोणाचार्यासारख्या शस्त्रास्त्रविद्याकुशलगुरुचा पट्टशिष्य होय; हरदास (हर—शंकर, दास—भक्त=शंकरभक्त) होय; अजितसख (त्रैलोक्यानें अजिंक्य जो कृष्ण त्याचा

होय [1]अजितसख, म्हणतिल घन 'गुरुजी' या [3]शरप्रकरदास. ॥ २५
प्रथम [4]पैरास्त्रें वारी, द्रुत मग [6]संमोहनास्त्र [8]नर यो[9]जी ।
चित्तांत म्हणे, 'गुरुजी ! [10]मनिं [11]बाणासुरसहाय हर यो [11]जी !' ॥ २६
संमोहनास्त्र [12]चापप्रवर, प्रो[13]दाम [14]देवदत्त दर, ।
मोहिति [15]परां, नर तसा होय, जसा [16]वामदेव [17]दत्तदर. ॥ २७

प्रियमित्र) होय. ह्या तीन विशेषणांपैकीं प्रत्येक फार मार्मिक व खुबीनें योजिलेलें आहे. 'द्रोणप्रियशिष्य' यानें अर्जुनाचें बालपणचें युद्धकौशल्य सुचविलें, 'हरदास' या पदानें पाशुपतास्त्राची प्राप्ति सुचविली व 'अजितसख' यानें त्याचा अजिंक्यपणाही सहज सुचविला. हीं तीन विशेषणें क्रमाक्रमानें अर्थात जास्त महत्त्वाचीं आहेत. यांत 'परिकर' नामक अलंकार आहे, कारण हीं विशेषणें साभिप्राय आहेत. जेथें विशेषणें सहेतुक (हेतुगर्भ) असतात तेथें 'परिकर' अलंकार होतो. तसेंच यांत 'सार' नामक अलंकाराची छटा मारीत आहे, कारण यांत अर्जुनाच्या गुणांचें वर्णन पायरीपायरीनें उत्कर्ष दाखवून केलें आहे. जेथें एखाद्या गुणाचें वर्णन उत्तरोत्तर उत्कर्ष दाखवून केलेलें असतें तेथें 'सार' अलंकार होतो.

१. विष्णुसख, नारायणसख. [सखि=समप्राणमित्र. 'अत्यागसहनो बंधुः सदैवानुमतः सुहृत् । एकक्रियं भवेन्मित्रं समप्राणः सखा मतः ॥' इति रघुवंशे पंचमसर्गे ५७ श्लोकस्य टीकायाम्.] २. उदकवृष्टि करणारे मेघ (घन) या शरसमूहवृष्टि करणाऱ्या अर्जुनाला गुरुजी म्हणतील. (आपला हा स्वामी आहे असें समजून त्याला हात जोडतील. उदकवर्षी मेघही शरवर्षी अर्जुनाचें गुरुत्व–प्रभुत्व–कबूल करतील.) अर्जुनाचें शरसंधानलाघव शीघ्र आणि तीव्र असल्यामुळें मेघवृष्टि ही त्यापुढें हात जोडील, पर्जन्याच्या वेगापेक्षां अर्जुनशरांचा वेग जास्त होता–हें तात्पर्य. ३. बाणवृष्टि करणाऱ्यास. ४. शत्रूंचीं अस्त्रें. ५. त्वरित, लवकर. ६. संमोहन करणारें अस्त्र. मूर्च्छा उत्पन्न करणारें अस्त्र. हें अस्त्र ज्यावर टाकावें त्याला हें मोहित (मूर्च्छित) करतें, परंतु त्याचा प्राण घेत नाहीं. शत्रुप्राणवध केल्याशिवाय या शस्त्रापासून जयप्राप्ति होते. या अस्त्रांचा प्रभाव असा आहे कीं शत्रुकुल गाढनिद्रानिमीलित आणि निःस्पंद होतें. इतर अस्त्रानें प्राणहिंसा होते, यानें प्राणहिंसा न होतां जयप्राप्ति होते. (रघुवंश–सर्ग ५ श्लो० ५७ पहा.) ७. अर्जुन. ८. अध्याय ६६ श्लोक ११ पहा. ९. 'रणिं' असा पाठभेद. १०. बाणासुराचा सहाय (मदतनीस) हर (शंकर) ये (येवो). वाण=हा बलिदैत्याच्या शतपुत्रांतील ज्येष्ठ. यास शंकरप्रसादानें सहस्र हात प्राप्त झाले. ११. येवो. (सहाय हो.) १२. श्रेष्ठ धनुष्य. (गांडीव.) १३. अतिगंभीर. १४. देवदत्त नामक दर (शंख). देवानें (इंद्रानें) दिलेला तो देवदत्त. देवदत्त हें इंद्राच्या शंखाचें नांव. अर्जुनानें इंद्राला एकदां दानवयुद्धांत साहाय्य केलें होतें, त्यावरून प्रसन्न होऊन इंद्रानें हा शंख अर्जुनास दिला होता. [पृष्ठ १२ टीप ८ पहा.] १५. श्रेष्ठ. १६. शंकर. [वाम जो देव तो वामदेव. वामयति दुष्टानां मदमिति वामः, वामश्चासौ देवश्च=वामदेवः.] १७. दत्तभय.

पार्थ म्हणे, 'भगिनीचें स्मर उत्तर, उत्तरा! उतर, वास ।
घे कर्णाचें, भ्रमले धनुच्या परिसोनि राउत रवास. ॥ २८
डसला मोहाहि सुतगुरुस, मग न कां सुयोधना चावे? ।
एक कबंधचि सक्रिय हे हर्षाया सुयोध नाचावे. ॥ २९
जा, न हसावें, न तुवां भ्यावें, घेतां हरूनि वास कृपा, ।
घे मद्गुरुप्रसादहि, नेते न लुटिति काय गा! शिवा सकृपा? ॥ ३०
गुरुसुतसुयोधनाचीं नीळें भरितें सदा नव सुवासें ।
ध्यावीं, त्यां काय उणें? कितिकां देती न दान वसुवासें? ॥ ३१
भ्रमला नसे महात्मा, आहे याहुनिहि शोंतनव सोजो, ।
शिवसा पावत आला व्हाया व्यसन प्रशांत नवसा जो.' ॥ ३२
हरवी बोळाकरवीं त्या पांचांचींही कीर्ति सेंह वासें, ।
बुडत्येच सदहितांच्या बहु थोरांचीहि कीर्ति सेंहवासें. ॥ ३३
भीष्माची परमसुखा विजयिहरिजना पहात पावे धी; ।
मग मुरडितांचि रथ तो, इषुनीं त्यांतें महातपा वेधी. ॥ ३४
पार्थहि त्यांच्या वेधी, सोडुनि शीघ्र क्षुरप्र, वाहातें, ।
तत्सूताचेंहि धरी विजयविशिखहत उर प्रवाहातें. ॥ ३५

---

१. अध्याय ६६ श्लोक १२-१४ पहा. २. उत्तरेचें. ३. वचन. [पृष्ठ ६५ गीति ३२-३३ पहा.] ४. रथांतून खालीं उतर. ५. वस्त्र. (कर्णाचें पीत सुंदर वस्त्र. अ० ६६ श्लो० १३.) ६. स्वार. ७. ध्वनीला. ८. मोहरूप अहि (सर्प). ९. पुत्रासह द्रोणाला. १०. शिरोरहित शरीर. ११. चलनवलनव्यापारयुक्त. १२. उत्तम योद्धे. १३. कृपाचार्याला न भ्यावें. १४. माझ्या गुरूचा प्रसादही (द्रोणाचार्यांचें वस्त्र हाच प्रसाद) घे. १५. शरणागत. १६. शंकरा. हा चरण सुभाषितरूप आहे. १७. गुरुसुत (अश्वत्थामा) आणि दुर्योधन यांचीं. १८. भरलेलीं. १९. सुगंधानें. २०. द्रव्य आणि वस्त्रें. २१. उदारधी, महानुभाव. (भीष्म.) २२. भीष्म. २३. शोभतो आहे ह्यापेक्षांही ज्यास्त शांतनव शोभो (साजो). शांतनवाला मोहबाधा झाली नाहीं, कारण संमोहनास्त्राचा प्रतिघात तो जाणत आहे. यास्तव त्याजकडे न जातां, त्याच्या रथास सव्य घालून दुर्योधनाकडे जा—असें मूळांत आहे. [अ० ६६ श्लो० १४.] २४. दुःख, संकट. २५. उत्तराकरवीं. २६. कर्ण, द्रोण, दुर्योधन, कृप, आणि अश्वत्थामा या पांच जणांचीं. २७. ही 'सहोक्ति' आहे. २८. साधुद्वेष्ट्यांच्या, सज्जनशत्रूंच्या. २९. समागमानें. हें अर्ध सुभाषितरूप आहे. ३०. अत्यंत सुखाला. ३१. यशस्वी कृष्णभक्तांला. ३२. बुद्धि. ३३. उत्तर अर्जुनाचा रथ युद्धमध्यांतून दूर नेण्यासाठीं वळवीत असतां. [श्लो० १६-१७.] ३४. त्या अर्जुनाला. ३५. मोठें तप ज्याचें तो. (भीष्म.) ३६. भीष्माच्या. ३७. बाणविशेष. ३८. अश्वातें. ३९. त्या भीष्माच्या सूताचें (सारथ्याचें). ४०. अर्जुनबाणताडित. ४१. रक्तप्रवाहातें. असा भाव.

कुरुकटकांतूनि निघे रथ घनपटलामधूनि जेंवि रवी, ।
हरिजनतेज न वदवे, षड्रिंसहि अरि वधूनि जें विरवी. ॥ ३६
हरिजन हरिसे स्तुत्य, सरिपूंसहि पार्थ सुगति दे वधुनी, ।
आहे याचीहि सदाचरणप्रभवा सुकीर्तिदेवधुनी. ॥ ३७
हे तों एक प्रभु, नरनारायण, यांत भेद न गमो, जी ! ।
त्यांच्या गुणापुढें न त्रिदशांचा आपणासि नेमो मोजी. ॥ ३८
भूप म्हणे, 'ज्या एकें केले बहु हे असे परासु भट, ।
तो सोडिला कसा हो ? सोडिति जीवा, न परि परा, सुभट'. ॥ ३९
हांसोनि नदीज म्हणे, 'हा काळवरि त्वदीय शक्तिमती ।
कोठें गेल्या होत्या ? चपलतेसह भुजाहि शक्तिमती. ॥ ४०
पार्थ बहु भला, तुमच्या तो आजि अपार्थ कापिता मोना, ।

---

१. सहस्ररश्मि. (श्लो० १८.) २. कृष्णभक्ताचें तेज वर्णन करवत नाहीं. ३. या सहा शत्रूंचा त्याग करावा अशी नीति आहे. 'कामः क्रोधस्तथा लोभो हर्षो मानो मदस्तथा । षड्वर्गमुत्सृजेदेनमस्मिंस्त्यक्ते सुखी नृपः ॥' [कामंदक ४-३१.] 'कामः क्रोधो मदो मोहो लोभो मात्सर्यमेव च । षड्वर्गमुत्सृजेदेनमस्मिंस्त्यक्ते सुखी नृपः ॥' असाही पाठ आहे. ४. विरघाळून टाकी, पातळ करी, घाबरवी. जें (हरिजनतेज) अरि वधूनि (बाह्य शत्रूंचा नाश करून) षडरींसहि विरवी (कामक्रोधादि अंतर्गत व अदृश्य षड्रिपूंचाहि नाश करतें [तें] हरिजनतेज (ईश्वरभक्तांचें तेज) न वदवे (वर्णन करवत नाहीं). पराक्रमी पुरुषांना जरि बाह्य व दृश्य शत्रूंचा नाश करितां आला तरि त्यांना अंतर्गत व अदृश्य अशा मानसिक शत्रूंच्या पुढें हार खावी लागते. ईश्वरभक्त मात्र अंतर्बाह्य अशा दोन्ही शत्रूंचा मोड करितात, म्हणून खरे श्रेष्ठ तेच होत. अर्जुनानें जरि एवढ्या बलाढ्य शत्रूचा पराजय केला तरि तो लेशमात्र गर्वानें फुगला नाहीं—हा कवीचा प्रस्तुताशय. हें अर्ध सुभाषितरूप आहे. ५. कृष्णासारखे. 'हरिजन हरिसम सत्य' असा पाठभेद तीन जुनाट हस्तलिखित प्रतींत आढळतो. ६. उत्तम पद, मोक्ष. ज्याप्रमाणें विष्णु आपल्या भक्तांस मोक्षपदवी देतो त्याप्रमाणें हरिभक्त जो पार्थ तो आपल्या शत्रूंला रणचत्वरीं मारून उत्तम गति देतो, तेव्हां तोही हरिसमच झाला—असा भाव. ७. सदाचरणापासून प्रभव (जन्म) जिचा. ८. सुकीर्ति हीच देवधुनी (गंगा). देवांची धुनी (नदी) ती गंगा.—गंगेंत स्नान करणारा जसा मुक्त होतो, तसा अर्जुनसुकीर्तिरूप गंगेंत स्नान करणारा मुक्ति पावतो. गंगेविषयीं स्मृतिवचन आहे तें:—'गंगायां स्नाति यो मर्त्यो यावज्जीवं दिने दिने । जीवन्मुक्तः स विज्ञेयो देहान्ते मुक्त एव सः ॥'. ९. या कृष्णार्जुनाच्या. १०. देवांचा. (त्रिदश=देव. ज्यांना सदां तृतीया अवस्था=यौवनावस्था असते ते त्रिदश.) ११. वृक्ष. (कल्पवृक्ष.) १२. दुर्योधन. (अ० ६६ श्लो० १९-२०.) १३. गतप्राण. १४. शत्रूला. १५. अध्याय ६६ श्लो० २०-२२ पहा. १६. तुझ्या. १७. सामर्थ्य आणि बुद्धि. १८. धनुष्यबल्लीसहित. १९. बाहु. २०. शक्तिसंपन्न अशा. २१. फुकट. २२. तुम्ही बेशुद्ध पडलां होतां तेव्हां तुमच्या माना पार्थ कापिता. (प्राण घेता.)

या [1]अभयदा न व्हाया [2]नरजाति [3]अपार्थका पिता माना. ॥ ४१
वा ! न द्रवे अधार्मिक, सर्वहि ये, परि न ये नटा कविता, ।
[4]अस्मद्वधार्थ धृतअसि याकरवीं काळही न टाकविता. ॥ ४२
जे काय दुरभिमानी श्रमती जोडूनि [5]अघ नर सदा ते ।
भूपा [6]असदुपदेशद [7]मरुपथिका जेंवि [8]अघनरसदाते. ॥ ४३
जाऊ गोधन, योध[9] नु वेचावे, तूं [10]पुरासि चाल कसा ? ।
दे कर्णकृपद्रोणा रथ, मजही, [11]औतुरासि [12]चौलकसा.' ॥ ४४
भूपाचे उपदेशीं मग होतां गर्व शांत, न वच रणा ।
वदला, विहित हित म्हणुनि नमिति मनें सर्व [13]शांतनवचरणा. ॥ ४५
[14]परंतों लागे जेव्हां कुरुबल सोडूनि [15]हुरुप दीनभनें ।

---

१. अभय देणाराला. [रक्षणादि कारणांनीं जे पितृत्व पावतात त्यांचा निर्देश भारतांत आणि इतर ग्रंथांत आढळतो, तो असाः- 'शरीरकृत् प्राणदाता यस्य चान्नानि भुंजते । क्रमेणैते त्रयोऽप्युक्ताः पितरो धर्मशासने ॥ १ ॥ कन्यादातान्नदाता च ज्ञानदाताभयप्रदः । जन्मदो मंत्रदो ज्येष्ठभ्राता च पितरः स्मृताः ॥ २ ॥.' रघुवंश-सर्ग १ श्लो० २४ यांतही असाच अभिप्राय दर्शविला आहेः-'अन्नाच्छादन देउनी जगविणें, भीतीसही वारणें, विद्या सांगुनि सद्गुणा शिकविणें, कष्टांतुनी तारणें, । हें तो भूप करी, म्हणूनि म्हणती त्याला प्रजांचा पिता, तेव्हां केवळ जन्मदत्व उरलें बापांकडे तत्त्वतां ॥ २४ ॥' [लेलेकृत रघुवंश-सर्ग १ ला.] २. मनुष्यजाति. ३. निष्फला. या पद्यांत आठ अक्षरांचें अंत्य यमक आहे. ४. पिता=पाति (रक्षति) इति पिता. जो रक्षण करतो तो पिता. 'रक्षणाच्च पिता नृणाम्' हें वचन अनुसंधेय आहे. नरजाति अपार्थका न व्हाया या अभयदा पिता माना- असा अन्वय. यांत दोन निषेधवाचक शब्द आहेत, त्यांचा 'संभाव्यनिषेधनिवर्तने' ह्या न्यायानें परस्पर लोप होतो असें समजावें. ५. द्रव पावे=दया करी. अर्जुन धार्मिक म्हणून द्रवला, आणि मोहमूढ अशा तुम्हां लोकांचा प्राण त्यानें घेतला नाहीं. तो अधार्मिक (क्रूर-निर्दय) असता तर तुमचा द्रव त्याला आला नसता. धार्मिकत्व आंगीं येणें फार कठिण आहे, नटाला सर्व कांहीं येतें पण त्याला कविता येणें मात्र कठिण आहे, ती वेषांतरानें अथवा हावभावांनीं येणारी नव्हे, ती मूळचीच (आंगचीच) असली पाहिजे. अर्जुनाची धार्मिकता (द्रव पावणें हा धर्म) ही आंगचीच होय असें येथें सूचविलें आहे. ६. आम्हांस मारण्याकरितां. ७. धारण केलेला खड्ग. यांत 'अतिशयोक्ति' आहे. ८. पाप. या आर्येच्या प्रथमार्धांत अर्थांतरन्यास आणि द्वितीयार्धांत उपमा आहे. ९. वाईट उपदेश देणारे. १०. मारवाडांत प्रवास करणाऱ्या जनाला. ११. पाण्यावांचून इतर रस देणारे. अघन+रस+दाते=उदकाशिवाय+रस पदार्थ+देणारे. १२. वीर, योद्धे. १३. हस्तिनापुराला. १४. पीडिताला. १५. त्वरितगति असा, चालविणारा असा. १६. भीष्मपादाला. १७. रणांगणांतून हास्तिनपुराला. १८. ईर्ष्या, उमेद.

विजय करी पाडुनि शर भीष्मद्रोणादिगुरुपदीं नमनें. ॥ ४६
मग कुरुपतिचा भेदुनि मुगुट, विखरिला धुळींत मणिगणकीं, ।
भीमीं भक्ति, वहु दया त्याही तज्जन्मपत्रकरगणकीं. ॥ ४७
करि कृष्णसख कुपतिची कुदशा केवळ, तथापि कुरुसेना, ।
परंते गरुडत्यक्ता जैसी नागी तसीच कुरुसेना. ॥ ४८
परे ते प्रथम परतले, मग नगभित्तनुज वीर तो परते, ।
नरतेज किति तया ? ज्या स्मरतां असुरवर युवतिसीं न रते. ॥ ४९
प्रभु सुरदत्तदरातें वाजवि, परिसोनि तद्रवा हगती ।
मुतती भयें, विसरती त्या कुरुकटकांत भद्र वाह गती. ॥ ५०

---

१. अर्जुनानें शांतनव आणि वृद्ध द्रोणाचार्य यांना मस्तकानें प्रणिपात केला आणि द्रौणि, कृप आणि इतर बाल्हिक, सोमदत्त इत्यादि मान्य कौरव यांना चित्रविचित्र शरांनीं अभिवंदन केलें. [अध्याय ६६ श्लोक २६.] २. दुर्योधनाचा. ३. मुकुट (श्लोक. २७.) आवेध्य, बंधनीय, क्षेप्य आणि आरोप्यक अशीं चतुर्विध देहाभरणें (देहाचे अलंकार) असतात असें मानण्याची चाल आहे. 'चूडामणिः समुकुटः शिरसो भूषणं स्मृतम्'. [भारतीय नाट्यशास्त्र–अध्याय २१ श्लो० ११-१५ काव्यमाला पृ० २२७.] ४. मण्यांच्या समूहांनीं. ५. भीमावर भक्ति होती, भीमानें केलेली दुर्योधनवधाची प्रतिज्ञा खरी व्हावी या हेतूनें आणि दुर्योधनाची जन्मपत्रिका करणाऱ्या गणकाचें घटित खरें व्हावें या हेतूनें अर्जुनानें दुर्योधनाचा वध केला नाहीं ६. दुर्योधनाची जन्मपत्रिका करणाऱ्या ज्योतिष्यावर. ७. या अर्धात 'क'काराची आवृत्ति झाल्यामुळें 'वृत्त्यनुप्रास' झाला आहे. ८. भूपतीची (दुर्योधनाची). ९. पृथ्वी. १०. गजपुरास परते. ११. शत्रु. (कौरव.) १२. इंद्रपुत्र, अर्जुन. [नगभिद्=इंद्र. इंद्रानें आपल्या वज्रानें पर्वतांच्या पक्षांचा छेद केला–अशी पौराणिकी कथा आहे. तिजवरून इंद्राला नगभिद्, गोत्रभिद् इत्यादि नांवें पडलीं आहेत. एकटा मैनाक पर्वत मात्र या पक्षछेदसंकटापासून मुक्त झाला. 'स्वेषु स्थानेषु संस्थाप्य पर्वतानां पुरंदरः। चिच्छेद भगवान् पक्षान् वज्रेण शतपर्वणा ॥' (हरिवंश). पूर्वी हिरण्याक्षाच्या मायेनें सपक्ष झालेले पर्वत यथेच्छ संचार करीत आणि तेणेंकरून मुनिजनांस त्रास देत, म्हणून इंद्रानें पर्वतपक्षशातन करून त्यास यथास्थान स्थिर केलें आणि मुनिजनांला होणारा त्रास बंद केला. १३. अध्याय ६६ श्लो० २९ पहा. १४. या आर्येतील दोन्ही अर्धांमध्यें आरंभीं आणि अंतीं कवीनें यमक योजिलें आहे. सामान्य नराचें तेज त्या अर्जुनापुढें काय चालावयाचें आहे? ज्या अर्जुनाचें स्मरण होतां दैत्यश्रेष्ठ (असुरवर) आपल्या युवतिसीं रमणें सोडून देतात अशा अर्जुनापुढें साधारण पुरुषाचें (दुर्योधनासारख्या पळपट्या पुरुषाचें) तेज काय पडणार आहे? अर्जुनाचें स्मरण होतांच जर दैत्यश्रेष्ठ गलितवीर्य होतात, तर त्या प्रतापशील वीरापुढें सामान्य मनुष्याचें काय चालणार? अर्जुनानें कालखंजादिक दैत्यवरांचा वध केला असल्यामुळें त्याचें स्मरण होतांच धाकानें दैत्यांनीं गलितोत्साह आणि भ्रष्टवीर्य होणें साहजिक आहे. १५. अर्जुन. १६. देवदत्तनामक दरातें. (शंखातें.) १७. त्या शंखाच्या शब्दातें. १८. कल्याणप्रद वाह (घोडे). १९. भद्र (कल्याणप्रद) वाह (घोडे) गति (त्वरित निघून जाणें) विसरती.

तो अभयदेश जातां मत्स्यपुरा, करुनि अभय देशपथें ।
जे भग्नभीतशरणागत कुरुभट त्यांसि अभय दे शपथें. ॥ ५१
हरुनि यशोधन गोधन, योधें अगणित क्षयासि नेऊन, ।
त्या नृपपुत्रासि म्हणे, 'चाल पुरा, हें मनींच ठेवून. ॥ ५२
यद्यपि सत्य वदावें निजगुरुपासीं, तथापि त्यासम जो ।
तुज बहुमत धर्म प्रभु, तदनुमतें ही कथा पिता समजो. ॥ ५३
म्हण कुरुमर्दन गोधनमोचन इत्यादि कर्म हें माजें, ।
अनृतहि हित, साधूच्या रक्षी प्रेमा, तसेंचि हे मी जें.' ॥ ५४
'साजेल कसा तुमच्या आंगींचा मज मुलास पेरावा? ।
लज्जाफलार्थ कैसा गुरुकर्णी अनृत शब्द पेरावा? ॥ ५५
आहे प्रसादकामुक, आज्ञा मोडील हा कसा दास? ।
म्हणतां तसें म्हणेलचि, जड कंदर देचि हाक सोदास.' ॥ ५६
जयकथन करिति जाउनि नृपपुत्रप्रहित दूत नगरातें, ।
बाळासहि न गिळों दे वदनींचा मधुर नूतन गरा तें. ॥ ५७
तीं स्वायुधें शमीवरि ठेवितां राघवा वृषाकपिला ।

---

१. अभयदात्यांत श्रेष्ठ. (अर्जुन.) २. विराट नगराला जातांना. ३. पराभव पावलेले (भग्न) भ्यालेले (भीत) शरण आलेले अशा कौरवयोधांस. [कौरवांकडील योद्धे पराभव पावून पलायन करून परत जात असतां अर्जुनास भेटले, तेव्हां त्यानें त्यांस अभयवचन देऊन आश्वासन दिलें असें वर्णन आहे. अध्याय ६७ श्लोक ५-६.] ४. असंख्य वीरांचा नाश करून. ५. उत्तराला. ६. अध्याय ६७ श्लो० ८-१० पहा. ७. स्वपित्यापाशीं. ८. त्या पित्यासारखा, गुरूसारखा. ९. विराटराजा. १०. गोसमूहविमोचन. ११. माझें. १२. खोटें (बोलणें) ही हितप्रद असतें, जें (अनृत) साधूच्या प्रेमा रक्षी (सज्जनाचें प्रेम संपादितें) [आणि] तसेंचि [साधूचा] हेमा (रक्षी) तें अनृत हित (होय)—असा अन्वय. हें अर्ध सुभाषितरूप आहे. १३. द्रव्या. (अनृतापासूनही द्रव्यसंरक्षण हितकारक—असा भाव.) १४. हें उत्तराचें अर्जुनाला उत्तर आहे. १५. पोषाक. १६. लज्जारूप फल प्राप्त होईल यासाठीं. १७. सोडावा, घालावा, सांगावा. १८. कृपा इच्छिणारा (हा उत्तर). १९. तुम्ही म्हणतां तसें हा दास म्हणेलचि. (हा दास उत्तर विराटाला तुम्ही म्हणतां तसेंच सांगेल.) २०. पाषाणीदरी (गुहा). जड (अचेतन) अशी दरी (गुहा) सुद्धां हांक मारली असतां हांक देते (तसा प्रतिध्वनि करते—मी तर सचेतन प्राणी नर आहे, तेव्हां मला तुमच्या म्हणण्याप्रमाणें म्हटलेंच पाहिजे—असा भावार्थ.) २१. प्रतिध्वनि. २२. राजपुत्रानें पाठविलेले. २३. फणसाचा गरा. हा दाखला पंतांच्या पदरचाच आहे. २४. कथन. २५. शरविक्षतांग अर्जुन स्मशानांत शमीवृक्षावर आपलीं आयुधें ठेवण्यासाठीं आला, तेव्हां वन्हिप्रतिम महाकपि मारुति सकल भूतांसह आकाशांत उड्डाण करून गेला. [अ० ६७ श्लोक १२-१३.] २६. रामचंद्राला. २७. विष्णूला. 'कपिर्वराहः श्रेष्ठश्च धर्मश्च वृष उच्यते । तस्मात् वृषाकपिः प्रोक्तो वरेण्योऽभीष्टदो मनुः॥.'[विष्णुनामसहस्रम्—विवृत्तिसहित मू पृ०८.]

स्मरुनि कपि उडे, विजयश्री ज्यासि भजे, जसी वृषा[1] केपिला.[2] ॥ ५८
गेला गगनपथें ध्वज जो निजतेजें म्हणे 'उभा'[3] रविला, ।
पहिला सिंहांक[4] ध्वज पार्थें त्या स्यंदनीं उभारविला. ॥ ५९
झांकी वपुला[5] क्षतजें, वसतां वर्मी अरीषु,[6] न्हाल्याला, ।
झाला सारथि पहिला, योपावेषासि[7] तो पुन्हा ल्याला. ॥ ६०
वैराटि[8] रथी केला, सत्प्रेम[9] बहु श्रितीं,[10] न बहु लेंकीं, ।
व्रीडा[11] महत्त्व ल्यातें विजय जयश्रीविवाहबहुलें[12] कीं. ॥ ६१
विजयी विराट इकंडे[13] ये, पूजिति पौर[14] विप्रजन यातें, ।
येतांचि सभेंत पुसे प्रेमें त्या उत्तरा स्वतनयातें. ॥ ६२
जेंन[15] कथिति, 'धेनु[16] कुरुनीं वळिल्या, येऊनि उत्तराशेला,[17] ।
त्वत्कीर्तिनें[18] पसरिला स्वपरित्राणार्थ[19] उत्तरा शेला.[20] ॥ ६३
गेला कुरु जिंकाया, आहे सारथि बृहन्नडा,[21] गमला ।

---

१. बैलाला. २. धेनु. ३. उभा रहा, माझ्यापुढें जाऊं नको. जो मारुतियुक्त ध्वज आपल्या तेजानें रवितेजाशीं स्पर्धा करूं लागला. हनूमान् जन्मतांच सूर्यबिंबाला खाण्यासाठीं अतिवेगानें धांवला होता ही कथा सुप्रसिद्ध आहे. तिजवरून मारुतीच्या तेजाची महती लक्षांत येण्यासारखी आहे. ४. सिंहचिन्हाचा. [सैंहध्वज=विराटीय पूर्व ध्वज. अ० ६७ श्लो० १३ टीका पहा.] ५. शरीराला. ६. रक्तानें न्हालेल्या (वपुला).७. शत्रुबाण.८. नाहालेल्या.९.स्त्रीवेषास. वेणी घालून पुनः सारथी झाला. १०. विराटपुत्र.११.साधुप्रेम.१२.आश्रितजनांवर. हा चरण सुभाषितरूप आहे.१३.लज्जा.१४.अर्जुनानें. १५. जयश्रीच्या (यशोलक्ष्मीच्या) विवाहाचें बहुलें असा जो विजय (अर्जुन) त्यातें स्त्रीवेष घेऊन लज्जा धरणें हें महत्त्व (महत्त्वप्रद) असें झालें. जयश्रीचें विवाहबहुलें जो विजय (अर्जुन) त्यातें व्रीडा महत्त्व होय. शमीवृक्षावर आयुधें टेवून, आपली वेणी घालून, उत्तराला रथांत बसवून, आपण पूर्वीप्रमाणें सारथि होऊन,अर्जुनानें बृहन्नडारूप धारण करून विराटनगराकडे रथ चालविला,यांत स्त्रीरूप घेतलें यामुळें येणारी लज्जा ही त्यास महत्त्वप्रद झाली. याचा अन्य रीतीनें ही अर्थ करतात तो असाः— विजयजयश्रीविवाहबहुलें (अर्जुन आणि यशोलक्ष्मी यांच्या विवाहाचें जें बहुलें—रंगस्थान—रणांगण) [हें] त्यातें (त्या उत्तरातें) व्रीडामहत्त्व (मोठी लज्जा) [देणारें झालें]. १६. विराटराजा संग्रामांत त्रिगर्तांस जिंकून, गोधन आणि द्रव्य हीं त्याजपासून घेऊन चार पांडवांसह स्वनगरांत आला. येथें दक्षिणगोग्रहणवृत्तांताचा संबंध आला आहे. [अध्याय ६८ श्लोक १-६.]१७. पुरवासी.१८. अंतःपुरांतील स्त्रिया व कन्या म्हणतात असें मूलांत आहे. (श्लो० ६.) १९. उत्तर+आशेला=उत्तर दिशेला. [आशा= 'आशा ककुभि तृष्णायाम्' इति हैमः.]२०. तुझ्या कीर्तीनें उत्तररूप शेला पसरला (पदर पसरला). येथें तुझ्या कीर्तीनें (कोण्या सुंदर स्त्रीनेंच जणूं काय) उत्तररूप शेला पसरून माझें संरक्षण करा अशी विनवणी केली. २१. आपल्या संरक्षणासाठीं. २२. अध्याय ६८ श्लोक ६-७ पहा.

सत्य कुमारचि, वदला 'लागो अपकीर्तिचा न डाग मला.' ॥ ६४
भूप म्हणे, 'कुरु होतिल वारे, करितील आजि अभ्र मुला, ।
दुःख सुदेष्णेला जें, शिरतां सिंहांत कैलभ अभ्रमुला. ॥ ६५
अक्षत असाल ते जाँ, मेळविलें काल आर्य ! हो ! यश तें ।
लघु, गुरु हें ध्या, धीरां वीरांच्या सिद्ध कार्य होय शतें.' ॥ ६६
हांसुनि धर्म म्हणे, 'हो ! विजयिसुतातें पहाल नयनांहीं, ।
आहे बृहन्नडा जरि सारथि, तरि गोधनांसि भय नाहीं. ॥ ६७
सारथि बृहन्नडा जरि, उत्तर मांसें भरील तरि भूतें, ।
परिभूतें होतीलचि तन्मंत्रेंकरुनि आजि अरिभूतें. ॥ ६८
घालिल बृहन्नडा, जसि देवी घाली नरामर क्षेमीं, ।
वादी म्हणे, 'न उरविन बाधा, घालीन रामरक्षे मीं.' ॥ ६९
ऐसें धर्म वदे तों, करिती येउनि सभेंत दूते नती, ।
कथिती विजयकथा जी देणारी हर्ष नित्य नूतन ती. ॥ ७०
'देवा ! कुमार आला, सोडविल्या धेनु, पळविलीं कटकें, ।
ने वय प्रमाण तेजस्विजनीं म्हणती कवी न ते लटकें.' ॥ ७१

---

१. कार्तिकस्वामी. [कुमार = स्कंद.] २. वायु. ३. मेघ. ४. उत्तराला. ५. छावा. ६. हत्तिणीस. ७. त्रिगर्तांनीं ध्या वीरांला विद्ध (क्षत) केलें नसेल असे जे वीर असतील त्यांनीं उत्तराच्या साहाय्यासाठीं निघून जावें. (श्लोक १०-११.) ८. अहो पूज्य वीर हो ! जें काल (त्रिगर्तांचा पराभव करून) यश मिळविलें तें लघु (लहान) होय. [आर्य='कर्तव्यमाचरन् काममकर्तव्यमनाचरन् । तिष्ठति प्रकृताचारे स वै आर्य इति स्मृतः.'] ९. अध्याय ६८ श्लोक १५-१६ पहा. १०. पृथ्वीतें. ११. पराभव पावलेलीं. १२. अर्जुनाच्या मसलतीनें. त्या अर्जुनाच्या मंत्रानें. [मंत्र—मसलत; चेटक, तोडगा, मंत्राक्षता, भूतनिःसारण करणारा तोडगा. 'मंत्रो वेदविशेषे स्यात् देवादीनां च साधने । गुह्यवादे च पुमान्' इति मेदिनी.] १३. शत्रुपिशाच. १४. काली. (महिषासुरमथिनी चंडी.) १५. मनुष्य आणि देव. १६. सुखांत. १७. सुज्ञ. १८. रामरक्षानामक मंत्राला. १९. उत्तरानें पाठविलेले दूत. २०. नमन. २१. युवराज. ['युवराजस्तु कुमारो भर्तृदारकः' इत्यमरः.] २२. हें अर्ध सुभाषितरूप आहे. २३. तेजस्विजनांत वय प्रमाण धरीत नाहींत, तेजस्विजनाचे बाल्यादि वयाकडे दृष्टिकोणी देत नाहींत, तर गुणांवर नजर असते. असाच अभिप्राय रघुवंश सर्ग ११ श्लोक १ यांत आहे:—'तेजसां हि न वयः समीक्ष्यते.' तसेंच कुमारसंभवांत (सर्ग ६ श्लोक १२) असाच अभिप्राय अन्यप्रकारें दर्शविला आहे. 'स्त्रीपुमानित्यनास्थैषा वृत्तं हि महितं सताम्'. उत्तररामचरित्रांत (अंक ४) समार्थ श्लोकांश आहे तो सुप्रसिद्ध आहे. 'गुणाः पूजास्थानं गुणिषु न च लिंगं न च वयः; 'गुणाः प्रियस्वेऽधिकृता न संस्तवः' इति किरातार्जुनीये, 'पदं हि सर्वत्र गुणैर्निधीयते' इति रघुवंशे (सर्ग ३ श्लोक ६२). रघुवंशांतील श्लोकाचें पद्यात्मक भाषांतर असें:—'तेजस्विता बहुत ध्या वसते नरांत, त्यालाचि थोर म्हणुनी गणिती जनांत; तो लेंकरूं जरि असे तरि लोक त्यास संमानिती, नचि मनीं गणिती वयास.' [लेलेकृत रघुवंश.]

धर्म म्हणे, 'आयकिलें दूतांचें वचन चांगलें कानें, ।
राया ! सुखरोमांचित[1] केलें कीं आजि आंग लेंकानें[2] ? ॥ ७२
सारथि बृहन्नडा ज्या, तद्विजयें करुत[3] बायका नवला, ।
चिंतामणिगल[4] बालक जो, दुर्लभ त्यासि काय कानवला[5] ?' ॥ ७३
दूतांतें सुखवुनि, नृप सचिवांसि म्हणे, 'गुंड्या उभारा हो ! ।
पुर शोभवा, पुढें जा, राजपथीं विप्रजन उभा राहो. ॥ ७४
गाजत वाजत साजत आज तया जतन करुनि आणा हो ! ।
मजमागें मत्स्यांचा[6] हा रिपुशशिराहुबाहु[7] राणा[8] हो.' ॥ ७५
यापरि वदोनि हर्षें, सामोरे सर्व लोक[9] पाठवुनी, ।
आजि करावी अक्षक्रीडा ऐसें मनांत आठवुनी, ॥ ७६
सर्वस्व[10] समर्पी या धर्मासि, ब्राह्मणासि वाणिकसें[11], ।
नृपं कृष्णेसि म्हणे, 'गे ! सैरंध्रि[12] ! मदक्षपात्र आण कसें.' ॥ ७७
धर्मासि म्हणे, 'हूं, या, मांडा उकलूनि रम्य तळपट, हो[13].' ।
कृष्णाहि म्हणे, 'मेल्यां अक्षकरांचें[14] समूळ तळपट हो.' ॥ ७८

---

१. संप्रहृष्टतनुरुह, पुलकित. २. ला उत्तराच्या विजयानें. ३. अध्याय ६८ श्लोक २० पहा. ४. चिंतामणि (इच्छिलेलें वस्तु देणारें रत्न) ज्याच्या गळ्यांत आहे असा बालक. ५. ला बालकास. ६. हें अर्ध सुभाषितरूप आहे. ७. पक्वान्नविशेष. हें सुरस गीत्यर्ध पंताच्या पाकभेदाचें दर्शक आहे. ८. वस्त्राभरणें देऊन दूतांची संभावन करून. (अध्याय ६८ श्लोक ४२.) ९. पताकांनीं राजमार्ग सुशोभित करा, पुष्पोपहारांनीं देवतांचें अर्चन करा, स्वलंकृत गणिका, मोठमोठे वीर कुमार यांनीं वाद्यंत्री घेऊन उत्तराला सामोरें जावें, मत्तगजारूढ होऊन मनुष्यांनीं सर्व चवाट्याच्या जागीं जयघोष करावा, नाट्यरसवेषाभरणा कुमारी तबोवर घेऊन उत्तरेनें उत्तरास सामोरें जावें (श्लोक २३-२६) असें वर्णन मूळांत आहे. १०. मत्स्यदेशांचा. ११. शत्रुरूप चंद्राला राहूसारखा (ग्रासणारा) आहे बाहु ज्याचा असा. हें 'राणा' याचें विशेषण. १२. राजा. १३. होवो. १४. मंगलारात्रिकादि आणि दधिदूर्वादिक हातांत घेऊन अनेक प्रमदा, मंगलवाद्यें जयवाद्यें घेऊन इतर लोक, मागध सूत इत्यादिकांस सामोरे पाठवून (श्लोक २७-२८). १५. सकल धन. १६. वाणासारखें. १७. विराट म्हणतो. (श्लोक ३०.) १८. नाझा सोकट्यांचा पट. १९. अहो. २०. पंताच्या सभापर्वांत असाच उद्गार एक ठिकाणीं आहे. [सभापर्व-अध्याय ५ गीति ८७.] हें भाषण स्त्रीस्वभावास कसें अनुरूप आहे तें पहा. २१. सोकट्या (फांसे) करणारांचें. २२. कृष्णेचें हें अल्प पण आवेशयुक्त भाषण वाचून या व्यसनाच्या घोरतेचें विशदतर वर्णन करणें अशक्य असें वाटतें. या लहानशा वाक्यांत जो अर्थसंग्रह व्यक्त केला आहे तो दोन चार पानें लिहिलीं तरी त्यांत व्यक्त करतां येणार नाहीं. यावरून पंतांची वर्णनशैली किती मार्मिक आहे हें स्पष्ट होतें. हें घोर अक्षक्रीडाव्यसन पांडवांच्या

'द्यूत करूं या' म्हणतां, धर्म म्हणे, 'आवरूनि धी राहें, ।
व्यसनावर्तीं पाडिल, न निघों दे सांवरूनि धीरा हें. ॥ ७९
हें कामकोपलोभप्रमुखमहानर्थकोटिचें वतन, ।
'द्यूत' न म्हणे कवण कितव? धर्महि दुःखांत पावला पतन. ॥ ८०
धर्मा नळाहि देवनि दे वनवास प्रसिद्ध, उत्साहें ।
'हूं' न म्हणवे विराटा! निर्मील प्राणहानि कुत्सा हें. ॥ ८१
अक्षांसह टाकूनि श्री ही धी कीर्तिही कितव देतो, ।
आग्रह तरी, प्रवर्तो द्यूत, नृपा! जो सखा हित वदे तो.' ॥ ८२
द्यूत प्रवर्ततां, तो भूप म्हणे, 'ऐकिलेंसि कंका! तें ।
कुरु जिंकिले कुमारें, वय तरि अद्यापि उचित 'अंकातें.' ॥ ८३
धर्म म्हणे, 'हे कौरव किति? सूत बृहन्नडा कुमारा ज्या, ।
समरीं अमरींच्याही तो भय देईल कुंकुमा, राजा!' ॥ ८४
मत्स्य म्हणे, 'रे! कंका! शंका सोडूनि बोलसी भलतें, ।
क्लीबासि मत्सुताधिक म्हणसी हें वचन मन्मनीं सलतें. ॥ ८५

काळींच होतें असें नाहीं, तर पृथ्वीवरील अत्यंत जुनाट मानलेला जो ऋग्वेद त्यांतही या भयंकर व्यसनाच्या दुष्ट परिणामांचें उत्तम वर्णन आढळतें. ऋग्वेदसंहितेच्या १० व्या मंडळाचे ३४ वे सूक्तांत या द्यूताचें जें वर्णन केलें आहे त्यावरून ह्या व्यसनाचा अंमल आमच्या पूर्वजांवर चांगला बसला होता असें म्हणणें भाग पडतें. एकदां मनुष्य या फंदांत पडला म्हणजे त्याची आणि त्याच्या कुटुंबाची कशी दुर्दशा होते याचें चित्र पूर्वोक्त सूक्तांत फार चांगलें काढिलें आहे. या सूक्ताचें भाषांतर विविधज्ञानविस्तार पुस्तक १३ पृ० १६७-१७० यांत पहावें.

१. अध्याय ६८ श्लोक ३३-३५ पहा. २. मति, मन. ३. दुःखरूप चक्रांत, संकटाच्या फेऱ्यांत. ४. शहाण्या मनुष्याला. ५. हें अक्षक्रीडाव्यसन. ६. हायहाय. ७. जुगारी. ८. पांडवेय युधिष्ठिर (श्लोक ३४). ९. नळाचें उदाहरण मूळांत नाहीं, हें पंतांनीं आपण होऊन येथें घातलें आहे. १०. फाशांचा खेळ, द्यूत. ११. होकार, रुकार. हे विराटा! माझ्यानें हूं म्हणवत नाहीं, द्यूत खेळण्यास माझ्यानें रुकार देववत नाहीं. १२. निंदा. १३. लज्जा. १४. चालूं दे. १५. जो हित वदे तो सखा, हे नृपा! होय. ['स किंसखा साधु न शास्ति योऽधिपम्' हा समानार्थक श्लोकांश आहे. किरातार्जुनीय–सर्ग १ श्लो० ५.] १६. उत्तरानें. (श्लो० ३६.) १७. मांडीस. १८. कौरवांची काय कथा आहे, ते कौरव तृणासारखे तुच्छ होत–असा भाव. १९. ज्या कुमारा बृहन्नडा सूत (सारथि) त्याला हे कौरव म्हणजे कोणत्या झाडाचा पाला? २०. देवांगनांच्याही. २१. तो कुमार. या उत्तरार्धास मूळांत आधार नाहीं. येथें पंतांनीं आपलें कल्पनाबल खर्चून मूळावरही कडी केली आहे असें कोण म्हणणार नाहीं? २२. पंढाला (बृहन्नडारूप अर्जुनाला.)

कंका ! रंका ! [1]सद्योजातहि [2]हरि भंगितो [3]करिघटातें, ।
ब्रह्मांडाधिकहि [4]घटज सेवुनियां सागरा करि घटातें. ॥ ८६
विप्रा[5]धमा ! जरि मनीं वांचावें हें असेल, हो मूंक, ।
न पुन्हा असें वद, सखा म्हणवुनि म्हणतों 'न जीविता मुक्त.' ॥ ८७
धर्म म्हणे, 'जिंकाया शक्त न [6]भीष्मादिकां [7]नगारातीं, ।
कुरुगुरुपुढें विरे [8]परशक्ति, नृपा ! होय कां न गौंरा ती ? ॥ ८८
त्यावरि बृहन्नडाचि प्रौढा, जसि [9]दानवावरि [10]भवानी, ।
गावें या दोघींचें यश भूपा ! आदरें [11]हरिभवानीं. ॥ ८९
कुरुगुरुसवें झगडतां त्या [12]सुरगुरुचेहि ओंठ करपावे, ।
[13]विंध्यस्कंधगशिशुचा कां विधुच्या मंडळा न कर पावे ?' ॥ ९०
ऐसें सत्य [14]वदे जों, तों घाली माळ [15]अक्षमा [16]राया, ।
शिकवी युधिष्ठिराच्या भाळीं [17]पाणिस्थ [18]अक्ष माराया. ॥ ९१
अक्षप्रहार होतां, वाहों लागे [19]अशुद्ध नाकानें, ।
तें [20]स्वांजळींत धरिलें, त्या [21]शांतिक्षांतिविजितनाकानें. ॥ ९२
[22]धर्माभिप्रायज्ञा [23]कृष्णा [24]तांटांत तें धरी रगत, ।
पतिद्वदत साध्वीनें, नाडीनें जाणिजे [25]शरीरगत. ॥ ९३
तों तो उत्तर आला, [26]द्वारस्थानीं नृपासि जाणविला, ।
[27]तेणें अत्युत्कंठित होउनि भेटावयासि आणविला. ॥ ९४

१. उपजतांचही, नुकताच जन्मलेला. २. सिंह. ३. गजसमूहाला. [घटा=हस्तिसंघ. 'करिणां ना घटा' इत्यमरः, 'घटा घटनगोष्ठीभघटनासु च योषिति' इति मेदिनी.] ४. अगस्ती. ५. ब्रह्मबंधो ! ब्राह्मणाधमा ! (श्लो० ३८.) ६. उगला, मुका. (श्लोक ४०.) ७. द्रोण, द्रौणि, कर्ण, कृप, भीष्म इत्यादि. (श्लो० ४१.) ८. पर्वतशत्रु. (इंद्र.) मागें ४९ व्या आर्येंत 'नगभित्' शब्दावर टीप आहे ती पहा. ९. शत्रुशक्ति. १०. थंड. ११. महिषासुरावर. १२. देवी काली. १३. हरिहरांनीं, विष्णुशंकरांनीं. १४. बृहस्पतीचें. १५. विंध्याचल पर्वताच्या खांद्यावर गेलेल्या मुलाचा. १६. धर्म बदे. १७. असहनशीलता. १८. विराटाला. विराट असहनशील (क्रोधवश) झाला. १९. हातांतील. (श्लो० ४६.) २०. फांसा. २१. रक्त, शोणित. (श्लो० ४७.) २२. आपल्या हस्तसंपुटांत. तें रक्त पृथ्वीवर पडलें असतां पृथ्वीचें भस्म करील म्हणून धर्मानें हातांत धरिलें. (वामन–विराटपर्व–अध्याय ८ श्लोक २४.) २३. शांति आणि क्षांति (क्षमा) यांहीं करुन जिंकला आहे (नाक) स्वर्ग ज्यानें अशा धर्मानें.२४. धर्माचा अभिप्राय जाणणारी. २५. द्रौपदी. २६. सौवर्णपात्रांत. (श्लोक ४९.)२७.शरीराला काय झालें काय नाहीं, शरीराला जें कांहीं झालें असेल तें. हें अर्ध सुभाषितरूप आहे. २८. द्वारपालांनीं. २९. विराटानें.

तेव्हां कंक हळूच क्षत्त्यासि[1] म्हणे, 'बृहन्नडा[2] राहो, ।
राहो न हें, सभेंत न तेंत्क्षोभें[3] रक्त नृपतिचें वाहो. ॥ ९५
रण नसतां, मदेहीं जो क्षत[4] कीं क्षतजलेश[5] काढील, ।
तो तत्काळ वधावा, जरि त्याला अमृत शक्र वाढील. ॥ ९६
ही सत्य तेंत्प्रतिज्ञा, या राजाचें म्हणोनि हो हित रे! ।
मारील विराटातें हें माझें देखतांचि लोहित[6] रे!' ॥ ९७
क्षत्त्यानें गुंतवितां, जरि संक्षत[7] तरि निराकुल[8]लक्षणसा ।
राहे बाहेर प्रभु[9], परम सुलक्षण[10]हि तो कुलक्षणसा. ॥ ९८
उत्तर पित्यासि वंदुनि, पाहे कंकासि[11] तो सभाकोणीं[12], ।
तातासि पुसे, 'ऐसा केला अन्याय[13] हा महा कोणी[14]?' ॥ ९९

---

१. द्वारपालकास. २. अध्याय ६८ श्लोक ५४-५६ पहा. ३. बाहेर राहो, एकीकडे असो, सभेंत न येवो: असें म्हणण्याचें कारण कंकाच्या भाषणांत आहे, त्याचें वर्णन इतर ठिकाणीं आढळतें तें असें:—'यो मे करोति वपुषि क्षतं क्षितौ तं प्रेषयेत्स सकुटुंबकं दिवि । षंढोऽयमत्र न विमुच्यतामतो दौवारिकेऽवददिदं युधिष्ठिरः' ॥ १५१ ॥ [श्रीमदमरचंद्रसूरिकृत बालभारत—विराटपर्व, सर्ग ३ पहा.] ४. त्या बृहन्नडेच्या क्षोभानें. ५. जखम, व्रण. ६. रक्तलेश, रक्तबिंदु. ७. अर्जुनप्रतिज्ञा. (श्लोक ५४-५७.) ८. रक्त. 'रुधिरेऽस्रमलोहितास्ररक्तक्षतजक्षोणितम्' इत्यमरः. ९. क्षत्ता=द्वारःस्थ, द्वारपालक. ['क्षत्ता स्यात्सारथौ द्वारःस्थे क्षत्रियायां च शूद्रजे' इत्यमरः; 'क्षत्ता शूद्रात्क्षत्रियाजे प्रतीहारे च सारथौ। भुजिष्यातनये क्षत्ता नियुक्ते च प्रजासृजि ॥' इति विश्वः.] १०. जखमा लागलेला असतांही व्रणित. ११. न व्याकुल अथवा न आकुंचित आहे क्षण म्हणजे उत्साह—आनंद ज्याचा असा. १२. अर्जुन. [अर्जुन सभेंत उत्तराबरोबर आला नाहीं.] १३. शुभलक्षणसंपन्न. [पुरुषाच्या शुभ आणि अशुभ लक्षणांचें वर्णन वराहमिहिरकृत बृहत्संहितेंत आहे. अध्याय ६८ 'पुरुषलक्षण' पहा.] १४. रुधिरसंयुक्त, व्यग्र, अनपराधी, एकांतीं भूमीवर बसलेला असून जवळ सैरंध्री उभी आहे, अशा कंकाला पाहून उत्तर विचारतो. (श्लोक ५८.) १५. सभेच्या कोपऱ्यांत. १६. कंकाला अक्षताडन केलें हा अन्याय कोणी केला? १७. येथें 'कोणीं' आणि 'कोणी' असें पूर्वोत्तर यमक साधिलें आहे. यांत अंतिम अक्षरावर एकदां अनुस्वार आहे आणि एकदां नाहीं. पूर्व यमकावर जर अनुस्वार आहे तर उत्तर यमकावर अनुस्वार असावयाचा असा सामान्य नियम आहे. या नियमाचें पालन करून पंतांनीं आपलें बुद्धिवैभव अनेक स्थळीं प्रकट केलें आहे. जरी पूर्वोत्तर यमकांवर अनुस्वारव्यत्यय येऊं नये अशी खबरदारी कवीनें जागोजाग घेतली आहे, तथापि ञ म ङ ण आणि न या अक्षरांच्या ठिकाणीं हा नियम पाळिला आहे असें नाहीं व पाळण्याचें कारणही नाहीं. हे पांचही वर्ण स्वभावतःच अनुनासिक आहेत, याजकरितां त्यांजवर अनुस्वार असला अथवा नसला तरी लाभहानि कांहीं नाहीं. तेव्हां प्रस्तुत पद्यांत पूर्व यमकावर अनुस्वार असून उत्तर यमकावर नाहीं म्हणून कवीच्या पदरीं अनुस्वारव्यत्ययदोष येतो असें नाहीं. आतां अनुनासिक अक्षरें नसूनही कोठें कोठें हा अनुस्वारव्यत्ययदोष

भूप म्हणे, 'पुत्रा! म्यां केला स्वकरेंचि दंड या कंका, ।
कीं हा करी प्रशंसा पंढाची, नच धरी मनीं शंका.' ॥ १००
उत्तर म्हणे, 'अहाहा! केला अन्याय हा! धरा पाय, ।
ब्रह्मक्षोभ स्वर्गापायहि केवळ नव्हे धरापाय.' ॥ १०१
नमुनि विराट म्हणे, 'वा! कंका! चुकलों महायशा! पावें, ।
न मला सख्या! तुवां या मंदघा घेउनि सहाय शापावें.' ॥ १०२
कंक म्हणे, 'सोड चरण, मज सोसावें असें जरि न कळतें, ।
गळतें रक्त महीवरि, तरि हें त्वद्राष्ट्र तत्क्षणीं जळतें.' ॥ १०३
शमतां शोणितधारा, संपादी धर्मराज तो शुचिता; ।
तों ये बृहन्नडा, मग दावी जी रीति आपणा उचिता. ॥ १०४
राजा म्हणे, 'कुमारा! या वृत्तें लाज त्या कुमारा हो, ।
निंदुनि इंदुनिभयशा क्षण मौनव्रतपरा उमा राहो. ॥ १०५

पंताच्या काव्यांत आढळतो, पण अशी स्थळें फार विरळ होत. उदाहरणार्थ—आदिपर्व–अध्याय ११, आर्या ७६; वनपर्व–अध्याय १३, आर्या ६६; भीष्मपर्व–अध्याय ६, आर्या ५.[निबंधमाला–अंक ६९, पृष्ठ २६-२८. श्री० गणपतराव हरिहर कुरुंदवाडकरांचें पत्र.]

१. अध्याय ६८ श्लो० ६० पहा. २. क्लीवाची, पंढ सारख्याची. ३. हीं उदात्त, सरस, प्रौढ, प्रसन्न, आल्हादजनक आणि मधुर पद्यें (१०१–११९) वाचून पंतांच्या अंगीं कविता प्रसविण्याची ईश्वरदत्त बुद्धि होती असें कोणाच्या मनांत येणार नाहीं बरें? ४. विप्राचा क्षोभ. ५. स्वर्गहानिकर. ६. धरा+अपाय=पृथ्वी+अपकार, उपद्रव=पृथ्वीला अपाय करणारा, पृथ्वीनाशक. उत्तराचें व विराटाचें संभाषण वामनकृत विराटपर्व–अध्याय ८ श्लोक ३४-४० यांशीं अवश्य ताडून पहावें. पंत-पंडितांतील तारतम्यभाव कळून येईल. ७. प्रसन्न व्हावें. या आर्येंत 'चुकलों' 'पावें' आणि 'सख्या' हीं तीन पदें विराटाचें अंतःकरण आरशाप्रमाणें व्यक्त करीत आहेत. या आर्येंत विराटाचा अनुताप आणि नम्रीभाव फार सरस रीतीनें व्यक्त केला आहे, तेव्हां हें वर्णन कोणाच्या मनांत भरणार नाहीं? ८. मद्+अघा=माझ्या+पातकास. ९. अक्षताडन सोसावें असें जर माहीत नसतें तर. १०. तुझें राज्य भस्म झालें असतें. (श्लो० ६४.) ११. रक्ताची धार पडावयाची बंद झाली तेव्हां. १२. स्वच्छता. धर्मानें आपलें रक्तबंबाळ झालेलें मस्तक धुऊन टाकलें. १३. बृहन्नडा विराटाला अभिवंदन करून धर्माच्या संनिध उभी राहिली–अशी योग्य रीति तिनें दाखविली. (श्लोक ६६.) १४. विराट राजा. (श्लोक ६७-७६.) युधिष्ठिराचें क्षमापन करून अर्जुन श्रवण करीत असतां उत्तराची प्रशंसा करून विराट म्हणतो. १५. या विजयवृत्तानें. १६. षडाननाला. १७. चंद्राप्रमाणें शुभ्र यश ज्याचें अशा या कुमाराला (गुहाला). इंदु+निभ+यश=चंद्र+सम+यश. १८. मुक्याच्या व्रतामध्यें निमग्न अशी. १९. कुमारमाता मुकी राहो.

त्वां जिंकिला कसा तो [1]अश्वत्थामा? तसाचि तो [2]कर्ण?।
तरि [3]द्रोण [4]महात्मा दिव्यधनुर्वेदशंभुगोकर्ण. ॥ १०६
केला कसा कृपाचा भंग? कसा पळविला सुयोधन गा!?।
कैसा भीष्मप्रमुखा [5]स्वभुज अशनि [6]कळविला [7]सुयोधनगा?' ॥ १०७
उत्तर म्हणे, 'पित्या! [8]कुरु पाहुनि, झालों भयाकुळ, पळालों,।
सिंह प्रेक्षुनि [9]यूथभ्रष्ट [10]कलभसाच मी बहु गळालों. ॥ १०८
[11]मरणेच्छुनिर्धना जें [12]दातां, [13]सोडूनि सुजळ, दे [14]वसुतें,।

---

१. श्लोक ७० पहा. २. श्लोक ६९ पहा. ३. श्लोक ७२ पहा. ४. महानुभाव, महामनस्क. ५. दिव्यधनुर्वेदरूप शंभूस गोकर्णस्थानापन्न द्रोण. दिव्य असा धनुर्वेद हाच शंभु (शंकर) त्याला गोकर्णाप्रमाणें आश्रयस्थान असा द्रोण. शंभूचें आवडतें आश्रयस्थान जसें गोकर्ण क्षेत्र तसें धनुर्वेदाचें प्रिय निवासस्थान द्रोण होय असें सूचविलें आहे. [गोकर्ण क्षेत्र मुंबई इलाख्यांत कानडा जिल्ह्यांत कुमठा तालुक्यांत कुमठ्याच्या उत्तरेस तीन कोसांवर आहे. येथें 'श्रीमहाबलेश्वर' नामक शिवलिंगाची स्थापना गणपतीनें केली अशी स्कंदपुराणांत कथा आहे. येथें प्रतिवर्षी महाशिवरात्रीस म्हणजे माघ वद्य १४ स मोठी यात्रा भरते. माघ वद्य ८ च्या दिवसीं उत्सवास आरंभ होतो व तो फाल्गुन शुद्ध १ पर्यंत चालतो. महाशिवरात्रीस काशीहून गंगोदकाची कावड गोकर्णमहाबलेश्वराचे अभिषेकासाठीं आणण्याची चाल आहे. 'यात्राकल्पलता'—गोकर्ण—पृष्ठ ६१-७४ पहा.] ६. यांत 'रूपक'अलंकार झाला आहे. स्वभुज आणि अशनि तसेंच सुयोध आणि नग या यथानुक्रम उपमेयोपमानांचा अभेद वर्णिला आहे. इंद्रानें आपल्या वज्रानें पर्वतांचा चुराडा केला म्हणून इंद्राला 'गोत्रभिद्' असें म्हणतात—ही कथा पुराणप्रसिद्ध आहे. ७. इंद्राचें वज्र. ८. महान् योद्धेरूप पर्वतांस. ९. अध्याय ६९ श्लोक १-११ पहा. १०. कौरववीरसैन्य. ११. स्वजातीय प्राण्यांच्या समुदायांतून चुकलेला असा. कळपांतून चुकलेला. १२. गजबालकवत् [कलभ=करिशावक.] १३. दारिद्र्यामुळें मरण इच्छिणाऱ्यातें. १४. "पंतांची कविता आनंदजनक विचारांनीं आणि चमत्कारिक कल्पनांनीं ओतप्रोत भरलेली आहे. मोरोपंताचीं कितीएक पद्यें स्वतंत्रपणें आनंदजनक आहेत व कितीएक एकंदर प्रबंधांत संलग्न असतांना आनंदाला प्रसवतात. तथापि भारतादि ग्रंथरचनेंतील त्याच्या स्वतंत्र कल्पना आणि स्वतंत्र रचिलेल्या ग्रंथांतील कल्पना या सर्वांचें एकीकरण करून पाहिलें असतां, मोरोपंतासारखी कवितास्फूर्ति आजपर्यंत झालेल्या कोणत्याही महाराष्ट्र कवीस नव्हती व पंतानें रचिलेला आहे इतका काव्यग्रंथही दुसऱ्या मराठीभाषाकवीनें रचिलेला नाहीं हें स्पष्ट दिसतें. दुसरें, कवितेचा आत्मा जो रस तो ज्या मायेच्या आश्रयानें राहतो ती चमत्कारिक कल्पनाही मोरोपंताच्या काव्यांत सर्वत्र भरलेली आहे. कोणत्याही विषयाचें वर्णन करतांना प्रत्येक गोष्टीचें स्वरूप दृष्टांतादि अलंकारांनीं उत्कर्षेंकरून दाखविण्याचा प्रत्येक पद्यांत मोरोपंतानें यत्न केलेला आढळतो. त्याच्या बहुत करून सर्व आर्यांचीं उत्तरार्धें अलंकारमय किंवा चमत्कारिक कल्पनामय असतात. कितीएक ठिकाणीं त्याच्या कल्पना इतक्या उज्ज्वल व उदात्त आढळतात कीं, त्या कामांत तो नामांकित संस्कृत कवींची स्पर्धा करीत आहे कीं काय असा भास होतो." [हंसकृत पंतावरील निबंध—पृष्ठ ११७-११८.] १५. धना.



जैसें यश, तैसें हें केलें मद्वदन उजळ देवसुतें. ॥ १०९
मज सारथि करुनि रथी झाला, विद्या प्रकाम रुद्रा ज्या ।
ठाव्या, त्या देवसुता, बहुमत तो त्र्यंबका मरुद्राजा. ॥ ११०
दिव्यदराच्या नादें निर्मुनि त्या कुरुबळांत आधीतें, ।
हरिलें होतें गोधन जें, सोडविलें पळांत आधीं तें. ॥ १११
आधीं कर्ण पळविला, मग केला विरथ तो कृपहि, राया ! ।
शकला न एकही त्या देवसुताच्या यशा नृप ! हिराया. ॥ ११२
अरिसेनेसि न वरतें पाहूं दे, जेंवि साधु कुलटेतें, ।

---

१. देवपुत्रानें. [कोणी एक देवपुत्र रणांत येऊन त्यानें कौरवांचा पराभव करून त्यांच्यापासून गोधन परत घेऊन माझें साहाय्य केलें इत्यादि उत्तराचें भाषण मूळांत आहे. हा देवपुत्र म्हणजे अर्जुनच होय.] मूळांत 'देवपुत्र' असा शब्द आहे. अध्याय ६९ श्लोक २ पहा. याच प्रसंगाला अनुलक्षून बालभारतांत जें वर्णन आहे तें असें:—'केनापि दिव्यपुरुषेण पौरुषं पुण्येन मे विदधता जिता द्विषः । गंता दिनैः प्रकटतां स तु त्रिभिः श्रुत्वा सुतोत्तरमिति स्मितो नृपः ॥ १५६ ॥' [श्रीमदमरसूरिप्रणीत बालभारत–विराटपर्व, सर्ग ३ पहा] २. पुष्कळ. ३. ज्या विद्या रुद्रा (शिवाला) प्रकाम (पुष्कळ) ठाव्या [होत्या] त्या (त्या देवसुताला) ठाव्या=प्रत्यक्ष शंकराला ज्या अस्त्रविद्या अवगत होत्या त्या सर्व देवसुतास (अर्जुनाला) तितक्याच मानानें माहित होत्या, तो देवसुत अस्त्रविद्येंत साक्षात् शंकरच होता. येथें देवसुत (मूळ भारतांत देवपुत्र) शब्द योजिला आहे तो समर्पक [illegible]. देवसुत म्हणजे देवाचा (इंद्राचा) सुत असा अर्थ. या शब्दांतील खुबी मार्मिकवाचकांच्या [illegible]त येण्यासारखी आहे. अर्जुनानें आपलें नांव प्रकट न करावें असें उत्तराला बजावून सांगितलें [illegible], त्यामुळें त्याला तें स्पष्टपणें सांगतां येईना. तेव्हां त्यानें अर्जुनाचें नांव युक्तीनें सूचवून मिथ्यादित्वाचा दोषही टाळिला. पंतांनींही ११५ व्या आर्येंत 'देवपुत्र' या शब्दाची योजना केली आहे. (गीति १०९-१२० पहा.) ४. शंकराला आणि इंद्राला बहुमान्य होता. [त्र्यंबक=तीन अंबक (नेत्र) ज्याला तो शंकर. ह्या शब्दाची निरुक्ति महाभारतांत द्रोणपर्वांत अशी आहे:—'तिस्रो देव्यो यदा चैनं भजंते भुवनेश्वरम् । द्यौरापृथिवी चैव त्र्यंबकस्तु ततः स्मृतः ॥'.] ५. इंद्रास. [मरुत्+राजा+=देव+अधिप.] ६. दिव्य (देवदत्त) शंखाच्या. ७. कौरवसैन्यांत. ८. मनोव्यथेतें. ९. हरिलेलें. १०. रथहीन. ११. यांत उपमा अलंकार आहे. वाक्यांतील अलंकार थोड्या फेरफारानें कसे बदलतात ते पहा:—'हें मुख चंद्रच आहे' असें म्हटलें म्हणजे रूपकालंकार झाला. 'हें मुख चंद्रासारखें आहे' यांत उपमालंकार झाला. 'हें मुख जणूं काय चंद्रच आहे' यांत उत्प्रेक्षा झाली. 'हें मुख नव्हे तर चंद्रच' असें म्हटलें म्हणजे अपन्हुति झाली. 'हें मुख चंद्र समजून चकोर त्यासभोंवतीं घिरट्या घालतो' यांत भ्रांतिमान् अलंकार झाला. 'हें मुख मुखासारखें आहे' अनन्वय. 'मुखासारखा चंद्र आहे' प्रतीप. 'चंद्राला पाहून तुझें मुख मी आठवतों' स्मरण. 'मुखचंद्रानें ताप शमतो' परिणाम. 'अहो ! हें मुख आहे किंवा चंद्र आहे' संदेह. 'चंद्र असें सम-

काय वदूं गुरु गुरुसुत जिंकुनि भीष्मावरीहि उलटे तें? ॥ ११३
श्रीमद्भीष्मासहि तो निजशस्त्रास्त्रप्रवीणता कळवी, ।
पळवी सुयोधनातें, त्यासकट तैंदाश्रिताननें मळवी. ॥ ११४
सैंमोहनास्त्र योजुनि सर्वांसहि देवपुत्र मग मोही, ।
हरिहरलीलेहून न्यूना लीला तुम्हासि न गमो ही.' ॥ ११५
मत्स्य म्हणे, 'तैंदर्शन तुज घडलें, तें मलाचि कां नाहीं? ।
नेत्रें बहु तळमळती, लाभ मिळविला भलाचि कानांहीं. ॥ ११६
सर्वस्वें पूजाया तो आम्हां मायबापसा मान्य, ।
लीलेनें हैंरिला जरि तेणें हा ताप, काय सामान्य? ॥ ११७
सांग कसें तुज दिसतें? तो मज दावील काय पांय सखा? ।
याहुनि उणाचि दुकळीं म्हैणता 'हो कौंयपुष्ट, पांयस खाँ. ॥' ११८

जून चकोर आणि कमल असें समजून भ्रमर तुझ्या मुखावर आसक्त असतात' उल्लेख. 'हा चंद्र होय' अतिशयोक्ति. 'मुखानें चंद्रकमलांस जिंकिलें' तुल्ययोगिता. 'रात्रौ चंद्र आणि तुझें मुख हर्षतात' दीपक. 'तुझ्या मुखावर मी आसक्त आहें, चंद्रावर चकोर आसक्त आहे' प्रतिवस्तूपमा. 'आकाशांत चंद्र, भुवनांत तुझें मुख' दृष्टांत. 'मुख चंद्रकांति धरितें' निदर्शना. 'निष्कलंक मुख चंद्राहून सुंदर असतें.' व्यतिरेक. 'तुझ्या मुखाबरोबर चंद्र रात्रौ हर्ष पावतो' सहोक्ति. याप्रमाणें वाक्यांत थोडा फेरफार केला कीं लागलाच अलंकारांतही बदल होतो. [श्रीमदप्पयदीक्षितप्रणीत 'चित्रमीमांसा' पृ० ५.] १२. व्यभिचारिणीतें. कुलटा=असती. [कुल+अटा=कुलटा घरोघर फिरणारी=जारिणी.) 'शकंध्वादिषु पररूपं वाच्यम्' या वार्तिकाच्या आधारानें 'शकंध्वादि'गणांतील शब्दांमध्यें पररूप होतें. जसें शक+अंधु=शकंधु; सीमन्+अंत=सीमंत (भांग); सार+अंग=सारंग (चित्रमृग, राजहंस) इत्यादि.

१. द्रोण. २. द्रौणि. ३. त्याच्या आश्रितांचीं मुखें. ४. प्राण न घेतां मोहित करून टाकण्याची शक्ति ज्यांत आहे असें अस्त्र. ५. कमी, उणी. ६. त्या देवपुत्राचें दर्शन. ७. हरण केला. ८. कौरवगोग्रहणरूप ताप. कौरवानें गाई धरून नेल्यामुळें झालेला त्रास. ९. हा ताप सामान्य नव्हे, असामान्य होय—असा भाव. ज्या देवसुतानें आमचा त्रास सहज दूर केला तो सामान्य पुरुष म्हणावा काय?—असाही अर्थसंबंध लाविला तरी चालेल. १०. तो देवपुत्र आपल्या चरणाचें दर्शन मला देईल काय? ११. म्हणणारा. १२. शरीरानें पुष्ट. 'पायस (खीर) खा आणि शरीरानें पुष्ट व्हा' असें दुष्काळांत म्हणणारा पुरुष या देवपुत्राहून कमीच होय. १३. पायस=परमान्न. ['पायसस्तु क्लीबपुंसोः श्रीवासपरमान्नयोः' इति मेदिनी. पयसि संस्कृतम्=पायसम्.] १४. अध्याय ६९ श्लोक १२-१३ यांत ही विराटोक्ति आहे. ही पंतांच्या ११६-११८ या गीतीशीं ताडून पाहिली तर पंतांची वाणी अर्थभारवती आणि रसाळ आहे असेंच ठरेल. पंतांनीं विराटाच्या भाषणांत मार्दव, वि-

उत्तर म्हणे, 'उद्यां कीं परवां भेटेल तो असें वाटे, ।
जळकारुण्यहि विनतानुगतचि सोडील तें कसें वाटे?' ॥ ११९
समजावेंचि, परि न ल्या यमधर्मवरेंचि तत्त्व तें समजे,
सज्ज्ञानीं सत्करुणेवांचुनि मतिचे न चालती गमजे. ॥ १२०
राजाज्ञेनें वस्त्रें कुरुवीरांचीं बृहन्नडा उचली, ।
ल्या उत्तरेसचि न ती भेटि बहुत सुकविमतिसही रुचली. ॥ १२१
कन्येसि असीं वस्त्रें ओपी निर्मावयासि बाहुलि हा ।
श्रोते! हो! हृत्फलकीं प्रेमें श्रितकल्पवृक्षबाहु लिहा. ॥ १२२

नय, शालीनता, उदारता इत्यादि जे गुण व्यक्त केले आहेत त्यांचा मूळ व्यासवाणींत गंध सुद्धां नाहीं असें म्हटलें तरी चालेल. पंतांनीं या स्थळीं वर्णनविस्तारही केला आहे ही गोष्ट विसरतां कामां नये.

१. अध्याय ६९ श्लोक १४ पहा. २. भासे. ३. जलरूप कारुण्य. ४. सखल भूमि (उतरती जमीन) किंवा नम्र जन यांस अनुगत (अनुसरून असणारें–लागून राहणारें.) ५. मार्गातें. मार्गातें सोडणार नाहीं–असा भावार्थ. हें अर्ध सुभाषितरूप आहे. याला मूळांत आधार नाहीं. देवपुत्राची ऋजुता आणि दासजनानुकंपाप्रवणता दाखविण्यासाठीं स्वभावतः उतरत्या प्रदेशांत जाणाऱ्या (निम्नग) जळाचा दृष्टांत योजून वर्णन अलंकृत केलें आहे. ६. विराटास. ७. अज्ञातवासाची प्रस्फुटता होणार नाहीं म्हणून जो यमधर्माचा वर होता, त्याच्या योगें पांडव गुप्तरूपानें वास करीत होते म्हणून विराटराजानें त्यांस जाणलें नाहीं. [मोरोपंत–वनपर्व–अध्याय १५ गीति ४३-४४ काव्यसंग्रह पृष्ठ २२३ पहा.] ८. गमजा=गडबड, खाजवाखाजव, प्रभाव. हें अर्ध सुभाषितरूप आहे. सज्ज्ञानीं (सत् (खरें) ज्ञान होण्यांत–आत्मज्ञान होण्याच्या कामीं) सत्करुणेवांचुनि (साधूंची कृपा झाल्याशिवाय) मतिचे गमजे न चालती (नुसत्या बुद्धीचा पराक्रम चालत नाहीं). आत्मज्ञान होण्यास साधूंची कृपा अवश्य लागते, त्या साधुकृपेशिवाय आत्मज्ञान होत नाहीं. सत्पुरुषाची कृपा असली तरच खरें ज्ञान होतें, नुसत्या बुद्धीच्या जोरावर तें होत नाहीं. नुसत्या अकलेचे गमजे चालत नाहींत. सत्करुणेवांचुनि सज्ज्ञानीं (खरें ज्ञान होण्याविषयीं–खऱ्या ज्ञानाचे ठिकाणीं) मतिचे (बुद्धीचे) गमजे (विलास) न चालती=आत्मज्ञान होण्यास सत्कृपाच पाहिजे, बुद्धिवान् मनुष्य असला तरी त्याला केवळ बुद्धीनेंच–सत्करुणेशिवाय–खरें ज्ञान होणार नाहीं. विराटराजाला महानुभाव जे पांडव त्यांस ओळखतां आलें नाहीं, त्यांचें खरें ज्ञान झालें नाहीं, याचें कारण त्याच्या ठिकाणीं साधुकृपादृष्टि नव्हती हें होय. गोग्रहणसमरांत कंकादिकांनीं देवतुल्य पराक्रम दाखविले, तरी त्यांची ओळख विराटाला पटली नाहीं, कारण विराटावर साधूची कृपा नव्हती. या पद्यांत 'अर्थांतरन्यास' नामक अलंकार आहे. ९. विराटाच्या आज्ञेनें. (अध्याय ६९ श्लोक १६-१७ पहा.) १०. उत्तरेला. ११. हृदयरूप पाटीवर. १२. आश्रिताला कल्पवृक्षासारखा भुज ज्याचा असा.

शोभा सोडुनि होता शुद्ध वसंतीं करीरसा पार्थ, ।
मग मंत्रातें व्हाया उद्धव संतीं करी रसापार्थ. ॥ १२३
मंत्र नृपसुतासीं कीं 'हाहि, उद्यांचाहि तो दिवस जावा, ।
परवां बैसोनि पंदीं धर्मप्रभु द्यावया शिवें सजावा.' ॥ १२४

अध्याय सातवा.

अच्युतपदासि चिंतुनि सानुज धर्म स्ववेष घेऊनी, ।
सुदिनीं बसे नृपपदीं त्या मत्स्याच्या समेंत येऊनी. ॥ १

---

१. नेपूल्याच्या झाडासारखा. या झाडास वसंतांत पालवी न फुटतां उलटीं पानें गळून जातात. २. येथें दशाक्षरात्मक यमक साधलें आहे. अशी यमकप्रासमय रचना पंताच्या कवितेंत विपुल आहे. कित्येक स्थळीं फारच लांब लांब यमकरचना साधिली आहे. "या रचनेच्या संबंधानें यापूर्वी कांहीं ठिकाणीं लिहिण्यांत आलेंच आहे, त्यावरून ती दोषमय आहे कीं काय याविषयीं वाचकांची संशयनिवृत्ति झालीच असेल. यास्तव येथें इतकें सांगतों म्हणजे बस आहे, कीं वरील शब्दालंकार साधण्यास प्रस्तुत कवीनें पुष्कळ परिश्रम केले आहेत; व व्याकरण बिघडूं न देतां किंवा अर्थाची हानि न करतां लांब लांब यमकें साधण्याची व प्रासांची सांखळीची सांखळी जुळविण्याची जी या कवीची अपूर्व करामत दृष्टीस पडते ती समयविशेषीं अर्थ खुलविण्यास किंवा निदान नुसता मनास चमत्कार वाटविण्यास फार उपयोगीं पडते. तिजवरून कवीच्या भाषाप्रभुत्वाविषयीं मोठें प्रमाण मिळते हेंही येथें सांगायास पाहिजे असें नाहीं." [निबंधमाला—अंक ६३ पृष्ठ ८.] ३. मसलतीतें. ४. संतीं (संतांला, साधुजनांला) उद्धव (आनंद) व्हाया (होण्यासाठीं) मग [पार्थ] रसापार्थ (रसाप+अर्थ=पृथ्वीपति+हेतु, धर्मराजास भद्रासनीं उपविष्ट—करण्याविषयीं) मंत्रातें (मसलतीतें-विचारातें) [उत्तराबरोबर] करी. ५. रसा+प+अर्थ=पृथ्वी+पति+हेतु. [अध्याय ६९ श्लोक १८ टीका पहा.] ६. आजचाही दिवस. ७. श्वः=वां (उद्यां) असा हा अपभ्रंश आहे. ८. 'परवां' हें संस्कृत 'परश्वस्' या शब्दाचें अपभ्रंशरूप आहे. त्याचा मूळचा अर्थ 'येणाऱ्या उद्यांचे पुढील दिवशीं' असा आहे व याच अर्थानें येथेंही प्रयोग केलेला आहे. परंतु 'गेलेल्या कालच्या मागील दिवशीं' ह्या अर्थीही या शब्दाचा प्रयोग करतात. येथें 'परवां' म्हणजे तिसऱ्या दिवशीं असें जाणावें. उत्तरगोग्रहण ज्येष्ठ वद्य ८ स सूर्योदयीं समाप्त झाल्यावर तिसऱ्या दिवशीं म्हणजे ज्येष्ठ वद्य १० स पांडवांनीं आपलें खरें स्वरूप विराटराजाला दाखविलें. [अध्याय ७० श्लोक १-३ पहा.] ९. येथें 'गोहरण' नामक उपपर्व समाप्त झालें. येथून 'वैवाहिक' नामक पोटपर्वास आरंभ होतो. १०. भद्रासनीं, भूमिपालासनीं. ११. कल्याण. १२. श्रीकृष्णपदास. [अच्युत=विष्णु (कृष्ण). 'भक्तेभ्योऽच्युतपूर्वत्वात् अच्युतः परिकीर्तितः । आश्रितानां च्युतिर्यस्मान्नास्ति सोऽच्युत ईरितः ॥' विवृत्तिसहितं विष्णुनामसहस्रम्. पृ० ८.] १३. धाकट्या चार भावांसह. १४. तिसऱ्या दिवसीं. (अध्याय ७० श्लोक १-४.) तिसऱ्या दिवसीं (ज्येष्ठ वद्य १० स) भूरिभुजप्रभाव असे पांच पांडव

मागुनि विराट येउनि हांसोनि म्हणे, 'सभासदा ! कंका ! ।
भद्रासनीं बैसाया आजि तुज कसी न वाटली शंका ?' ॥ २
अर्जुन म्हणे, 'नृपा ! हा हरिच्या अर्धासनीं बसायाचा, ।
आहे प्रतापमहिमा विख्यात जगत्त्रयीं असा याचा. ॥ ३
गंधर्वांसि हरि म्हणे, यांचींच यशें करूनि तांडव गा.' ।
हा पुण्यश्लोक प्रभु सम्राट् सद्गुणसमुद्र पांडव, गा !' ॥ ४

सकाळीं स्नान करून, शुभ्रांबर परिधान करून आपलें व्रत यथाकाल समाप्त करून, युधिष्ठिराला अग्रभागीं ठेवून आणि मत्त नागराजांप्रमाणें विराजमान होत्साते विराटाच्या सभेंत येऊन त्याच्या भद्रासनावर बसले–असें वर्णन मूळांत आहे. १५. त्या विराटाच्या.

१. अध्याय ७० श्लोक ६-९ पहा. विराटराजाच्या या सनिंदोपालंभपर भाषणावर मानी अर्जुनाचें उत्तर कसें पाणीदार आणि ठसठसित आहे तें पहा. २. 'सभासद' हें पद येथें सहेतुक योजिलें आहे. धर्माचा अधिकार म्हटला म्हणजे त्यानें सभेंत बसावें आणि अक्षातिवापाच्या (द्यूत खेळणाऱ्याच्या) नात्यानें बागावें इतकाच, पण असें असूनही त्यानें जें विराटाच्या मताप्रमाणें सिंहासनावर बसण्याचें साहस केलें तें अनुचित होय असें 'सभासद' या विशेषणानें धर्माला त्याच्या पदवीचें स्मरण देऊन सूचविलें आहे. ३. सिंहासनीं. भद्रासनाचें लक्षण 'देवीपुराणां'त आहे तें असें:—'हैमं च राजतं ताम्रं क्षीरवृक्षमयं च वा । भद्रासनं प्रकर्तव्यं सार्धहस्तसमुच्छ्रितम् ॥ सपादहस्तमानं च राज्ञो मांडलिकांतरात् ॥.' याचें लक्षण 'वराहसंहितें'त आहे:–'त्रिविधस्तस्योच्छ्रायो हस्तः पादाधिकोऽर्धयुक्तश्च । मांडलिकानंतरजिस्समस्तराड्यार्थिनां शुभदः ॥' [रंगनाथकृत विक्रमोर्वशीयनाटकटीका–पृष्ठ १३९ पहा.] 'भद्रं शुभमासनं पट्टादिनिर्मितं यत्र तादृशम् । बध्नंतमिति पदमध्याहार्य भद्रासनमासनविशेषमिति केचिद्व्याचक्षते.' । [कुमारसंभव–द्वादश सर्ग श्लो० २० टीका.] ४. अध्याय ७० श्लो० ७ पहा. ५. भीति. ६. अध्याय ७० श्लो० ९-२८ पहा. ७. इंद्राच्या. ८. अर्धं आसनस्यार्धासनम्=अर्धें आसन. [अर्धासन प्राप्त होणें हें गौरव आणि सन्मान यांचें ज्ञापक आहे. 'हरिच्या अर्धासनीं' या पदानें धर्माचें श्रेष्ठत्व सुचवून त्याची इंद्रसमानताही दर्शविली आहे. 'इंद्राचें अर्धासन' अशीं पदें संस्कृतांत वारंवार येतात. रघुवंश सर्ग ६ श्लो० ७३, शाकुंतल नाटक अंक ७ इत्यादि पहा. महाभारतांतही हेंच पद योजिलें आहे. (श्लोक ९.) मोरोपंत–वनपर्व–अध्याय ५ गीति ५ यांत हेंच पद योजिलें आहे. ९. या धर्माचीं. १०. नृत्य. ११. गायन करा, स्तवन करा. १२. पुण्य (पावन, पवित्र) श्लोक (कीर्ति) ज्याचा तो. 'पुण्यश्लोक' हें धर्माचें नांवच आहे. 'पुण्यश्लोको नलो राजा पुण्यश्लोको युधिष्ठिरः । पुण्यश्लोका च वैदेही पुण्यश्लोको जनार्दनः ॥.' या श्लोकांत 'पुण्यश्लोक' हें उपपद कोणकोणास लावणें योग्य आहे याचें वर्णन केलें आहे. १३.सार्वभौम. 'सम्राट्'शब्दाची व्याख्या:—'येनेष्टं राजसूयेन मंडलस्येश्वरश्च यः । शास्ति यश्चाज्ञया राज्ञः स सम्राडिति शब्द्यते ॥,' म्ह० ज्यानें राजसूय यज्ञ केला, जो द्वादश राजमंडलाचा प्रभु व जो सर्व राजांस आपल्या आज्ञेंत ठेवितो, त्याला 'सम्राट्' म्हणावें. १४. उत्तम गुणांचा सागर. धर्माच्या गुणाचें वर्णन मूळांत (श्लोक ९-२८) बरेंच सविस्तर केलें आहे, पण पंतांनीं विस्तारभयास्तव

मत्स्य [1]म्हणे, 'पांडव हा तरि भीमप्रमुख बंधु जे चवघे ।
कोठें ? कृष्णा कोठें ? जीस क्षणहि न विसंबिती अवघे.' ॥ ५
पार्थ [2]म्हणे, '[3]सूद तुझा बलव [4]मगधेंद्रकाय हा चिरिता, ।
करिता झाला [5]सूतान्वयसागर [6]भीमकाय हाँचि रिता. ॥ ६
हयपाळ जो [7]नकुळ तो, गोपाळक तोचि होय सहदेव, ।
अर्जुन बृहन्नडा मी, भिडला ज्या [8]चापपाणिसह [9]देव. ॥ ७
[10]सैरंध्री हे कृष्णा, मेले [11]कीचक इला अनादरिते, ।
हे किति ? [12][13]हरमुरज उदधि व्हावे क्षोभें इच्या [14]अनाद रिते. ॥ ८
अज्ञातवास दुर्घट परि निर्विघ्न [15]त्वदाश्रयें घडला, ।
होतों सुखरूप तुझ्या [16]गर्भांत श्रम न लेशही [17]पडला.' ॥ ९
उत्तरहि [18]पांडवांतें वर्णुनि, कळवी पुन्हा स्वजनकास ।

त्याचा संक्षेप केला आहे, इतकेंच नव्हे, तर त्या सर्व गुणांचें समुच्चयानें द्योतक असें 'सद्गुणसमुद्र' हें लहानसें विशेषणपद योजून कार्यभाग आटपला आहे.

१. अध्याय ७१ श्लोक १-२ पहा. २. अध्याय ७१ श्लोक ३-१० पहा. ३. खैंपाकी. ४. मगध+इंद्र+काय=देशविशेष+प्रभु, राजा (जरासंध)+देह=जरासंधदेह चिरणारा. ५. सूत+अन्वय+सागर=कीचकसूत+वंश+समुद्र=कीचकवंशरूप समुद्र. ६. महाकाय. भयंकर शरीर ज्याचें तो. 'भीमकाय' या विशेषणपदानें सहजगत्या भीमाचें नांव सूचविलें आहे. ७. हा भीमसेनच. ८. अश्वपालक, अश्वबंध. ९. गोसंख्य. १०. चापयुक्त हस्तासहवर्तमान. ११. शंकर (पशुपति). ज्यापाशीं चापपाणि होत्साता शंकर युद्धास आला—असा भाव. [मोरोपंत—वनपर्व—अध्याय ३ गीति १-३२, काव्यसंग्रह पृ० २७-२९ पहा.] १२. अध्याय ७१ श्लोक ८ पहा. १३. ह्या कीचकांचा काय पाड आहे? हे तुच्छ क्षुद्र पदार्थ होत—असा भाव. १४. शंकराचा मृदंग. शंकर तांडव करीत मृदंग वाजवितो—इत्यादि कथा सुप्रसिद्ध आहे. १५. नादरहित. या द्रौपदीच्या क्षोभापुढें सागराचा क्षोभ अथवा शंकरमुरजाचा क्षोभ (गंभीर नाद) तुच्छ होय—असा इंगितार्थ जाणावा. १६. तुझ्या आश्रयानें. १७. गर्भवासांत जसे प्राणी सुखरूप असतात तसे तुझ्या घरीं—असा भाव. [अध्याय ७१ श्लोक १० पहा.] १८. अध्याय ७१ श्लोक १३-१७ यांत उत्तरानें पांडवांचें केलेलें वर्णन आहे. उत्तर म्हणतोः— ज्याचा वर्ण सुवर्णासारखा शुद्धगौर, ज्याची तनु सिंहासारखी, ज्याचे नेत्र पृथु दीर्घ आणि ताम्र आहेत, तो हा कुरुराज धर्म पहा. ज्याचें गमन मत्त हस्तीप्रमाणें, ज्याची कांति तप्त सुवर्णाप्रमाणें, ज्याचा स्कंधप्रदेश दीर्घ आणि स्थूल आहे, आणि जो आजानुबाहु आहे, तो हा भीम पहा. सर्व धनुर्धाऱ्यांत श्रेष्ठ, कृष्णवर्ण, तरुण, ज्याला गजेंद्राची उपमा शोभते, आणि ज्याचे डोळे कमलपत्राप्रमाणें विस्तृत आहेत असा हा वीर अर्जुन धर्मराजाजवळ उभा आहे. सर्व पुरुषांत श्रेष्ठ, विष्णु आणि महेंद्र यांच्याप्रमाणें पराक्रमी आणि स्वभाव व पराक्रम या दोन गोष्टींमध्यें त्रिभुवनांत अद्वितीय असे हे नकुलसहदेव धर्मराजाजवळ शोभत आहेत. सुवर्णाप्रमाणें जिचें शरीर देदीप्यमान

कीं, 'हेचि घालणारे व्यसनीं तारावया स्वजन कास.' ॥ १०
भूप म्हणे, 'त्वां अर्जुन पूजावा सर्वकाळ, भीमहि म्यां, ।
नैं असत्य, हरिजनाच्या सोडुनियां गर्व काळ भी महिम्या. ॥ ११
वत्सा ! काय वदों रे ! धर्मात्मा धर्म हा असा मान्य, ।
म्यां ताडिला ललाटीं अक्षें, अपराध हा असामान्य. ॥ १२
सचिवांहीं म्यां त्वांही प्रार्थावा धर्मराज, कन्या या ।
द्यावी धनंजयाला पोटीं घालावयासि अन्याया.' ॥ १३
उत्तर म्हणे, 'बैहु बरें, न कळत अपराध घडति, परि साचे ।
साधु क्षमी यशस्कर, घनहि सुभूषेंत पडति परिसाचे.' ॥ १४
भेटे विराट राजा त्या पांचां पांडवांस गुरुसाच, ।
व्यसनांत आश्रयप्रद अन्नप्रद होय वृद्ध गुरु साच. ॥ १५

आहे, जी मूर्तिमंत सूर्याची कांतीच आहे, जिच्या शरीरावर निळ्या कमळाची आभा आहे, जी देवादिकांनाही पूज्य आहे, आणि जी शरीर धारण केलेली साक्षात् लक्ष्मीच कीं काय अशी ही द्रौपदी नकुलसहदेवांजवळ उभी आहे.

१. कास, कासोटा. कास घालणारे=सिद्ध असणारे. २. भीमानें विराटाला शत्रूंच्या हातांतून मुक्त केलें म्हणून त्यानें भीमाचें पूजन करावें हें उचित आहे. [अध्याय ७१ श्लोक २५ पहा.] ३. 'संभाव्यनिषेधनिवर्तने द्वौ प्रतिषेधौ' इति वामनः. [किरातार्जुनीय-सर्ग ४ श्लो० २४ टीका.] येथें दोन निषेध आहेत पण त्यांचा लोप झाला आहे असें जाणावें. ४. भगवद्भक्तांच्या महिम्या काळ भी (भीतो) हें सत्य होय. हें अर्ध सुभाषितरूप आहे. "मोरोपंतानें उपमारूपकव्यपेक्षादि अर्थालंकारांची योजना आपल्या काव्यांत विपुलपणें केल्यामुळें मनोरंजनादि अनेक प्रकारचे लाभ जे अनुभवास येतात, त्यांतील सुभाषितश्रवण हा एक होय. पंताची कविता वाचित असतां अनेक प्रकारचीं सुभाषितें अवलोकनांत येतात. संस्कृतांत ज्याप्रमाणें अनेक अभियुक्त कवींच्या ग्रंथांतून निवडक कविता घेऊन सुभाषितरत्नाकरादि ग्रंथ बनविले आहेत; त्याप्रमाणेंच मोरोपंत, वामनपंडित, मुक्तेश्वर, तुकाराम, रामदास इत्यादि महाराष्ट्र कवींच्या ग्रंथांतून सुभाषितें काढल्यास महाराष्ट्रसुभाषितरत्नाकर जरी बनला नाहीं, तथापि त्याची राजतरंगिणी तरी बनेल असें आम्हास वाटतें." (हंसकृत मोरोपंताच्या कवितेवरील निबंध-पृष्ठ १०५.) ५. पुण्यशील, सदाचारसंपन्न. ६. सामान्य नव्हे. ७. अध्याय ७१ श्लो० २३ पहा. तसेंच श्लोक ३४ पहा. ८. अन्याय पोटीं घालणें=क्षमा करणें, माफ करणें, अपराधमोचन करणें. ९. उत्तरा देणें हें बरें आहे. १०. हातोडे. (परिस पाषाण म्हणून जे घण त्यास फोडूं पाहतात ते सुभूषेंत पडति म्हणजे अलंकार घडतात.) ११. परिसाचे घनहि सुभूषेंत पडति=परिसाला फोडणारे घन (हातोडे.) सुभूषेंत पडती (अलंकार घडवून सुवर्णमय होतात.) १२. गुरुप्रमाणें, गुरुसारखा. १३. व्यसनांत आश्रय देणारा, अन्न घालणारा आणि वयोवृद्ध पुरुष हे खरोखर गुरु होत. देवलऋषीच्या मताप्रमाणें

धर्मासि म्हणे, 'बा ! गा ! साधो ! जोडा नसेचि या दिवसा, ।
तूपदीं मच्चित्तींही संपादुनि सुकृतजय दयादि वसा. ॥ १६
तूंचि बळी स्वजनांसह तरलासि, न वायुनंदन वेनौका, ।
वरिति सुमति सत्संगति उतराया वार्धि मंद नव नौका. ॥ १७
'तारुनि परासि तरती हरिजन' जें वर्णिलें असें कविनीं, ।
तें दाविलें मज तुम्हीं कुरुकुलसंततिसरोजिनीरविनीं. ॥ १८
राज्यादि सर्व दिधलें, तुज म्यां, हें आपुलें असें म्हण, गा ! ।
शशिचूड 'नको' न म्हणे धुतऱ्याचें फूल वांहत्या भणगा. ॥ १९
धर्मा ! धनंजयवधू होउ म्हणे धन्य भाग्य मत्तनया, ।
देसील मान वचना तूंचि प्रभु, अन्य भाग्यमत्त न या.' ॥ २०
पाहे धर्म धनंजयवदनातें तेधवां, नर वदे तो, ।
तें परिसिते म्हणति, 'सुख याहुनि हरिवेणुचा न रवं देतो.' ॥ २१
'प्रेम' तुझें आम्हांवरि ऐसेंचि देयासुधानदा ! राहो, ।
अभिमन्युची वधू हो, ती माझी बा ! बुधा ! न दारा हो. ॥ २२
केंवि वरावी ? वर्तत होती कीं एकवर्ष कन्यासी, ।

अकरा गुरु आहेत:—'आचार्यश्च पिता ज्येष्ठो भ्राता चैव महीपतिः । मातुलः श्वशुरस्त्राता मातामहपितामहौ । वर्णज्येष्ठः पितृव्यश्च पुंस्येते गुरवो मताः ॥.'

१. मारुति. २. वनचर. [वन आहे ओकस् (गृह) ज्याचें तो=वनौका.] ३. सुमनस्क= पुरुष साधुसमागम स्वीकारतात. ४. समुद्र. ५. मूर्ख पुरुष. हें अर्ध सुभाषितरूप आहे. ६. कुरुकुलवंशरूप कमलिनीस रविसारखे जे तुम्हीं त्यांनीं. ७. अध्याय ७१ श्लो० ३३ पहा. ८. चंद्रशेखर. (शंकर.) ९. धोतऱ्याचें फूल शंकरास फार प्रिय आहे अशी प्रसिद्धि आहे. या धत्तूराविषयीं 'धत्तूर धूर्त तरुणेंदुनिवासयोग्ये स्थाने पिशाचपतिना विनिवेशितोऽसि' अथवा 'महेशस्त्वां धत्ते शिरसि' इत्यादि सुभाषितें सुप्रसिद्ध आहेत. १०. वाहणाऱ्या, पूजेंत देणाऱ्या, देवाच्या मस्तकावर घालणाऱ्या. ११. भिकाऱ्यास. यांत 'प्रतिवस्तूपमा' अलंकार आहे. १२. अर्जुनाची स्त्री. १३. माझी कन्या. १४. वचना मान देणें—वचन मान्य करणें, वचन स्वीकारणें. १५. भाग्यानें (दैवानें ऐश्वर्यानें) मत्त (मस्त झालेला). १६. या वचनाला. १७. ऐकणारे. १८. शब्द. १९. ही अर्जुनोक्ति आहे. २०. दयामृताचे नदा ! २१. कन्येसारखी स्त्री मजपाशीं एक वर्षपर्यंत वागत होती, तिच्यापाशीं मी विवाह कसा करावा ? [कन्येसारख्या मानलेल्या युवतिशीं कोणी तरी लग्न लावील काय ?] [ती मजपाशी मला पिता समजून सर्व रहस्य सांगे, मी तिचा अत्यंत प्रिय नर्तक होतों. ती मला नित्य आचार्याप्रमाणें मानी, मी एक वर्ष शुद्ध, जितेंद्रिय आणि दांत असा असतां तिचा परिग्रह केला तर लोक तिच्या व माझ्या संबंधाविषयीं शंका घेतील. तीं लोकांनीं घेण्यास अवकाश नसावा म्हणून मी तिला स्नुषात्वासाठीं स्वीकारतों (अध्याय ७२ श्लोक २-९) असें मूळांत आहे.]

[1]हरिजनकथेंत शिरतां न विशंकावे शुकादि संन्यासी. ॥ २३
तो साधुजनां तोखेद, ओखदसा होय खलजनां [3]भाचा, ।
योग्य तुला जामाता बहिश्चर प्राण [4]जलजनाभाचा.' ॥ २४
मत्स्य म्हणे, 'बा ! धर्मा ! वंद्य तुझें [5]नंदना वना [6]शील, ।
त्रिजगदघातें तुमचें पुण्यलताकंद नांव नाशील. ॥ २५
देवा ! सौभद्रार्थ स्वीकारावी तुम्हींच कन्या, [8]हो ! ।
घ्या पदरीं, हे संतति यां संबंधें जगांत धन्या [9][10]हो.' ॥ २६
धर्म म्हणे, 'बहु उत्तम, हें मज अश्लाघ्य काय हो ! नातें ? ।
मिळतां सुवर्णमुद्रा [12]अर्थी इच्छील काय [13]होनांतें ?' ॥ २७
धाडूनि दूत धर्में आप्तांला हा विवाह जाणविला, ।
अभिमन्यु [14][15]राम कृष्ण द्रुपद [16]स्वैकुमारवर्ग आणविला. ॥ २८
आणुनि संपत्ति दिल्या श्रीकृष्णें [18]भक्तनायका [19]सारा, ।
[18]तो आटतांचि आला भेटाया मेघ काय [20]कासारा ? ॥ २९
अभिमन्युविवाहोत्सव जग निववी, जेंवि चंद्र [2]पुनिवेचा, ।
धर्म म्हणे, 'हूं, कनकें मणि बहु वस्त्रान्नराशिहुनि वेचा.' ॥ ३०

---

१. हरिजनकथेंत (मजसारख्या भगवद्भक्तांची कथा चालली असतां) शिरतां (तेथें जाण्यास)= मजसारख्या भगवद्भक्तांच्या कथेंत प्रवेश करण्यास शुकादिक यतिजनाला (माझें नांव काढण्यास) शंका वाटूं नये (शरम वाटूं नये). नृत्यगानसंपन्न व लावण्यगुणान्वित उत्तरेचा भार्यार्थ स्वीकार करण्याचें मी नाकारतों, यावरून हरिभक्तांच्या इंद्रियनिग्रहसामर्थ्याविषयीं शुकादिक संन्याश्यांस देखील बिलकूल शंका येऊं नये. यांत 'काव्यलिंग' नामक अलंकार आहे. २. तोषद. ३. कृष्णाचा भाचा (सौभद्र), वासुदेवाचा भागिनेय. ४. कमलनाभ कृष्णाचा. येथें 'अभिमन्यु' असें न म्हणतां, 'जलजनाभाचा भाचा' असें म्हटलें आहे म्हणून हें 'पर्यायोक्त' अलंकाराचें उदाहरण आहे. ५. नंदनवनाला. ६. स्वभाव, वृत्त. ७. जगत्त्रयपातकातें. ८. पुण्यवल्लीमूळ असें (नांव), पुण्यरूपवल्लीचा कंद असें. ९. अहो. १०. मत्स्यभारतविवाहसंबंधानें. ११. होऊ. १२. याचक. हें अर्ध सुभाषितरूप आहे. १३. होनाची किंमत ४।५ रुपयेपर्यंत असते आणि सुवर्णमुद्रेची (मोहरेची) किंमत १५ रुपयेपर्यंत असते. यांत 'प्रतिवस्तूपमा' नामक अलंकार झाला आहे.. [पृ. ३६. टीप २२ पहा.] १४. बलराम. १५. आपले पुत्र, द्रौपदीपुत्र. १६. धर्मराजास. १७. सारभूता, बहुमूल्य. १८. तो कृष्ण. १९. सरोवरास. यांत 'स्वरूपोल्लेक्षा' नामक अलंकार झाला आहे. २०. पूर्णिमेचा.

नटनर्तकीगणातें धर्म म्हणे, 'रामकृष्णगानाचा[1] ।
नृत्याचा रस शिवसे जाणति, जा त्यांपुढेंचि, गा, नाचा.' ॥ ३१
भीम म्हणे 'वाढा हो! देवि[2]! अहो! भूमिदेव[3]! जेवा, जी! ।
चालों नका, बसा या न्या, व्हावे जे मेंहेभ[4] जे वाजी[5].' ॥ ३२
राम[6] म्हणे, 'घालाव्या कुडक्या चारीहि याच कानीं कीं'. ।

---

१. बलराम आणि कृष्ण यांच्या यशांच्या गायनाचा. अभिमन्युविवाहोत्सव जगातें निववी. या उत्सवप्रसंगीं धर्मानें वस्त्रें व अन्नें वांटलीं इतकेंच नाहीं तर मणिकनकेंही उधळलीं. इतकेंच नाहीं तर ज्या लोकांस नृत्यगान आवडत होतें त्यांची नटनर्तकीजनांकडून धर्मराजानें तृप्ति करविली असें या पद्यांत सांगितलें आहे. धर्म नटनर्तकीगणातें (नृत्यकुशलस्त्रीपुरुषांना) म्हणे (म्हणाला):—रामकृष्णगानाचा [आणि] नृत्याचा रस शिवसे [जे] जाणति त्यां पुढेंचि जा, गा, [आणि] नाचा.=शिवासारखे जे प्रेक्षक जन नृत्यगानरसज्ञ आहेत त्यांच्यापुढें जा, गायन करा, आणि नाचा. रामकृष्णांच्या यशांच्या गायनाचा रस जसा शिव जाणतो त्याप्रमाणें जे नृत्याचा रस जाणणारे आहेत (नृत्यकलेंत जे मार्मिक आहेत) त्यांच्यापुढें जा, गायन करा आणि नाचा. जे नृत्यकलाभिज्ञ असतील त्यांच्या पुढें जाऊन तुम्ही नाचावें हें उचित होय. यांत धर्माला नृत्यगानाची गोडी फारशी नव्हती असें दाखवून तदभिज्ञजनांस संतुष्ट करण्याची त्याची उत्कट इच्छा दर्शविली आहे. [कैलासपर्वतावर गजानन तांडवनृत्य करून शंकरपार्वतीला आनंदवितो, शिव स्मशानांत नृत्य करतो, तसेंच तो सदां रामनामजपनिमग्न असतो, या गोष्टींवरून तो गाननृत्यकलेंतील खुब्या जाणतो व तो गाननृत्यरसज्ञ आहे असें होतें.] २. 'स्वस्थपणें' असा पाठभेद आहे तो सुरस दिसत नाहीं. ३. विप्र हो! ४. महागज. ५. घोडे. ६. बलराम याचक विप्रांना म्हणे (म्हणाला):—[अहो! याचक जन हो!] याच कानीं (या एकाच कानांत) चारीही कुडक्या (कानांत जो चौकडा घालतात त्याला कुडुक अथवा कुडकी म्हणतात. एका कानांत एक कुडकी मिळून दोन कानांत दोन कुडक्या होतात.) घालाव्या कीं, (एका कानांत एक कुडकी घालावयाची असें असतां चार चार कुडक्या घाला असें बलराम विप्रजनांस सांगूं लागला. विप्रांस वाटलें कीं प्रत्येक कानांत दोन दोन घालण्यासाठीं चार चार दिल्या असाव्या, पण बलराम म्हणाला:—चारीही कुडक्या एकाच कानांत घाला, दुसऱ्या कानांसाठीं आणखी चार देतों. प्राचीन काळीं कुडकी हा अलंकार ऋषिजन घालीत असत असें दिसतें. 'एक म्हणे लेववितां हा! घडितां सांडिली दुजी कुडकी' [आदिपर्व—अध्याय २ आर्या ३९ 'काव्यसंग्रह' पृष्ठ ७.] या पद्यांत बलरामानें विप्रांस अपरिमित अलंकार वांटले असें सूचविलें.) उत्तरार्धाचा अन्वयः—मुनि भूषवितां (मुनिजनांला भूषणें देऊन अलंकृत करीत असतां) तो (तो भूषविणारा बलराम) याचकानीकीं (याचकसमुदायांत) मूर्तखवृक्ष (मूर्तिमंत कल्पवृक्ष) भासे (वाटे.) यांत उत्प्रेक्षालंकार झाला आहे. अभिमन्युविवाहोत्सवांत बलरामानें याचकांस अपरंपार धन दिलें. मुनींच्या आंगावर इतके अलंकार चढविलें कीं तो याचकांच्या समूहामध्यें कल्पवृक्षासारखा भासूं लागला.

मुनि भूपवितां भासे मूर्तस्वर्वृक्ष याचकानीकीं. ॥
सहदेव नकुळ अर्जुन अच्युत बळ भीम धर्म नव्याही ।
त्या नाऱ्यासि न मिरविति, ते गमति विराटबंधु, न व्याही. ॥ ३४

उपसंहार.

(गीतिवृत्त.)

श्रोते ! हो ! वर्णावें किति ? मज 'गप्पी' असें वदाना कीं ।
स्वल्प उपप्लव्यपुरीं उत्सव, बहु होय हो ! तदा नाकीं. ॥ १
वदवि मयूराकरवीं श्रीराम 'विराटपर्व' चवथें, बा ! ।
स्वल्प म्हणोनि न सोडी अमृताची शक्ति सर्व चव थेंबा. ॥ २

---

१. मूर्तिमान् कल्पतरु. २. याचकमंडळींत. ३. नूतनालाही. ४. कितीही वर्णिलें तरी थोडेंच वर्णन होणार आहे–असा भाव. ५. म्हणाना. ६. अतिशयित लहान. ७. विराटनगरसमीपस्थ नगरांतरीं. ८. स्वर्गांत देवाद्रिकांला आनंद झाला म्हणून मोठा उत्सव झाला. ९. या आर्येच्या संबंधानें आणि एकंदर या ग्रंथाच्या संबंधानें कै० हंस यांचा अभिप्राय असा आहे:—"**मोरोपंतानें** भारत, भागवत, रामायण यांवरील ग्रंथ मूळग्रंथांपेक्षां फार संकोचित केले आहेत; त्यानें अठरा पर्वांच्या भारती इक्षुदंडाची लावणी महाराष्ट्रभूमिकेंत करून ठेविली आहे. महाभारत ग्रंथ नानाप्रकारच्या कथांनीं अतिमनोरम झालेला प्रसिद्धच आहे, तो गीर्वाणभारांत सांठविलेला असल्यामुळें प्राकृतांस दुर्मिळ होता त्याची सुगमता करून **पंतानें** प्राकृत जनांवर मोठाच प्रसाद केला हें कोणीही कबूल करील. हीं पंतांचीं सर्वच पर्वें उत्तम काव्यरसानें पुष्ट झालीं आहेत. पुण्यश्लोक युधिष्ठिर व जनार्दन यांचें हें पुण्यमय चरित वर्णन करित असतां, **मोरोपंत** अगदीं तल्लीन झालेला दिसतो. विवलकरी वळण जसें कोठेंही पाहिलें तरी तत्काळ ओळखतां येण्याजोगी त्याची अक्षरावयवरचना ठरीव झाली आहे, त्याप्रमाणें **मोरोपंता**ची कविता, तींतही विशेषेंकरून आर्यावृत्तांतील, तत्काळ ओळखण्याजोगी. वळणदार दिसते. हा त्याचा सर्वसाधारण गुण भारतांतही तसाच उतरला आहे. भवभूति, जगन्नाथराय, इत्यादि पंडितांनीं स्वकृतीविषयीं मोठी उद्दाम गर्वोक्ति प्रकट केलेली दिसते तसा मार्ग पंतानें घेतला नाहीं; आणि वस्तुतः वरील पंडितांनीं इहलोकसंबंधी शृंगारवीरादि मदपूरित रसानीं आपल्या वाग्देवीस राज्याभिषेकच केला आहे. **मोरोपंता**चें तसें नाहीं. त्यानें शृंगारवीरादि रसांत पवित्र भक्तिरसाचें मिश्रण करून ते सर्वच अमृतमोदपूरित केले आणि त्यांच्या पानानें आपल्या भारतीस चिदानंदांत निमग्न केलें आहे. तेव्हां अर्थात् वरील पंडितांच्या उक्ती उद्दाम मदमय आणि **पंता**ची लीन मोदमय झाली. त्यानें कांहीं पर्वांच्या शेवटीं आपले भक्तिपूरित आनंदोद्गार प्रकट केले आहेत." (हंसकृत मोरोपंतावरील निबंध–पृ० २७-२८ पहा.) १०. मोरोपंतांकरवीं. ११. अत्यंत लहान.

रामघन[1] सत्प्रसादामृत[2] जों जों बहु वळोनि वर्षतसे, ।
तें तों भक्तमयूर[3] स्वार्याकेका[4] करूनि हर्षतसे.[5] ॥ ३

---

१. रामरूप मेघ. २. उत्तम प्रसाद (कृपा) हेंच अमृत. ३. आपली आर्यारूप मयूरवाणी. ४. मोरोपंतांनीं आपल्या 'केकार्यां'चें जें हें वर्णन केलें आहे त्यास उद्देशून कै० हंसयांनीं लिहिलें आहे:—"सुरेख व गुणकीर्तिसंपन्न अपत्यविधूला अवलोकिलें म्हणजे जनकाचा प्रेमसागर उचंबळतो; मग आनंदलहरींत हेलखावे खातां खातां लीन होऊन ज्या परमेश्वराच्या प्रसादानें आपण ह्या सुखास पात्र झालों त्याच्या आभारासह तो अपत्याचें वर्णन ध्वनीनें सूचवितो; तसा प्रकार **मयूरानें**ही आपल्या केकांविषयीं कोठें कोठें जाणविला आहे." (हंसकृत निबंध—पृष्ठ ९२-९३.) ५. ह्या पर्वाच्या आम्हाला एकंदर पांच प्रती मिळाल्या, पैकीं दोन कै० **ज० बा० मोडक** यांच्या संग्रहांतील रा० बडे, बी. ए. यांनीं दिल्या. यांपैकीं पहिलीच्या शेवटीं असा समाप्तिलेख आहे:— "शके १७१२ साधारणनामसंवत्सरे उदगयने आषाढाधिक मासे शुक्लपक्षे अष्टम्यां तद्दिनीदं पुस्तकं नेरलेकर शांभट्टात्मज यादवभट्टेन लिखितं." दुसरीच्या शेवटीं, "शके १७३४ अंगिरानामसंवत्सरे भाद्रपद शुक्ल २ इंदुवासरे तद्दिने संपूर्ण. हस्ताक्षर जयराम त्रिंबक निसबत चातुर्मास्य" असा समाप्तिलेख आहे. तिसरी प्रत रा० रघुनाथ रामचंद्र देसाई, ग्वाल्हेर यानीं दिली, हिच्या शेवटीं, "आषाढे मासे कृष्णपक्षे द्वितीयायां भृगुवासरे तद्दिने इदं पुस्तकं समाप्तं. संवत १९१० शके १७७५ शिवरामात्मज पेंढरकरोपनामक लक्ष्मणेन लिखितं" असा समाप्तिलेख आहे. चवथी रा० गणेश बळवंत जोशी, बी. ए. एल्. एल्. बी., कोल्हापुर, यांनीं कृपा करून पाठवून दिली व पांचवी आमच्या स्वत: जवळची. या दोन्ही पोथ्यांच्या शेवटीं "इति श्रीमदार्याभारते श्रीरामनंदनमयूरेश्वरकृतौ विराटपर्व समाप्तम्" असा उल्लेख आहे. ह्या चारही पोथ्या देणारांचे आमच्यावर फार फार उपकार आहेत.

मोरोपंतकृत महाभारत-विराटपर्वाचीं परिशिष्टें.

१. पाठभेद.

गीति.	अर्ध.	मूळपाठ.	पाठांतर.	पृष्ठ.
		अध्याय पहिला.		
३	पू०	इंद्रसेनाद्यनुचर	इंद्रसेवाद्यनुचर	१
१२	उ०	सचक्षु	शुचक्षु	४
१९	,,	यावें	पावें	५
२४	पू०	सन्नीति	सत्कीर्ति	६
३४	उ०	बहुतां	बहुधा	८
३५	,,	राजाज्ञेनें सशंक	राजसभे निःसशंक	,,
३८	पू०	ग्लानिविकास	म्लानिविकास	,,
३९	उ०	नयनमुखें करुनि आ पटुनीं	नयनमुखीं करुनियां पटुनीं	९
४४	,,	जन्मदरिद्रा	जन्मदरिद्र्या	१०
५१	पू०	कंबु कसा	कंचुकसा	१२
५६	,,	बहु परि तीस	बहुत रितीस	१४
६०	उ०	रक्षार्थ गुप्त	रक्षावयासि	१५
६३	,,	वदे	म्हणे	,,
६५	पू०	धडडड	धडधड	,,
६९	,,	आवरी	आकळी	१६
७३	,,	दिलें मी	दिली कीं	१७
,,	उ०	कां मारिती	या हाणिती	,,
७४	पू०	शुचि वपुतें–नव्हे	(१) या शुचिवपुतें···न. (२) शुचिवपुतें···नसे.	,,
७८	,,	जरि	तरि	१९
८२	उ०	तें	तैं	,,
८६	पू०	महान	लहान	२०
९१	,,	जाणुनिही	जाणुनि हा	२१
१०४	,,	वर्त्तिहरचि तो	वर्तिहर जसा	२५
११४	उ०	भुलेल	चुकेल	२७
११५	,,	क्षपा	क्षण	,,

गीति.	अर्ध.	मूळपाठ.	पाठांतर.	पृष्ठ.
१२६	उ०	त्या मद्यमदांध	त्या मतिमंदासि	२९
१२८	पू०	चांचपी, मृगपतिच्या	सांसपी, मग पतिच्या	३०
१३०	,,	मूर्तमदन	मूर्तिमदन	,,
१३८	उ०	कां न	(१) मग न. (२) मा न	३२
१४४	,,	दंडितो	दंडिता	३४
१४५	,,	रितें	वितें	,,
१४७	पू०	ती	जों	,,
१५२	उ०	पाहिली	देखिली	३५
१५४	पू०	सस्मितमुखी ही	सस्मितामुखि ती	,,
१५५	उ०	स्वसंगकामें	स्वकामसंगें	३६
१५७	,,	चिरडी	शिरडी	,,
१६०	,,	व्रजस्था	व्रतस्थहि	,,
१६२	,,	उपटुनि	उपडुनि	३८
१६९	पू०	अजान	अजाण	३९
१७१	उ०	भीती	भीतां	,,
१७९	,,	स्वविवाहमंडप गणी	स्वविवाहमंडपांगणीं	४१
१८७	पू०	सुख	मज	४२
१९०	उ०	सपूर्वजहि कीर्ति	सपूर्वज हितास	,,

अध्याय दुसरा.

१२	पू०	म्हणवुनि	म्हणूनि	४५
१४	उ०	यांसि···कां	तयांसि···कीं	,,
१५	,,	वाहुटळे	राहु टळे	४६
२०	पू०	जेथें ते तेथें	ते जेथें तो तेथें	४७
३५	,,	नुगता	नुकता	५०
३७	उ०	रीति	कीर्ति	,,
३८	,,	पावोनि	धांवोनि	,,
४०	पू०	तप्तकाय	तें सकाय	५१
४७	,,	हूं	त्वां	५२
४८	,,	बा!	मा(=लक्ष्मी)	,,
५७	उ०	केवळ विरे जसें डिखळ	विघरे जसेंचि हो! डिपळ	५४

गीति.	अर्ध.	मूळपाठ.	पाठांतर.	पृष्ठ.
६३	उ०	शंकें मी	न शकें मी	५५
६५	,,	परि	तरि	५६
६६	पू०	सोडवूनि	जोडवूनि	,,
६७	उ०	या	म्यां	,,
७४	,,	निकर	निकट	५८
७५	पू०	वृत्त हेरजनीं	वृत्ति हेरांनीं	,,
,,	उ०	हे रजनी	हे रानीं	,,

अध्याय तिसरा.

५	,,	कुटिल	लुटिल	५९
८	,,	भलतसें	भलतसा	६०
१४	पू०	त्या	ती	६२
१९	उ०	सारथ्यगुणा नुघडुनि	सारथ्यगुण न उघडुनि	६३
२०	पू०	नेतो हरूनि	नेतात हरुनि	,,
२३	उ०	कां न	काम	६४
२४	पू०	ने	जे	,,
३०	उ०	स्वधीन	सुधीन	६५
३२	,,	अरिचींहि तुम्ही	अरिचीं तूंहीं	,,
३३	पू०	सुवाहुल्या	स्वबाहुल्या	,,
४०	उ०	पुरींत	पुरांत	६६
४८	पू०	वृत्तिरसीं	वृत्तिस	६८
५३	,,	ती या मुखीं	तिचिया मुखीं	६९
५४	उ०	पारद	पारहि	,,
६२	पू०	राहिली	राहिल्या	७१
६७	,,	हा क्लीबसमहि वेषें, क्लीबीं	हा क्लीवहि समवेषें, क्लीवा	७२
७१	,,	तो	या	,,
७२	उ०	बळें	करें	,,
७३	,,	कुपणीं	कूंपीं	,,
७५	,,	खळसा हांसे	खळसहवासें	७३
७९	पू०	होउनि	हो तूं	७४
८२	,,	अशुभसें	जरि असे	,,

गीति.	अर्ध.	मूळपाठ.	पाठांतर.	पृष्ठ.
८४	पू०	नयनीं	नयनें	७५
८७	उ०	रविपरिस	रविप्रभा	,,
९७	पू०.	खड्गाद्यायुध	शंखाद्यायुध	७७
१००	उ०	वहु	हा	,,
१०२	पू०	हें चाप	हा चाप	,,
१०५	,,	वाण	सर्व	७८
११३	,,	कां क्लीब? क्लीववेष	लां ऐसा क्लीबवेष	७९
११४	,,	माझा	माझ्या	,,
११८	,,	तद्दृष्टिपुढें	तद्दृष्टिप्रति	८१
१२०	,,	अस्त्रें चित्तीं	अर्जुनचित्तीं	८२
१२३	उ०	सहाय	साह्यार्थ	,,

अध्याय चवथा.

१५	,,	कीं दुरुनि दिसावे	कीं दूरूनि पहावे	८५
,,	,,	युद्धपटु	युद्धकटु	,,
१८	पू०	आजि	आधिं	८६
३३	उ०	तनुची	तुमची	८९
३४	पू०	सागरांत	सागराशि	,,
४७	,,	जिष्णु	विष्णु	९१
४८	,,	व्याधी खलमति, खरे	व्याधि खल कुधी, अरे!	,,
४९	,,	जसें	असें	९२
६२	उ०	संख्यावदादता	संख्यावदाहता	९४
६५	पू०	जय	जन	९५
६७	,,	नका	नको	,,
७३	उ०	मजपरिस	मज पहा	९६
७७	,,	कृष्ण! राम!	राम! कृष्ण!	,,
७८	पू०	व्यूहांत न	व्यूहीं नच	९७
८४	उ०	सोडा, नाहींतरि वधिन तुम्हासि	सांडा, ना तरि वधिन तुम्हालाचि	९८
८७	पू०	जलनिधिमग्ना	जलधिनिमग्ना	,,
८८	,,	पुच्छावरि	पृष्ठोपरि	९९

गीति.	अर्ध.	मूळपाठ.	पाठांतर.	पृष्ठ.
		अध्याय पांचवा.		
२	उ०	सदयोदास	सदयोदरास	१०१
४	,,	नारायणसख्य!	नारायणसख्या!	,,
५	पू०	वाहति	वाहे	१०२
१२	उ०	पाहों	पाहे	१०३
२१	पू०	शीघ्र स्रवळें	शीघ्रास्रवळें	१०६
२४	उ०	पितृप्रतापहरणें	स्वपितृप्रतापहरणें	१०७
३१	पू०	भीष्मेंद्रमुख	भीष्मप्रमुख	१०९
३७	उ०	सन्नीतिला	सद्नीतिला	११०
४२	,,	सद्धरणी	मद्धरणी	१११
४३	पू०	रवींद्र	रवींदु	,,
४५	उ०	मत्रांत	पात्रांत	,,
७०	,,	तत्सुतकृत	सत्सुतकृत	११७
७८	पू०	कीं	तूं	११८
७९	उ०	न हा	नव्हे	१२०
		अध्याय सहावा.		
२	उ०	धृष्टा!	नष्टा!	१२१
३	पू०	भटतल्लज	भट तत्कृत	,,
१०	उ०	मद्धनुष्यअब्द	मद्धनुःसदब्द	१२३
१९	,,	सर्व अर्ध	सद्वचनें दुखवे खलहृदय जसें तप्तलोहशंकु शतें	१२५
२०	पू०	पदपीडित	पदताडित	,,
३३	उ०	बुडल्येच	बुडतीच	१२७
३७	,,	सदाचरणप्रभवा	सदाचारप्रभवा	१२८
३८	,,	यांच्या	ज्यांच्या	,,
४६	पू०	हुरुप	(१) गुरुप (२) कुरुप	१२९
४९	उ०	असुरवर	सुर असुर	१३०
५२	पू०	अगणित	न गणितां	१३१
६०	उ०	पहिला	पहिल्या	१३२

गीति.	अर्ध.	मूळपाठ.	पाठांतर.	पृष्ठ.
६१	उ०	व्रीडा	शोभे	१३२
६२	,,	उत्तरा स्वतनयातें	उत्तराख्यतनयातें	,,
६३	पू०	वळिल्या	वरिल्या	,,
८२	,,	न्ही	स्त्री	१३५
९४	,,	द्वारस्थानीं	द्वास्थानीं ला	१३६
९५	,,	क्षत्त्यासि	द्वास्थासि	१३७
११३	उ०	वदूं	कथूं	१४१
११५	,,	लीलेहून न्यूना	लीलेहुनि कां न्यूना	,,
११७	पू०	पूजाया	पूजावा	,,

अध्याय सातवा.

१	उ०	सभेंत	सभेस	१४३
११	,,	न असत्य	वा! सत्य	१४६
२५	,,	त्रिजगदघातें	त्रिजगद्वंद्या तें	१४८
३१	,,	जा	जे	१४९
३२	,,	न्या	ध्या	,,

२. अधिक टीपा.

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.
	अध्याय पहिला.	
३	उत्तरार्ध—झाडून=सर्व सगळा, एकही बाकी न ठेवितां, सर्व गोळा करून.	१
७	उत्तरार्ध—टीपेंतीलच पाठ सरळ व शुद्ध व सरस समजावा. मूळांतील पाठ ग्रहण केल्यानें तृतीय चरणासाठीं 'नृ' मागें ओढावा लागतो पण तसें करणें अप्रशस्त होय.	३
९	पूर्वार्ध—पूजुनि=यथायोग्य आदर करून. सेवकांची पूजा करणें ही गोष्ट कदाचित् अपूर्व वाटणारी आहे, परंतु सेवकासेवकांतही योग्यायोग्यतेचा प्रकार असतो, तेव्हां त्यास अनुसरून त्यांच्या दर्ज्याप्रमाणें त्यांचा मान राखणें, त्यांचा आदर करणें यांत कांहीं वावगें नाहीं. सातव्या गीतींतील 'बहु मानें' व 'पूजुनि' हे दोन्ही शब्द समानार्थक होत. धर्मराज विराटाला फार पूज्य असल्यामुळें त्याच्या पदरच्या मनुष्यांस–कंकादिकांस–धर्मासाठीं अगत्य बाळगून विराटानें आदरपूर्वक आपल्या घरीं ठेविलें. उत्तरार्ध—[भीम] हळहळुनि म्हणे:–[हे] हरिपादपल्लवा! धर्म (युधिष्ठिर) खपदा (खराज्यपदा) लाहो (पावो)–असा या उत्तरार्धाचा सान्वय अर्थ करावा. ४० व्या आर्येवरून (पृ० ९) विराटानें धर्मादिकांचा गौरव केला म्हणून भीमाला आनंद झाला नाहीं असें दिसतें. भीम 'हाय' असें म्हणाला. यावरून असें निष्पन्न होतें कीं, विराटानें केलेली भीमाची योजना त्यास संतोषकारक वाटली नाहीं. आपलें रूप प्रच्छन्न करून य:कश्चित् काम पत्करल्यावांचून धर्मास स्वराज्यार्ध मिळण्याची आशा नाहीं म्हणून भीमानें स्वाभिमान क्षणभर विसरून, प्रसंगाकडे दृष्टि देऊन, बळवत्ल पत्करून दु:खानें उद्गार काढिला–'हे प्रभो आतां तरी धर्म खपदा लाहो.' धर्मराज फार गंभीर, केवढेंही संकट प्राप्त झालें तरी न डगमगणारा, म्हणून ही उत्तरार्धांतील उक्ति धर्माची समजण्यापेक्षां ती भीमाची समजावी हें प्रशस्त होय.	,,
३५	उत्तरार्ध—सशंक=भयानें, आपलें खरें रूप प्रकट होईल या भयानें पारतंत्र्यामुळें किंवा प्राकट्यभयानें, भंगभयानें नव्हे. [विराटपर्व–अध्याय १३ श्लो० २० टीका.]	८
३७	उत्तरार्ध—रंगीं (सभेमध्यें, समाजांत, मजलसींत) जो (जो पुरुष)	

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.
	गल्ल (गाल) फुगवूनि (फुगवून) हासे (हांसतो) तोचि (तोच पुरुष) रडे (रडतो)–असा सान्वय अर्थ.	८
४१	पूर्वार्ध—'हर्षें' या ठिकाणीं 'हरिसीं' असा पोथीपाठ आहे तोच कथानुरोधानें पाहिलें असतां प्रशस्त होय. [टीप १६ पृ० ९ पहा.]	९
४६	उत्तरार्ध—'शांतीस' या ठिकाणीं 'सीतेस' असा अन्य पाठ असेल तर अर्थ विशेष सुसंगत होईल, व 'तामससा' हें रावणाचें विशेषण समजावें लागेल.	११
७४	योग्य=मान्य; योग्य=उचित.	१७
७५	ज्या नीतिसतीची (नीतिरूप पतिव्रतेची) पायरी (पदवी, स्थान) अत्युच्च (अतिशयित उन्नत, श्रेष्ठ) [व] बुधमान्या (पंडितांला वंदनीय अशी आहे) तीतें (त्या नीतिसतीतें) हा (विराटराज) दासीपरि पाहे (दासीसारखी तुच्छ लेखितो). विराटराय रीतीतें (नीतीतें, योग्य आचारवृत्तीतें) नुमजेचि, विराटानें नीतीची योग्यताही जाणली नाहीं, त्याला द्रौपदीचें खरें स्वरूप माहीत नव्हतें, तरी त्याला नीतीची योग्यता कळली पाहिजे होती. कीचकानें द्रौपदीला लत्ताप्रहार केला. (गीति ६६ पृ० १६) तेव्हां त्याला शासन करणें हें विराट राजाचें कर्तव्य होतें, तें त्यानें केलें नाहीं म्हणून विराटाला नीतिच कळत नाहीं अशी द्रौपदीची उक्ति आहे. या गीतीचा असाही अर्थ होतो तो येथें दर्शविला आहे.	१८
७६	गालीपरीस=शिवीपेक्षां; गालि=शाप; शिवी, शिवीगाळ, दुरुक्ति.	१९
८९	उत्तरार्ध—द्रौपदीचा पदर ओला झाला आहे आणि तिला घाम आला आहे असें पाहून भीम तिला म्हणतोः–[हे] भीरु! (भित्रे!] भ्यालीस, भय कां? (कशासाठीं भय?) [तूं भ्यालीस खचित, कारण] ज्या (मनुष्याला) दर (भय) ये (प्राप्त होतें, वाटतें) त्यालाचि (त्याच मनुष्याला) कांप मेटे (तोच कांपतो, जो भीतो तोच कांपतो,). द्रौपदी कांपत होती असें भीमास वाटलें, तेव्हां ती भ्याली असें त्यानें अनुमान केलें.	२१
९१	उत्तरार्ध—द्रौपदी भीमाला म्हणतेः–तुम्ही (भीमसेन) तरि यमा (यमाला) विनवा (माझ्याविषयीं रदबदली करा, मजसाठीं यमाला प्रार्थी, मी मरण इच्छितें तें तुमच्या तरी प्रार्थनेवरून यमानें मला	

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.
	घ्यावें असें करा) बंधछेदका जें सुकृत (बंधमुक्त करण्यास जें पुण्य प्राप्त होतें) तें [सुकृत यमा] हो (तें पुण्य यमाला मिळो; मरण देणें दुष्कृत होय हें खरें, पण मला (दास्यबंधांतून मुक्त करून) मरण देणें हें सुकृत–पुण्यकर्म–होय, हें दुष्कृत नव्हे. आज मला मरणप्राप्ति मोक्ष-साधन होय, कारण त्याच्या योगानें माझी बंधमुक्तता होणारी आहे.)	२१
१०२	उत्तरार्ध—तोहि पती (लाजो) जो अरिनें व्यसनांत बुडविलीला उद्धरिना–असा अन्वय. अथवा जो–उद्धरिना तोहि पती! असा तिर-स्कारविस्मयदर्शक अन्वय लावावा.	२४
१०४	यांतील वर्णन कीचकपर नसून रावणपर आहे. असेंच वर्णन पंतांनीं वनपर्वात केलें आहेः–'खलमूषक लंकातृणराशिस्थ स्वकुल सर्व चाटून। तो खाववावया ने त्या साध्वीवर्तिलागिं दाटून. ॥' [काव्यसंग्रहग्रंथमा-ला ३–मोरोपंत–वनपर्व–पृ० १५७. अ०११ गी० ४६] द्रौपदी म्हणतेः–दीपकवर्तिहरचि खराखु (दुष्ट उंदीर) तो खल (दुष्ट रावण) श्रीरामाच्या रामेला (स्त्रियेला–सीतेला) हरितां, तत्तेजें (त्या सीतेच्या तेजानें) खरा-खुरा (खरोखर, निःसंशय) मेला (मरण पावला) [पण] मीहि निस्तेज (मला तसें तेज नाहीं).	२५
१०८	उत्तरार्धः—[जे] सुख गुरुवचोनुगचि वपु दे तें [सुख] सुरसगंधनं-दनग (वपु) न दे–असा अन्वय लावावा. या योगानें 'एकाक्षरकोषा-' कडे धांव मारण्याचें प्रयोजन राहत नाहीं. सुरसगंधनंदनग–हें वपूचें विशेषण. जें सुख गुरुवचोनुग वपु देतें तें सुरसगंधनंदनग वपु न दे. उत्तम सुवासिक अशा नंदनवनांत शरीर असतांना सुख होतें परंतु वडिलांची आज्ञा पालन करणारें वपु जास्त सुख देतें.	२६
११५	उत्तरार्ध—सद्धन हरिता चोर काननीं निजमार्ग भुलेल (हा) नि-श्चय–असा अन्वय. साधूचें धन हरण करणारा चोर अरण्यांत निज-मार्ग भुलेल (चुकेल) हा निश्चय यांत संशय नाहीं. साधूंचा छल केला असतां नीचांचा नाश होईल व साधूंचें धन हरण केलें असतां तें चो-रांस पचणार नाहीं. चोर वाट चुकून सांपडले जातील–असें तात्पर्य. 'कां न नीचोर–काननीं चोर' हें पंताचें आवडतें यमक आहे. [वनपर्व–अ० ११ गी० ५४.]	२७
११८	'[जेंवि] युव्या (तरुणास) वृद्धकलत्र (वृद्धाची तरुण स्त्री) [पहावया	

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.
	लागे=समाचार द्यावा लागतो] तेंवि मज हें पद (विराटराज्य) पहावया लागे (सांभाळावें लागतें). वृद्धाच्या तरुण स्त्रीचा **सर्वतोपरि समाचार** जसा तरुणास घेणें भाग पडतें तद्वत् ह्या विराटराज्याचें संरक्षण मलाच करावें लागतें. वृद्धकलत्राचा भार तरुणावर त्याप्रमाणें विराटराज्यश्रीचा भार मजवर पडतो. वृद्धाला स्वतः आपल्या स्त्रीचे मनोरथ पूर्ण करितां येत नसल्यामुळें तें काम जसें तरुणावर पडतें तद्वत् विराट हा केवळ नांवाचा राजा असून सर्व राज्यकारभार मलाच पाहावा लागतो असें कीचकाचें म्हणणें. वृद्ध स्त्रीची हातांतील मशालीची एके ठिकाणीं जी तुलना केली आहे ती फार समर्पक असून ह्या गीत्यर्धाचा त्यामुळें खुलासा होतो. 'पाणौ गृहीतापि पुरस्कृतापि स्नेहेन नित्यं परिवर्धितापि । परोपकाराय भवेदवश्यं वृद्धस्य भार्या करदीपिकेव ॥' वृद्धाची भार्या मशालीप्रमाणें परोपकारास कशी कारणभूत होते तें मार्मिक वाचकांस उघड करून सांगणें नकोच. ही शृंगारोक्ति ह्या प्रसंगीं कीचकास उत्तम रीतीनें शोभते. ही उपमा कालिदासाच्या समर्पक व मार्मिक उपमांच्या अगदीं तोडीची आहे.	२७
११९	हा कदलीचा दाखला अन्यत्रही आढळतो. [सभापर्व–अ० ४।९२, शांतिपर्व–अ० १।१८, आश्रमवासीपर्व–अ० ६।६१, ब्रह्मोत्तरखंड–अ० ३।६० व अध्याय ८।३८ आणि शिवरामायण–गीति २३.]	२८
१२०	उत्तरार्ध—भ्राता व दास हे दोघेही मनुष्याच्या अत्यंत रहस्यांतले समजून त्यांना देखील ही गुप्त गोष्ट सांगूं नका असें सैरंध्रीचें कीचकास म्हणणें. एकाच कुक्षींतून जन्मलेल्या भ्रात्यांमध्यें अत्यंत सौहार्द असणें अत्यंत साहाजिक, तसेंच त्या वेळेस दास लोकांला धन्याचीं गुप्तकामें करण्याचे प्रसंग पुष्कळ येत असल्यामुळें धन्याचें एखाद्या दासाशीं अत्यंत रहस्य असणें स्वाभाविक असून इष्ट होतें. धन्याची मर्जी संपादण्यासाठीं कुंटणपणाचीं कामें दास लोकांना करावीं लागत. आपल्या बंधूला सुद्धां ही गुप्त गोष्ट समजूं द्रेऊं नका असें द्रौपदीचें म्हणणें साहजिक आहे. पांडवांमध्यें सौहार्दभाव फार होता, तसाच कीचक व शतकीचकांचा असेल असें समजून द्रौपदीनें कीचकास रहस्यभेद बंधूशीं देखील न करण्याविषयीं अगत्याची सूचना केली आहे. 'या रहस्या (या गुप्त गोष्टीला) तिसरा भ्राता वा (किंवा) दास पात्र न हो (होवो)'=ही गुप्त गोष्ट तुमचा बंधु किंवा अत्यंत प्रिय दास ह्यालाही कळूं नये. ही गोष्ट षट्कर्णी होऊं नये असें सैरंध्रीचें कीचकास म्हणणें.	

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.
१४४	वासविवाययसा=वासवि=इंद्रसंबंधी, इंद्राचा. वायस=काक.	३४
१४६	ही भीमोक्ति मानावी. हिच्या आरंभीं 'हरिप्रसादानें' अशा अर्थाचें पद अध्याहृत समजावें म्हणजे झालें. भीमकर (पूर्वार्ध) भीमाचे (महादेवाचे) कर (हात), पक्षीं भीमाचा हात–असा अर्थ घेतला तरी चालेल.	३५
१५३	पूर्वार्ध—नसें दूर=मी दूर नाहीं, जवळच आहें–असाही अर्थ होईल.	
१५५	या वीरानें एकट्यानेंच चिता सेवणें बरोबर नाहीं; आपल्या संभोगेच्छेनें (स्वसंगकामें) हा मेला आहे, तेव्हां त्यावरेवर इलाही सहगमन करणें उचित कसें नाहीं? (अर्थात् उचित आहे–असें उत्तर.)	३६
१५८	पूर्वार्ध—हा कामी कीचक (लत्ता) न मारितां जरि मज वधिता तरि फार चांगलें झालें असतें. द्रौपदी आपले पतीस म्हणते:—कीचकास मारलें त्यापेक्षां त्याला जीवंत ठेवून मला मारिलें असतें तर आतां मला चितेवर घालण्यासाठीं कीचकाचे बंधू नेतेना, व दीनाप्रमाणें मी हांका मारिल्या नसत्या. मी जीवंत राहिल्यानें मजवर मोठें संकट आलें व मी हांका मारीत आहें.	
१६०	उत्तरार्ध—सिंह गजाला मारतो अशी प्रसिद्धि आहे, तिजवरून सिंह श्रेष्ठ गज हलका असा अर्थ निष्पन्न होतो. हलकट मनुष्यानें थोराच्या स्त्रीस गांजण्यास आरंभ केला तर त्याचें थोर मनुष्य चालूं देईल काय? थोर पुरुष आपल्या स्त्रीचे हाल हलकट मनुष्यानें केलेले पाहून स्वस्थ निजून राहील काय? अर्थात् नाहीं–असें उत्तर अपेक्षित आहे.	
१६१	हो! (श्रोते हो!) तेथें (भीम) प्राकारावरुनि निजवेषासह उडीला टाकी (आपणास कोणी ओळखूं नये म्हणून भीमानें आपला नेहमींचा जो बल्लभाचा वेष तो टाकिला आणि लागलीच तटावरून उडी टाकिली.) [पंतांनीं भीमाचें जागीं जिवाची कल्पना केली आणि द्रौपदीचे जागीं कुडीची कल्पना योजिली, अथवा नवरा हा जीव व स्त्री ही कुडी (शरीर) अशी कल्पना केली असें येथें समजावें.] जरि कुडी पतन लाहेल तरि लाहो–हें जीव कां म्हणेल? [अर्थात् म्हणणार नाहीं–हें या प्रश्नाचें उत्तर आहे.] (देह कोठेंही पडो किंवा त्याची स्थिति कशीही होवो, किंवा त्यास कशीही कष्टदशा प्राप्त होवो–अशी देहाची निष्काळजी ज्याप्रमाणें जीव कधींही करीत नाहीं, त्याप्रमाणें भीमानें द्रौपदीविषयीं निष्काळजी केली नाहीं. कुडी पडली तर पडेना, आपलें काय जातें–	

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.
	असें जीव कसें म्हणेल? वायकोचें कांहींका होईना असें न म्हणतां तिची हांक ऐकतांच भीम निघाला–असा भाव. येथें पूर्वार्धांत **सहोक्ति** अलंकार झाला आहे.	३७
१६२	पूर्वार्ध—याया त्या दुष्टांच्या जनु अंतःपूर्वपुरविलापाला=त्या दुष्टाच्या अंतःपुरांतील स्त्रीमंडळाच्या शोकाला जन्म देण्याकरितां–स्त्रीमंडळाला रडविण्याकरितां असा अर्थ करावा.	,,
१६३–१६४	यांचा अन्वय असाः—'वा! सुविरुदा केंवि विटलासि?' [असें] केशवास हसतीला (दोष देणारीला, निंदिणारी जी द्रौपदी तिला) सतीला शवासह जाळावयासि ते (उपकीचक) जों घेउनि गेले, तों तो (भीम) गर्जोनि म्हणेः–'गे! हा [मी] आलों, सर्व खळ मारितों, हे या राष्ट्रीं केवळ कंटक, जसे पर्थीं खळगे [तसे] न वरे.' पहिलें भाषण द्रौपदीचें प्रभूस, व दुसरें भीमाचें द्रौपदीस उद्देशून आहे. द्रौपदीनें या भाषणानें कृष्णाचें सोपालंभ स्मरण केलें आहे. द्रौपदीनें नेहमीं संकटसमयीं कृष्णास हांक मारिली अशी तिची भक्ति कृष्णावर होती व कृष्ण संकटसमयीं भक्तास सोडवितो अशी तिची पक्की खातरी होती व संकटांतून अनाथास सोडवावें असें कृष्णाचें विरुद आहे असें तिला वाटत असे. यावेळीं तिजला कीचकाचे बंधूंनीं धरून कीचकाचे प्रेतासह दहन करण्यासाठीं नेलें. असें संकट प्राप्त झालें तरि कृष्ण आपले विरुदास जागला नाहीं असें वाटून ती म्हणतेः–हे कृष्णा! तूं आपले विरुदास कधींच विटलास (कंटाळलास) असें माहीत नाहीं मग असें कां झालें? तेव्हां तूं कंटाळला असशील तर कधीं कंटाळलास–असा दोष कृष्णास लावितें. हंसणें याचे अर्थ–हास्य करणें, निंदा करणें, विनोदानें टोंचून बोलणें, शिव्या देणें, तुच्छ करणें असे अनेक आहेत. 'पीतों हें रक्त तुझें हांसत होतासि मज जसा भणगा । दुःशासना तसा तूं पुनरपि गौर्गा स्वआननें म्हण गा! ॥' [मोरोपंत–कर्णपर्व]	३८
१६९	अजान (अजाण, ज्यांचा पुराणेतिहासाशीं फारसा परिचय नाहीं असे अज्ञ लोक) देखील जर कीचकमातेला दुसरी रावणमाताच म्हणतील, तर कवि (ज्ञाते जन, पुराणेतिहासज्ञपुरुष) साध्वीकृष्णा ही दुसरी जानकीच होय, असें कां म्हणणार नाहींत? अर्थात् म्हणतीलच. अजान (अनभिज्ञलोक) कीचकवितीतें (कीचकमातेला) दुसरी पुष्पोत्कटाचि (रावणमाताच) गणितील (समजतील) [तसेंच] जी कृष्णा	

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.
	(सैरंध्रीचें रूप धारण केलेली द्रौपदी) तीतें (तिला) कवि जानकीच (सीताच) [असें] कां न म्हणतील? (कां म्हणणार नाहींत)? मूर्ख लोक कीचकमातेला रावणमाता समजतील तसेंच ज्ञाते पुरुष सैरंध्रीला ते जानकीच असें मानतील. पुष्पोत्कटेच्या पुत्रानें (रावणानें) पतिव्रता सीतेचा उपहास केला म्हणून तो सपुत्रबांधव मरण पावला, तद्वत् कीचकमातेच्या पुत्रानें सैरंध्रीचा अभिलाष धरिला म्हणून तोही सपुत्रबांधव मरण पावला. रावणाचा अंत सीतापतीच्या हातून झाला, तसाच कीचकाचा सैरंध्रीपति गंधर्व यांकडून झाला. तेव्हां कीचकमातेला पुष्पोत्कटेची व सैरंध्रीला जानकीची उपमा फार शोभते.	३८
१७३	उत्तरार्ध—पानवेलीला निरनिराळ्या प्रकारचें खत घालून कमवावें लागतें व त्याची जोपासनाही फार करावी लागते. जोपासनेच्या मानानें पानें अधिक चांगलीं मऊ होतात. दुसऱ्या ठिकाणचीं व रामटेकचीं पानें यांतील अंतर जोपासनेच्या व खताच्या मुळेंच पडलें आहे. तसा प्रकार मिरवेलीचा नाहीं. या वेलीस खतादिक उपचारांची अवश्यकता नाहीं. ही मलबारप्रांतीं आपोआप रानभर पसरलेली दृष्टीस पडते, परंतु तिच्या पानांचें मार्दव व सुरेखपणा हीं बाह्य साधनांनीं आणलेलीं नसतात. त्याचप्रमाणें भगवद्भक्ताचें यश आपोआप म्ह० साहजिकच परिस्फुट होतें (मिरवितें) तसा प्रकार इतर लोकांचा नाहीं.	३९
१७८	युगपत्=एकदम ['युगपदेकदा' इत्यमरः । युवंत्यस्मिन्काले इति युगपत्, गपत हा प्रत्यय । युगं पयते (गच्छति) अस्मिन् युगपत् ।]. 'पय गतौ.'	४१
१८२	शालि=भात, साळ, धान्यविशेष (श्रेष्ठ व रुचिप्रद धान्य.) नाचणी=नागली. हित=रुचिकर, सुखप्रद, फायदेशीर, गुणावह.	,,

---

अध्याय दुसरा.

६	हेरांनीं चित्त उदास न केलें=हेरांनीं शोध मनापासून केला, शोध करण्यांत हयगय केली नाहीं.	४३
१६	पूर्वार्ध—भलत्या-हें मरणाचें विशेषण केलें तरी चालेल. त्या तैशा धीरावीरा··· आधिस्तव (संकट प्राप्त झालें म्हणून) भलत्या (अनुचित,	

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.
	अयोग्य) मरणिं आवडि होईल काय? नाहीं. श्लाघ्य मरणाविषयीं त्या पांडवांस आवड होईल. इतर मरणाविषयीं होणार नाहीं.	४६
३०	सुशर्मा म्हणतोः—बहुधा (अनेक प्रकारांनीं) पीडुनि (पीडा देऊन) त्रिगर्तांच्या करा (करभाराला–त्रिगर्तांस अनेक शस्त्रेनें पीडा देऊन त्यांजपासून करभाराला) घेता (घेणारा) कीचक मेला. त्याचा (त्या कीचकाचा) आम्हा (आम्हा त्रिगर्तांला) [जेंवि] धाक (भय) तेंवि रात्रिंगर्तांचा (खळग्यांचा) पांथा न वहु (प्रवासी जनांस रात्रीच्या वेळीं खळग्यांचा जसा धाक वाटतो तसाच आम्हास कीचकाचा धाक वाटत असे–असें तात्पर्य.)	४८
३३	उत्तरार्ध–अंधारा (अंधाराला, काळोखाला) जैसा (ज्याप्रमाणें) निर्दीप (दीपशून्य) निलय (गृह) थारा (आश्रयस्थान होतो) [तैसा] आथिला (चिंतेला–अंतःकरणांत) थारा न हो (होवो, मिळो, अंतःकरणांत पांडवांचा संशय ठेवूं नका. आतां मनोव्यथा वाहण्याचें कारण नाहीं.)	४९
३५	सर्वासशूरपूर्णा=सर्व+आस+शूर+पूर्णा=सर्व आसांमध्यें (सोयऱ्यांमध्यें) जे हिंमतवहादर शूर होते त्यांनीं भरलेली अशी (सेना).	५०
४०	सुशर्म्यानें दक्षिणगोग्रहण केलें हें कळतांच, क्रोधाग्नीनें तप्तदेह अशा विराटानें रणाला न भीतां कवच चढविलें. हें त्याचें करणें योग्यच होय असें पंत प्रतिपादन करतातः—जसें तोकवच [प्रिय जरी असलें तरी] धीरा (शाहण्या मनुष्याला) भुलविणार नाहीं, तसेंच जीवित प्रियही असलें तरी तें वीराला भुलविणार नाहीं, तेव्हां विराट रणाला भ्याला नाहीं व रणासाठीं कवच घालून सिद्ध झाला हें ठीकच झालें. वीरास जीवित प्रिय आहे, तरी जीवित भिऊन युद्धास जाऊं नकों असें म्हणेल तर वीर तें भाषण ऐकणार नाहीं. जरी जीवित वीरा प्रियही असलें तरी तें त्याला भुलवील काय? (स्वकर्तव्यपराङ्मुख करील काय? भ्रमवील काय?–अर्थात् नाहीं हें उत्तर.) तसेंच तोकवच प्रियही असलें तरी तें धीरा भुलवील काय?–अर्थात् नाहीं हें उत्तर.	,,
४२	चवथा चरण—प्रवळांहीं [मत्स्यांहीं] अबळ मत्स्यसे सुभटांहीं भट नाहीं[-से] केले–असा अन्वय करून 'प्रबळ मत्स्यांनीं निर्बळ मत्स्य जसे नाहींसे (व्यसु) करावे तसे त्रिगर्तभट विराटाच्या सुभटांनीं नाहींसे केले (मारिले) असा अर्थ समजावा.	,,
४९	द्विज=(१) विप्र (मार्कंडेय) (२) क्षत्रिय (विराट). [द्विज= हें पद	

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.
	येथें दोन अर्थी योजिलें आहे. 'द्विजः स्याद्ब्राह्मणक्षत्रवैश्यदंतांडजेषु ना' इति मेदिनी.]	५१
६५	बोधीं=बोध केल्यानें. नव्हे=न होय. चपळ=कलुषित मनुष्य.	५६
६६	गोधनरूप जें यश तैं सोडवून (गाई परत आणून) आणि विजयोत्सवा पावूनि, तें रणाजिर वसविती (रणस्थानीं मुक्काम करिती, राहती) –असा भावार्थ. मूळांतही असेंच आहेः–'संग्रामशिरसो मध्ये तां रात्रिं सुखिनोऽवसन्.' ज्या वस्तूचा सिंहास अभिमान तें वस्तु वारणा (हत्तीस) कसें जिरेल? जिरणार नाहीं–हा भावार्थ.	

अध्याय तिसरा.

३४	सिंहा='सिंह' शब्दाची व्युत्पत्ति लक्षांत ठेवण्यासारखी आहेः–'हिनस्ति मारयतीति सिंहः। हृह हिसि हिंसायामित्यस्य प्रयोगः। हिंसेर्वर्णविपर्ययः। 'भवेद्वर्णागमाद्धंसः सिंहो वर्णविपर्ययात्। गूढात्मा वर्णविकृतेर्वर्णलोपात्पृषोदरम् ॥' [रघुवंश–स० २ श्लो० २७ चारित्रवर्धनकृत शिशुहितैषिणीटीका.]	६६
५२	बृहन्नडा म्हणतेः—सैरंध्रीकृत जें दुधासम स्तवन [तें मी] कज्जल कसें करूं?=सैरंध्रीनें जी दुधासारखी स्तुति केली तिला मी काळिमा कशी आणूं? [कज्जल–काजळ–काळें असतें] तिनें जी माझी निर्मल स्तुति केली ती मी काळी कशी करूं? रणांगणांत मजला जो अनुभव आहे व सारथ्यगुण आहे त्याजविषयीं माझी प्रशंसा सैरंध्रीनें केली व मी तुजबरोबर असल्यें म्हणजे तुला अपयश यावयाचें नाहीं असें सैरंध्री म्हणाली. त्या तिच्या बोलण्यास काळिमा कशी आणूं? तें तिचें बोलणें खोटें न पडावें यासाठीं, युद्ध न करतां, पळून परत जावें हें मला पसंत नाहीं, असें बृहन्नडा उत्तरास म्हणते., उत्तरार्ध—सन्मन अनृता (असत्याला) भीतें जसें समस्त वन कुऱ्हाडीस भीतें. अनृत [जसें] सन्मनास भय उत्पन्न करतें तसें अरण्यास कुऱ्हाड भय उत्पन्न करते.	६९
५६	शंकराच्या डमरूपासून सूत्रें निघालीं, त्यावरून व्याकरण झालें. भाषेचे नियम डमरूपासून उत्पन्न झाले, ह्या कथेकडे लक्ष आहे.	७०
६१	उत्तरार्ध—नमज्जन हो! (शरणागत जन हो!) ही अशी (अपयशीं कोणाला बुडूं देऊं नये अशी–पापीजनांला तारक अशा प्रकारची–) म-	

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.
	जनरीति (माझ्या भक्तांची पद्धती, पाप्याला मुक्त करण्याविषयीं माझेपेक्षांही माझे भक्त (उत्सुक आणि समर्थ होत) असें भगवान उपदेशी. माझ्या भक्तांची रीति अशी आहे कीं आपण तरून दुसऱ्यास तारावयाचें असें भगवान् श्रीकृष्ण सांगे.	७०
६८	चवथा चरण—'विराट घरीं नव्हता, किंवा घरीं नसावा, कोठें गेला असावा' इतकें येथें सांगावयाचें आहे, पण तें सरळ मार्गानें न सांगतां मुद्दाम वक्र तऱ्हेनें सांगितलें आहे. 'तो विराट कांहीं मेला नसावा, त्याला मसणांत नेलें नसावें, बापास मसणांत नेलें म्हणून पोर पुढें आला अशी गोष्ट नसावी' असें भाषण लौकिकमनुष्यस्वभावानुरूप योजिलें आहे. येथें दुसऱ्यास तुच्छ मानण्याचा आणि अपरोक्ष भाषणापेक्षां परोक्ष भाषणांत थोडी ज्यास अमर्यादा करण्याकडे प्रवृत्ति असते अशा प्रकारचा सामान्य मनुष्यस्वभाव दर्शविला आहे. 'तो' या पदानें विराट समजावा. कौरवमतें विराट सुशर्म्याच्या हातून मेला असावा म्हणून अशी उक्ति.	७२
८४	अर्धनारीनटेश्वर—अशी एक मूर्ति मौजे बेलापुर तालुके माळशिरस जिल्हा सोलापुर येथें आहे. हिचे पुढील बाजूस शंकराची मूर्ति आहे व मागील बाजूस पार्वतीची आहे. मूर्ति एकच परंतु समोरून पुरुषाची व पाठीमागें जाऊन मूर्तीकडे तोंड करून उभें राहिलें असतां स्त्रीची मूर्ति आहे असें दिसतें. उजवें अंग पुरुषाचें व डावें स्त्रीचें असें नाहीं.	७५
८९	असेल दिसतो तैसा—जैसा (बुळा) दिसतो तैसा (बुळा) असेल. नुरेचि=न उरेचि, जीवंत न राहे.	,,
११३	व्रत एक वर्ष आदरिला—येथें 'व्रत' शब्द पुल्लिंगी आहे. 'नियमो व्रतमस्त्री' इत्यमरः । व्रियते यद्वा व्रजंत्यनेन स्वर्गम् इति व्रतम् ।	७९
१२१	उत्तर म्हणतोः—हे पार्था! (अर्जुना!) वनसार्थाधिपापरिस (वनांत सांपडलेल्या व्यापाऱ्यांच्या काफल्याचा नायकांपेक्षां) मनांत बहु 'हाय' म्हणतों (मी मनांत फार तळमळतों, कारण तुला कोणी मदतगार नाहीं आणि त्यांतही शत्रूशीं प्रसंग पडला आहे. सार्थाधिपाला अरण्यांत कोणी सोबती नसावा तेव्हां तो जसें 'हाय' करतो त्यापेक्षां ज्यास्त मी 'हाय' करीत आहें. कदाचित् त्याला चोराशीं गांठ पडणार नाहीं, पण आम्हाला शत्रूशीं गांठ पडलीच आहे म्हणून मला मनांत ज्यास्त दुःख होत आहे.)	८२

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.
१२२	गुरुचा=द्रोण, सुरेश्वर, हरि, हर इत्यादि गुरुजनाचा [गीति १२४ पूर्वार्ध] या परीस=या गुरुप्रसादाहून कोण सहाय अधिक आहे? गुरुप्रसाद हाच मोठा सहाय होय [गीति १२३ उत्तरार्ध.]. गुरूची योग्यता सामान्य नाहीं:-'अज्ञानतिमिरांधस्य ज्ञानांजनशलाकया । चक्षुरुन्मीलितं येन तस्मै श्रीगुरवे नमः' ॥ देवलाच्या मतें बारा गुरु होतः-'आचार्यश्च पिता ज्येष्ठो भ्राता चैव महीपतिः । मातुलः श्वसुरस्त्राता मातामहपितामहौ । वर्णज्येष्ठः पितृव्यश्च पुंस्येते गुरवो मताः ॥.'	८२

अध्याय चवथा.

२	उत्तरार्ध—तो (शंखजनित नाद) जैसा कल्पांतीं (प्रलयकालीं) रुद्रदेवदत्त (महादेवानें दिलेला) दर (भय, त्रास) [तैसा] जना (मनुष्यांना) होय (दुःसह झाला.) 'दर'शब्द संस्कृतांत अस्त्री आहे.	८३
३४	विजय=अर्जुन. ['विजयः स्याज्जये पार्थे' इति मेदिनी. 'पार्थः किरीटी गांडीवी गुडाकेशो बृहन्नडा । अर्जुनः फाल्गुनो जिष्णुर्विजयश्च धनंजयः ॥ सव्यसाची सुभद्रेशो राधावेधी कपिध्वजः । बार्त्रघ्नश्चापि बीभत्सुः' इति त्रिकांडशेषः. [कांड २, क्षत्रियवर्ग, श्लोक ३९१-९२ पृ० १६.] परि साहसें विजया न [तरशील, अतएव] हें शील नसो, इतर शील असो-असा अन्वय. विजयाचा तुझ्याकडून पराभव होणें अशक्य असल्यामुळें, तुझें हें शील (अशा प्रकारचें साहसी वर्तन) नसो (नसावें तर) इतर शील (दुसऱ्या तऱ्हेचें म्हणजे आमच्या सगळ्यांच्या साह्याचानें भांडण्याचें वर्तन) असो (असावें).	८९
५६	यांतील दुर्योधनाच्या भाषणानें गीति १३-१६ यांतील भाषणही दुर्योधनासच अधिक शोभेल असें दिसतें. मूळांत जरी हें कर्णाचें भाषण म्हणून दिलें आहे तरी तें दुर्योधनाचेंच मानावें हें बरें. असें केल्यानें 'तेजोजननार्थ तसें [गीति १३-१६ पृ० ८५-८६] वदलों' या म्हणण्याची संगती चांगली जुळते.	९३
६५	उत्तरार्ध—सम रामाशीं व्हा=बारा वर्षें वनवास, एक वर्ष अज्ञातवास पांडवांनीं करावा म्हणजे त्यांचें राज्य स्वाधीन करूं असें पांडवांस कौरवांनीं वचन दिलें होतें तें वचन सत्य करा आणि एकवचनी (सत्यवचनी) जो राम त्याच्याशीं सम (रामासारखे योग्यतेचे) व्हा.	९५

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.
७५	धनंजया समहा कधीं पाहीन–द्रोण म्हणतो, धनंजया (अर्जुनास) समहा (उत्सवयुक्तास, जय प्राप्त झाला आहे ज्यास अशा अर्जुनास) कधीं पाहीन? शत्रूचा पराजय करून राज्य मिळविलें आहे असा त्यास कधीं पाहीन? स+मह=सहित+उत्सव=समह.	९६
८७	उत्तरार्ध—हो! (अहो!) विजय (अर्जुन) हांसे [व] मनिं म्हणे (म्हणाला):–'गोपसख्या! (हे गोपांच्या सख्या! हे गोपांच्या मित्रा कृष्णा!) मला (अर्जुनाला) [धेनु] कां बुझाल्या?' हें अर्जुनाचें स्वगत-भाषण आहे.	९८

अध्याय पांचवा.

८	उत्तरार्ध—इतरीं (अन्य प्रकारच्या, युद्धाशिवाय अन्य जातीच्या) गुरुकलहीं (गुरूशीं होणाऱ्या कलहांत). 'इतरीं' ह्याचें 'गुरुकलहीं' हें विशेष्य आहे. 'यासि'=द्रोणार्जुनकलहासीं–असा अर्थ हस्तलिखित प्रतींत आहे.	१०२
९	उत्तरार्ध—'नको' हें एकवचनी क्रियापद पार्थाचें द्रोणाच्या ठायीं असलेलें प्रेम दाखवितें.	१०२
१३	पूर्वार्ध—शरसागरीं (बाणसमुद्रांत) गुरु (द्रोण) तिमिंगिल (तिमिभक्षक असा) पळभरि होय. (द्रोणाचें वर्चस्व क्षणभर मात्र दिसलें) [त्यावेळीं] शिष्य तिमी (शिष्यरूप, अर्जुनरूप तिमिमासा हा) पळभरि कंप्र होय (क्षणभर कंपित झाला, चळचळ कांपूं लागला. द्रोणाचें तेज क्षणभर दिसलें, तेव्हा पार्थ कंप्र (कंपयुक्त) असा क्षणभर झाला, परंतु पुढें द्रोणाचा पराभव झाला. [कंप्र=कांपणारा; 'र' हा प्रत्यय कांहीं धातूंस लागतो:–नम् (लवणें) नम्र (लवणारा, दीन); कम् (इच्छिणें) कम्र (कामुक); हिंस् (मारणें) हिंस्र (मारणारा, घातुक); असे आणखी थोडे शब्द आहेत].	१३४
१८	उत्तरार्ध—'अजि! हे धृतराष्ट्रा! तो (द्रोणाचा) परिभवहि (पराभव कां होईना) [परंतु] तसाच अति अद्भुत व त्रिजगद्विस्मयकर [झाला]'. तो द्रोणाचा पराभवहि तसाच कांहीं विलक्षण होता कीं जगाला तो अति अद्भुत व विस्मयकारक वाटला.	१०५
२४	इंद्र शचीला म्हणतो:–जसे अर्जुनाचे भाते आहेत तसे द्रोणपुत्राचे नाहींत. द्रोणपुत्राचे भाते जर अक्षयकाय असते तर ते आकाशाला	

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.
	निरवकाश करून टाकते. द्रोणपुत्राचे भाते अक्षय्यकार्य नाहींत म्हणून नभाला निरवकाश करूं शकत नाहींत. अर्जुनाचे भाते मात्र अक्षय्यकार्य असल्यामुळें नभाला भरून टाकतात.	१०९
४३	उत्तरार्ध—हितुला=चित्ताला. 'हितुला म्हणजे हितकर्त्याला' असा इतरलिखित प्रतींत अर्थ दिला आहे.	११०
५१	कर्णाचा शोणाश्व नांवाचा बंधु होता, त्याचा वध अर्जुनानें केला, या गोष्टीस अनुलक्षून अर्जुन कर्णास म्हणतोः—तूं बढाई मारितोस पण तुजसमक्ष मी तुझा भाऊ मारिला तेव्हां त्यास कां तारिलें नाहींस? याकरितां तुझें दौलाचें भाषण जारविलासन्यायाचें आहे म्हणजे जार पुरुष विलासांत जसें हवें तसें बडबडतो त्यांत वास्तविक कांहीं नसतें; तें सर्व भाषण क्षणिक तसें खळरूपी जें तम त्याचा रवि म्हणजे नाशक तशा मजपुढें तुझें भाषण केवळ क्षणिक व मिथ्या आहे—असा भाव.	११२
६३	वासवा (इंद्राला) जसे (ज्याप्रमाणें) नग (पर्वत) [हूं म्हणती=होकार देऊन शरण येतात, प्रतीकार करीत नाहींत] [तसे=त्याप्रमाणें] त्या विजया (त्या अर्जुनाला) सर्व महारथ (सकल मोठे योद्धे) हूं म्हणती (प्रतीकार न करिती. सेवा करण्यास तत्पर असतात.) जेणें (ज्या अर्जुनानें) असुरगि[illegible] (असुरांचे पर्वत) पिष्ट केले (पराभूत केले) त्यास (त्या अर्जुनाला) ते (कौरव) गहूं तसे न? (कौरव हे गव्हांप्रमाणें पिष्ट करण्यास योग्य नाहींत काय? अर्जुनाला कौरव हे गव्हांसारखे पिष्ट करतां यावयाचे नाहींत काय?) किति (ते कौरव काय बापडे होत?)	११४

अध्याय सहावा.

१३	अर्जुन दुर्योधनाला म्हणतोः—[हे दुर्योधना! तूं] भयें (भयानें) कांपसि (तूं भयानें कांपत आहेस.) [थंडीनें कांपत नाहींस, कारण हा] हेमंतसमय नाहे (हा हेमंतांतील समय नाहीं कीं तुला थंडी लागून कांपरी सुटावी). [हा] रणसमय [आहे] तुझी आण (मी तुझी शपथ घेऊन सांगतों) मी सह[illegible] (अरोखर) धनंजय जरी आहें तरी कांहीं असितपथ (अग्नि) नाहीं, तर पार्थ (अर्जुन) आहें. [मी थंडीनें कांपतों म्हणून धनंजयाला (अग्नीला) पाठ दाखवितों—असें जर तूं म्हणशील तर तें तुझें म्हणणें खोटें आहे. तूं भयानें कांपत आहेस व मला पाठ दाखवीत आहेस—हें तुझें करणें क्षत्रियाला अनुचित होय—असा भाव.]	१२३

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.
२९	अर्जुन उत्तरास म्हणतोः—[माझ्या संमोहनास्त्रानें उत्पन्न केलेला] मोहाहि (मोहरूप सर्प–मूर्च्छारूप साप) ससुत गुरूस (पुत्रासह द्रोणाला, अश्वत्थाम्यासह द्रोणाचार्याला) डसला (अश्वत्थामा व द्रोण या दोघांसही मूर्च्छा आली.) मग न कां सुयोधना चावें? (मग दुर्योधनाला मूर्च्छा कशी येणार नाहीं? मग मोहरूप सर्प दुर्योधनाला कां चावणार नाहीं? अर्थात् चावेल–हें उत्तर. कौरवसैन्यांत सर्व नष्टसंज्ञ पडले आहेत व म्हणूनच क्रियारहित–निश्चेष्ट–आहेत असा भाव.) [या समयीं सर्व निश्चेष्ट पडले असतां] एक कबंधचि सक्रिय आहेत (आतां कबंध मात्र काय ते सक्रिय असे म्हणजे नाचत आहेत, कौरवसैन्यांत जागृत, व्यापारयुक्त असा कोणी नाहीं, फक्त कबंध नाचताहेत, त्यांस तुला भिण्याचें कारण नाहीं). हे (कबंध) सुयोध (उत्तम वीर) हर्षाया (हृष्ट व्हावे यासाठीं) नाचावे (नाचोत–नाचूंद्या. जे उत्तम योद्धे आहेत त्यांस आनंद व्हावा म्हणून या कबंधांना खुशाल नाचूंद्या, त्यांला भिण्याचें कारण नाहीं. संमोहनास्त्रानें शत्रुपक्षीय सर्व वीर नष्टसंज्ञ म्हणून क्रियारहित झाले आहेत. फक्त कबंध मात्र सक्रिय (नृत्यक्रीडायुक्त) आहेत; अस्मत्पक्षीय उत्तम वीरांला आनंद होण्यासाठी हे कबंधांना खुशाल नाचूंद्या.) असेंच वर्णन द्रोणपर्वात आहेः–'शतसंख्य नाचले त्या अद्भुत समरोत्सवीं भट कबंध.' [मोरोपंत–द्रोणपर्व–अध्याय १० गीति ४ पहा.]	१२७
३१	उत्तरार्ध—त्या काय उणें? (त्या पांचांजणांस वस्त्रास काय कमी आहे?) [ते पांचजण] कितिकां वसुवासें दान न देती [काय?]=ते शेंकडों लोकांना धनें आणि वस्त्रें अर्पण करीत नाहींत काय? [या भाषणांत त्या पांचांचा उपहास केला आहे, आपण नग्न राहून आपल्या नेसूंचें वस्त्र दुसऱ्यास देणें हें केवढें तरी धार्मिकपण! ही उपहासगर्भ ही उक्ति आहे.]	,,
६९	उत्तरार्ध—वादी (मंत्रज्ञ, मंत्रवादी, ज्याच्याजवळ स्तोत्र येतें तो) म्हणे (खचित म्हणेल):—मी (मंत्रज्ञ) रामरक्षा (रामरक्षास्तोत्र जपेन, रामरक्षामंत्राचा प्रयोग करीन) [व] बाधा न करविन (पिशाचबाधा नाहींशी करीन). येथें वादी=उत्तर; रामरक्षा=बृहन्नडा. बृहन्नडा जवळ असतां शत्रूपासून पराभव होण्याची भीति नको–असा भाव. जसा वादी रामरक्षेच्या योगानें पिशाचबाधा दूर करतो तसा उत्तर	

पद्य.	पद्यांचा अर्थ.	पृष्ठ.
	राजपुत्र बृहन्नडेच्या साहाय्यानें आपलें रक्षण करील, असा ह्याचा पूर्वार्धाशीं संबंध जाणावा.	१३३
८६	उत्तरार्ध—घटज (घटोत्पन्न अगस्त्यमुनि) सागरा सेवुनियां (सागराला तीन आचमनांनीं शुष्क करून) घटातें (स्वतःची उत्पत्ति ज्या घटापासून झाली त्यातें) ब्रह्मांडाधिकहि (ब्रह्मांडापेक्षांही मोठें) करि.	१३६

अध्याय सातवा.

८	इच्या क्षोभें हरमुरज अनाद [व] उदधि रिते व्हावे–असें जिचें सामर्थ्य तिच्यापुढें या कीचकांचा काय पाड आहे?	१४५
१६	उत्तरार्ध—दयादि सुकृतजय संपादुनी [तुम्ही पांडव] स्वपदीं वसा [व] मच्चित्तींही वसा–हे पांडव हो! तुम्ही विजयश्री, दया, पुण्यश्री इत्यादिक मिळवून आपल्या सिंहासनावर बसा आणि माझ्या विराटाच्या हृदयांतही वसा. [सुकृत=पुण्य.]	१४७
१७	वनौका=वन+ओ =अरण्य (पक्षी) उदक+गृह, यावरून वनौक म्हणजे समुद्र (...) अरण्यवास असा अर्थ, 'वन' हें पद श्लिष्ट समजून करावा. वायुनें न (मारुति) वनौका (समुद्राला) तरला (उल्लंघून गेला, परंतु तो एकटा गेला. अंगदादिक स्वजनासह गेला नाहीं) तूं धर्मराज वनौका तरलासें (अरण्यवासांतून पार पडलास) आणि तोहि स्वजनासह म्हणून तूंचि बळी (तूंच शक्तिमान्, समर्थ होस) तसा वायुनंदन बळी नाहीं असें येथें 'व्यतिरेका'लंकारानें दाखविलें आहे.	,,
२०	पूर्वार्ध—धन्यभाग्य भक्तनया (मोठ्या भाग्याची माझी कन्या उत्तरा) हे धर्मा! धनंजयवधू होवूं (अर्जुनाची स्त्री होवो) [असें तो विराट राजा] म्हणे.	,,
२६	'ध्या पदरीं' लोकप्रवादाची अनुकृति आहे, म्हणून हा 'लोकोक्ति' अलंकार	१४८

३. मूळाचें शुद्धिपत्र.

गीति.	अर्ध.	अशुद्ध.	शुद्ध.	पृष्ठ.
		अध्याय पहिला.		
९	२	म्हणे धर्म, 'खपदा	म्हणे, 'धर्म खपदा	३
२०	,,	स्मरादिनि खिलारी	स्मरादिनिखिलारी	५
३७	,,	फुगऊनि	फुगवूनि	८
६४	१	अन्या या,	अन्या, या	१५
७२	२	उपेक्षिता	उपेक्षितां	१७
७३	१	दिलें	दिल्यें	,,
८९	२	भेटें, ख्यालाचि, कांप दर	भेटे ख्यालाचि कांप, दर	२२
९०	१	भामिनी!···मांडिवरूनि	भामिनि!···मांडीवरूनि	,,
१०२	,,	वांचाया? हे स्त्री,	वांचाया, हें स्त्री	२४
,,	२	तोहि पती	तोहि पती,	,,
१०३	,,	धर्मे चार्थे च	'धर्म चार्थे च'	२५
१०४	१	मीहीं	मीहि	,,
१११	२	गरुड म्हणतां प्रतिभटा	गरुडें म्हणतां प्रतिभट	२६
११४	,,	निश्चय सद्धन करितां,	निश्चय, सद्धन हारतां	२७
१२५	१	म्हणऊनि	म्हणवूनि	२९
१४१	२	कलिमाजि	कलिमाजें	३३
१५८	१	वधितां–मारिता	वधिता–मारितां	३६
१५९	,,	नीच कास,	नीच, कास	,,
,,	२	मजसहित	मज सहित	,,
१६२	१	जणु अंतःपूर्व पुर विलापाला	जनु अंतःपुरपूर्वनिलापाला	३७
१८७	२	नेणे जन मन,	नेणें जन, मन	४२
१९०	१	तेथुनि	येथुनि	,,
		अध्याय दुसरा.		
८	१	मतिप्रति,	मतिप्रति	४९
३६	,,	सरला, जों	सरला जों,	५०
४०	२	जीवित वीरा;	जीवित, वीरा	५१

गीति.	अर्ध.	अशुद्ध.	शुद्ध.	पृष्ठ.
		अध्याय तिसरा.		
३०	२	स्वधीन तोकवच	स्वधीनतोकवच	६५
६२	,,	अरिनीं	अरिंनीं	७१
६३	,,	चा मागें	त्यामागें	,,
६४	,,	युद्ध न,	युद्ध, न	,,
९३	,,	वेची	वेची.'	७६
१११	१	गमन	नमन	७९
		अध्याय चवथा.		
२	२	रुद्रदेव दत्तदर	रुद्रदेवदत्त दर	८३
२८	१	ऐकेंचि	एकेंचि	८८
२९	,,	भगवदनुजा	भगवदनुजा	,,
३१	२	वीरधनंजय	वीर धनंजय	,,
३४	,,	विजया	विजया;	८९
४०	१	पावूनि सर्वमहितें	पावुनि सर्व महीतें	९०
५१	२	एकाशि	एकासि	९२
६१	१	शास्त्रमत	शास्त्रमतें	९४
६७	,,	नका	नको	९५
७५	२	धनंजयास महा	धनंजया समहा	९६
८७	,,	गोपसख्या	गोपसख्या !	९८
९२	,,	रिण	ऋण	९९
		अध्याय पांचवा.		
२९	१	आट	आठ	१०८
,,	२	अद्भत	अद्भुत	,,
३७	१	रिते	रिते	१०९
३९	२	धांवे कर्णगजावरि	धांवे कर्ण, गजावरि	,,
७०	१	तच्छत्रें	तच्छत्र	११७
		ज्यातें	ज्या, तें	,,

गीति.	अर्ध.	अशुद्ध.	शुद्ध.	पृष्ठ.
		अध्याय सहावा.		
१०	१	'करुनि बाहुशब्द अरे!	करुनि बाहुशब्द, 'अरे!	१२२
११	२	अपा! परत	अपापरत	१२३
१३	,,	नव्हे	नव्हें	,,
१४	१	म्हणता	म्हणतां	,,
२३	,,	लागले	लागले	१२५
२४	,,	खरथाही न	स्वरथाहि नर	,,
२९	२	सक्रिय	सक्रिय,	१२७
३१	१	गुरुसुतसुयोधनाचीं	गुरुसुतसुयोधनांचीं	,,
३३	,,	पांचोंचींही	पांचोंचींही	,,
,,	,,	कीर्तिसेंह वासें	कीर्तिसेंह वासें	,,
३८	,,	प्रभु,	प्रभु	१२८
,,	२	त्यांच्या	यांच्या	,,
४१	१	अभयदा...अपार्थका	अभयदा,...अपार्थका,	१२९
५१	,,	मत्स्यपुरा,...देशपथें	मत्स्यपुरा...देशपथें,	१३१
५८	,,	राधवा	राघवा	,,
६५	२	सुदेष्णेला जें,	सुदेष्णेला, जें	१३३
७८	१	तळपट	तळ पट	१३४
८७	२	'न जीविता	न, 'जीविता	१३६
९९	,,	कोणी	कोणीं	१३७
१०९	१	जें	जैं	१३९
११८	२	कायपुष्ट	पुष्टकाय	१४१
११९	,,	नुगतचि	नुगतचि,	१४२
		अध्याय सातवा.		
१६	२	मच्चित्तींही...दयादि	मच्चित्तींही,...दयादि,	१४७
२०	१	धर्मा!...होउ	'धर्मा!...होउ'	,,
,,	,,	धन्य भाग्य	'धन्यभाग्य	,,
२२	,,	प्रेमें	प्रेमें	,,
३२	२	बसा या न्या, व्हावे	वसाया न्या हावे	१४९

४. टीपांचें शुद्धिपत्र.

टीप.	अशुद्ध.	शुद्ध.	पृष्ठ.
१५	धर्मइळव्हलुनि···(हा) खपदा···भीमाची·····धर्म म्हणतो·····	भीम हळव्हलुनि···(हा धर्म) स्वपदा·····आपली·····भीम म्हणतो·····	३
६	खतंत्र स्त्री	स्त्री	४
४	ये इतरां	इतरां ये	६
६	हरि (मारुति) आणि हर (कृष्ण)	हरि (कृष्ण) आणि हर (शंकर-मारुति)	,,
१३	प्रख्यात. पुरुष	प्रख्यात पुरुष	,,
९	भीम युधिष्ठिरास विकीत असे	भीम विकीत असे	७
१८	या मरणा	या मरणा (संकटा, दुर्दैवा)	८
२३	तालमींत	सभेंत	,,
२८	(इतर सर्व मल्लांचीं	(इतर सर्व उभय पक्षाच्या मल्लांचीं	,,
,,	त्या मल्लांचा तोंडें	त्या प्रतिपक्षीय मल्लांचीं तोंडें	,,
२१	दुर्दशा प्राप्त झाली, असतां	दुर्दशा प्राप्त व्हावयाची असल्यास	९
३	नम्र करायास	[हें वाक्य रद्द]	११
१२	शंखाच्या	अंबुज=शंख. शंखाच्या	१२
७	देवि! (हे महिषी,	देवि! [हे महिषि!	१४
,,	असें म्हणूं देत नाहीं	असें वेद म्हणूं देत नाहीं	,,
५	यत्र गायात	यत्र गायंति	१५
,,	मध्य भागीं असतो	मध्यभागींच केवळ असतो	,,
,,	येथें सूर्यानें रक्षक धाडिला म्हणून 'सवितृमंडलस्थ' असें पद योजिलें आहे.	वर निर्दिष्टस्थानीं तो अतिरेकानें रहातो व तो सर्वत्र आहे या शास्त्रसिद्धांताचा अवलंब करून पंतांनीं येथें सूर्यमंडळांतही सूर्याची व्याप्ति कल्पिली व 'सवितृमंडलस्थ' असें पद योजिलें आहे.	,,
१९	या कीचकापाशीं	या=चला, निघा	,,
२४	वाईट स्वभावाच्या ठायीं	वाईट स्वभावाच्या मनुष्याच्या ठायीं	,,
१	तवकें=लागलीच	तवकें=रागानें	१६

टीप.	अशुद्ध.	शुद्ध.	पृष्ठ.
१८	चंचुचरण सित	चंचुचरण लोहित (लाल) व देह सित	१७
३	नीच कीचक	नीच दुःशासन	२३
६	तेल न पिते काय ?	तेल न पितां काय ?	२४
११	सलनिवृत्ति व्हावी	स्खलनिवृत्ति व्हावी	,,
३	तो (कीचक)	तो (रावण)	२५
,,	व तो कीचक	व तो रावण	,,
,,	द्रौपदी ही निस्तेज ... उंदिर	[हें शेवटचें वाक्य रद्द]	,,
१०	दुःसह.	दुःसह. हें कीचककृत घर्षणदुःख, विटंबनादुःख	,,
१४	अल्प (क्षुद्र)	अल्पा (क्षुद्रा)	२६
२१	ज्या वेळीं	काल ज्या वेळीं	२७
,,	कीचकानें द्रौपदीस	या कीचकानें तुला (द्रौपदीस)	,,
११	आपल्या संकेताला	आपल्या संकेताला जाणण्याला	२८
६	अतिच असे अप्रकृत	अहित्व असे अप्रकृत	३०
२	कलियुगांत	भांडणांत, कलहामध्यें	३३
७	समजलें तरि चालेल.	समजलें तरि चालेल. कारण नसतां, करितां इत्यादि रूपांतच संकेतार्थबोधक शक्ति आहे.	३४
९	अर्थ (विष्कंकर)	अर्थ (निष्पुत्र)	,,
१	नुकसानीच्या मूळ कारणाला	नुकसानींच्या	३५
२	जिच्या	आपल्या	३६
६	जाणो	जन्म, उत्पत्ति	३७
२	टीप दुसरी रद्द समजावी		३८
९	कांटे.	कांटे, क्षुद्र शत्रु	,,
२२	जातो	जातों	३९
१०	व्रजराज	व्रतराज	४०
२३	गीति आहेत	गीती आहेत	४२
१५	दुर्योधनाचे	कीचकाचे	४३
,,	पांडव	त्रिगर्तादिक	,,
२	मतिप्रति	तुम्ही ज्ञाते मतिप्रति	४४

टीप.	अशुद्ध.	शुद्ध.	पृष्ठ.
२	योग्य तुम्ही	योग्य	४४
३	ते ज्ञानी (विचारशील)	हे	,,
२	मरहट्ट (मारवाडी)	मरहट्टी (मराठी)	४५
३	खपर [illegible] होय	खपरकायहोम	४६
१	अजा	अज	४७
१५	ओळखवत नाहीं	ओळखवत नाहींत	,,
८	दूतश्रेष्ठ चरप्रवरलक्ष	चरप्रवरलक्ष	४८
२१	ओष्ठातें	ओष्ठार्तें	५०
४	हा पाद सुभाषितरूप आहे	[हा भाग रद्द]	५१
२०	१५ हे भगिनि उत्तरे !	२० हे भगिनि उत्तरे !	६२
६	इह आणि	इह + अमुत्र=या आणि	६४
३	चमकता	चमकत	६७
२७	अपकीउर्तीच्या	अपकीर्तीच्या	७२
२६	राक्षसांचें	रक्षस्+आयु+धक्+रामा=राक्षस+ जीवित+दहन करणाऱ्या+रामाला=राक्षसांचें	७६
२६	विराटास	वैराटिस	७८
६	इंद्राज्ञा	इंद्राज्ञा [वनपर्व अध्याय ३।७।]	७९
१५	दर्शनीय.	दर्शनीय, प्रत्यक्ष येऊन	८१
११	या अर्जुनाहून	या प्रसादापरिस	८२
६	महादेव	महादेवानें दिलेला	८३
७	दिले.....तो (रुद्रदेव)	भय, त्रास	,,
२	जे गज ते बहुधा	जे बहुधा	८४
,,	ते दिग्गज	ते गज बहुधा दिग्गज	,,
२०	सेवीत नाहीं	शिवत नाहीं	८९
४	(धर्म, अर्थ, मोक्ष आणि काम)	(धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष)	९१
१८	दिवस, दिवसाचा अंश	दिवस.	९३
२१	मोठा	उत्सवयुक्त	९६
१५	न सोसेनासा	सोसेनासा	९७
३	त्याकडे	त्यांकडे	९९
१८	कांहीं कविताकुसमें	कांहीं कविताकुसुमें	१००

पद्य.	अशुद्ध.	शुद्ध.	पृष्ठ.
४	एकदा	एखादा	१०१
२४	या कुरुकलहाला	या युद्धरूप गुरुकलहाला	१०२
१	करसंधानाचें	शरसंधानाचें	१०८
,,	रत मिळालीं	परत मिळाल्हीं	,,
६	धम	धर्म	१०९
१३	यमदंड.	यमदंड मला दाखवूं नको	,,
३	कर्ण हाच गज त्यावर	जसा हरि गजावरि तसा कर्ण धांवे	१११
५	अर्थ्य, न्याय	अर्थ्य, न्याय्य	११२
११	शसर्योंववयोस्तथा	शसर्योंववयोस्तथा	,,
१	[…अध्याय ४ गीति ९५ पहा]	[…अध्याय ४ गीति ९४ पहा]	११३
३	तच्छत्रें (त्या भीमाचीं छत्रें)	तच्छत्र (त्या भीमाचें छत्र]	११७
,,	हा छत्रांच्या पांढरेपणापेक्षां	हा छत्राच्या पांढरेपणापेक्षां	,,
,,	तें सत्सुतकृतनिजपूर्वजलंघन	ते तत्सुतकृतनिजपूर्वजलंघन	,,
१	नदीज.	नदीज आपगेचा (गंगेचा) पुत्र= आपगेय भीष्म	१२०
२	आपगेचा (गंगानदीचा) पुत्र भीष्म	[हा मजकूर रद्द]	,,
११	प्रसुतसमय हा हेमंताचा	प्रस्तुत समय हा हेमंताचा	१२३
१९	स्वरथाही शिवों न दे	स्वरथाहि नर शिवों न दे	१२५
२५	द्रोणप्रिया शिष्य	द्रोणप्रियशिष्य	,,
१०	ये (येवो)	यो (येवो)	१२६
१९	सुगंधानें	वस्त्रानें	१२७
२०	उत्तररूप शेला पसरला	उत्तराला शेला पसरला	१३२
,,	उत्तररूप शेला पसरून	उत्तराला शेला पसरून	,,
१८	माझा सोंकट्यांचा पट	माझ्या सोंगट्यांचा पट; माझें सोंगट्या ठेवण्याचें पात्र (भाजन =भांडें)	१३४
१७	मांडीस	मांडीवर, मांडीवर बसण्यास	१३५
१५	धना	धनाला	१३९
१२	शरीरानें पुष्ट	पुष्टशरीर	१४१
१४	कामां नये	कामा नये	१४२
२	तो सुरस दिसत नाहीं	[हा भाग रद्द]	१४९

00058215

Digitized with financial assistance from

Ms.Swati Thakar

on 13 March, 2020